# मोठ्यांच्या मुलाखती

लेखक
ह. वि. देसाई

किंमत रु. ३-८ ]

[ ऑक्टोबर १९४०

६०८०

मुद्रक
आर. एस. गुर्ते,
मुंबई वैभव प्रेस, सँढर्स्ट रोड,
गिरगांव–मुंबई नं. ४

प्रकाशक
शेठ हिरजी मोहनजी
शंकरबारी लेन, लोहाणा सॅनिटरी,
ठाकुरद्वार, मुंबई २

माझ्या गुणदोषांकडे दुर्लक्ष करून पित्याच्या अंतःकरणानें
माझ्यावर प्रेम करणारे, वृत्तपत्रव्यवसायाचा मला मार्ग
दाखवून त्या व्यवसायांत कायम टिकविण्यासाठीं
सर्व परीनें सहाय्य अन् प्रोत्साहन देणारे
माझे मानलेले वडील

**मामा वरेरकर**

यांस—

# भूमिका

१९३४ सालीं ' विहार ' साप्ताहिकाचा सहसंपादक या नात्यानें काम करीत असतांना मी कै. बापूसाहेब पेंढारकर यांची पहिल्यानें मुलाखत घेतली. अन् त्यानंतर कांहीं कालानें इटालियन नाटककार पिरॅन्डेलो याची एका लेखकानें घेतलेली मुलाखत माझ्या वाचनांत आली. ती मुलाखत त्या लेखकानें इतक्या कलात्मकतेनें लिहिली होती, कीं त्या मुलाखतींत त्या लेखकानें पिरॅन्डेलो यांच्या वाङ्मयावर अन् जीवनावरही प्रकाश पाडला होता. आपणही अशाच कांहीं मुलाखती घ्याव्या अशी त्यावेळीं मला साहजिकच इच्छा झाली. पण बरींच वर्षे तो योग आला नाहीं. त्यानंतर १९३७ सालीं त्र्यं. वि. पर्वते यांनीं 'चित्रा' साप्ताहिकांत मुलाखती सुरू केल्या अन् 'आशा' साप्ताहिक सुरू झाल्यानंतर कांहीं महिन्यांनीं अनंत काणेकर यांनीं मुलाखती घेण्याची कामगिरी माझ्यावर सोंपविली. प्रस्तुत पुस्तकांतील पहिल्या भागांतील ज्या दहा मुलाखती आहेत त्या मुलाखतींची कल्पना अनंत काणेकर यांची आहे. ' राजकारणाखेरीज जीवनांतील इतर प्रश्नांकडे मी कसा पहातों ? ' या शीर्षकाखालीं या मुलाखती घेण्यांत आल्या. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची ती व्यक्ति ज्या विषयांत तज्ज्ञ असेल किंवा तिचा जो व्यवसाय असेल त्या संबंधीं कांहींही प्रश्न विचारायचे नाहींत असें आम्हीं पहिल्यानें मुलाखतीचें स्वरूप ठरविलें होतें. डॉ. मुळगांवकर यांचा डॉक्टरी व्यवसाय, खेर, डॉ. आंबेडकर, बॅ. जमनादास मेहता प्रभृतींचा

राजकीय व्यवसाय अन् मतें, प्रो. कर्वे यांचीं लैंगिक विषयावरील मतें जगजाहीर आहेत. तेव्हां त्यांच्या या जाहीर व्यवसायासंबंधीं अगर मतांसंबंधीं कोणताही प्रश्न न विचारतां त्यांच्या खाजगी जीवनावर, आवडत्या विषयांवर अन् छंदांवर प्रकाश पडेल असे मी प्रश्न विचारले. अर्थातच कांहीं बाबतींत मला प्रत्येकाला ठराविकच प्रश्न विचारणें भाग पडलें. एकाद्या प्रश्नावर अनेकांचीं कोणतीं मतें आहेत हें समजून घेण्यासाठीं मी कांहीं प्रश्न पहिल्या विभागांतील सर्वच व्यक्तींना विचारले आहेत. गांधीवाद, रशियन वाङ्मय अन् रशियांतील विवाह-विषयक कायदे या संबंधींचे प्रश्न सर्वांना विचारण्यांत माझा असा हेतु होता, कीं प्रत्येकाचीं मतें अन् आवडी-निवडी वाचकांना समजून घेण्याची संधि मिळावी.

वृत्तपत्रव्यवसायांत मुलाखतीचा प्रकार केवळ जरूरीमुळें निर्माण झाला आहे. कित्येक पुढारी, ग्रंथकार अन् कलावन्त यांचीं मतें किंवा लेख वाचण्याची वाचकांना उत्कट इच्छा असते. पण या त्यांच्या अपेक्षा पुरविणें संपादकांना कठीण जातें. याचें कारण असें, कीं कित्येक पुढारी अगर कलावन्त यांना लेख लिहिण्याची सवड अगर संवय नसते. त्यामुळें लेख लिहून देण्यापेक्षां संपादकाशीं अर्धा पाऊणतास बोलत बसणें कुणाही पुढाऱ्याला अगर कलावन्ताला सर्व दृष्टींनें सोईचें वाटतें. अन् त्यामुळेंच मुलाखतीच्या प्रकाराला जास्त महत्त्व आलें आहे. मो. ग. रांगणेकर यांनीं मुलाखतींचा हा प्रकार फार कलात्मकतेनें हाताळला आहे. त्यांनीं जशा मुलाखती घेतल्या आहेत त्याचप्रमाणें अनेक व्यक्तींशीं चर्चा करून चर्चित विषयावरील त्या व्यक्तींचीं मतें लेखरूपानें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत.

एथिल मॅनिन या लेखिकेनें ' Confessions and Impressions ' या आपल्या आत्मचरित्रपर ग्रंथांत कांहीं मुत्सद्दी, ग्रंथकार अन् कलावन्त यांचीं कलात्मकतेनें स्वभावचित्रें रेखाटलीं आहेत. अलिकडे मराठी वृत्तपत्रव्यवसायांतही अशा प्रकारच्या स्वभावचित्रांना महत्त्व येत चाललें आहे. पण माझ्या मतें मुलाखतीपेक्षां स्वभावचित्रें रेखाटणें जास्त कठीण आहे. कारण मुलाखतींतून जें व्यक्तिदर्शन घडतें तें त्या व्यक्तीच्या उत्तरांतून प्रतीत होत असतें. पण स्वभावचित्रांचें तसें नाहीं. स्वतंत्रपणें अन् यशस्वी रीतीनें स्वभावचित्र रेखाटायचें झालें तर त्या व्यक्तीच्या विचारांशीं अन् जीवनाशीं लेखकाला समरस व्हावें लागतें. त्यासाठीं दीर्घ व्यासंगाची अन् अवलोकनाची जरूरी असते. या दृष्टीनें विचार केला तर मराठी वृत्तपत्रांत ' विविधवृत्ता 'चे 'सत्यग्राही ' ( चं. वि. बावडेकर ? ) यांनीं यशस्वी रीतीनें अशीं कांहीं स्वभावचित्रें रेखाटलीं आहेत.

प्रसिद्ध अन् लोकप्रिय पुढारी अगर व्यक्ति यांचें वृत्तपत्रकाराला जितकें विविध दर्शन होतें तितकें कुणालाच होत नाहीं. विविध व्यक्तींच्या स्वभावाच्या अन् जीवनाच्या अभ्यासामुळें वृत्तपत्रकार मनानें अन् वृत्तीनेंही मूर्तिभंजक होतो. विभुतिपूजेला त्याच्या जीवनांत स्थान राहात नाहीं. म्हणूनच पूर्वपरिचय नसतांही वृत्तपत्रकार वाटेल त्या पुढाऱ्यावर प्रश्नाचा भडिमार करीत असतो. प्रे. रूझवेल्ट, पं. जवाहरलाल नेहरू प्रभृति पुढारी ज्यावेळीं मुलाखत देतात त्यावेळीं त्यांच्याभोंवतीं गोळा झालेल्या वृत्तपत्रकारांपैकीं एकादाही वृत्तपत्रकार त्यांच्या प्रत्यक्ष ओळखीचा नसतो. पण जणुं काय आपण आपल्या एकाद्या पूर्वपरिचयाच्या मित्राजवळ बोलत आहोंत अशा आत्मविश्वासानें पत्रकार त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार करीत असतात. पण वृत्तपत्रकार जितक्या स्पष्टपणें अन् निःसंकोचपणें प्रश्न विचारूं शकतात तितक्याच निःसंकोचपणानें प्रसिद्ध व्यक्ति तत्कालिन विषयासंबंधीं मुलाखत नसली तर उत्तरें देण्यास कचरतात असा माझा अनुभव आहे. कारण आपलें राजकीय किंवा सार्वजनिक जीवन अन् खाजगी जीवन हीं अगदीं भिन्न आहेत; तेव्हां खाजगी जीवनाला सार्वजनिक महत्त्व देण्याचें कांहीं कारण नाहीं अशी त्यांची भूमिका असते. या त्यांच्या भूमिकेचा विचार करूनच वृत्तपत्रकाराला त्यांच्या खाजगी जीवनासंबंधीं संयमी वृत्ति धारण करून प्रश्न विचारावे लागतात. अन् हीच वृत्ति कायम ठेवून मी या पुस्तकांतील मुलाखतींत प्रश्न विचारलेले आहेत.

प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं मुलाखतींत विस्कळितपणाचा दोष दिसून येतो त्याचें कारण अत्यंत घाईनें त्या मुलाखती लिहिल्या गेल्या आहेत. अन् घाईनें—धांदलीनें काम करणें ही गोष्ट वृत्तपत्रव्यवसायांत अगदीं अपरिहार्य होऊन बसली आहे. Lafcadio Hearn या लेखकानें आपल्या एका ग्रंथांत वाङ्मय आणि वृत्तपत्रीय वाङ्मय यासंबंधीं असें मत व्यक्त केलें आहेः—

"I cannot recommend journalism as a medium of expression to literary students—at least, not as a regular occupation. For journalism cannot wait, and the best literature must wait.....I do not doubt your powers to please the public, to excite their emotions, to strengthen their best sentiments. But if you ask me whether I would call this

work literature, I should answer "No; that is journalism. It is work which has been quickly, and therefore imperfectly done. It is only the ore of literature, it is not literature in the true sense."

प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या भागांतील मुलाखती 'आशा' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. अन् दुसऱ्या, तिसऱ्या अन् चौथ्या भागांतील मुलाखती 'पूर्णिमा' साप्ताहिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. कै. बापूसाहेब पेंढारकर यांची मुलाखत 'विहार' पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. या सर्व पत्रांच्या चालकांनीं मुलाखती पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास मला परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. त्याचप्रमाणें 'धनुर्धारी' अन् 'यशवन्त' चे संपादक प्रभाकर पाध्ये यांनीं विस्तृत प्रस्तावना लिहिल्याबद्दल अन् आर्टिस्ट कामत यांनीं नव्या पद्धतीनें मुखपृष्ठ तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

गोविंद भुवन, शिवाजी<br>पार्क, दादर<br>२७-१०-४०.

ह. वि. देसाई

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# प्र स्ता व ना

मराठी प्रकाशनाच्या इतिहासांतील एक खुणेचें पान, असें पर्वते यांच्या 'मीं घेतलेल्या मुलाखती' या पुस्तकाचें वर्णन मी एकदां केलें होतें; कारण या पुस्तकाच्या प्रकाशनानें पर्वते यांनीं मराठी वाङ्मयांत एक नवें दालन उघडलें. ह. वि. देसाई यांचें 'मोठ्यांच्या मुलाखती' हें पुस्तक पर्वत्यांच्या पुस्तकाच्या पावलावर पाऊल टाकून येत असल्यामुळें त्याचेंहि वर्णन तसेंच करावयास हरकत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, मुलाखतीचा प्रकार या दोघांनीं मराठींत अगदीं प्रथम आणि नव्यानें सुरू केला. मुलाखती ही चीज मराठी वृत्तव्यवसायाला नवीन नाहीं. परंतु त्या साक्षेपानें गोळा करून पुस्तकरूपानें ग्रंथवाङ्मयाच्या सदरांत टाकल्याचीं हीं पहिलींच उदाहरणें असावींत.

पर्वते यांच्या पुस्तकाचें उत्साहानें स्वागत झालें, आणि अगदीं तसेंच आणि त्याच धर्तीचें हें नवें पुस्तक दुसरा एक प्रकाशक उत्साहानें प्रकाशित करीत आहे, यावरून मुलाखतींच्या प्रकाराला मराठींत सन्मानाचें स्थान प्राप्त झालें आहे हें सिद्ध होतें. आमच्या वृत्तव्यवसायाच्या बदललेल्या स्वरूपाचें हें द्योतक आहे. पहिल्या महायुद्धापूर्वींचीं आपलीं वर्तमानपत्रें हीं मुख्यतः वृत्तपत्रें नसून मतपत्रें होतीं. संपादकाच्या भरवशावर त्या पत्रांचें महत्त्व अवलंबून होतें. बातमीबद्दलची नैसर्गिक आवड वर्तमानसारावर भागवून वाचक, त्या वेळीं, संपादक काय म्हणतो याकडे अधिक लक्ष देत असत. महायुद्धानंतर वाङ्मयाप्रमाणें वृत्त-

लेखनावरहि पाश्चात्य प्रवाहांचा परिणाम झाला, आणि वर्तमानपत्रांत संपादकाच्या निवेदनापेक्षां बातम्यांकडे वाचक अधिक आस्थेनें पाहूं लागले. ( वृत्तपत्रांतील अग्रलेखांचें महत्त्व कमी व्हाव-याचें हें कारण आहे. ) एखाद्या विवक्षित विषयाबद्दल समाजांतील प्रमुख व्यक्तीचें मत हें देखील एक वर्तमानच आहे, व म्हणूनच मि. बेव्हर्ली निकोल्स यांनीं, Journalism now-a-days consists more in making other people say things than saying them yourselves अशा अर्थाचे उद्गार एकदां काढले. वृत्तपत्रांच्या या बदलत्या स्वरूपामुळें पूर्वी टिळक–आगरकरादि संपादकांच्या अग्रलेखांना मराठी वाङ्मयांत जसें चिरकालिक स्वरूपाचें स्थान प्राप्त झालें तसेंच कांहींसें यापुढें मुलाखतींना होईल असा अंदाज करावयास हरकत दिसत नाहीं.

कोणत्याहि विषयावरील एखाद्या प्रमुख व्यक्तीचें मत मिळविण्याचा मुलाखतीसारखा सोपा मार्ग नाहीं. सर्वच मोठ्या व्यक्तींचे लेख मिळविणें आणि मिळाले तरी ते सारे छापणें मोठमोठ्या मातबर संपादकांनाहि शक्य होणार नाहीं. या व्यक्तींना देखील हा मुलाखतीचा मार्ग सोईचा वाटतो. एखाद्या विषयावर मत व्यक्त करावें असें त्यांना वाटलें तरी त्यांपैकीं सर्वांनाच लेखन साधत नाहीं. आणि साधलें तरी तेवढी फुरसत नसते. तेव्हां मुलाखतीचा मार्ग संपादक आणि सदर्हू व्यक्ति – दोघांच्याहि सोईचा आणि दोघांनाहि समाधान देणारा आहे.

मुलाखतीचा प्रकार वृत्तलेखनासाठीं अस्तित्वांत आला असला तरी तो ललितलेखना-चाच एक प्रकार आहे. यशस्वी मुलाखत तीच म्हणतां येईल कीं जी वृत्तलेखन आणि ललितलेखन या दोनहि कसोटींस उतरते. वृत्तलेखन आणि ललितलेखन यांमध्यें मी केलेला हा फरक कित्येकांना चुकीचा वाटतो. ज्याला आपण वर्तमानपत्री लिखाण म्हणतों त्याच्या स्वरूपाकडे जरा खोल नजरेनें पाहिलें म्हणजे मी म्हणतों तो फरक स्पष्ट होईल. समजा, शत्रूच्या विमानांनीं एखाद्या इमारतीवर बॉम्ब टाकला, तर तो केव्हां टाकला, किती विमानांनीं टाकला, त्यांना प्रतिकार कितपत झाला, किती नुकसान झालें, कोणी दगावलें का, संरक्षणाची काय व्यवस्था झाली, व एकंदर गडबड कशी उडाली याचें अचूक व मुद्देसूद वर्णन दिलें कीं तें वृत्तलेखनास पुरे होईल. परंतु ललितलेखक त्या बॉम्बफेकीचें वर्णन असें करील कीं वाचकालाहि त्या बॉम्बच्या स्फोटाचा भयानकपणा जाणवावा. थोडक्यांत म्हणजे वाचकाला त्या बॉम्बफेकीचा प्रत्यय आला पाहिजे. कांहीं दिवसांपूर्वी, कलेच्या स्वरूपाबद्दल, अनंत

काणेकरांशीं वाद करतांना, मीं असें म्हटलें होतें कीं, जीवनाची अनुभूति देणें हेंच ज्या अर्थी कलेचें खरें कार्य आहे त्या अर्थी 'श्रेष्ठ कलाकृति जीवनावर नवा प्रकाश टाकते' असें जें काणेकर म्हणतात तें बरोबर नाहीं; 'श्रेष्ठ कलाकृति जीवनाचा नवा प्रत्यय देते' असेंच म्हटलें पाहिजे. त्यावेळीं 'प्रत्यय' आणि 'प्रकाश' यांमध्यें मीं जो फरक केला तो किती महत्त्वाचा आहे हें वृत्तलेखन आणि ललितलेखन यांमधील फरकाचा विचार करतांना ध्यानांत येईल. उपरोक्त बॉम्बफेकीवर वृत्तलेखनानें प्रकाश पडेल, पण तिचा प्रत्यय आणून देण्याचें सामर्थ्य त्या वृत्तलेखनांत नसलें तर त्याला ललितलेखनाचा दर्जा कधींहि प्राप्त होणार नाहीं. हाच ललितलेखन आणि इतर प्रकारचें लेखन यांत फरक आहे. लेखन म्हटलें कीं त्यांत लालित्य आलेंच, असा आग्रह धरला तर विधवाविवाहमंडळाच्या अहवालापासून चेम्बर ऑफ कॉमर्सच्या पत्रव्यवहारापर्यंत सर्व लिखाणाचा समावेश ललितलेखनांत करावा लागेल!

अर्थात् वृत्तलेखन आणि ललितलेखन यांमध्यें अपरिहार्य विरोध असतो असें मला म्हणायचें नाहीं. सारेंच वृत्तलेखन ललित नसतें एवढेंच मला म्हणावयाचें आहे. किंबहुना वृत्तव्यवसायाचा आधुनिक विकास कांहीं दृष्टींनीं लालित्याला मारकच ठरतो. वृत्तव्यवसाय हें आधुनिक जीवनांतील धांदलीचें मूर्तिमंत उदाहरण आहे; व म्हणून, वृत्तवाङ्मयाचें वर्णन माडखोलकरांनीं 'धांदलें वाङ्मय' असें केलें होतें तें मला अगदीं समर्पक वाटतें. वृत्तलेखनावर वेळेचें आणि जागेचें जबरदस्त बंधन असतें. शिवाय त्यांत प्रामाणिकपणाचा आविष्कारहि अनिर्बंधपणें नेहमींच होऊं शकत नाहीं. वृत्तलेखन करणाऱ्या लेखकास त्याच्या वृत्तपत्राच्या नानाविध संबंधांचें अवधान राखावें लागतें. मुलाखत घेणाराचें उदाहरण हवें असलें, तर ज्या व्यक्तीची मुलाखत त्यानें घेतली तिचे आलेले सारेच अनुभव खुल्या दिलानें सांगून टाकण्यास तो मोकळा नसतो. एका दृष्टीनें आपल्या साऱ्याच जीवनक्रमाबद्दल असें म्हणतां येईल. आयुष्यांत मनुष्याला स्वतःचे मन मारून व इतरांशीं समेट साधूनच पुष्कळदां वागावें लागतें. पण जीवनांतील प्रतारणेचा मिस्किल विलास वृत्तव्यवसायांतच अधिक आढळतो.

एखाद्या व्यक्तीची मुलाखत घेतांना लेखकाला विचार-विकार-भावनांचा जो कांहीं प्रत्यय आला तो प्रत्यय वाचकालाहि आला, थोडक्यांत म्हणजे मुलाखत देणारी व्यक्ति वाचकापुढें शब्दरूपानें उभी झाली, त्या व्यक्तीच्या सान्निध्याचा प्रत्यय वाचकाला मिळाला

तरच ती मुलाखत ललित लेखनाच्या दृष्टीनें यशस्वी ठरते. हीच ललित लेखनाची कसोटी टॉल्स्टॉयप्रभृति विचारवंतांनीं सांगितली आहे.

टॉल्स्टॉय यांच्या विवेचनाच्या अनुरोधानें मी कलेच्या स्वरूपाची थोडी चर्चा येथें करूं का ? टॉल्स्टॉयनीं कलेची व्याख्या अशी सांगितली आहे :—

Art is a human activity consisting in this, that one man consciously by means of certain external signs, hands on to others feelings he has lived through, and that others are infected by these feelings and also experience them.

स्वतःच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या कल्पना, भावना अगर विचारलहरी एखाद्या दृश्य कृतीच्या द्वारें इतरांच्या मनांत बुद्धिपुरस्सर उत्पन्न करणें याला टॉल्स्टॉय कला म्हणतात. निवेदन ( communication ) हें कलेचेंच नव्हे तर कलावंताचें ध्येय ते मानतात, हें यावरून स्पष्ट होईल. मला स्वतःला हें विवेचन पूर्णपणें मान्य नाहीं. कोणत्याहि कलाकृतीचा परिणाम रसिकावर टॉल्स्टॉय म्हणतात तसा होतो; किंबहुना कलावंताच्या भावना, कल्पना अगर विचारलहरी रसिकाच्या अंतरंगांत उत्पन्न झाल्या तरच तो त्या कृतीला कला म्हणावयास तयार होईल हें मला पटतें. पण कलेकडे पाहण्याची ही रसिकाची दृष्टि झाली; कलावंताची नव्हे. आपल्या अंतरंगांतील लहरींचे पडसाद दुसऱ्या कोणाच्या तरी अंतरंगांत उठविण्याच्या बुद्धीनें, तसा हेतु मनांत धरून कलावंत कलानिर्मिति करतो असें मला वाटत नाहीं. कलानिर्मिति करतांना कलावंताचा उद्देश निवेदनाचा असतो हें मला पटत नाहीं. आत्मप्रकटन ( expression ) हाच कलावंताचा हेतु असतो असें मला वाटतें. अंतरंगांत माजलेली सारी खळबळ कलानिर्मितीच्या रूपानें बाहेर काढून टाकावी आणि स्वस्थता साधावी म्हणून कलावंत कलानिर्मिति करतो. कला हा एक प्रकारचा परिहार आहे. कलावंत कलानिर्मिति करीत असतो त्या वेळीं रसिकांबद्दलचा विचार त्याच्या मनांत डोकावत नाहीं. आपल्या अंतःकरणांतील भावना, कल्पना अगर विचारलहरी आपण आपल्या कृतींत बरोबर व्यक्त करीत आहों कीं नाहीं एवढीच काळजी त्याला असते. कलानिर्मितीचें कार्य पुरें झालें, कलाकृति तयार झाली कीं लगेच कलावंताचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल, तिच्याकडे तो रसिकाच्या दृष्टीनें पहावयास लागेल, हें कबूल. त्या दृष्टीनें

कलावंत हा स्वतःच सामान्यतः त्याच्या कलाकृतीचा पहिला रसिक असतो. पण त्याची ही रसिकदृष्टि कलानिर्मितीनंतर जागी होते; कलानिर्मितीच्या कार्यांत निमग्न असतांना त्याची दृष्टि निराळी, कलावंताची असते; आणि कलेच्या स्वरूपाबद्दल विवेचन करतांना ही दृष्टिहि विचारांत घेतली पाहिजे.

कलाकृतीकडे कलावंताच्या आणि रसिकाच्या अशा दोन दृष्टींनीं पाहतां येतें. कलावंताच्या दृष्टीनें कला म्हणजे आत्मप्रकटन; तर, तें निवेदन आहे या दृष्टीनें रसिक तिच्याकडे पाहतो. हे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत, आणि त्यांचा घोंटाळा झाल्यामुळेंच ' कला आणि नीति ', ' कला आणि मतप्रचार ', ' कलेसाठीं कला ' इत्यादि वाद विकोपास गेले आहेत, असें मला वाटतें.

वर मुलाखतींना कलेची कसोटी लावतांना मीं त्यांच्याकडे रसिकाच्या दृष्टीनें पाहिलें हें उघड आहे. कलावंताच्या कलाकृतीकडे जग सामान्यतः रसिकाच्याच दृष्टीनें पाहणार. ज्या मुलाखतीच्या वाचनानें वाचकाला कांहीं काल ती मुलाखत देणाऱ्या व्यक्तीचा सहवास लाभल्यासारखें वाटतें तिलाच तो कलात्मक म्हणेल. येथें एक गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे. वृत्तपत्रीय मुलाखतींत मुलाखत देणाऱ्या व्यक्तीबरोबर ती घेणाऱ्या लेखकाचाहि सहवास घडण्याचा संभव असतो. हा संभव थोडाबहुत मर्यादेंत राखण्याची काळजी मुलाखत-लेखकानें घेतली पाहिजे. कारण मुलाखत देणाऱ्या व्यक्तीचें तिच्या एकंदर वागणुकींतून न उद्गारांतून व्यक्तिदर्शन करणें हाच वृत्तपत्रीय मुलाखतीचा प्रधान हेतु आहे. वेंचक प्रश्न विचारण्या-पलीकडे लेखकाच्या मतांचें व पूर्वग्रहांचें दडपण त्या व्यक्तिदर्शनावर पडतां कामा नये. मुलाखत हें व्यक्तिदर्शन आहे, व्यक्तिविवेचन नव्हे. मला वाटतें, व्यक्तिविवेचनाला स्वभाव-चित्रांत अधिक स्थान आहे. वृत्तपत्रीय मुलाखतींत लेखकाच्या पेक्षां मुलाखत देणाऱ्या व्यक्तीच्याच सान्निध्याचा विशेष प्रत्यय वाचकांना आला पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें तर पर्वते आणि देसाई यांच्या कांहीं मुलाखती निःसंशय कलात्मक झाल्या आहेत. वर उपयोगांत आणलेले ' प्रत्यय ' आणि ' प्रकाश ' हे शब्द वापरून तुलनात्मक दृष्टीनें बोलावयाचें म्हटल्यास मी असें म्हणेन कीं, पर्वत्यांच्या मुलाखतींत त्यांना भेटलेल्या व्यक्तींच्या जीवनावर एकंदरींत कमी प्रकाश पडत असला तरी त्यांच्या जयकर, देविकाराणी, बोखारी, सर चुनिलाल मेथा अशा कांहीं मुलाखतींत त्या व्यक्तींचा उत्कट ' प्रत्यय ' येतो. तर उलट देसाई यांनीं ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्यांच्या जीवनावर ' प्रकाश ' पाडण्याचें कार्यच अधिक प्रमाणांत केलें आहे. हा फरक पडण्याचें कारण पर्वते आणि देसाई यांच्या

वृत्तव्यवसायिक अनुभवांतील भिन्नतेंत आणि त्यांच्या मुलाखतींत ज्या विषयांचा परामर्श घेतला गेला त्यांच्या कमीअधिक व्याप्तींत सांपडेल. पर्वते देसाईच्या मानानें वृत्तव्यवसायांत अधिक मुरलेले आहेत. मराठी वृत्तव्यवसायाचा त्यांचा अनुभव अधिक दीर्घकालीन तर आहेच, पण इंग्रजी वृत्तव्यवसायाचा देसाईना कधींहि न लाभलेला अनुभव पर्वत्यांना भरपूर प्रमाणांत मिळालेला आहे. यामुळें त्यांची दृष्टि साहजिकच अधिक विदग्ध बनली आहे. दुसरें असें कीं, पर्वत्यांनीं ज्या थोर व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या त्यांपैकीं पुष्कळांशीं त्यांचा दाट परिचय असल्यानें त्या व्यक्तींची मुलाखत त्यांनीं ज्या साहजिकपणानें आणि गप्पागोष्टीच्या वातावरणांत घेतली त्या साहजिकपणाचा व वातावरणाचा फायदा, या परिचयाच्या अभावीं, देसाई यांना मिळाला नाहीं. त्यामुळें 'आपलें अमुक विषयावर मत काय आहे ?' 'आपणांस इतर कोणत्या विषयांची आवड आहे' असे 'तांत्रिक आणि तिऱ्हाईतपणाचे' प्रश्न देसाईच्या मुलाखतींत बरेच वेळां आढळतात. परंतु देसाई यांची दृष्टि पर्वत्यांच्या इतकी विदग्ध नसली तरी ती अधिक व्यापक म्हणजे अधिक विषयांत रममाण होणारी आहे. पर्वत्यांनीं आपल्या मुलाखतींत साधारणपणें तत्कालीन राजकीय व सामाजिक घडामोडींचीच चर्चा अधिक केलेली आढळते, तर देसाईनीं विचारलेले प्रश्न अधिक विविध आणि अधिक मूलभूत स्वरूपाचे आहेत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पर्वत्यांच्या गप्पा रंगल्यामुळें त्यांच्या मुलाखतींत अधिक उत्कटता आढळत असली तरी देसाईनीं विविध प्रश्न विचारून त्या व्यक्तींच्या जीवनावर अनेक प्रकारांनीं प्रकाश टाकला आहे असें दिसतें. याचें एकच उदाहरण मी देतों. पर्वते यांनीं डॉ. आंबेडकरांची मुलाखत अधिक मोकळ्या मनानें घेतली असली तरी त्या मुलाखतींत राजकीय व सामाजिक प्रश्नांचाच प्रामुख्यानें विचार झालेला दिसतो. डॉक्टर-साहेबांना अर्थशास्त्र व तत्त्वज्ञान यांच्या इतकीच चित्रकलेची आवड आहे हें देसाईच्या मुलाखतीवरूनच समजतें. व्यक्तीच्या जीवनावर विविध बाजूंनीं प्रकाश पाडून तिचा थोडाबहुत प्रत्ययहि अप्रत्यक्षपणें आणून देतां येईल. उदाहरणार्थ, " मूर्खपणानें लिहिलेला कोणता ग्रंथ असेल तर तो गीता ! " हे डॉक्टरांचे, हिंदूंच्या अतिपवित्र ग्रंथाबद्दलचे उद्गार वाचून त्यांची हिंदुधर्माकडे पहावयाची दृष्टि ध्यानांत येते; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या बेडर वृत्तीचीहि थोडीबहुत कल्पना येते. तसेंच यां मुलाखतींत आंबेडकरांच्या विनोदबुद्धीचा प्रत्यय फारसा येत नसला तरी 'हास्या'बद्दलच्या त्यांच्या कल्पनांवरून त्यांच्याकडून विनोदी बोलांची अपेक्षा करावयास हरकत नाहीं, एवढें समजतें.

देसाई यांचे ' तांत्रिक आणि तिऱ्हाइतपणाचे ' प्रश्न कोणत्याहि एका मुलाखतींत रसभंग करणारे वाटले तरी तेच तेच प्रश्न निरनिराळ्या व्यक्तींना विचारल्यामुळें एक निराळीच सरसता निर्माण होते. कितीहि थोर व्यक्ति असली तरी ती परिपूर्ण नसते. जीवनाच्या कांहीं थोड्या बाजूंचा आविष्कार तिच्या ठिकाणीं झालेला असतो. या व्यक्तींचा समूह म्हणजे विविधतेचें एक रमणीय प्रदर्शनच. निरनिराळ्या व्यक्तींना तेच तेच प्रश्न विचारून या विविधतेचा गंमतीदार प्रत्यय देसाईनीं आणून दिला आहे. उदाहरणार्थ, सोव्हिएट रशिया-बद्दल एम्. एन्. रॉय, डॉ. आंबेडकर, एन्. एम्. जोशी, जम्नादास मेथा, सामळदास गांधी-प्रभृतींचे विविध विचार वाचले म्हणजे रशियन पद्धतीचा एकांगीपणानें विचार करण्यांत हांशील नाहीं, एवढें साधारण वाचकाच्या सहज ध्यानांत येईल. बाळासाहेब खेरांसारख्या अध्यात्मवादी गृहस्थाच्या, ' आनंद कशांत आहे याची निश्चित कल्पना ज्यावेळीं मला येऊं लागली त्यावेळीं मात्र मला फार आनंद झाला ' या उद्गाराशीं, प्रो. र. धों. कर्वे सारख्या बुद्धिवादी गृहस्थाच्या, ' दुःख संपल्याचा आनंद अपूर्व असतो नाहीं का ? ' या उद्गारांची तुलना करून कोणत्याहि सोफिस्ट ( Sophist ) वावदुकास स्वतःची करमणूक करून घेतां येईल. बॅ. जम्नादास मेथा व ना. म. जोशी या मजूर–पुढाऱ्यांस डिकन्स आणि शॉ हेच ग्रंथकार विशेष आवडतात, हें पाहून इंग्रजी वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांस मौज वाटेल. ' आपण आत्मचरित्र कां लिहीत नाहीं ? ' या प्रश्नाला डॉ. मुळगांवकर व डॉ. आंबेडकर या दोघांहि ' डॉक्टरां 'नीं ' लिहिण्यासारखें कांहीं नाहीं म्हणून ' असें जें उत्तर दिलें आहे तें पुष्कळांची करमणूक करील. पोशाखाबद्दल प्रो. कर्वे व शंकरराव देव यांनीं व्यक्त केलेले विचार त्यांच्या व्यक्तित्वांइतकेच विरोधी असल्यामुळें Apparel oft proclaims the man या सुभाषिताची एका नवीन तऱ्हेनें प्रतीति येते. त्यांना भेटलेल्या थोर व्यक्तींचे जे छंद देसाईनीं सांगितले आहेत त्यांमुळें कोणत्याहि व्यंगचित्रकाराच्या प्रतिभेला चालना मिळेल असें मला वाटतें. एका व्यक्तीला निरनिराळे प्रश्न विचारणें जितकें चित्तवेधक असतें तितकेंच, किंबहुना त्याहूनहि अधिक, एक प्रश्न निरनिराळ्या व्यक्तींना विचारणें चित्तवेधक असतें.

या मुलाखतींत झालेल्या व्यक्तिदर्शनाकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें कीं कांहीं मजेदार अनुभव येतात. प्रो. वामन मल्हार जोशी आणि र. धों. कर्वे हे दोघेहि सरल वृत्तीचे आणि स्पष्टवक्ते गृहस्थ आहेत. परंतु प्रो. वामनरावांच्या स्पष्टवक्तेपणांत जो

सात्त्विकतेचा प्रत्यय येतो तो कर्व्यांच्या स्पष्टवक्तेपणांत येत नाहीं. हें असें कां ? या प्रश्नाचें उत्तर या पुस्तकांतील मुलाखतींत सांपडेल.

देसाईंचे प्रश्न तांत्रिक आणि तिऱ्हाईतपणाचे असतात असें जें वर मी सुचविलें आहे तें मात्र सर्वस्वीं खरें नाहीं. ' जीवनाकडे पहायची माझी दृष्टि ' या विभागांतील मुलाखतींच्या बाबतींतच त्यांचे प्रश्न कांहींसे तांत्रिक आणि तिऱ्हाईतपणाचे वाटतात. कारण त्या विभागांतील बहुतेक व्यक्तींशीं त्यांचा परिचय नव्हता किंवा त्यांच्या पातळीवर जाऊन ते बोलूं शकत नव्हते. तरीपण बाळासाहेब खेर आणि जम्नादास मेथा यांच्या मुलाखतींत या अडचणींनीं कसलाहि बखेडा उत्पन्न केल्याचें दिसत नाहीं. याचें कारण उघड आहे. खेर आणि जम्नादास मेथा यांचा मनमोकळा स्वभाव. अपरिचयाची अडचण देसाईंना येथें मुळींच जाणवली नसावी.

' माझ्या आयुष्यांतील सुखदुःखाचे क्षण ' या विभागांतील सवच मुलाखती सुरेख आणि रसपूर्ण झाल्या आहेत. शंकरराव देवांचा रुक्ष आखडतेपणा, र. धों. कर्वे यांची स्वाभिमानी आत्मपरता, वा. म. जोशी यांची रसिक पण सात्त्विक विद्वत्ता, ना. सी. फडके यांचा खेळाडूपणा, कॉ. निमकरांचा दिलखुलासपणा, माडखोलकरांचा आत्मविश्वास, य. गो. जोशी यांची मिस्किल विनोदबुद्धि इत्यादि गोष्टींचा प्रत्यय पुष्कळच प्रमाणांत येत असल्यामुळें हीं व्यक्तिदर्शनें आकर्षक झालीं आहेत. या मुलाखती इतक्या यशस्वी होण्याचें कारण उघड आहे. देसाई येथें परिचित प्रांतांत वावरत आहेत. ललितलेखनाला आवश्यक असणारी समरसता ते येथें साधूं शकले. साधारणपणें हेंच विधान ' साहित्य आणि कला ' या विभागाबद्दल करतां येईल. या विभागांतील, शिल्पकार करमरकर आणि कै. बापूराव पेंढरकर यांच्या मुलाखतींचा येथें मुद्दाम निर्देश करावासा वाटतो.

देसाईंनीं ज्या व्यक्तींच्या मुलाखती येथें प्रसिद्ध केल्या आहेत त्यांपैकीं बहुतेक व्यक्ति मराठी वाचकांना इतक्या आवडतात, आणि त्यांच्याबद्दल मराठी वाचकांची जिज्ञासा देखील इतकी जबरदस्त आहे कीं त्यांच्या सहवासांत जाण्यासाठीं या प्रस्तावनेच्या औपचारिक मार्गाची खरोखर काय गरज होती तेंच मला समजत नाहीं. देसाईंनीं मला ही प्रस्तावना लिहायला सांगितली याचें कारण मजविषयींची त्यांची स्नेहार्द्र बुद्धि— आणि या स्नेहांकित बुद्धीनेंच मीं ती लिहायला घेतली.

पुणेंवाडी, दादर<br>
ता. २१ ऑक्टोबर १९४०

**प्रभाकर पाध्ये**

# जीवनाकडे पहायची माझी दृष्टी

: १ :

# डॉ. शां. रा. मुळगांवकर

विसंगति हाच मानवी व्यवहारांतील सुसंगतपणा आहे काय ? बालपणापासून विशिष्ट महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन ध्येयपूर्तिसाठीं झगडणाऱ्या व्यक्ती बालपणीं महत्त्वाकांक्षा बाळगलेल्या व्यवसायाऐवजीं दुसऱ्याच अनपेक्षित व्यवसायांत पडतात–त्यांत असामान्य यश मिळवितात याची पदोपदीं जीवनांत साक्ष पटते. बालपणीं ध्यानींमनीं नसलेल्या व्यवसायांत असामान्य यश मिळालेल्या व्यक्ती तुमच्या परिचयाच्या आहेत का ? डॉ. मुळगांवकर हे अशाच व्यक्तींपैकीं एक आहेत. आज वैद्यकीय व्यवसायांत अभूतपूर्व असें त्यांनीं यश संपादिलें आहे. पण बालपणीं त्यांना आपण डॉक्टर व्हावें असें मुळींच वाटत नव्हतें !

त्यांची भेट घेण्यापूर्वी बालपणापासून वैद्यकीय व्यवसायाविषयीं अत्यंत आवड असल्या-मुळें त्यांनीं वैद्यकीचा कोर्स घेतला अशी माझी समजूत होती. पण त्यांची ज्यावेळीं मी भेट घेतली त्यावेळीं मात्र माझी अपेक्षा फोल ठरली.

डॉ. मुळगांवकर यांची माझी ही पहिलीच भेट. पण या पहिल्या भेटींतच त्यांच्याविषयीं मला आदरभाव वाटूं लागला. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे जगांतील सर्व सुखा-समाधानांचें तेज त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असलेलें दिसून येतें. त्यांच्या भव्य आकृतीप्रमाणें त्यांच्या हास्यांतही भव्यपणा असल्याची साक्ष पटते.

"लहानपणीं आपणांस कोण व्हावंसं वाटत होतं?" असा मी त्यांना प्रश्न केला त्यावेळीं ते थोडेसे गंभीरपणानें हांसले. त्यांच्या त्या गंभीर हास्यांत जुन्या स्मृति जागृत झाल्याच्या रेषा त्यांच्या चेहेऱ्यावर उमटलेल्या स्पष्ट दिसत होत्या. पण क्षणांतच त्यांनीं मधुर हास्य केलें. पन्नाशीच्या घरांत ते आले असले तरी अजूनही मोहक सौंदर्यानें चमकणारे त्यांचे नेत्र, भव्य कपोल आणि मोहक ओंठ त्यांच्या त्या हास्यानें हांसत असल्याचें दिसूं लागले.

"इंजिनिअरचा डॉक्टर झालों आहें मी!" ते आपलें हंसें आवरून म्हणाले.

"इंजिनिअर?" मी आश्चर्यानें उद्गारलों.

"हो–हो, इंजिनिअर!" डॉक्टरनीं पुनः आपल्या वाक्यावर थोडा जोर दिला.

"यशस्वी इंजिनिअर व्हावं अशी माझी बालपणापासूनची महत्त्वाकांक्षा होती. पण माझी स्वतःची महत्त्वाकांक्षा मला बाजूला ठेवावी लागली. आईच्या आग्रहासाठीं वैद्यकीचा कोर्स मला घ्यावा लागला, आईसाठीं—केवळ आईच्या इच्छेसाठीं मी माझी आवड-निवड बाजूला ठेवली."

आईच्या आठवणीनें पुन्हां ते थोडेसे गोंधळल्यासारखे झाले अन समोरच्या भिंतीकडे शून्य दृष्टीनें पाहूं लागले.

" आजच्या तुमच्या व्यवहारांत तुम्हांला पूर्ण समाधान वाटतं का? " असा ज्यावेळीं मी प्रश्न केला त्यावेळीं ते होकारार्थी उत्तर देऊन म्हणाले, " मी अगदीं एकलकोंडा आहें. अष्टौप्रहर माझ्या व्यवसायांत दंग असतों—रमून जातों. "

" आपण आपल्या व्यवसायांत इतके जे दंग असतां ते कीर्तीच्या मोहानं, लोकसेवेच्या तळमळीनं कीं—"

" बोला ना पुढं ! कीं पैशांच्या मोहानं असंच आपल्याला म्हणायचं आहे ना ? "

" हो ! असंच ! " मी गोंधळून म्हणालों,

" मी दांभिकपणा कशाला पांघरूं ? वैद्यकीय व्यवसाय हा माझा चरितार्थाचा व्यवसाय आहे. अन् हें चरितार्थाचं काम करीत असतांना लोकसेवा झाली तर त्याचं श्रेय घ्यायला कांहीं माझी ना नाहीं. "

डॉक्टर हंसत पुन्हा म्हणाले, " कीर्तीचाही मला मोह नाहीं. आतां कीर्ति मिळालीच तर माझा नाइलाज आहे ! "

" वैद्यकीय व्यवसायांतून आपणांला थोडी फुरसत मिळाली तर आपण कोणतं कार्य हातीं घ्याल ? "

" माझी बाळपणाची महत्त्वाकांक्षा पुरी करीन मी ! "

" म्हणजे ? "

" कारखान्यांत काम करीन मी ! " माझी उत्सुकता वाढविण्यासाठीं तेवढेंच वाक्य पुरें करून ते म्हणाले, " लोणावळ्याला माझं एक वर्कशॉप आहे. Wood-turning-metal turning चं वर्कशॉप आहे. तिथं जाऊन मी काम करीन. "

वार्धक्याच्या सीमारेषेवर येऊन पोंचलेलीं माणसें तारुण्यांतल्या मधुर स्मृतींनीं जशीं किंचित् उत्तेजित होतात, तसे उत्तेजित दिसले व आपल्याच विचारांत क्षणभर गढून गेलेले दिसले.

" राजकारणांत नाहीं का भाग घेणार ? " मी प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या विचारांतून जागें केलें.

" राजकारण मला समजत नाहीं ! " पूर्वीसारखेंच मधुर हास्य करीत ते म्हणाले, " राजकारणांत भाग घ्यावयाचा असला तर आधीं कायद्याचा अभ्यास केला पाहिजे. "

" पण कायद्याचा अभ्यास नसलेले पुढारी विद्यमान नाहींत का ? "

" नाहींत असं नाहीं, " डॉक्टर पुर्डे म्हणाले, " पण तेच जर कायदेपंडित असते तर त्यांना राजकारणांत जास्त यश मिळालं असतं, असा माझा समज आहे. "

" आतांपर्यंत किती तरी डॉक्टर राजकारणांत भाग घेऊन यशस्वी झाले आहेत. "

" खरं आहे तें; पण माझं तरी असं मत आहे, कीं राजकारणांत पडलेल्या प्रत्येक माणसाला कायद्याचं ज्ञान असावं. "

" आपणांला राजकारणाची आवड नाहीं का ? "

" आवड आहे—आपला देश स्वतंत्र व्हावा अशी इच्छाही आहे. पण ज्या व्यवसायांत मला कांहीं कळत नाहीं त्यांत मी कोणती कर्तबगारी गाजविणार ? "

" इंग्रज-मराठी भाषेंतील कोणते ग्रंथ आणि ग्रंथकार आपल्या विशेष आवडीचे आहेत ?"

"हरिभाऊ आपटे यांच्या वाङ्मयाखेरीज मराठी वाङ्मय मी फारसं वाचलेलं नाहीं. त्यानंतर आतां कोण लेखक पुढे आले आहेत याची मला माहितीही नाहीं. हरिभाऊ आपटे यांचं वाङ्मय मात्र मला फारच आवडतं. त्यांचा सामाजिक प्रश्नांकडे पहाण्याचा दृष्टिकोण अत्यंत शास्त्रीय होता-जिव्हाळ्याचा होता. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्या मी पूर्वी वाचलेल्या आहेत. "

" आणि इंग्रजी वाङ्मय ? "

" इंग्रजी वाङ्मयही मी फारसं वाचलेलं नाहीं. पण शेरलॉक होम्सचं वाङ्मय मला फार आवडतं. "

" आणखीन् इतर वाङ्मय आपण कांहीं वाचलं नाहीं का ? "

"I have no inclination towards serious literature ! कथावाङ्मयांतील ललित प्रकारही मला फारसे आवडत नाहींत. विनोदी कथा किंवा ज्यांना आपण इंग्रजींत thrillers म्हणूं शकतों, असें वाङ्मय मला वाचणं जास्त आवडतं. कोण आपला तो विनोदी लेखक—हं ! पी. जी. वुडहाऊस मला फारच आवडतो. त्याचं बहुतेक वाङ्मय वाचलं आहे मी ! पण वेळाच्या अभावीं आतां मला विनोदी वाङ्मयही वाचतां येत नाहीं. "

" आपण आत्मचरित्र कां लिहित नाहीं ? "

" लिहिण्यासारखं कांहीं नाहीं म्हणून ! " डॉक्टर हंसत हंसत म्हणाले, " मी कुठं मोठा माणूस आहे एवढा ? सामान्य माणूस आहे मी ! "

" पण आपणांला जीवनांत जे विविध अनुभव आले आहेत ते इतरांना मार्गदर्शक होण्यासारखे नाहींत का ? "

" सामान्य माणसांचे अनुभव इतरांना काय उपयोगी पडणार ? " डॉक्टर उद्गारले.

त्यांचें हे उद्गार ऐकून स्त्रियांप्रमाणेंच लोकप्रिय माणसेंही विनयी असतात कीं काय, अशी कल्पना माझ्या डोक्यांत चमकून गेली !

" जीवनाकडे पहाण्याचा तुमचा कोणता दृष्टीकोण आहे. "

" I had some Principles before me. माझ्या जीवनांत मी कांहीं तत्त्वं ठरविलीं आहेत आणि त्यांच्या अनुरोधानंच मी नेहमीं वागत असतों. त्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यांतच समाधान मानतों."

" धार्मिक रूढींविषयीं आपलं कोणतं मत आहे ? "

" धार्मिकतेला तेवढं माझ्या जीवनांत महत्त्व नाहीं. मी कोणत्याही रूढीकडं धार्मिकतेच्या दृष्टीनं पहात नाही. मी आईचा श्राद्धविधि अजूनही पार पाडतों. पण धार्मिक विधि म्हणून मात्र नव्हे. आईची एक वार्षिक स्मृति म्हणूनच तो विधि मी आनंदानं आणि आदरानं पार पाडत असतों. त्यांत धार्मिकतेचा मात्र मुळींच हेतु नाहीं. "

" ईश्वराच्या अस्तित्वावर तुमचा विश्वास आहे का ? " असा ज्यावेळीं मी त्यांना प्रश्न विचारला त्यावेळीं ' तुम्हीं आजचीं तरुण माणसं ईश्वराच्या अस्तित्वावर नसती कां चर्चा करतां ? " अशा प्रश्नार्थक नजरेनें त्यांनीं माझ्याकडे पाहिलें.

" माझा खरोखरच विश्वास आहे ईश्वरावर. Some power, some superior power is really behind it. Call it nature or anything else. "

यावेळीं त्यांच्या चेहेऱ्यावर खरोखरच तेज चमकत होतें. पण ईश्वराच्या अस्तित्वाच्या प्रभावापेक्षां त्यांची भव्य देहयष्टि, वार्धक्यांतही चेहऱ्यावर विलसणारें सौंदर्य यांचाच तो प्रभाव आहे असेंच मात्र मला वाटलें ! त्यावेळच्या त्यांच्या त्या भावनामय समाधीचा भंग

करणें मला जरासें कठीणच वाटलें. पण ठरलेल्या वेळांत मुलाखत संपविणें रास्त वाटल्यामुळें मी त्यांना विचारलें,

" तुम्हांला कोणत्या प्रकारची करमणूक आवडते ? नाटक कीं सिनेमा ? "

" दोन्हीही आवडत नाहींत मला. But generally I go for Cinema. I just go out to Cinema, and forget my worries. "

त्यांनीं ज्यावेळीं दुःखाच्या गोष्टीला सुरवात केली, त्यावेळीं मी थोडासा गंभीरच झालों. कारण त्यांच्या सदा हांसणाऱ्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे त्या हास्याच्या आंत कोणतीं तरी दुःखें–कोणत्यातरी यातना दडून बसलेल्या असतील, ही कल्पनाही मला शक्य कोटींतील वाटेना. कीं हंसऱ्या चेहऱ्याच्या आंत नेहमींच दुःखाचे डोंगर लपलेले असतात ?

पण माझी गोंधळलेली वृत्ति ओळखून डॉक्टर म्हणाले, " गप्प कां तुम्हीं ? डॉक्टरला कांहीं दुःखं नसतात असं का तुम्हांला वाटतं ? त्याला वैयक्तिक कांहीं दुःखं नसलीं तरी व्यावसायिक दुःखं तरी असतात ना ? संबंध दिवस डॉक्टरला दुःखी लोकांच्या सतत सहवासांत राहावं लागतं. अर्थात् त्या वातावरणाचा डॉक्टरच्या मनावरही अप्रत्यक्षपणं परिणाम होत असतो अन् हा परिणाम नाहींसा करण्यासाठीं डॉक्टरला मनाचा आणि शरीराचा शीण कमी करण्यासाठीं नाटक-सिनेमा पहावे लागतात. डॉक्टर झाला तरी तो सामान्य माणूसच आहे ना ? "

" नवीन नवीन मोटरी विकत घेण्याचा आपणांस नाद आहे हें खरं आहे का ? "

" That is not true " डॉक्टर माझ्या विधानांचा इन्कार करून म्हणाले, " अशी पैशांची उधळपट्टी कोण करील ? बाकी आगगाडीपेक्षांही मोटरनं प्रवास करणं मला फार आवडतं हें मात्र खरं. तेव्हां मोटरींतून प्रवास करायचा म्हटलं कीं Comfortable Car असली पाहिजे असा आग्रह धरला तर तें कांहीं चुकीचं होणार नाहीं. याचा अर्थ मी नव्या नव्या मोटरी खरेदी करतों असा कांहीं होत नाहीं. "

" गायनाची आपणांस कितीशी आवड आहे ? स्वतः गाण्याचा आपणांस नाद आहे का ? "

" Personally I can't sing. पण मला गाणं मात्र आवडतं. पण गवयी

थाटाच्या गाण्याचा मला फार तिरस्कार वाटतो. जुन्या थाटाच्या Classical singing ची पद्धति मला मुळींच आवडत नाहीं. tuneful संगीतच मला जास्त आवडतं. सिनेमांत अलिकडे अगदीं थोडक्या वेळांत गाण्याची पद्धत चालू आहे हें खरं; पण सिनेमांतील सर्वच गाणीं tuneful असतात, असं मात्र नाहीं."

"अन् इंग्लिश सिनेमांतल्या गाण्याविषयीं आपलं काय मत आहे ?"

"आपल्या हिंदी संगीतांत जशा गवयी गाण्याच्या आणि आजच्या आधुनिक गाण्याच्या पद्धति आहेत तशा इंग्लिश गाण्यांतही आहेत. पण ज्याला मी गवयी थाटाचं गाणं म्हणतों तें इंग्रजी सिनेमांत असलं तरी मला आवडत नाहीं. गायनकलेंतील आधुनिकताच मला जास्त प्रिय आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे इंग्रजीपेक्षां हिंदी संगीतच माझ्या जास्त आवडीचं आहे."

"तुम्हांला दुसऱ्या कोणत्या Hobbies ( छंद ) आहेत काय ?"

"फोटोग्राफी हा एक माझा आवडता छंद आहे. वेळ मिळेल त्यावेळीं ह्या आवडीचा मनमुराद उपभोग घेत असतो Motoring हा सुद्धां माझा एक आवडता छंद आहे, हें मी आपणांस सांगितलंच. तसंच Mechanical Work हेंही मला फार आवडतं. माझे हे असे 'छंद' आहेत." डॉक्टर माझ्याकडे पहात हंसत म्हणाले.

तेवढ्यांत 'ऑपरेशन रूम' मधें जाण्याचा डॉक्टरांचा वेळ झाला. त्यांनीं घड्याळांत पाहिलें. मीही माझी 'वेळ भरत' आल्याचें ओळखलें! डॉक्टरांच्या सहवासांत पाऊणतास केव्हां निघून गेला याचें मला भानही राहिलें नाहीं.

आणि 'ऑपरेशन रूम' मधें जाण्याची घाई असतांही डॉक्टर माझ्या खांद्यावर प्रेमळ-पणानें हात ठेवीत 'लिफ्ट' पर्यंत मला पोंचवायला आले. लिफ्टमधें त्यांनीं माझा पुन्हां प्रेमाचा निरोप घेतला.

आणि मी त्यांच्या बंगल्यांतून बाहेर पडलों तरी कितीतरी वेळ त्यांचा हांसरा चेहरा अन् हांसरे डोळे माझ्या पुढें नाचत होते—माझ्याशीं बोलत होते !

: २ :

# प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए.

"राजकारणाची मला अगदीं पहिल्यापासून आवड आहे. पण माझी राजकारणावर लिहिण्याची पद्धत इतकी स्पष्ट आहे, कीं मला तावडतोब तुरुंगांत जावं लागेल. माझ्या हल्लींच्या स्थितींत तुरुंगांत जाणं मला परवडणार नाहीं." असे उद्गार प्रो. र. धों. कर्वे यांनीं आपल्या मुलाखतींत काढले.

तत्त्वज्ञानी माणसाला जीवनांत समाजाच्या टीकेचे आघात सहन करावे लागतात आणि खुषमस्कऱ्याला मानसन्मान मिळतो. प्रो. कर्वे यांचें जीवन कांहीं अंशीं असेंच आहे. समाजाची कोणत्याही रीतीनें पर्वा न करतां आपली मतें समाजाच्या गळीं उतरवित असतां त्यांना जीवनांत अपमानाचे आणि उपहासाचे धक्के सहन करावे लागत आहेत. तरीही हंसतमुखानें त्यांचें स्वागत करण्याची वृत्ति प्रो. कर्वे यांच्या अंगीं बाणलेली आहे. आणि यामुळेंच त्यांचें खडतर जीवन त्यांना सुसह्य झालें आहे.

प्रो. कर्वे यांच्याकडे तुम्ही केव्हांही जा, ते सतत कांहींना कांहींतरी काम करीत असलेले दिसतात. त्यांनीं आपल्या जीवनाला यंत्राप्रमाणें वळण लावलेलें आहे. यंत्राच्या गतीनें ते नेहमीं काम करीत असतात. साठीच्या घरांत आले असले तरी तरुणाच्या उत्साहानें काम करतांना आढळतात.

प्रो. कर्वे यांच्या एकंदरींत जीवनाविषयीं आदर वाटतो यांचें कारण असें, कीं त्यांच्या जीवनांत दांभिकतेला जागा नाहीं. कोणत्याही प्रश्नाबाबत, खाजगी जीवनाबाबतही ते वाटेल त्याच्याशीं वाटेल तितक्या गप्पा मारूं शकतात. इतरांना जे प्रश्न गुप्त वाटतात ते त्यांना अगदीं साधेसुधे वाटतात. या त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळें समाजांत त्यांना मानानेंही वागविलें जात नाहीं. माझे एक मित्र एकदां म्हणाले, ' कर्वे यांचें समाज–स्वास्थ्य चोरून वाचणारे त्यांचे चहाते फार आहेत. पण त्यांच्या गुणांचं उघडपणं गुणग्रहण करणारा यांचा एकही मित्र नाहीं.'

प्रो. कर्वे यांचीं मतें, त्या मतांचा समाजांत होणारा सन्मान, आणि समाजाची त्यांच्याकडे पहाण्याची दृष्टी पाहिली म्हणजे समाजांतील ते एकांडे शिलेदार वाटतात. आणि ही शिलेदारी ते कुणाची पर्वा न करतां बिनदिक्कत पार पाडतात.

आजचा हिंदूसमाज संकुचित वृत्तीचा आणि पुरातन मतांचा आहे. तरीही स्वैराचाराचें आपलें आवडतें तत्त्व प्रतिपादण्यास कर्वे कधींच माघार घेत नाहींत. समाजाच्या मताप्रमाणें आपल्या मतांना वळण देऊन लोकप्रियता मिळविण्यापेक्षां लोकांना धक्के देणेंच कर्वे यांना आवडतें. तो त्यांचा आवडीचा खेळ होऊन बसला आहे !

लैंगिक प्रश्नासंबंधीं प्रो. कर्वे यांचीं मतें सर्वश्रुत आहेत. पण कुणालाही माहित नसणाऱ्या त्यांच्या जीवनांत अनेक गोष्टी असतील या हेतूनें मी त्यांची भेट घेतली.

" लैंगिक प्रश्नाखेरीज दुसरे कोणते विषय आपल्या विशेष आवडीचे आहेत ? " असा मी त्यांना प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, " या विषयापेक्षां किती तरी विषय माझ्या आवडीचे आहेत. सिनेमा, नाटक आणि संगीत हे विषय माझ्या अत्यंत आवडीचे आहेत. लैंगिक विषयाइतकेच आवडीचे आहेत. पण अलिकडं पेटीवादनामुळं बिघडलेल्या संगीताचा मात्र मी भोक्ता नाहीं. हार्मोनियमनं आपलं हिंदी संगीत अगदीं बिघडवून टाकलं आहे. "

" आणखी कोणता विषय तुमच्या आवडीचा आहे ? "

" गणीत ! " प्रो. कर्वे माझ्याकडे पहात म्हणाले. त्यांचे हें उत्तर ऐकतांच मला आश्चर्य वाटलें. आणि त्याची थोडीशी कल्पना येतांच प्रो. कर्वे म्हणाले, " गणीत हा विषय माझ्या आवडीचा असूनही मी त्या विषयाकडे दुर्लक्ष केलेलं आहे. "

" कां दुर्लक्ष केलं तुम्हीं ? " मी आस्थेनें विचारलें.

" महाराष्ट्रांतले लोक भित्रे आहेत म्हणून ! "

" म्हणजे ? "

" म्हणजे असं, कीं महाराष्ट्रांत गणितज्ञ फार आहेत. पण लैंगिक प्रश्नांवर स्पष्ट मत व्यक्त करणारा मात्र कुणीं नाहीं. आणि म्हणूनच मला स्पष्टपणानं लैंगिक प्रश्नांवरचीं मतं व्यक्त करावीशीं वाटलीं. लैंगिक प्रश्नांचा मानवी जीवनाशीं निकटचा संबंध आहे—हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आणि याचसाठीं गणीतासारख्या आवडत्या विषयांकडं दुर्लक्ष करून मी लैंगिक प्रश्नाकडे लक्ष दिलं. इतर लोक भितात-मतं व्यक्त करायला कचरतात म्हणून लैंगिक विषयांचा मी जास्त सूक्ष्मपणं अभ्यास केला. "

प्रो. कर्वे यांची लैंगिक विषयासंबंधीं जशीं जहाल मतें आहेत, त्याचप्रमाणें त्यांची राजकीय मतेंही जहाल आहेत. म. गांधी यांच्या धार्मिक राजकारणावर त्यांचा फार कटाक्ष आहे. " राजकारणांत तुम्हीं प्रत्यक्ष भाग कां घेत नाहीं ? " असा मी प्रश्न केला तेव्हां ते म्हणाले, " राजकारणाची मला पहिल्यापासून आवड आहे. राजकारणावर मी अनेक लेख आफ्रिकेंत असतांना लिहिले आहेत. नैरोबी येथील एका इंग्रजी पत्राच्या संपादकमंडळांत मी काम करीत असतां संपादकाच्या गैरहजेरींत मी अनेक अग्रलेखही लिहिले आहेत. पण त्यावेळींही मी फार जहाल लिहित असें. "

" मग आतां कां लिहित नाहीं राजकारणावर तुम्हीं ? "

" माझी लिहिण्याची पद्धत इतकी स्पष्ट आहे, कीं मला ताबडतोब तुरुंगाची हवा खावी लागेल. पण तुरुंगांत जायला मला आज सवड नाहीं—माझी परिस्थिति नाहीं. "

" म्हणजे आर्थिक परिस्थितीच ना ? "

" होय. मी घरचा एकटा मिळवता आहे. मी तुरुंगांत गेलों तर माझ्या पत्नीची उपासमार व्हायची. ती आजारी नसती तर स्वतःच्या पायावर ती उभी राहूं शकती. अशी परिस्थिति असती तर मात्र मी राजकारणांत नेकीनं भाग घेतला असता. But today I can't afford to go to jail. म्हणूनच बेतानं राहातों."

" घरच्या मंडळीच्या चरितार्थाची व्यवस्था झाली तर राजकारणांत भाग घ्याल ?"

" राजकारणांत भाग घेईन. पण कॉंग्रेसमधें मात्र शिरणार नाहीं !"

" कां म्हणून ?"

" कॉंग्रेसविषयीं मला अनादर नाहीं. कॉंग्रेसला माझा विरोध नाहीं. पण कॉंग्रेसमधें ज्या कांहीं स्वार्थी अन् मूर्ख व्यक्ती आहेत त्यांच्याशीं माझं मुळींच पटायचं नाहीं. उदाहरणार्थ, गांधींचं खादीचं वेड मुळींच पसंत नाहीं. !"

राजकारणाच्या विषयावरून आमच्या चर्चेचा ओघ स्त्री-पुरुषांच्या परस्पर आकर्षणाच्या प्रश्नाकडे वळला. स्त्री-पुरुषांचें एकमेकांवर जें प्रेम असतें तें शारीरिक आकर्षणच असतें कीं प्रेमाची उदात्त भावनाही परस्परांत असूं शकते, या विषयावर बोलतांना प्रो. कर्वे म्हणाले, " प्रेम आणि शारीरिक उपभोग या अगदीं वेगळ्या गोष्टी आहेत; प्रेम नसतांही स्त्री-पुरुष शारीरिक उपभोग घेऊं शकतात."

" पण शारीरिक सौंदर्य नसतांना स्त्री-पुरुष एकमेकांवर प्रेम करूं शकतील काय ?"

" तें परिस्थितीवर अवलंबून आहे—सहवासावर अवलंबून आहे. पण शारीरिक उपभोगाच्या इच्छेचाही मी प्रेमांतच अंतर्भाव करतों. शारीरिक उपभोग हाही एक प्रेमाचा प्रकार आहे. प्रेम उत्पन्न होण्यासाठीं सौंदर्याची फार मदत होते. पण सौंदर्याशिवाय प्रेम उत्पन्न होणार नाहीं असं मात्र म्हणतां येणार नाहीं. ही गोष्ट प्रत्येक व्यक्तीच्या मनोभूमिकेवर सर्वस्वीं अवलंबून आहे. एक गोष्ट मात्र खरी, कीं आकर्षण होण्यास सौंदर्याची फार मदत होते."

प्रेमाच्या प्रश्नावर सर्वसाधारणपणें चर्चा चालू असतांना मी त्यांना सहज प्रश्न केला, " तुमचा कधीं प्रेमभंग झाला आहे का ?"

माझा प्रश्न ऐकतांच कर्वे पोट धरधरून हंसले ! त्यांच्या चेहऱ्यावरचें तें मिस्किल हास्य

पाहून मलाही कांहीं केल्या हंसें आवरतां आलें नाहीं. इतक्यांत त्यांच्या पत्नीनें दिवाणखान्यांत प्रवेश केला. हास्याची लाट ओसरल्यावर कर्वे हंसत हंसतच म्हणाले,

"हजारों वेळां प्रेमभंग झाला आहे माझा! अगदीं नैसर्गीक गोष्टी आहेत या. बाकी खोटं बोलायचं असलं तर प्रेमभंग झाला नाहीं असं म्हणतां येईल म्हणा!" कर्वे पुनः हंसत हंसत म्हणाले.

स्वैराचारासंबंधीं प्रो. कर्वे यांचीं मतें प्रसिद्ध आहेत. स्वैराचाराचे ते पुरस्कर्ते आहेत. पण कोणत्याही तत्त्वाचा पुरस्कार करणारी व्यक्ति त्या तत्त्वाप्रमाणें आचरण करते कीं नाहीं हा सर्वसाधारणपणें कुतूहलाचा प्रश्न असतो. सर्वांना याविषयीं उत्सुकता वाटत असते. म्हणून मी त्यांना विचारलें, "आपण स्वैर-संभोगाचे पुरस्कर्ते आहांत. हें आपलं आवडतं तत्त्व आपण कधीं आचरणांत आणलं आहे काय? कीं तें तत्त्व म्हणूनच प्रतिपादन करतां?"

हा प्रश्न मी त्यांना थोडा भीतभीतच विचारला. या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळणार नाहीं, अशा अपेक्षेनें विचारला. या प्रश्नानें कर्वे माझ्यावर भडकतील अशीही माझी अपेक्षा होती. पण माझ्या दोन्ही अपेक्षा फोल ठरल्या. या प्रश्नानें त्यांच्या चेहऱ्यावर तरी कांहीं फरक होईल—त्यांचा चेहरा गंभीर होईल असें मला वाटलें होतें. पण पहिल्या-सारखाच त्यांचा चेहरा निर्विकार असल्याचें पाहून मला आश्चर्य वाटलें. कारण हा प्रश्न त्यांच्या खाजगी जीवनासंबंधीं होता. पण या प्रश्नाचेंही कर्वे यांनीं अगदीं शान्तपणें उत्तर दिलें. ते म्हणाले—

"आधीं स्वैराचार या शब्दाचा अर्थ पुष्कळ लोक चुकीचा समजतात. स्वैराचार म्हणजे एकट्या व्यक्तीला वाटेल तें करण्याचा अधिकार आहे असा मात्र नव्हे. पण दोन माणसांची संमति असल्यावर त्यांच्या संबंधाला इतरांनीं कोणत्याही प्रकारची हरकत करूं नये. स्वैरा-चाराला कायद्याची आणि समाजाचीही परवानगी असावी, असं माझं मत आहे."

एवढें बोलून ते थोडेसे थांबले. मी त्यांना वैयक्तिक जो प्रश्न विचारला होता, त्याची वाच्यता पुन्हा करूं नये असें मला वाटलें. त्यांच्या खाजगी जीवनाविषयीं मी उपस्थित केलेला प्रश्न मलाच आक्षेपार्ह वाटूं लागला. या विचाराच्या गोंधळांत मी असतांनाच कर्वे पुढें म्हणाले,

" मी स्वतः स्वैराचार करतों कीं नाहीं त्यांत इतरांचा कांहीं संबंध नाहीं. ही खाजगी गोष्ट आहे. आणि असा प्रश्न कुणी विचारला तर सपशेल खोटं बोलायला कांहीं हरकत नाहीं ! खोटं बोलण्याचं कारण असं, कीं या प्रश्नाबाबत कांहीं उत्तर दिलं नाहीं म्हणजेही लोक गैरसमज करून घेतात—संशय घेतात. तेव्हां खोटंच बोलणं जास्त सोईचं वाटतं. आणि ज्या वेळीं इतरांच्या अब्रूचा प्रश्न असेल त्यावेळीं खोटं बोलणं कर्तव्यच ठरतं !"

प्रो. कर्वे यांचें हें अनपेक्षित उत्तर ऐकतांच मी गोंधळूनच गेलों. त्यांच्या स्पष्टवक्तेपणा-बद्दल जरी पूर्वी माझी खात्री होती, तरीही मी या प्रसंगीं गोंधळून गेलों—थोडासा खजील झालों. त्यांना एकदां कुणी तरी त्यांच्या 'समाजस्वास्थ्या'च्या वाचकानें त्यांच्या पत्नी-विषयीं नाजुक प्रश्न विचारला होता; त्यावेळींही त्यांनीं असेंच उत्तर देऊन पृच्छकाला निरुत्तर केलें होतें त्या प्रसंगाची मला आठवण झाली.

मी विषयान्तर करण्याच्या उद्देशानें म्हणालों, "लैंगिक प्रश्नांच्या अभ्यासाखेरीज आणखी तुम्हांला कोणत्या विषयांचा नाद आहे ?"

प्रो. कर्वे माझ्या प्रश्नाला उद्देशून म्हणाले, "टेनिस, बुद्धिबळाचा खेळ, सिनेमा-नाटकं हे अत्यंत आवडीचे माझे छंद आहेत."

आपल्या हातून परिस्थितीमुळें पार न पडलेल्या आणि त्या पार पाडण्याची उत्कट इच्छा असलेल्या अशा अपूर्त महत्त्वाकांक्षा अनेक व्यक्तींच्या जीवनांत असतात, आणि त्या कधीं तरी पूर्ण करण्याची त्याची इच्छाही बलवत्तर असते. म्हणून मी त्यांना विचारलें, "तुम्हांला आयुष्यांत थोडं स्वास्थ्य मिळालं, तर तुम्ही कोणतं महत्त्वाचं कार्य हातीं घ्याल ?"

"अर्थात् संततिनियमनाच्या प्रचाराचं कार्य !" कर्वे उद्गारले, "संततिनियमनाचा मी सर्वत्र प्रचार करीन. आणि मला जर परिस्थिति अनुकूल मिळाली—आर्थिक परिस्थिति अनुकूल लाभली तर गोरगरिबांना संततिनियमनाचीं उपकरणं मोफत देईन. गोरगरिबांना संततिनियमनांचीं उपकरणं आज घेतां येत नाहींत. त्यांच्या जीवनांतील ही अडचण मला दूर करतां आली तर मला फार समाधान लाभेल—आनंद होईल."

संततिनियमनाचा प्रश्न उपस्थित होतांच त्या प्रश्नावर आमची बराच वेळ चर्चा झाली. ब्रह्मचर्य पाळून संततिनियमन करण्याचें म. गांधी यांचें जें मत आहे तें हास्यास्पद अस-

त्याचें कर्वे यांनीं आपलें मत व्यक्त केलें. वैषयिक भावना कुणालाही दडपून टाकतां येणें शक्य नाहीं. विवाहित स्त्री-पुरुषांना तर वासनांचा मोह आवरणें महा कठीण. नैसर्गिक रीतीनें संततिनियमन कधींच शक्य नाहीं. त्यासाठीं संततिनियमनाचीं उपकरणेंच वापरलीं पाहिजेत, असें त्यांनीं आपलें मत व्यक्त केलें.

त्यानंतर आमच्या दैववादावर गप्पा सुरू झाल्या. या विषयावरील कर्वे यांचीं मतें अत्यंत शास्त्रीय आहेत—अभ्यसनीय आहेत. मी त्यांना विचारलें, "दैववादावर तुमचा विश्वास आहे काय ?"

कर्वे म्हणाले, "दैववादाची माझी कल्पना अगदीं निराळी आहे. ज्याला इतर लोक दैववाद म्हणतात त्याला मी Scientific determinism म्हणतों. याचा अर्थ सगळ्याच गोष्टी आधीं ठरलेल्या आहेत. ज्योतिष असा मात्र नव्हे. आज जी जगाची स्थिति आहे ती कालच्या स्थितीवर अवलंबून आहे अन् उद्यांची आजच्या स्थितीवर अवलंबून आहे. कालच्या स्थितींत बदल करतां येत नाहीं म्हणून आजच्या स्थितींत बदल करतां येत नाहीं; तेव्हां उद्यांच्या स्थितींत बदल होणार नाहीं. याचा अर्थ दैववादावर विसंबून राहून कुणी कांहींच कार्य करूं नये असं मात्र नव्हे."

"दैववादावर जर तुमचा विश्वास नाहीं तर असामान्य बुद्धिमत्तेचीं माणसं आयुष्यांत अपयशी ठरतात आणि नालायक माणसं समाजावर अगर जगावर सत्ता गाजवतात, याची संगति कशी लावायची ?"

माझ्या या प्रश्नाला उत्तर देतांना कर्वे म्हणाले, "जीवनांत यश मिळवायला बुद्धिमत्ताच तेवढी पुरते असं नाहीं. तुम्हांला जीं माणसं नालायक वाटतात तीं जगावर सत्ता गाजवायला लायक असतात. समाजावर सत्ता कशी गाजवावी, मोठेपणा कसा मिळवावा याचं त्यांना अचूक ज्ञान असतं. आपल्याला तीं माणसं नालायक वाटत असलीं तरी कर्तबगाराच्या दृष्टीनं लायक असतात. त्यांच्या बाबतींत दैववाद लागू पडत नाहीं."

प्रो. कर्वे यांचीं सर्वच मतें जहाल असल्यामुळें त्यांचे त्यांच्या वडिलांशीं कोणते संबंध आहेत, सलोख्याचे आहेत कीं बिघडलेले आहेत याविषयीं समाजांत फार परस्परविरोधी मतें आहेत. पण मी ज्यावेळीं त्यांच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला त्यावेळीं त्यांच्या लिहिण्याच्या टेबलावर त्यांनीं आपल्या वडिलांची रंगीत तसबीर ठेवलेली मला दिसून आली.

" तुमच्या जहाल मतांमुळं तुमचे आणि तुमच्या वडिलांचे संबंध कायमचे बिघडले आहेत काय? कीं तुमच्या वडिलांना तुमच्या मतांविषयीं आदर वाटतो?" मी विचारलें.

" तसे आमचे आपलेपणाचे संबंध मुळींच बिघडलेले नाहींत. माझीं सर्वच मतं, किंवा विशिष्ट विषयासंबंधींचं तत्त्वज्ञान ते मान्य करतात असं नाहीं."

त्यानंतर इतर लोक आपलें मासिक राजरोस वाचायला घाबरतात. पण आपले वडील आगगाडींतूनही 'समाज-स्वास्थ्य' आणि "Reason" वाचतात असें त्यांनीं मला सांगितलें.

लैंगिक प्रश्न, दैववाद वगैरे विषयांवरून आमच्या चर्चेचा ओघ आहारशास्त्राकडे वळला. कोणत्याही विषयावर मत विचारलें, कीं प्रो. कर्वे यांचीं मतें नेहमीं तयार असतात. खरें म्हटलें तर लैंगिक प्रश्न कर्वे यांच्या जास्त आवडीचा; पण राजकारण, समाजकारण, आहार आणि विहार या सर्व प्रश्नांचा त्यांचा अभ्यास आहे. त्यांचें जसें फ्रेंच भाषेवर प्रभुत्व आहे तसेंच इंग्रजी भाषेवरही आहे. फ्रेंच वाङ्मयाचा त्यांच्या मनावर फार परिणाम झालेला आहे. अन् फ्रेंच वाङ्मयांत ज्याप्रमाणें मानवी जीवनांतील कोडीं सोडविण्याचे तेथील जुन्या नव्या लेखकांनीं प्रयत्न केले आहेत तसे मराठी वाङ्मयांतही केले जावे असें त्यांचें मत आहे. अन् म्हणूनच मानवी जीवनावर प्रकाश पाडणाऱ्या फ्रेंच लेखकांच्या कथा ते नेहमीं आपल्या 'समाज-स्वास्थ्या'च्या अंकांत देत असतात.

"आपण कसला आहार घेतां?" मी त्यांना विचारलें.

"मी नेहमीं कच्चा आहार घेतों." कर्वे यांनीं सुरवात केली, "कोणताही आहार शिजविण्यासाठीं विस्तवाचा मुळींच उपयोग करायचा नाहीं असं मी ठरविलं आहे. याचं कारण कोणतंही अन्न शिजविल्यानं त्यांतील सत्त्व (Vitamin) नाहींसं होतं."

"म्हणजे आपण भात कधींच घेत नाहीं का?"

"मुळींच नाहीं." कर्वे उद्गारले.

"ब्रेडसुद्धां कधीं खात नाहीं का?"

"अलिकडे थोडी ब्रेड घेतों. पण तीसुद्धां न घेतलेली बरी. कोणताही संस्कार केला न जातां जें अन्न खाल्लं जातं तेंच खरं पौष्टिक अन्न. रानटी लोक कुठं शिजवून अन्न खातात? पण कच्च्या अन्नांत सत्व असतं म्हणून त्यांची प्रकृति धष्टपुष्ट असते."

"आपण कच्चं अन्न खाण्यांस केव्हांपासून सुरवात केली? आणि कारण काय झालं?"

" एक दीड वर्ष झालं याला. कच्चं अन्न घ्यायला असं झालं, कीं मी अनेक शारीरिक व्याधींनीं आजारी होतों. विशेषतः ब्लड प्रेशरच्या विकाराचा मला जास्त त्रास होत होता. उन्हाची तिरीपही सहन होत नसे. एकदां तर मी रस्त्यांत फेन्ट येऊन पडलों. त्यानंतर मी कच्चं जेवण घेण्यास सुरवात केली. आणि कांहीं दिवसांनीं माझी प्रकृती सुधारत चालली. हें अन्न घेण्यापूर्वी माझी प्रकृति सुधारेल असं मला वाटलं नव्हतं. पण आतां मी टेनिसचे तीन तीन सेट खेळूं शकतों. "

" कच्च्या अन्नामुळं वजन कमी झालं का ? "

" हो—वजन कमी झालं. पण Vitality मात्र कमी झाली नाहीं—उलट वाढली. अन् त्यानंतर कोणतीही शारीरिक व्याधी राहिली नाहीं. कच्चं अन्न खाण्यांत एक धोका असतो. चांगलं चावून अन्न खाल्लं नाहीं तर डायरिया मात्र होण्याचा संभव आहे. पण जर चांगलं चावून अन्न खाण्याची संवय ठेवली तर मात्र ही भीति नाहीं. दुधाखेरीज इतर सर्व पदार्थ मी कच्चे खातों. "

" मग दुधच कां कच्चं घेत नाहीं ? "

" याचं कारण आहे. दूध नेहमीं वाहेरून येत असतं. अर्थातच त्यांत रोगाचे जंतु असण्याचाही संभव असतो. दूध गरम केलं म्हणजे रोगांच्या जंतुची तेवढी भीति नाहीं. म्हणूनच मी दूध तापवून घेतों. पचत नाहीं म्हणून तापवून घेतो असं नव्हे. माझ्या घरीं गाई म्हशींचं दूध मिळण्याची सोय झाली तर मी कच्चंच दूध घेईन. "

" आपण मांसाहार करतां का ? "

" मी मांसाहार करतों. पण नेहमीं असंच नाहीं. मी तें कच्चं खात नाहीं. पण कच्चं मांस खाल्लं तर जास्त वरं. मी पॅरिसमध्यें असतांना एक बाई आजारी होती. डॉक्टरनीं तर त्या बाईला घोड्याचं कच्चं मांस खाण्यास सांगितलं आणि तिची या 'औषधा'नं प्रकृति सुधारलीही. "

त्यानंतर आपल्या 'आहार-शास्त्र' या पुस्तकासंबंधीं बोलतांना प्रो. कर्वे म्हणाले, " एका गृहस्थानं खाजगी वक्षीस ठेवलं होतं म्हणून मी 'आहार-शास्त्र' या नांवाचं पुस्तक लिहिलं होतं. त्या पुस्तकांतही मी कच्च्या अन्नाचा पुरस्कार केलेला आहे. पण ती कच्च्या अन्नाची कल्पना परीक्षक—मंडळाला आवडली नाहीं. त्या मंडळांत या बाबतींत मतभेद झाल्यामुळं कित्येकांची तर परीक्षकमंडळांतून राजीनामा देईपर्यंत मजल गेली.

त्यांतील कांहीं भाग गाळीत असलां तर बक्षीस मिळेल, तुमचंच पुस्तक चांगलं आहे, असं मला कळविण्यांत आलं. पण तो भाग गाळण्यास मी परवानगी दिली नाहीं. पण ज्या गृहस्थांनीं बक्षिसाची रक्कम ठेवली होती त्यांनीं या बाबतींत तडजोडीची भूमिका स्वीकारून मला व डॉ. म्हसकर यांना अर्धे अर्धे बक्षीस दिलं ! '

" आपणांस कोणत्या तऱ्हेचा पोशाख आवडतो ? "

" एकाच तऱ्हेचा पोशाख करावा असं माझं मत नाहीं. नवीन तऱ्हेचे पोशाख करावे असं मला वाटतं. पण तसं करतोंच असं नाहीं. धोतर मात्र कधीं आवडत नाहीं. सुरवार, त्यावर लांब कोट आणि डोक्यावर फेझ् टोपी घालणं मला जास्त आवडतं. "

" आपण रुमाल कधीं वापरतां का ? "

" कधीं कधीं वापरतोंही. पण तो बांधणं थोडं त्रासाचं आहे म्हणून नेहमीं वापरत नाहीं. "

" युरोपीयन पद्धतीचा पोशाख आपणांस जास्त आवडत नाहीं काय ? "

" फारसा आवडत नाहीं. पण तो पोशाख सोईचा असतो म्हणून मी वापरतों. "

नगर वाचनालय, ... ग्रंथा

: ३ :

# डॉ. बी. आर. आंबेडकर

"सगळ्यांत कुठल्या गोष्टीचा जर मला जास्त तिरस्कार असेल तर राजकारणाचा. मी राजकारणांतून निवृत्त झालों तर वाचन अन् लेखन यांतच माझा सारा वेळ मी खर्च करीन. माझ्या दृष्टिकोणानं भगवान् बुद्धाच्या जीवनचरित्रावर जसं मी एक चरित्र लिहिणार आहें, त्याचप्रमाणं मी स्वतः एक कादंबरीही लिहिणार आहे." असे उद्गार डॉ. बी. आर. आंबेडकर यांनीं मी त्यांची भेट घेतली त्यावेळीं काढले.

डॉ. आंबेडकर यांची भेट घ्यायचें ज्यावेळीं मी ठरविलें त्यावेळीं माझ्यापुढें अनेक अडचणींची कल्पना चमकून गेली. त्यांतली पहिली अडचण म्हणजे त्यांना माझ्याशीं अनेक विषयांवर चर्चा करण्यास वेळ मिळेल कीं नाहीं ही. आणि दुसरी अडचण म्हणजे अशी, कीं त्यांच्या लहरी स्वभावाविषयीं असलेली मला माहिती. डॉक्टरांच्या लहरीविषयीं

अशी गोष्ट सांगतात, कीं आपल्या 'स्टडी–रूम' मधें वाचीत किंवा लिहित असले म्हणजे स्वतःचेंही अस्तित्व ते विसरतात ! कुणीतरी जिवलग स्नेही जरी त्यांना भेटायला गेला तरी त्यावेळीं ते 'काय ? बरं आहे ना ?' असा साधा प्रश्न करून ते जे आपली मान पुस्तकांत खुपसतात ते तास न् तास तशा समाधींत असतात. पण जर का ते आपल्या 'स्टडी रूम'च्या बाहेर असले तर त्यांना सहजच एकादा प्रश्न विचारावा, आणि जगांतील विचारप्रवाहांचें बसल्या बैठकींत ज्ञान करून घ्यावें.

डॉक्टरांच्या भेटींसाठीं मी त्यांची भेट व्हावी म्हणून डॉक्टरांच्या सेक्रेटरींना फोन केला. पण त्यावेळीं सेक्रेटरी घरीं नसल्यामुळें मी डॉक्टरांना टेलिफोन केला. डॉक्टर त्यावेळीं आपल्या 'स्टडी रूम'मधें असतील अशी माझी कल्पना होती. पण डॉक्टर आपल्या बंगल्याच्या टेरेसवर कुणा पाहुण्याशीं बोलत बसले आहेत असें ज्यावेळीं मला कळलें त्यावेळीं माझ्याबरोबर असलेल्या डॉक्टरांच्या एका स्नेह्याबरोबर मी डॉक्टरांच्या बंगल्यावर गेलों.

डॉक्टरांची मी 'अपॉइन्टमेन्ट' मुळींच घेतलेली नव्हती. व्हिजिटिंग कार्ड आंत पाठविल्यानंतर पंधरा मिनिटें बाहेर तिष्ठत रहावें लागेल अशी माझी कल्पना होती. पण तेथें जाऊन पहातों तों डॉक्टरांचें घर म्हणजे सर्वांनाच 'मुक्तद्वार' असलेलें मला आढळून आलें.

मी सरळ वर गच्चीवर गेलों, त्यावेळीं डॉक्टर पाहुण्याशीं कांहींतरी कायदेशीर प्रश्नाबाबत बोलत बसले होते. मला ते दुसऱ्या दिवशीं वेळ देऊन मुलाखतीस बोलावतील असें मला पहिल्यानें वाटलें. पण मी ज्यावेळीं त्यांना माझ्या येण्याचा उद्देश सांगितला त्यावेळीं "हं बोला, काय विचारायचं आहे तुम्हांला ?" असा त्यांनीं मला प्रश्न केला.

असेंब्लीमधें अगर सभांत भाषणें करतांना मी अनेक वेळां डॉ. आंबेडकर यांना पाहिलें होतें. प्रतिपक्षाला वाग्बाणांनीं नामोहरम करण्याच्या वेळीं त्यांची मुद्रा बरीच क्रुद्ध दिसते. ते फारच गंभीर दिसतात, अन् अशा मनःस्थितींत असतांनाच मी त्यांना अनेक वेळां पाहिलें होतें. पण आतांची त्यांची मुद्रा खेळकर दिसत होती. त्या वेळेपुरते तरी जीवनाकडे ते खेळकर मनःस्थितीनें आणि मुद्रेनें पहात आहेत, असें मला वाटलें. त्यावेळीं त्यांचा पोशाख अगदीं साधा होता. बंगाली पद्धतीनें त्यांनीं लहानसें धोतर गुंडाळलें होतें. अन् सदऱ्यावर एक शाल परिधान केली होती.

"आपण जुनं मराठी वाङ्मय वाचलं आहे का ?"

" बहुतेक सर्व संतवाङ्मय वाचलं आहे मी. "

" कुणाचं वाङ्मय जास्त आवडतं आपल्याला ? "

" मुक्तेश्वर हे माझ्या जास्त आवडीचे आहेत. "

" कां आवडतात आपल्याला हे कवि ? " माझ्या बरोबरच्या संपादक-मित्रानें प्रश्न केला.

" मुक्तेश्वर-ज्ञानेश्वराचं तत्त्वज्ञान मला मान्य आहे असं नाहीं. पण मला त्यांचं जें वाङ्मय आवडतं तें केवळ भाषेच्या वैभवामुळं-तत्त्वज्ञानामुळं नव्हे. "

" पण गीतेविषयीं आपलं काय मत आहे ? " माझ्या संपादक-मित्रानें प्रश्न विचारला.

" I don't accept gita at all. " डॉक्टर म्हणाले.

" कां बरं ? " मी त्यांना विचारलें.

" याचं कारण असं आहे, " डॉक्टर जास्त गंभीर होऊन म्हणाले, " ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग आणि कर्ममार्ग असे तीन मार्ग गीतेमधें सांगितले आहेत. पण त्या मार्गांतसुद्धां विसंगतीचे अनेक नमुने सांपडतात. आपण जीवनांत केलेल्या सर्व चुका सांवरून घेण्याचं त्यांत तत्त्वज्ञान आहे. मूर्खपणानं लिहिलेला कोणता ग्रंथ असेल तर तो गीता ! हें एक साधंच उदाहरण पहा. कृष्णानं अर्जुनाला युद्धप्रवृत्त करण्यासाठीं जो कुरुक्षेत्रावर उपदेश केला आहे, तोसुद्धां विसंगतीनंच भरलेला आहे. पहिल्यानं कृष्ण उपदेश करतो राज्यासाठीं लढ, नंतर सांगतो क्षात्रधर्मासाठीं शस्त्र हातांत घे, अन् नंतर सांगतो, मी सांगतों म्हणून युद्ध कर ! आतां यांत नीति कुठं राहिली ? "

" गीता म्हणजे Compromise of all errors असंच तुमचं मत आहे का ? " माझ्या मित्रानें प्रश्न केला.

" अलबत् ! " डॉक्टर आंबेडकर उद्गारले, " It is an irresponsible book of ethics ! "

गीतेवर चर्चा करतां करतां डॉक्टर हिंदुधर्माच्या चर्चेकडे वळले. अन् धर्मासंबंधींचीं त्यांचीं मतें ऐकतांच माझें असें मत बनलें, कीं जगांतील सर्व धर्मांतील तत्त्वज्ञानाचा डॉ. आंबेडकर यांनीं गाढ व्यासंग केला आहे. धर्मासंबंधीं त्यांचीं मतें परिपक्व आहेत. धर्मासंबंधींचें त्यांचें विशिष्ट तत्त्वज्ञान आहे.

डॉ. आंबेडकर पुढें म्हणाले, " बुद्धधर्माच्या नाशानंतर गीतेला महत्त्व आलं. "

" बुद्ध धर्माचा नाश व्हायचं कारण काय ? " माझ्या मित्रानें प्रश्न केला.

" तो मोठा इतिहास आहे " डॉक्टर म्हणाले, " त्याकाळीं दोन धर्मांचे विचारप्रवाह वाहात होते. एक वैदिक धर्म आणि दुसरा बुद्धधर्म. पण या दोन्ही धर्मांच्या तत्त्वज्ञानांत बुद्धाचं तत्त्वज्ञान अत्यंत महत्त्वाचं होतं—मानवी जातीच्या कल्याणाचं होतं. तरी बुद्धधर्माला यश मिळालं नाहीं. बुद्धधर्माचा अल्पावधींतच नाश झाला.

" याचं कारण ? " मी अधीरतेनें विचारलें.

" थांबा—तेंच मला सांगायचं आहे. " डॉक्टर उद्गारले.

" बुद्धधर्माला अपयश आलं याचं कारण असं, कीं बुद्धधर्माला त्या काळच्या ब्राह्मणवर्गाचा कसून विरोध होता. बुद्धधर्म जगांतून शक्य तितक्या लवकर नष्ट व्हावा अशी त्यांची आत्यंतिक इच्छा होती. कारण बुद्धधर्मांत स्वातंत्र्य आणि समानता हीं जीं तत्त्वं आहेत तीं ब्राह्मणवर्गाला मुळींच पसंत नव्हतीं. समाजामधें समानता आणि स्वातंत्र्य याचं युग जर सुरू झालं तर आपलं समाजांतील स्थान कायम राहाणार नाही अशी त्यांना भीति वाटत होती. "

" आर्थिक हितसंबंधासाठींच ब्राह्मणानीं हें धोरण स्वीकारलं होतं का ? "

" मुळींच नाहीं—आर्थिक हितसंबंधापेक्षां सामाजिक हितसंबंधावरच त्यांची लोभी नजर खिळलेली होती. जगांत बुद्धधर्माचा विजय झाला असता तर जातिभेद शिल्लक राहिले नसते; आणि असं झालं असतं तर ब्राह्मणाचं समाजातलं स्थान कसं अढळ राहिलं असतं ? "

" ब्राह्मणवर्गाला इतर जातींनीं कसा पाठिंबा दिला ? बुद्धधर्म असतांना अल्पसंख्याकांनीं बहुसंख्याकांवर मात कशी केली व बुद्धधर्माचा निःपात कसा केला ? "

" ज्यांच्या हातीं राजकीय आणि लष्करी सत्ता होती तो अल्पसंख्य वर्ग मधेंच घोंटाळत होता. त्यांना आपल्या हातांशीं धरण्याचा ब्राह्मणवर्गानं कावा लढविला. त्यांच्या राम, कृष्ण, या देवांना मान्यता देऊन त्यांचीं मनं वळविलीं. पण क्षत्रियांना आपल्या बाजूला वळविण्यासाठीं ब्राह्मणांनीं कृष्ण, राम, अशासारख्या क्षात्रवंशी देवांना भजण्यास सुरवात केली आणि अशा रीतीनं त्यांनीं क्षत्रियांचीं मनं वळवून घेतलीं. बुद्धधर्माला मोठ्या शिताफीनं विरोध केला. ब्राह्मणांचा विरोध नसता तर आज हिंदुस्थानांत बुद्धधर्माचं युग निर्माण झालं असतं. आजच्यापेक्षां हिंदुस्थानची निराळी परिस्थिति दिसली असती. बुद्धधर्मांतच अनत्याचाराचं तत्त्वज्ञान आहे ! "

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

" म. गांधींचंही अनत्याचाराचं तत्त्वज्ञान आहे कीं ! " माझे संपादक—मित्र म्हणाले.

" खरं आहे ! " डॉक्टर उपहासात्मक हंसत हंसत म्हणाले, " त्या माणसाचा अनत्याचाराच्या तत्त्वज्ञानावर अन्तःकरणपूर्वक कितपत विश्वास आहे याची मला शंका आहे ! त्यांतूनही गांधींना मी बुद्धपंथीय म्हणायला मुळींच तयार नाहीं. गांधी हे जैनपंथीय आहेत असं फार तर म्हणतां येईल. आपल्या श्वासानंही कुणाला उपद्रव होऊं नये, पावलाखालीं मुंगीही चिरडल्याचं 'पाप' आपल्या माथीं घेऊं नये म्हणून नाकाला फडका गुंडाळून रस्त्यांत भीत भीत चालणारे जैन लोक आणि गांधी यांच्यांत फारसा फरक नाहीं. गांधीचं आजचं अहिंसेचं जें तत्त्वज्ञान आहे तें बुद्धाचं तत्त्वज्ञान नसून जैनांचं तत्त्वज्ञान आहे. बुद्धानं कधींच असल्या अनत्याचाराच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केलेला नाहीं."

" अनत्याचारासंबंधीं आपलं काय मत आहे ? "

" अनत्याचाराचं तत्त्वज्ञान ठीक आहे. बुद्धांचंही हें आवडतं तत्त्वज्ञानं होतं. पण या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करण्याचा प्रश्न सर्वस्त्रीं परिस्थितीवर अवलंबून आहे. याचा अर्थ शस्त्रबल नसावं असा मात्र कुणी करूं नये. शस्त्रबल असावं, पण त्याचा विघातक उपयोग करूं नये. आणि शस्त्रबल असतांही कुणी अनत्याचारी वृत्तीनं राहायचं व्रत पाळलं तर तें कांहीं वाईट नाहीं. सामर्थ्यवान् असतां अनत्याचाराचं व्रत पाळावं—दुबळेपणांत नाहीं. बुद्धांचं हेंच तत्त्वज्ञान होतं. गांधींचं मात्र आजचं जैन तत्त्वज्ञान आहे. "

" बुद्धधर्माविषयीं आपणांस अजूनही महत्त्व वाटतं का ? "

" अर्थात्च ! " डॉक्टर उत्साहानें म्हणाले, " बुद्धधर्मामुळं लोकांचं नैतिक बल वाढलं आहे. "

डॉक्टर आंबेडकर पुढें बोलतांना म्हणाले, " आज जो हिंदुधर्म आहे त्यांत दोन प्रवाह चालू आहेत. एक वैदिक धर्म आणि दुसरा बुद्धधर्म. आजच्या हिंदुधर्मांत ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांतल्या नव्वद टक्के बुद्धधर्मांतल्या आहेत. मात्र आजच्या हिंदुधर्मांत जातिभेद आणि कर्मकांड यांचा जो अनिष्ट वैदिक प्रवाह वाहत आहे त्या प्रवाहामुळं हिंदुधर्माचा साराच प्रवाह बिघडून गेला आहे. "

" समाजांत कोणत्या तरी धर्माचं बंधन असावं असं आपणांस वाटतं काय ? "

" अलबत् ! " डॉक्टर म्हणाले, " धर्माचं बंधन नसलं तर प्रत्येक माणसाच्या संरक्षणासाठीं एकेका पोलिसाची जरूरी लागेल. "

नगर वाचनालय, सातारा.

आ. ४४०

" कां बरं ? धर्माचं कार्य कायदा करूं शकणार नाहीं का ? "

" मुळींच नाहीं. " डॉक्टरनीं बोलायला सुरवात केली, " विशिष्ट धर्म असं मी म्हणत नाहीं. पण कोणत्या तरी धर्माच्या तत्त्वज्ञानाचं माणसाच्या मनावर दडपण पाहिजे. जेवणाचे डबे पोंचविणाऱ्या घांट्यांचं, मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या लोकांचं उदाहरण घ्या. किंवा थोरामोठ्यांच्या घरीं नोकरकाम करणाऱ्या नोकरांचं उदाहरण घ्या. भुकेनं व्याकूळ झाले तरी ते आपल्या मालकांशीं अत्यंत प्रामाणिकपणानं वागतात. याचं कारण कायद्याला ते घाबरतात असं नव्हे, तर धर्माचं त्यांच्या मनावर दडपण असतं. अधर्म होऊं नये— आपल्या हातून धर्मबाह्य कृत्य होऊं नये असं त्यांना नेहमीं वाटत असतं. "

" पण कायद्यांची तरी बंधनासाठींच योजना केली आहे ना ? कायद्यांचंही माणसाच्या मनावर दडपण असतं. " मी म्हटलें.

" चुकतां आहांत तुम्हीं ! " डॉक्टर म्हणाले, " कोणत्याही देशांतून धर्म नाहींसा झालेला नाहीं. धर्माचं बंधन कायम आहे. धर्माचा भावनात्मकतेशीं संबंध पोंचतो आणि कायद्याचा बुद्धीशीं. जीवनांत भावनात्मकतेला फार मोठं स्थान आहे. म्हणूनच मी म्हणतों, कीं मानवी जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठीं कोणता तरी धर्म हवा — कोणतें तरी तवत्त्ज्ञान हवं ! "

" बरं, ईश्वरासंबंधीं आपलं कोणतं मत आहे ? ईश्वरावर आपला विश्वास आहे का ? "

" I do believe in God ! " डॉक्टर देवभोळ्या माणसाचा आव आणून म्हणाले, " विशिष्ट देवांवर किंवा देवाच्या आकृतीवर माझा विश्वास नसला तरी कोणती तरी अद्‌भुत शक्ति आपल्यावर प्रभाव गाजवीत आहे अशा मताचा मी आहें. "

" कोणती तरी Conscious Agency असंच आपणांस म्हणायचं आहे का ? " माझ्या—मित्रानें प्रश्न केला.

" असं म्हटलं तरी चालेल ! " डॉक्टर उद्गारले.

संत वाङ्मय, वैदिक धर्म, बुद्धधर्म, ईश्वराचे अस्तित्व यासंबंधीं आमची चर्चा झाल्यावर मी डॉक्टरांना विचारलें, " संत वाङ्मयानंतर आपण कोणते आधुनिक ग्रंथकार वाचले आहेत ? "

" हरीभाऊ आपटे, " डॉक्टर म्हणाले, " हरिभाऊंचं वाङ्मय मी अधाशीपणानं वाचलं आहे. हरिभाऊंचं वाङ्मय मला अत्यंत आवडलं. त्यानंतरच्या मराठी ग्रंथकारांचं वाङ्मय मात्र मी वाचलं नाहीं. "



३१।१।७४० ३६, भवानी पेठ

" अन् इंग्रजी वाङ्मय ? "

" मनोरंजनासाठीं मी कधींही कांहीं वाचलं नाहीं—वाचीत नाहीं. कथा—वाङ्मयापेक्षां इतर solid वाङ्मयच मी जास्त वाचलं आहे. शिकण्यासाठीं मी वाङ्मय वाचतों. मनरंजनासाठीं नाहीं. What instructs me amuses me ! अर्थशास्त्र आणि राजकारण हे अत्यंत माझ्या आवडीचे विषय आहेत आणि या विषयांवर सर्व उपलब्ध पुस्तकं मी वाचलीं आहेत. "

" आपण रशियन तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे का ? "

" मार्क्स वाचला आहे मी ! " डॉक्टर म्हणाले, " His is the satisfying philosophy to the lower order. It is a direction, not a dogma असं जें लेलिन म्हणतो, तेंच खरें आहे "

" आपण रशियन राज्यघटनेचा अभ्यास केला आहे काय ? "

" I did not get a chance to read it. "

" पण आपणांस रशियन तत्त्वज्ञानाविषयीं काय वाटतं. "

" They may be devils. But they have got good ideas ! पण ठराविक चाकोरींतून समाजाला विशिष्ट तत्वज्ञानानं वळण लावण्याची कल्पना मला पसंत नाहीं. नेहमीं समाज experimental stage ( प्रयोगावस्था ) मधें असला पाहिजे. नव्या कल्पनांना, विचारांना आणि प्रयोगांना त्यांत वाव असला पाहिजे. एका लेखणीच्या फटकाऱ्यानं आदर्श असा समाज कुणालाही निर्माण करतां येणार नाहीं. प्रयोगावस्थेंतूनच आदर्श जग हळुहळू निर्माण होत असतं. लोकांच्या विचारांना आणि कल्पनांना वाव मिळाला पाहिजे—त्यांचा विकास झाला पाहिजे. माणसाच्या मनाचा विकास होण्याला स्वातंत्र्य पाहिजे. एका ठराविक ठशानं माझ्या खुर्च्या कुणी तयार केल्या तर त्या मला आवडणार नाहींत. I would like my chairs to be something different ! "

"मार्क्सच्या तत्त्वज्ञानाला लेनिनंन बरंच निराळं वळणं लावलं आहे." नाझे मित्र म्हणाले.

" Andre Gide चा रशियासंबंधीचा, जो मी नुकताच एक ग्रंथ वाचला त्यामुळं माझ्या मनावर फारच परिणाम झाला. त्यांच्या पुस्तकावरून माझा असा समज झाला आहे, कीं रशियांत मुळींच व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं. म्हणूनच मला रशियासंबंधीं आज इतकी

उत्सुकता वाटत नाहीं. तत्त्वज्ञान कितीही प्रभावी असलं तरी त्या तत्त्वज्ञानाला प्रयोगाचे पैलू पाडले पाहिजेत. You cannot lay down an ideal state by a stroke of pen ! "

" आपण रशियन Marriage laws चा अभ्यास केला आहे का ? "

" I am not interested in Marriages ! " डॉक्टर हंसत हंसत म्हणाले.

" आपणांस अर्थशास्त्र व राजकारण यांखेरीज दुसरा कोणता विषय आवडतो ? "

" चित्रकला ! " डॉक्टर म्हणाले, " खरंच, माझ्याकडं चित्रं विकत घेण्याइतके पैसे नाहींत. नाहींतर पुस्तकांप्रमाणंच मी चित्रंही घेतलीं असतीं विकत ! मला हिंदी चित्रकला जशी आवडते तशीच इटालिअन चित्रकलाही आवडते ! "

चित्रकलेसंबंधीं बोलततांना डॉक्टर पुढें म्हणाले, " मी ऑक्सफर्ड येथें असतांना माझ्याच बरोबर बेव्हन नांवांच्या एका सधन गृहस्थाचा भाऊ होता. त्याच्यामुळं बेव्हनची आणि माझी ओळख झाली. बेव्हन हा मोठा सधन व्यापारी होता. पण ब्रिटिश म्युझियमपेक्षांही त्याच्याजवळ मोठा चित्रसंग्रह होता. त्यानं हजारों पौंड चित्रं खरेदी करण्यासाठीं खर्च केले होते. पुढं बेव्हन अफरातफरीच्या आरोपानं तुरुंगांत गेला. पण माझा त्याच्याविषयींचा आदर मात्र कमी झाला नाहीं. याचं कारण त्याचा चित्रसंग्रह पाहिल्यामुळं माझ्या मनावर अनुकूल परिणाम झाला होता. त्याच्या रसिकतेमुळं माझ्या मनांत आदर निर्माण झाला होता. आपल्याकडील व्यापारी किंवा धनिक वर्ग यांच्यामधें अशी रसिकतेची दृष्टी असत नाहीं, हा त्यांचा दोष नाहीं, चातुर्वर्ण्याचा आहे—चातुर्वर्ण्यांत जे वर्णभेद पाडले आहेत त्यांत कोणी काय करावं याचा खुलासा केला आहे. ब्राह्मणांनीं संस्कृति आणि कला यांचं संवर्धन करावं, वैश्य लोकांनीं पैसा कमवावा असे हे धार्मिक समजले जाणारे नियम असल्यामुळं प्रत्येकजण ठराविक ठशानं जीवनाकडं पहात असतो. त्यामुळं त्यांच्यांतील रसिकता मेली आहे. आपल्याकडील श्रीमंत माणसं पहा. त्यांना पैशांची अनुकूलता असली तरी आपल्या क्षेत्राबाहेर ते कोणत्याही गोष्टीकडं लक्ष देत नाहींत. आमच्याकडच्या धनिक मारवाड्यांच्या घरांत एकादंही सुंदर चित्र आढळणार नाहीं. पण युरोपांत तसं नाहीं. प्रत्येकजण आपापला व्यवसाय सांभाळूनही निरनिराळ्या कलांकडे दक्षतेनं पहातात. आपल्याकडे कलेविषयीं जी अनास्था दिसून येते याचं कारण चातुर्वर्ण्य आहे. चातुर्वर्ण्यामुळें हिंदुधर्मातील लोकांच्या रसिकतेचंही अपहरण झालं आहे. "

" आपणांस संगीत आवडतं का ? "

" संगीत आणि हास्य प्रत्येक माणसाला आवडलं पाहिजे. संगीतामुळं जीवनांत नवजीवन निर्माण होतं. तसंच हास्यानंही. माणसाला पोटभर हंसतां आलं पाहिजे. आमच्या हिंदी लोकांना शत्रु निर्माण करतां येतात. पण हंसतां मात्र येत नाहीं. हास्य हें प्रभावी शस्त्र आहे. उपहासपूर्वक हांसूनही शत्रुची रेवडी उडवितां येते—त्याला नामोहरण करतां येतं. आणि म्हणूनच दुसऱ्याकडं पाहून हंसणं आणि स्वतःही पोठ धरधरून हंसणं मला फार आवडतं."

" आपणांस राजकारण फार आवडत असेल नाहीं ?"

" नाहीं—मुळींच नाहीं ?" डॉक्टर म्हणाले, ' Politics is the one thing that I hate ! सगळ्यांत कुठल्या गोष्टीचा जर मला तिटकारा असेल तर तो राजकारणाचा !"

" आपण राजकारणांतून निवृत्त झालांत तर कोणतं आवडीचं काम हातीं घ्याल ? "

" I would do literary work ! लेखनांत सारा वेळ मी खर्च करीन. माझ्या दृष्टिकोणानं बुद्धाच्या चरित्रावर मी एक ग्रंथ लिहिणार आहे आणि एक स्वतंत्र कादंबरी पण लिहणार आहे !" डॉक्टर आनंदानें म्हणाले.

" आपण आत्मचरित्र कां लिहित नाहीं ? "

" लिहिण्यासारखं कांहीं नाहीं म्हणून ! " डॉक्टर हंसत हंसत म्हणाले.

: ४ :

# सौ. लीलावती मुनशी

" मला लिहायची स्फूर्तीच होत नाहीं हल्लीं. केवळ लिहिण्यासाठीं लिहिणं मला मुळींच आवडत नाहीं अन् दुसरीही गोष्ट अशी, कीं लिहिण्यासाठीं जें एक स्वास्थ्य लागतं तेवढंही स्वास्थ्य मला कार्य-बाहुल्यामुळं लाभत नाहीं. अन् म्हणूनच मी अलिकडे कांहीं लिहित नाहीं. "

मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या कॉंग्रेसपक्षाच्या स्त्रीसभासद आणि मुंबई सरकारचे माजी गृहमंत्रि आणि प्रसिद्ध गुजराती ग्रंथकार कन्हैयालाल मुनशी यांच्या पत्नी सौ. लीलावती मुनशी यांनीं मुलाखतींत वरील उद्गार काढले.

राजकारणी, साहित्यसेवक या नात्यानें मुनशी—पतिपत्नीला गुजराती समाजांत इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांत महत्व मिळालें आहे. पण कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीनें विचार केला तरीही मुनशी पतिपत्नीचें जोडपें समाजाला आदर्श आहे. प्रेम हें क्षणभंगुर आहे असें म्हणतात. पण एकाच विचारांचे, मनोभावनांचे स्त्री–पुरुष एका ठिकाणीं आले म्हणजे ते

जीवनांत स्वर्गसुख निर्माण करूं शकतात हें मुनशी—पतिपत्नीच्या जीवनचरित्रावरून दिसून येईल.

पूर्वीच्या लग्नापासून अनेक मुलें असलेल्या पुरुषांशीं लग्न करणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत. पण पूर्वीच्या पतिपासून मुलें असतांना स्त्रीशीं लग्न करणारा पुरुष मात्र समाजांत क्वचितच आढळतो. उत्कट प्रेम असल्याखेरीज पूर्वीचीं अपत्यें असलेल्या स्त्रीशीं पुरुष विवाहबद्ध होणार नाहीं.

मुनशी–पतिपत्नीचे एकमेकांवरील प्रेम असेंच अनन्यसाधारण आहे—हेवा करण्यासारखें आहे. कन्हैयालाल मुनशी यांना पहिल्या पत्नीपासून झालेलें अपत्य असतांना आणि लीलावती मुनशींनाही पहिल्या लग्नापासून झालेलें अपत्य असतांना या उभयतांनीं उत्कट प्रेमामुळें लग्न केलें. त्यांचें जीवन सत्यसृष्टींतलें न वाटतां काव्यमय जीवन वाटतें. पण काव्यमय मनोभावनेमुळें एकत्र येणारीं जोडपीं दुदर्म्यै ध्येयवादी असतात हे क्वचितच दिसून येतें. पण मुनशी—पतिपत्नीच्या जीवनांत मात्र हा ध्येयवाद पूर्णपणें दिसून येतो. काव्यमय जीवनाच्या मखमली गालीच्यावर चालत असतांना मुनशी—पतिपत्नीनें ध्येयवादाच्या गिरिशिखरांवरही प्रवास केला आहे. ध्येयवादासाठीं कष्टमय जीवनाचा अंगिकार केला आहे. समाजाच्या टीकेचे आघात हंसत खेळत सहन केले आहेत.

मुनशी यांच्या मलबारहिलवरील बंगल्याजवळ जाऊन पोंचेपर्यंत त्यांच्या जीवनाचा इतिहास माझ्या मनःचक्षूंसमोर दिसत होता. बंगल्याच्या फाटकाच्या प्रवेशद्वारावर मुनशी यांच्या नांवाचा बोर्ड पहातांच मी आंत शिरलों. पण मी आंत शिरतांच समोर मला दोन भव्य दगडी बंगले दिसले. त्यांपैकीं मुनशी कोणत्या बंगल्यांत राहात असावे याचा मला अंदाज लागेना. इतक्यांत पहिल्या बंगल्याच्या प्रवेशद्वारावर पाठमोऱ्या उभ्या असलेल्या एका युवतीकडे माझें लक्ष गेलें. बाहेर गडीमाणुसही कुणी न दिसल्यामुळें अगांतुकपणें बंगल्यामधें शिरण्यापेक्षां आधीं चौकशी करावी म्हणून ‘ मुनशींचा हाच बंगला का ? ’ असा मी प्रश्न केला त्यावेळीं त्या स्त्रीनें होकारार्थी मान हालविली आणि स्त्री आंत निघून गेली.

आणि मी माझें ‘ व्हिजिटिंग कार्ड ’ आंत पाठवितांच ज्यावेळीं लीलावती मुनशी बाहेर दिवाणखान्यांत आल्या, त्यावेळीं मी थोडा आश्चर्यचकितच झालों. ज्या स्त्रीनें माझ्या प्रश्नाचें बाहेरं उत्तर दिलें होतें त्याच लीलावती मुनशी हें ज्यावेळीं मला दिसून आलें त्या वेळीं ‘ लांबून आपल्याला मला ओळखतां आलं नाहीं ’ असें म्हणून मी दिलगिरी व्यक्त करायच्या विचारांत होतों. पण—

मा० ५७७/७०८७



नगर वाचनालय
२२१८१५८
मोठयांच्या मुलाखती – ग. वि. देसाई

" नांव कां नाहीं सांगितलंत तुम्हीं मला बाहेर ? " लीलावती मुनशीनीं मला चटदिशीं प्रश्न केला. आणि त्यांनीं मला जवळच्या कोचावर बसण्याची खूण केली.

सौ. मुनशींशीं चार दोन वाक्यें बोलतांच मला असें दिसून आलें, कीं सौ. मुनशी या बऱ्याच मोकळ्या स्वभावाच्या आहेत. त्यांचा माझा पूर्व परिचय मुळींच नव्हता. पण त्यांनीं माझ्याशीं मोकळेपणानें बोलायला सुरवात केली. बऱ्याच लहानमोठ्या पुढाऱ्यांना अन् लेखकांना भेटण्याचा मला योग आला आहे. पण पहिल्याच भेटींत मोकळेपणानें गप्पा मारणारे पुढारी माझ्या क्वचितच अवलोकनांत आले आहेत. पण सौ. मुनशी यांच्या वृत्तींत मला बराच मोकळेपणा दिसला. ही त्यांची नैसर्गिक वृत्ति आहे, कीं ही कमावलेली वृत्ति आहे असें विचार माझ्या मनांत आल्याखेरीज राहिले नाहींत.

मुनशी यांच्या दिवाणखान्यांत ज्या वेळीं मी बोलतां बोलतां चौफेर नजर टाकली तेव्हां मुनशी—पतिपत्नीच्या रसिकतेची बरींच प्रतिकें मला आजुबाजूला आढळलीं. मुनशी यांचा दिवाणखाना इतका कलात्मकतेनें शृंगारला आहे, कीं आपण एखाद्या सिनेमा—नाटकांतील मुख्य दिवाणखान्यांत बसलों आहोंत असाच क्षणभर भास होतो. एकाचवेळीं पन्नास साठ माणसें बसूं शकतील इतके निरनिराळ्या रचनेचे कोच अन् खुर्च्या दिवाणखान्यांत ठेवलेल्या आहेत. दिवाणखान्यांत प्रवेश केल्यानंतर उजव्या बाजूला मुनशी यांच्या पुस्तकांनीं भरलेलीं भव्य कपाटें आहेत. आणि त्या पुस्तकसंग्रहांत मुनशींची आवडींचींच अशीं पुस्तकें ठेवण्यांत आलीं आहेत.

सौ. मुनशी यांना मी प्रश्न विचारणार इतक्यांत आंतून श्री. मुनशी यांना भेटल्यानंतर 'आर्यन पाथ' या मासिकाचे प्रतिनिधी दिवाणखान्यांत आले. त्यांनीं सौ. मुनशींना आपल्या मासिकाचा अंक सादर केला त्या वेळीं 'I like it very much!' असें सौ. मुनशीनीं उद्गार काढतांच त्या मासिकाचा प्रतिनिधी बराच खूष झालेला दिसला !

ते गृहस्थ गेल्यावर पुनः मी त्यांना एक प्रश्न विचारला. इतक्यांत एक गृहस्थ आंत आले आणि सौ. मुनशींशीं त्यांनीं गप्पा मारायला प्रारंभ केला.

" आज रविवार आहे, तेव्हां आज हें असं चालायचं ! आपणांला कांहीं घाई नाहीं ना ? " सौ. मुनशींनीं मला विचारलें. अर्थातच मला घाई नव्हती. अन् ज्यावेळीं मी त्यांना तसें सांगितलें त्यावेळीं त्या थोड्या हंसल्या आणि त्यांनीं पाहुण्यांशीं गप्पा मारायला सुरवात केली.

त्यांचें पाहुण्याबरोबरचें बोलणें संपल्यावर माझ्याकडे वळून त्या म्हणाल्या, " हं ! आतां बोला ! "

" श्रीमंत स्त्रियांची गोष्ट वेगळी. पण घरकाम, मुलं इत्यादि कामं संभाळण्याची अंगावर जबाबदारी असलेल्या गरीब विवाहित स्त्रीला सामाजिक अगर राजकीय क्षेत्रांत कार्य करतां येईल काय ? " मी त्यांना विचारलें.

" गरीब विवाहित स्त्रीला सामाजिक अगर राजकीय चवळींत प्रत्यक्ष भाग घेणं अगदीं कठीण आहे. गरीब स्त्रीचंच कशाला, पण मध्यम वर्गांतील स्त्रीलासुद्धां आपला घरचा व्याप संभाळून चळवळींत भाग घेतां येणार नाहीं. "

" मग अशा स्त्रियांनीं चळवळींपासून अगदीं अलिप्त राहावं काय ? "

" असं कसं म्हणतां येईल ? प्रत्यक्ष भाग जरी घेतां आला नाहीं तरी घरीं राहूनही स्त्रियांना देशासाठीं अनेक कामं करतां येतील. त्यांतूनही एकाद्या स्त्रीचा जर नवरा समंजस असला तर तिला सामाजिक चळवळींतही बरंच कार्य करतां येईल. "

आमचें हें बोलणें चालू असतांना श्री. मुनशी एका पाहुण्याबरोबर बोलत दिवाणखान्यांत आले. त्यावेळीं आमच्या बोलण्यांत थोडा खण्ड पडला. इतक्यांत मुनशी—पतिपत्नींचे गुजरातींत कांहीं बोलणें चालू झालें. त्यावेळी मला असें दिसून आलें, कीं मुनशी यांच्या घरांत नेहमीं तीन चार भाषा बोलल्या जातात. सौ. मुनशी माझ्याशीं इंग्रजींत बोलत होत्या. आलेल्या पाहुण्याशीं गुजराती अगर हिंदी बोलत होत्या, आणि या दोन्ही भाषांप्रमाणेंच गडीमाणसांशीं अस्खलितपणें शुद्ध मराठी बोलत होत्या. आणि या चारही भाषांवर त्यांचें प्रभुत्व असलेलें मला दिसून आलें.

श्री. मुनशी आंत गेल्यावर पुनः आमच्या चर्चेला प्रारंभ झाला. मी त्यांना म्हटलें, " आपण असेंब्लीमधें एकपत्नीत्वाचं बिल आणणार होतां. पण हें बिल पास झालं तर पुरुषांवर अन्याय होईल असं आपणांस वाटत नाहीं का ? "

" कसला अन्याय होणार, सांगा ना ! " सौ. मुनशी थोड्या गंभीर होऊन म्हणाल्या.

" माझं म्हणणं असं कीं, " मी बोलायला सुरवात केली, " एकाद्या पतीचं पत्नीशीं पटत नसलं तर त्यानं जन्मभर पत्नीच्या सहवासांत दिवस काढावे का ? "

" आतांपर्यंत स्त्रियांनीं नाहीं का नको असलेल्या पतीच्या सहवासांत असं खडतर जीवन काढलं ? "

" म्हणजे पुरुषांवर सूड उगविण्यासाठींच हें बिल आहे का ?" मी विचारलें.

" असं मुळींच नाहीं !" सौ. मुनशींनीं बोलायला सुरवात केली, " धार्मिक पद्धतीनं विवाह झालेल्या पतिपत्नींना घटस्फोट घेण्याची मुभा नाहीं. तेव्हां अशा स्थितींत स्त्रियांची कुचंबणा नाहीं का होत ? पुरुष दुसरं लग्न करूं शकतो. पण पत्नीला मात्र दुसऱ्या लग्नाची मुभा नसते. अशा स्थितींत स्त्रीनं काय करावं ? धार्मिक पद्धतीनं विवाह झालेल्या जोडप्यांना घटस्फोट घेण्याचं बिल मध्यवर्ति असेंब्लींत आलेलं आहे. तें जर पास झालं तर कुणाला त्रास पोंचण्याचं कारण नाहीं. तोंपर्यंत एकपत्नीत्वाचं पुरुषांवर बंधन घालणारं बिल अवश्य हवं. पुरुषानं दुसरं लग्न केल्यावर स्त्रीची काय अवस्था होते याची कशी तुम्हांला कल्पना नाहीं येत ? रजिस्टर विवाहांची पद्धत सुरू झाली म्हणजे आपोआपच सर्व अडचणी दूर होतील."

" आजचा रजिस्टर विवाहाचा कायदा आपणांस पूर्ण स्वरूपाचा वाटतो का ?" मी विचारलें.

" तो कायदा पूर्ण स्वरूपाचा नाहीं हें खरं. पण आहे त्या स्वरूपाचा कायदा जरी लोकप्रिय झाला तरी बरंचसं कार्य होईल. एकदां त्या कायद्याची सर्रास अंमलबजावणी झाली म्हणजे त्यांतील दोष हळुहळू दूर करतां येतील. त्यांत सुधारणा करतां येईल."

या प्रश्नानंतर आमच्या चर्चेचा ओघ स्त्रियांच्या प्रश्नाकडे वळला, तेव्हां मी त्यांना विचारलें, " कॉंग्रेस जातिभेद अन् स्त्रीपुरुषांमधील भेद न मानतां स्वातंत्र्यासाठीं आणि समानतेसाठीं झगडत आहे. तेव्हां कॉंग्रेससारखी प्रातिनिधिक संस्था असतांना अखिल भारतीय महिला परिषदेसारख्या संस्थेच्या अस्तित्वाची निराळी जरूरी आहे का ?"

" अर्थातच !" सौ. मुनशी यांनीं बोलायला सुरवात केली, " कॉंग्रेस जरी देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आणि स्त्री–पुरुषांच्या हक्कांसाठीं भांडत आहे तरी स्त्रियांचे जे बारीकसारीक प्रश्न आहेत, त्यांकडे लक्ष देण्यांस कॉंग्रेसला आज वेळ नाहीं. तेव्हां स्त्री-जीवनाशीं संबंध येणाऱ्या बारिकसारिक प्रश्नांचा विचार करण्यासाठीं महिला परिषदेचीही अत्यंत जरूरी आहे."

" मग आपण महिला परिषदेच्या कार्यांत जास्त उत्साहानं कां भाग घेत नाहीं ?" मी विचारलें.

" या कामासाठीं माझ्या इतर भगिनींनीं वाहून घेतलं आहेच. मी प्रत्यक्ष जरी

महिला परिषदेच्या कार्यकारी मंडळांत नाहीं तरी माझ्या परीनं मी स्त्रियांच्या प्रश्नांकडे लक्ष देतच आहें."

स्त्रियांच्या प्रश्नांविषयीं सौ. मुनशी यांना फारच जिव्हाळा असल्याचें मला त्यांच्या बोलण्यावरून दिसून आलें. पण इतर देशांत स्त्रियांसंबंधीं जे कायदे आहेत त्या कायद्यांकडे लक्ष देण्यापेक्षां आपल्या देशांतील परिस्थितीच्या अनुरोधानें आपल्या देशांत कायदे तयार केले जाणेंच त्यांना योग्य वाटत असावें. कारण रशियामधें स्त्रियांना कोणकोणते हक्क आहेत, तेथील विवाहविषयक कोणते कायदे आहेत यांचा सौ. मुनशी यांनीं अभ्यास केलेला नाहीं आणि त्यांनीं तें कबूलही केलें.

स्त्रियांच्या प्रश्नांवरील चर्चा संपल्यावर मी त्यांना हळूच विचारलें, "आपण अन् श्री. मुनशी यांच्यामधें कांहीं वैचारिक मतभेद आहेत काय ? "

"I have not yet discovered them !" सौ. मुनशी हंसत हंसत म्हणाल्या.

"श्री. मुनशी यांचं वाङ्मय आपणांस फार आवडतं का ? "

"अर्थातच !" सौ. मुनशींनीं बोलायला सुरवात केली, "मुनशी यांच्या वाङ्मयानंच मला नवी दृष्टी मिळाली. अन् मुनशींच्या सहवासानंच मला वाङ्मयाची खरी ओळख झाली. तेव्हां मुनशी यांचं वाङ्मय मला आवडलं तर त्यांत नवल कसलं ? "

"कोणत्याही गुजराती लेखकापेक्षां मुनशी यांचं वाङ्मय आपणांस ज्यास्त आवडतं का ?"

"हो !" सौ. मुनशींनीं हंसत हंसत उत्तर दिलें.

"पण श्री. मुनशी यांचं वाङ्मय पुरोगामी आहे असं आपणांस वाटतं ?"

"कोणत्या दृष्टीनं म्हणतां ?" सौ. मुनशींनीं प्रश्न केला.

"वैचारिक क्रांतीच्या दृष्टीनं." मी उत्तर दिलें.

"गुजराती वाङ्मयापुरतंच बोलायचं झालं तर मुनशीं यांचं वाङमय पुरोगामी आहे. इतर देशी भाषांच्या वाङमयाशीं मी त्यांच्या वाङ्मयाची तुलना करूं शकणार नाहीं. याचं कारण असं, कीं मराठी, बंगाली किंवा हिंदी वाङ्मयाचा माझा कांहीं अभ्यास नाहीं."

"पण गुजराती लेखकांत मुनशी पुरोगामी आहेत हें तरी खरं आहे ना ?"

"हें माझं मत मघांशीं मी आपणांस सांगितलंच"

"मुनशी यांच्या वाङ्मयाला प्रचारकी वाङ्मय असं आपण म्हणाल का ?"

"मुनशी यांच्या वाङ्मयांत प्रचार आहे. पण तो रशियन थाटाचा प्रचार नाहीं. प्रचाराचा त्यांत अभिनिवेश नाहीं. अद्भुतरम्यता हाच त्यांच्या वाङ्मयाचा मुख्य विशेष आहे."

"आपणांस कोणते परदेशी लेखक आवडतात?"

"जुने इंग्रजी वाङ्मय मी बरंच वाचलं आहे. पण आधुनिक ग्रंथकार मी वाचलेले नाहींत. जुन्या पिढीचे जे ग्रंथकार मी कांहीं वाचलेले आहेत त्यांची आज मला तेवढी स्मृतिही नाहीं. अन् पूर्वींचे ते ग्रंथकार मी आज पुनः वाचले तर ते मला आवडतील असंही म्हणवत नाहीं."

"आपण वाचन सोडलंत तें सोडलंत, पण लेखन का बंद केलं?" मी त्यांना प्रश्न केला.

"I don't get inspiration—स्फूर्ति होत नाहीं म्हणून!" मुनशी यांनीं बोलायला सुरवात केली, "लिहिण्यासाठीं लिहिणं मला आवडत नाहीं. अन् दुसरीही गोष्ट अशी, कीं लिहिण्यासाठीं जे एक स्वास्थ्य लागतं तेवढं कार्यबाहुल्यामुळं मला मिळत नाहीं. असेंब्लीमध्यें गेल्यापासून तर मला मुळींच वेळ मिळत नाहीं. असेंब्लीपुढं येणारीं बिलं, निरनिराळ्या विषयांवरील अहवाल याचं सतत वाचन करावं लागतं. हें सर्व करीत असतां वाङ्मयलेखनाला कसा तो मुळींच वेळ मिळत नाहीं. कथावाङ्मय वाचायलाही मिळत नाहीं तिथं लिहायची गोष्ट कशाला?"

"आपण श्री. मुनशी यांचं जें रेखाचित्र लिहिलं आहे तें लग्नापूर्वी कीं लग्नानंतर?" मी त्यांना विचारलें.

"लग्नापूर्वींच मी तें रेखाचित्र लिहिलं होतं." सौ. मुनशींनीं उत्तर दिलें.

"अगदीं बालपणीं लेखिका व्हायचं अशीचं आपली इच्छा होती का?"

"बालपणीं विशिष्ट अशी कोणतीच माझी महत्वाकांक्षा नव्हती. आमच्या आजोबांची मोठी लायब्ररी होती. संबंध दिवस विविध विषयांवरील पुस्तकं वाचीत बसण्याचाच काय तो माझा कार्यक्रम होता. कितीही तास मी लायब्ररींत वाचत बसत असें अन् त्याचा परिणाम असा झाला, कीं मी लेखिका झालें!"

"आयुष्यांत पुढं आपणांस थोडं स्वास्थ्य अन् मुबलक वेळ मिळाला तर आपण काय करायचं ठरविलं आहे?"

"आज तरी मी माझा पुढील कार्यक्रम आंखलेला नाहीं. पुढचे बेत आज आंखण्यांत कोणता फायदा आहे?"

" आपण आत्मचरित्र कां लिहित नाहीं ? "

" म्हातारपणीं लिहिन कीं मी आत्मचरित्र ! " सौ. मुनशी हंसत हंसत म्हणाल्या.

" आपणांस फोटोग्राफी किंवा चित्रकला आवडते का ? " मी विचारलें.

" या दोन्हीही कला मला अत्यंत आवडतात. पण यांपैकीं कोणतीही कला मला अवगत नाहीं. " त्यांनीं उत्तर दिलें.

सुमारें अर्धा पाऊण तास आमचे विविध विषयांवर बोलणें चाललें होतें. मी एका बड्या पुढाऱ्याच्या पत्नीशीं किंवा एका विद्वान विदुषीशीं बोलत आहे याची मला यत्किंचितही जाणीव होण्यासारखी सौ. मुनशी यांच्या वागणुकींत मला कांहीं दिसलें नाहीं. घरांतल्या कुणीतरी वडिलधाऱ्या व्यक्तिशीं मी गप्पा मारीत आहें असेंच मला वाटलें.

आणि त्या चर्चेमुळें–खेळीमेळीच्या चर्चेमुळें झालेल्या आनंदाच्या भरांत मी सौ. मुनशी यांचा निरोप घेतला.

: ५ :

# बाळ गंगाधर खेर

" माझ्या आयुष्यांत मी अनेक आनंदाचे प्रसंग अनुभविले आहेत. त्या सगळ्याच प्रसंगाचं कशाला मी वर्णन करीत बसूं ? पण आनंद कशांत आहे याची जेव्हां निश्चित कल्पना मला येऊं लागली, त्यावेळीं मात्र मला फार आनंद झाला ! "

मुंबई सरकारचे माजी मुख्य प्रधान बाळासाहेब खेर यांनीं मुलाखतींत उद्गार काढले.

" आपण माझ्यासाठीं पंधरावीस मिनिटं वेळ काढूं शकाल काय ? " मी त्यांना फोनवरून विनंति केली.

" अवश्य ! " बाळासाहेब म्हणाले, " पण आपण असं करा, आज मी जातों आहे बाहेरगांवीं; तेव्हां आपण जर बोटीवर आलांत तर तेवढा वेळ मी आधीं येण्याचा प्रयत्न करीन. "

मीही पडत्या फळाची आज्ञा घेऊन भाऊच्या धक्क्यावर जाऊन हजर राहिलों.

बाळासाहेब तेथें येतांच त्यांच्याभोंवती बरीच मंडळी गोळा होईल अशी मला कल्पना होतीच. आणि माझी ती कल्पना खरी ठरली. बोट सुटण्याच्या पूर्वी बाळासाहेब धक्क्यावर ठरल्याप्रमाणें आले, तरीही बोट सुटायला चार दोन मिनिटें असेपर्यंत स्वागत–समारंभांतून कांहीं त्यांची मोकळीक झाली नाहीं.

बोटीच्या धक्क्यावर गोळा झालेली सर्व मंडळी बाजूला झाल्यावर मी त्यांची भेट घेतली. त्यावेळीं बाळासाहेब म्हणाले, " आतां कसं करायचं ? बोट तर सुटायची वेळ झाली ! "

आणि मी ज्यावेळीं त्यांना तिकिटच काढून बोटींत आल्याचें सांगितलें त्यावेळीं ते गालांतल्या गालांत हंसून म्हणाले. " Now you deserve everything ! "

बाळासाहेबांना बोटीच्या एजंटानें आणि तिकिट कलेक्टरनें ' फर्स्टक्लास ' मधें नेऊन बसविलें. पण त्यांनीं ' सेकंडक्लास ' चें तिकिट काढलेलें असल्यामुळें तिकिट कलेक्टरचा फर्स्टक्लासमधें बसण्याचा आग्रह असतांही ते सेकंडक्लासमधें येऊन बसले, आणि बाळासाहेब पहिल्या वर्गानें प्रवास करतील या कल्पनेनें मी घेतलेलें पहिल्या वर्गाचें तिकिट फुकट गेलें. त्यांच्याबरोबर मलाही दुसऱ्या वर्गात बसणें भाग पडलें.

तालबद्ध वाद्यानें अगर संगीताच्या एकाद्या मधुर लकेरीनें माणसाच्या चित्तवृत्ती जशा मोहित होतात त्याचप्रमाणें बाळासाहेबांच्या मधुरवाणीनेंही माणूस गुंग होऊन जातो. एकदां त्यांनीं बोलायला सुरवात केली म्हणजे काव्यशास्त्रविनोदानें बरोबरीच्या माणसाला ते डोलवीत असतात. त्यांच्या बोलण्यांत, चालण्यांत आणि स्वभावांत सहृदयता दिसून येते. कृत्रिमतेपेक्षां अंतःकरणाची तळमळ दिसते.

राजकारण, वृत्तपत्रव्यवसाय, संगीत, वाङ्मय यांवर त्यांच्या माझ्या कितीतरी वेळ गप्पा चालल्या होत्या.

" ग्रेसी फिल्डस्, चेंबर्लेन, बर्नार्ड शॉ अन् म. गांधी यांना निर्जन बेटांवर नेऊन ठेवलं अन् त्यापैकीं एकाला जगवायचं झालं तर कुणाला जगवायचं या विषयावर मिडलसेक्स येथें झालेला वादविवाद आपण वाचला का ? " मी बाळासाहेबांना विचारलें.

" होय तर ! अन् त्यांत महात्माजीचंच पहिलं नांव आलं. माझ्या मतें हाच निर्णय योग्य आहे ! " बाळासाहेब हर्षभरानें म्हणाले.

इकडच्या तिकडच्या आमच्या बऱ्याच गोष्टी झाल्यावर मी त्यांना म्हटलें, " आपण विश्रांतिसाठीं अन् हवापालटण्यासाठीं बाहेर जात असतांही मी आपणांस त्रास देत आहें "—

" त्रास कसला त्यांत ? उलट माझाच वेळ मजेंत जाईल कीं ! "

" आपण हवेसाठीं कुठं जाणार ? " मी त्यांना विचारलें.

" मी हवेसाठीं कधींच कुठं जात नाहीं. हवेचं हें खूळ आमच्या लोकांनीं पाश्चात्यांकडून उचललं आहे. मला तर कुठलीही हवा मानवते. पण विश्रांतीची मात्र जरूरी असते आणि मी मुंबईत राहून मिळत नाहीं, म्हणूनच मी मुंबईच्या बाहेर जातों इतकंच ! " त्यांच्या बाजूला बसलेल्या स्वामी कुवलयानंदाकडे पहात ते म्हणाले.

" आपणांस लहानपणीं कोण व्हावसं वाटत होतं ? " मी माझ्या मूळ कामगिरीकडे वळून म्हणालों.

" आपण फार विद्वान व्हावं, लोकशिक्षणाचं कार्य करावं असं मला बालपणापासूनच वाटत असे. भरपूर पैसे मिळवून चैन करावी असं मला बालपणींही कधींच वाटलं नाहीं. वैभवाच्या स्वप्नसृष्टींत मी कधींच गुंगून राहिलों नाहीं. "

" याच स्वभावामुळं आपलं राजकारणाकडे लक्ष वळलं का ? " मी विचारलें.

" राजकारणाकडे माझं फार उशीरां लक्ष गेलं. १९२० पर्यंत राजकारणांत मी प्रत्यक्ष असा कधींच भाग घेतला नव्हता. १९०८ पासून राजकारणाकडे मात्र माझं सतत लक्ष होतं. "

" आपण जुनं मराठी वाङ्मय कधीं वाचलं आहे का ? "

" पहिला भक्तिविजय हा ग्रंथ मी वाचला, " बाळासाहेब हंसत हंसत म्हणाले, " अर्थातच ही फार प्राचीन काळची गोष्ट झाली ! त्यानंतर मी बरंच जुनं वाङ्मय वाचलं आहे. "

" आपणांस जुन्या वाङ्मयाच्या वाचनाचा नाद कसा काय लागला ? "

" माझ्या वडिलांना वाचनाची फारच आवड होती. कोणत्याही मोठ्या लायब्ररींत दुर्मिळ असे ग्रंथ आणि मासिकं आमच्या घरीं असत. आणि त्यामुळंच माझी वाचनाची गोडी वाढली. मी एकदां आजारी असतांना तर 'अरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' उशीखालीं घेऊन चोरून वाचल्या आहेत ! याचं कारण चिपळूणकरांची ललितरम्य भाषा मला आवडत होती. "

" ज्ञानेश्वर–तुकारामादि संत कवींचं वाङ्मय आपण कितीसं वाचलं आहे ? "

" बराच प्रौढ झाल्यानंतर मी ज्ञानेश्वर–तुकारामाचं वाङ्मय वाचलं. विशेषतः १९२५–२६ नंतर मी बरंच आध्यात्मिक वाङ्मय वाचलं. पण त्या वाङ्मयाचा मी फारसा अभ्यास केलेला नाहीं. त्या वाङ्मयाची मला अभिरुची मात्र आहे. "

" आजच्या बदललेल्या काळांत संत वाङ्मयाची जरूरी आहे असं आपणांस वाटतं का ?"

" अर्थातच !" बाळासाहेब म्हणाले, " गणीतशास्त्रांतले सर्वच विषय जीवनांत कुठं उपयोगी पडतात ? पण Concentration ची संवय होण्यासाठीं ते विषय उपयोगी पडतात असं आपल्याला वाटत नाहीं का ? संत वाङ्मयाचंही तसंच आहे. त्या वाङ्मयानं मनाला एक प्रकारचं शिक्षण मिळतं. भक्तिरसामुळं भावनांचं योग्य प्रकारं परिपोषण होतं. स्वार्थाच्या पलिकडे जाण्याची वृत्ति माणसामध्यें येते. भावनांना विशिष्ट वळण लावणं ही एक मोठी शक्ति आहे. गांधीजी हे असामान्य बुद्धिमत्तेचे ( Intellectual giant ) आहेत असं नव्हे. पण त्यांनीं केवळ आपल्या मनोबलावर जगांत मानाचं स्थान मिळविलं आहे– जग जिंकलं आहे. संतवाङ्मयामुळं मनोबल वाढण्याच्या कामीं जो फायदा होतो तो लहानसा असं म्हणतां येईल काय ? "

" कामाचा इतका व्याप संभाळून आपणांस वाङ्मय वाचण्यास सवड मिळते का ? "

" प्रधानकीचा राजीनामा दिल्यापासून सपाटून वाचायला सुरवात केली. पण अधिकारारूढ असतांना मात्र आवडीचं वाङ्मय मला क्वचितच वाचायला मिळत असे. १९१२ ते १९१८ पर्यंत सर्वच प्रकारचं वाङ्मय मी वाचलेलं आहे. "

" आपण Fiction वाचलं आहे काय ? "

" Fiction तर मी सपाटून वाचलं आहे. बर्मिंगहॅम, ओपेनहॅम, लिकॉक प्रभृति बऱ्याच ग्रंथकाराचं वाङ्मय मी अत्यंत आवडीनं वाचलेलं आहे. त्यांतल्या कांहीं ग्रंथकारांचीं नांवं आतां मला आठवतही नाहींत. "

" शॉ किंवा वेल्स आपण वाचला आहे का ? "

" अगदीं बेताचा. त्यांचीं कांहीं पुस्तकं मी वाचलीं आहेत. "

" आधुनिक वाङ्मयाविषयीं आपलं काय मत आहे ? "

" गेल्या कांहीं वर्षांपासूनच वाङ्मय जिवंत झालं आहे. अलिकडच्या वाङ्मयांत जिवंतपणा दिसूं लागला आहे. आतां लेखक पूर्वीपेक्षांही जास्त स्पष्ट लिहूं लागले आहेत.

अर्थातच बऱ्याबरोबर वाईट निघतंच हें जरी खरं असलं तरी हीन वाङ्मय कांहीं चिरकाल टिकणार नाहीं. तें कालाच्या ओघाबरोबर नाहींसं होईल. आमच्याकडच्या कविता किंवा पदांच्या चाली पहा. आतां सगळ्या जुन्या चाली जाऊन नव्या चाली आल्या आहेत. हा झालेला बदल प्रगतिपरच नाहीं का ? "

वाङ्मयाच्या प्रश्नावर बोलतां बोलतां बाळासाहेब पुढें म्हणाले, "१९३० पासून नंतरचा जो काळ तुरुंगांत गेला, त्यावेळीं मी विविध वाङ्मय वाचलं."

" आपण रशियन कथावाङ्मय वाचलं आहे काय ? " मी त्यांना विचारलें.

" निकोलस गोगोल, टॉलस्टॉय यांचं बरंच वाङ्मय मी वाचलं आहे."

" राजकीय पार्श्वभूमीवर रशियांत जसें कथावाङ्मय निर्माण केलं जातं तसं आपल्या-कडेही होणं इष्ट आहे असं आपणांस वाटतं का ? "

" तसं वाङ्मय आपोआपच निर्माण होईल. आजच्या वाङ्मयांत ठराविक ठशानं जें वाङ्मय निर्माण केलं जातं, ती पद्धत नाहींशी होईल. आणि त्याला कांहीं उपाय नाहीं. असं होणारच. शिक्षणाचा जास्त प्रसार झाला म्हणजे वाङ्मयांतही विविधता येते. समाजां-तील सर्व लेखक पुढं येतात. आणि समरसतेनं आपले अनुभव वाङ्मयांत नोंदवून ठेवतात."

" आपणांस संगीताची आवड आहे का ? "

" संगीतशास्त्रांतील तीन भागाचं मी अनेकदां शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला आहे. "

" तीन भाग म्हणजे कोणते ? "

" संगीत, वाद्य आणि नर्तन ! " बाळासाहेब हंसत हंसत म्हणाले, " पण त्यांत मला कांहीं कधीं यश आलं नाहीं. "

" आपण रागदारी ओळखूं शकतां का ? "

" गाण्याचा बरेच दिवस अभ्यास केल्यामुळं मला साधारण रागदारी माहित झाली आहे."

" सर्व जगाचा धर्म एकच असावा असं आपणांस वाटंत का ? " वाङ्मयावरून धर्माकडे वळून त्यांना मी प्रश्न केला.

" नुसतं वाटून काय उपयोग ? सर्वांच्या मनांत एकच विचार यावा असं आम्हीं म्हटलं तर तें कुणी ऐकेल का ? तसंच धर्माचं आहे. शिवाय धर्म ही इतकी त्याज्य गोष्ट आहे असंही नाहीं. "

" पण धर्मामुळं सध्यां राजकारणांत कसं वादळ माजलं आहे तें आपण पहात असतांना धर्मांचं कसं समर्थन करतां ? " मी त्यांना प्रश्न केला.

" पण राजकीय प्रगतीला अडथळा करण्याचं धर्मांत कुणी कधीं काय सांगितलं आहे ? आत्म्यासंबंधीं व परलोकासंबंधीं उदात्त कल्पना प्रत्येक धर्मांत सांगितल्या आहेत. तसेच सदाचाराचे नियमही प्रत्येक धर्मांत आहेत. दुसऱ्याला मारणं वाईट आहे पण जगणं आणि जगविणं हा नीतीचा पाया आहे. Do not kill हें तत्त्व सर्व धर्मांत आहे. तेव्हां धर्म नको असं म्हणण्याचं कांहींच कारण नाहीं. सत्त्य हें सुद्धां धर्मांचं एक ब्रीदवाक्य आहे. "

" धर्माच्या नांवाखालीं ज्या रूढी चालू आहेत त्या बाधक नाहींत का ? "

" कोणत्याही धर्मांतील रूढी सदाचरणासाठींच असतात. पण त्याला विकृत स्वरूप आलं आहे तें आपोआपच नाहींसं होईल. "

" मग धर्मासंबंधीं आपली कोणती कल्पना आहे ? "

" सर्व धर्मसमभाव अशी सर्व धर्मासंबंधीं जी महात्माजींची कल्पना आहे ती मला पूर्ण मान्य आहे. "

" आपण धर्माची जरूरी आहे असे म्हणतां; पण रशियांत कुठं धर्म आहे ? तेथील लोक सुखानं राहातातच ना ? "

" कोणत्याही सुसंस्कृत माणसाच्या मनांतून धर्माची बीजं काढून टाकतां येणार नाहींत. रशियामधें धर्म नाहीं हें मला मुळींच मान्य नाहीं. ज्याच्या योगानं समाजाचं धारण होतं तो धर्म. कोणत्याही धर्माकडे मी संकुचित दृष्टीनं पहात नाहीं. कोणत्याही धर्मांत समाजाच्या हिताचीं बिजं सांठलेलीं असतात. अर्थातच लोकांनीं आपल्या बुद्धिप्रमाणं समाजधारणाच्या बिजांना विकृत स्वरूप दिलं तर तो कांहीं धर्माचा दोष नाहीं. "

" आपणांस जर पुढं मागं कधीं विश्रांति मिळाली तर आपण कोणतं आवडतं कार्य हातीं घ्याल ? "

" Preacher आणि Teacher हेंच माझं विशेष आवडीचं काम आहे. अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान आणि प्रतिग्रह हीं सहाही कर्मे मी करीत बसेन. "

" समजा, उद्यां स्वराज्य मिळालं तर प्रान्ताचे मुख्य प्रधान होण्याची जबाबदारी अंगावर घ्याल कीं नाहीं ? "

" स्वराज्याची गोष्ट कशाला, उद्यां जरी पुनः अधिकारारूढ होण्याचा प्रश्न कदाचित् उद्भवला तरीही मी मुख्य प्रधानाची जबाबदारी पत्करीनच असं नाहीं. "

" इतका प्रधानकीवर राग कां तुमचा ?"

" अधिकारांत जास्त रस नाहीं–आनंद नाहीं. साधासुधा माणूस म्हणून राहून समाजसेवा करतांना जो आनंद होतो तो अधिकारपदावर असतांना होत नाहीं."

" आपल्या राज्यांत अधिकारारूढ होऊन समाज सेवा करतां येत नाहीं असंच आपलं मत आहे ? "

" असं मला म्हणायचं नाहीं. अधिकारारूढ असतांना वेळाच्या अभावामुळं लोकांत जास्त मिसळतां येत नाहीं. आणि त्यामुळं मनाला समाधान होत नाहीं. "

" आपल्या सारख्या अनुभवी माणसानं अधिकाररूढ होण्याचं नाकारलं तर देशाचं एक प्रकारं नुकसानच नाहीं का ? "

" कांहीं नुकसान होणार नाहीं. माझी जागा दुसरी माणसं भरून काढतील. आपल्यामुळं देशाचं नुकसान होतं ही हास्यास्पद कल्पना आहे. "

" आपल्या जीवितांतील एखादा आनंदाचा प्रसंग आपण सांगूं शकाल काय ? "

" माझ्या जीवनांत आनंदाचे अनेक प्रसंग घडले आहेत. त्या सर्वांचं कुठं मी वर्णन करीत बसूं ? पण आनंद कशांत आहे याची निश्चित कल्पना ज्यावेळीं मला येऊं लागली त्या वेळीं मात्र मला फार आनंद झाला. "

बाळासाहेब खेर यांच्याशीं मी बोलत असतांना मला असें स्पष्ट दिसून आलें, कीं वाङ्मयाची त्यांना उत्कट आवड आहे. मनुष्य गप्पा मारत बसला म्हणजे त्याच्या आवडत्या विषयाकडे नकळत त्याच्या बोलण्याचा ओघ वळतो. बाळासाहेबांचेंही तसेंच झालें. आम्हांला नकळतच आमची पुन्हा वाङ्मयावर चर्चा चालू झाली. बाळासाहेब संस्कृत वाङ्मयासंबंधीं बोलतांना म्हणाले, " अगदीं बिनसायासानं संस्कृतचं ज्ञान माझ्या पदरीं पडलं. लहानपणापासून मला वाचनाची अभिरुची असल्यामुळं संस्कृत वाङ्मयही अधाशीपणानं वाचलं आणि त्यामुळंच भाषेवर प्रभुत्व मिळवितां आलं. विद्यार्थीदशेंतच मीं संस्कृतचं जास्त अध्ययन केलं."

" आपण कालिदास, भवभूति वगैरे ग्रंथकार वाचले आहेत काय ? "

" मी बहुतेक सर्व कालिदास वाचला आहे. मेघदूत, कुमारसंभव मधील कितीतरी सर्गेच्या सर्ग मला पाठ होते—अजूनही आहेत. "

" संस्कृत काव्यवाङ्मयाप्रमाणं इंग्रजी काव्यवाङ्मय आपण वाचलं आहे काय ? "

" इंग्रजी काव्य मी अगदीं बेताचंच वाचलं आहे. पण संस्कृत काव्यानंतर तर मला कुठलं वाङ्मय जास्त आवडलं असं विचाराल तर तें पर्शिअन सुफी Literature. "

" पार्शियन भाषेचा आपण अभ्यास केला आहे ? "

" मी बरेच दिवस पर्शिअन भाषेचा अभ्यास केला आहे. आणि ज्या शिक्षकाकडे मी त्या भाषेचा अभ्यास करीत असें, ते शिक्षकही रसिक होते. ते मला नेहमीं काव्य वाचून दाखवित असत. त्यामुळं पार्शियन काव्याची मला जास्त ओळख झाली. नंतर कांहीं दिवसांनीं ते शिक्षक निधन पावल्यामुळं पर्शिअन वाङ्मयाचा माझा अभ्यासही अर्धाच राहिला. "

" आणखी आपण कुठल्या भाषेचा अभ्यास केला आहे ? "

" हिंदी भाषेचा अलीकडे मी अभ्यास केला आहे. पण हिंदींतील वाङ्मय मात्र मी वाचलेलं नाहीं. "

" आपणांस विशेष कांहीं छंद आहेत का ? "

" चालणं आणि पोहणं हे माझे आवडीचे छंद आहेत. मी पूर्वी ग्रॅन्टरोडवर रहात असें. त्यावेळीं ग्रँटरोड ते अंधेरीपर्यंत मी अनेक वेळां चालत गेलों आहे. "

" नाटक-सिनेमा आपणांस आवडतो कीं नाहीं ? "

" नाटक-सिनेमाचा मला नाद नाहीं. त्याचं कारण असं आहे, कीं माझ्या अभिरुचीला पोषक असं त्यांत मला कांहीं आढळत नाहीं. कुणी आग्रहानं बोलावल्याखेरीज कधीं मी सिनेमाला जात नाहीं. "

" परदेशी सिनेमांतही आपल्या अभिरुचीला पोषक असं कांहीं नसतं का ? "

" कांहीं परदेशी चित्रपट मला आवडले आहेत. पण सर्वच परदेशी चित्रपट चांगले असतात असं नाहीं. "

" आजकाल सिनेमा हें प्रचारचं प्रभावी साधन होऊन बसलं आहे. सिनेमाद्वारं प्रचार व्हावा असं आपणांस वाटत नाहीं का ? "

" प्रचाराचं प्रभावी साधन हें मान्य न करून कसं चालेल ? पण आजकाल बऱ्यापेक्षां वाईटच प्रचार जास्त होतो हें तितकंच खरं आहे."

" चांगला प्रचार करण्यासाठीं सिनेमा कोणत्या प्रकारचे असावे असं आपणांस वाटतं ?"

" ज्यावेळीं चित्रपटामधें पूर्ण कलात्मकता दिसून येईल, ज्यावेळीं कला Perfect असेल त्यावेळींच योग्य प्रचार होईल. चित्रपटामधें जेवढी कलेची परमावधि करतां येईल तेवढे ते चित्रपट प्रचाराला–योग्य प्रचाराला उपयोगी पडतील."

" कलेची परमावधि साधलेले असे परदेशी चित्रपट आपण कधीं पाहिले आहेत काय?"

" कांहीं पाहिले आहेत; तरी आज त्यांची मला स्मृति नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत सिनेमाच्या कलेचा जास्त विकास झालेला आहे. आपल्याकडे त्याचं अनुकरण केलं जातं खरं; पण तें अनुकरण पूर्णपणं होत नाहीं. भ्रष्ट अनुकरण जास्त केलं जातं."

" समाजाच्या सुखासाठीं संधि मिळाली तर एखादी योजना आपण मनांत आंखली आहे का ?"

" अशा कितीतरी योजना माझ्या मनांत घोळत आहेत. त्यांपैकीं मुंबई शहराच्या उत्तर भागांत एक विस्तीर्ण असा 'पार्क' बांधण्याचं माझं एक सुखस्वप्न आहे." बाळासाहेब आनंदानें म्हणाले, " कामाच्या दगदगीनंतर माणसांना चार दोन तास विश्रांतीची अत्यंत जरूरी असते. आणि तशी विश्रांति या पार्कमध्यें मिळावी अशी योजना केली पाहिजे."

" या पार्कमधें कोणकोणत्या सोई करण्याची आपली कल्पना आहे ?"

" स्नानगृह, उपाहारगृह, नाटकगृह, सिनेमागृह, वाचनालय, क्रीडांगण, बगीचे, आणि इतर मनोरंजनाची व ज्ञानप्राप्तीचीं भरपूर साधनं तिथं ठेवण्याची माझी कल्पना आहे. तीन चार तास अल्प पैशांत लोकांची करमणूक होण्याची सर्व प्रकारें व्यवस्था केली जाईल आणि अशी योजना करणं कांहींच अशक्य नाहीं !"

" परदेशांतील पार्क पाहिल्यामुळंच आपणांला ही कल्पना सुचली का ?"

" होय. अमेरिकेंत गेल्यावेळीं मी असे बरेच पार्क पाहिले आहेत, आणि त्यावरूनच मला ही कल्पना सुचली."

" या पार्कसाठीं किती खर्च येईल असा आपला अंदाज आहे ?"

" निदान दहा लक्ष रुपये तरी खर्च येईल ! "

" सरकारच्या मदतीशिवाय या योजनेची अंमलबजावणी होणं शक्य आहे काय ? "

" मुळींच नाहीं. लोकांच्या सुखसोईकडे–मनरंजनाकडे लक्ष देणं हें सरकारचं काम आहे. This is the duty of a state. "

" आणखी आपल्या काय योजना आहेत ? "

" माझ्या कितीतरी योजना आहेत. "

" अधिकार हातीं असल्याखेरीज त्या योजना पार पडतील काय ? "

" अधिकार हातीं असतांना तरी कितीशा पार पडल्या आहेत ? "

" पण त्या योजना पार पाडण्याइतकी संधि मिळत आहे असं वाटलं तर आपण अधिकारारूढ व्हाल ? "

" होईनही. "

" मग आपण मघांशीं अधिकारारूढ होणार नाहीं म्हटलंत तें ? "

" याला मी अधिकार म्हणणार नाहीं. समाजसेवेचं स्थान म्हणेन. ज्या बुद्धीनं आणि मनानं आम्हीं तुरुंगांत जाऊन बसतों, त्याच बुद्धीनं सेक्रेटरीएटमध्यें जाऊन बसण्याची मनाची तयारी केली म्हणजे ती सेवाच होते. ज्यामुळं सर्व जनतेची सेवा होईल असा कोणताही अधिकार स्वीकारण्यास कांहीं हरकत नाहीं. "

" मागच्या अधिकारग्रहणानं लोकसेवा झाली नाहीं का ? "

" झाली. पण माझ्या मनाचं समाधान होण्याइतकी झाली नाहीं—"

बोलण्याच्या नादांत मुंबई ते रेवस पर्यंतचा एक तासाचा प्रवास केव्हां संपला त्याची आम्हांला जाणीवच राहिली नाहीं. बोट ज्यावेळीं रेवसच्या धक्क्यावर जाऊन पोंचली त्यावेळीं आम्हीं बोलणें संपविलें आणि मी बाळासाहेबांचा निरोप घेतला. त्याच बोटीनें पुनः मुंबईची वाट धरली.

: ६ :

# ना. म. जोशी

"विद्यार्थीदशेंत शिवाजीमहाराजांच्या जीवनचरित्राचा माझ्या मनावर फार परिणाम झाला होता. त्यावेळीं मी घोंगडीवर झोंपत होतों. कांहीं दिवस पायांत जोडाही वापरत नव्हतों. पण बंदुक मात्र कधीं ध्यावीशी वाटली नाहीं मलॊ. शिवाजीमहाराजांच्या जाज्वल्य देशसेवेचा माझ्या मनावर जरी ठसा उमटला होता तरी बंदुका घेऊन लढाईचा मार्ग स्वीकारावा— क्रांति करावी असं मात्र मला कधीं वाटलं नाहीं."

भारतसेवक समाजाचे प्रमुख सभासद, मध्यवर्ति असेंब्लीचे सभासद आणि कामगारांची स्थिति सुधारण्यासाठीं झटणारे निरलस कार्यकर्ते खासदार ना. म. जोशी यांनीं मुलाखतींत वरील उद्गार काढले.

ना. म. जोशी यांची मी भेट घेण्यापूर्वी त्यांच्याविषयीं माझी अगदीं निराळी कल्पना होती. राजकारणाच्या प्रश्नाव्यतिरिक्त ते कसल्याही बाबतींत लक्ष न घालणारे रुक्ष

गृहस्थ असतील अशी माझी कल्पना होती. पण मुंबई येथील भारत सेवक समाजाच्या इमारतींतील त्यांच्या खोलींत ज्यावेळीं मी प्रवेश केला, त्यावेळीं माझ्या पूर्वींच्या त्यांच्या-संबंधींच्या कल्पनेला धक्का बसला. त्यांच्या रसिकतेचीं प्रतीकें मला जागोजाग दिसूं लागलीं. राजकारणी माणसाला कलात्मक जीवनाचें अन् कलेचें अगदीं वाकडें असतें, अशी नुकतीच ' विशाल जीवन ' कादंबरी वाचून माझी कल्पना झाली होती. ' विशाल जीवन'मधील दिलीप कलात्मक कादंबरी जाळून टाकतो हें मी नुकतेंच वाचलें होतें. तेव्हां नानासाहेब जोशी यांच्यासारख्या राजकारणांत अनेक वर्षे बरेवाईट अनुभव आलेल्या व्यक्तीच्या खोलींत एकादेंही ललितवाङ्मयाचें पुस्तक आढळणार नाहीं अशी माझी कल्पना होती.

पण त्यांच्या खोलींत ज्यावेळीं मी प्रवेश केला, त्यावेळीं चुकून दुसऱ्या कुणाच्या तरी खोलींत मीं प्रवेश केला, असा मला भास झाला. सहज मी खोलीभर नजर फिरविली त्यावेळीं ती एखाद्या एम्. ए. च्या विद्यार्थ्यांची कॉलेजच्या रेसिडेन्सीमधील खोली असावी, असें त्या खोलीचें स्वरूप होतें. एक कॉट, एक टेबल आणि पुस्तकांचा ढिगारा असलेलीं दोन शेल्फ, असा त्या खोलीचा थाट होता.

एका शेल्फकडे मी बारकाईनें नजर टाकली त्यावेळीं तर मला अचंबाच वाटला. त्या शेल्फवर आंतर्राष्ट्रीय लेबर ऑफिसतर्फे प्रसिद्ध झालेले अहवाल असतील असें मला वाटलें होतें. पण त्या ठिकाणीं शेक्स्पीअर, सर जेम्स बॅरी, ऑस्कर वाईल्ड, बर्नार्ड शॉ, गॅल्सवर्दी या प्रसिद्ध नाटककारांच्या नाटकाचे संकलित ग्रंथ, दरवर्षी युरोपांत नव्या नव्या नाटककारांचे Famous Plays या नांवाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या नाटकांचे कितीतरी ग्रंथ असलेले मला आढळून आले. म्हणूनच उत्सुकतेनें मी दुसऱ्या शेल्फवर नजर टाकली. त्यावेळीं कै. हरिभाऊ आपटे यांच्या सर्व कादंबऱ्या, वरेरकरांचें वाङ्मय आणि इतर कांहीं मराठी पुस्तकें मला दिसून आलीं.

नानासाहेबांनीं सकाळच्या वर्तमानपत्रांवर खिळलेली आपली दृष्टि माझ्याकडे वळविली आणि हास्यवदनानें माझें स्वागत केलें. मी त्यांना मुलाखतीचें स्वरूप समजावून सांगत असतांनाच ते म्हणाले, " आतांच खेरांच्या मुलाखतीवर नजर टाकली मी. वाचायला वेळ मिळाला नाहीं मला अजून. "

" सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या व्यक्तीनं आजन्म अविवाहित रहावं असं आपणांस वाटतं का ? " मी त्यांना प्रश्न केला.

" असं कोण म्हणतंय् ? अविवाहित राहिलं पाहिजे असं नाहीं. सामाजिक कार्य करण्याची तळमळ असली म्हणजे त्यावर कुणीही निर्बंध घालूं शकत नाहीं. निर्बंध घालून घेणं न घेणं सर्वस्वीं व्यक्तीवर अवलंबून असतं. "

" भारतसेवक समाजाचा सभासद होणाऱ्या स्त्री-सभासदावर अविवाहित राहाण्याचं बंधन असल्याची बातमी वाचल्याचं मला आठवतं, त्यांत कितपत तथ्य आहे ? "

" त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तसं स्त्रीसभासदावर कांहीं बंधन नाहीं. पूर्वी आम्ही भारतसेवक समाजांत स्त्रीसभासद दाखल करून घेत नव्हतों. पण आतां तेंही बंधन आम्ही ठेवलेलं नाहीं. पण एखाद्या स्त्रीचं घरच्या व्यापामुळं आमच्या कार्याच्या बाबतींत दुर्लक्ष झालं तर मात्र त्या स्त्रीला सभासद राहूं द्यावं कीं नाहीं, याचा आम्हांला विचार करावा लागेल. "

" हा प्रश्न एखाद्या विवाहित पुरुष सभासदाच्या बाबतींतही उद्भवण्याचा संभव आहे. " मी विचारलें.

" खरं आहे तुमचं म्हणणं. " त्यांनीं उत्तर दिलें.

" कौटुंबिक परिस्थितीमुळें आपलं सामाजिक कार्याकडे कधीं दुर्लक्ष झालं आहे का ? "

" मुळींच नाहीं ! " नानासाहेब म्हणाले, " उलट कौटुंबिक जीवनामुळं मला मदतच झाली आहे. कुटुंबांत इतर व्याप सांभाळणारीं दुसरीं माणसं असल्यामुळं मला माझ्या आवडत्या कार्याला सर्वस्वीं वाहून घेतां आलं. "

" लहानपणापासूनच सामाजिक कार्य करण्याची आपली महत्त्वाकांक्षा होती ? "

" लहानपणीं मला कोणती महत्त्वाकांक्षा होती हें आज तरी मला नीट आठवत नाहीं. पण लहानपणीं विद्यार्थीदशेंत–शिवाजीमहाराजांच्या जीवनचरित्राचा माझ्या मनावर फार परिणाम झाला होता. त्यावेळीं मी घोंगडीवर झोंपत होतों. कांहीं दिवस पायांत जोडाही वापरत नव्हतों. पण बंदुक मात्र कधीं घ्यावीशी वाटली नाहीं मला. त्यांच्या जाज्वल्य देशसेवेचा जरी माझ्या मनावर ठसा उमटला होता तरी त्यांच्यासारखा सशस्त्र लढा करावा–क्रांति करावी असं मात्र मला कधीं वाटलं नाहीं. "

" देशाचा पुढारी व्हावं असं कधींच वाटलं नाहीं तुम्हांला ? "

" पुढारी नाहीं––पण शिपाई व्हावं असं मात्र वाटलं मला. सगळ्यांत शिक्षकाचा पेशा मला आवडीचा वाटत होता. आणि म्हणून मी शिक्षक झालोंही. शिक्षक असतांना

विद्यार्थ्यांबरोबर क्रिकेट खेळण्यांत मी देहभान विसरत असे. विद्यार्थ्यांकरितां आपण झटावं असं मला नेहमीं वाटे. शिक्षक झाल्यावर तेंच मी माझं ध्येय ठरविलं होतं. "

" मग शिक्षकीपेशा सोडून भारतसेवक समाजांत आपण कसे काय आलांत ? "

" त्याचं असं झालं, " नानासाहेब जोशी यांनी बोलायला सुरवात केली, " भारतसेवक समाजांत कार्य करणारे पदवीधर कार्यकर्ते पाहिजेत अशी ना. गोखले यांनीं ' ज्ञानप्रकाश ' मधें जाहिरात दिली होती, ती माझ्या वाचनांत आली. मी सहजच अर्ज केला. मला वाटलं होतं, कीं ना. गोखले मला भारतसेवक समाजांत घेणार नाहींत. पण माझी अपेक्षा चुकीची ठरली. ना. गोखले यांनीं मला अनपेक्षितपणं बोलावलं. पण मी शिक्षकाचा पेशा सोडला तो कमी योग्यतेचा आहे म्हणून सोडला असं मात्र नाहीं. भारतसेवक समाजाचं ध्येय जसं मला आवडीचं वाटतं, तसाच शिक्षकाचा पेशाही आवडीचा वाटतो. भारतसेवक समाजामधें मी सामील झालों याचं कारण ना. गोखले यांनीं मला बोलावलं असतांना त्यांना नाहीं म्हणायचं मला धैर्य झालं नाहीं म्हणून मी भारतसेवक समाजांत सामील झालों असं मात्र नाहीं. "

नानासाहेब टेबलावरील वर्तमानपत्रांची पृष्ठें सहज चाळीत चाळीत पुढें म्हणाले,

" लहानपणापासून आगरकरांकडे माझा ओढा होता. लोकमान्य टिळकांकडे माझा कधींच ओढा नव्हता. आगरकरांचा सुधारक पंथच मला प्रिय होता. आम्हां विद्यार्थीवर्गांत ज्यावेळीं आगरकर आणि लोकमान्य टिळक यांच्या तत्त्वज्ञानाविषयीं मोठे वादविवाद होत असत त्यावेळीं मी आगरकरांची बाजू घेऊन सर्वांबरोबर भांडत असें. "

" आपण आतांपर्यंत भारतसेवक समाजांत जी कामगिरी केली आहे त्याबद्दल आपणांस समाधान वाटतं का ? "

" अलबत् ! मी केलेल्या कार्याबद्दल मला नेहमींच समाधान वाटतं ! "

" भारतसेवक समाजाचं कार्य आणि कामगारांचे प्रश्न याखेरीज आपणांस कोणतं कार्य करावंसं वाटतं ? "

" कामगारांच्या प्रश्नांखेरीज दुसरं कोणतं कार्य हातीं घ्यावं असं मला कधींच वाटत नाहीं. त्यांना स्वतंत्र करावं, जें जें योग्य आहे तें त्यांना मिळवून द्यावं, व त्यांना इतर वर्गांच्या बरोबरीला आणावं हीच माझी आजची आत्यंतिक महत्त्वाकांक्षा आहे. अजूनही मला असं कधीं वाटत नाहीं, कीं दुसऱ्या कोणत्या तरी कार्यांत भाग घ्यावा ! "

नगर वाचनालय, सातारा.

कामगारांच्या चळवळीचा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळीं नानासाहेब जोशी जरा जास्त खुषींत आले. ही त्यांची मनःस्थिति ओळखून मी त्यांना म्हटलें " आपल्या हातीं सत्ता आली तर कामगारांसाठीं आपण काय कराल ? "

" राजकीय घटनेमधें कामगारांना इतरांच्या बरोबरीचें स्थान मी मिळवून देईन. शिक्षण, स्वातंत्र्य, मानसिक स्वास्थ्य, स्वतंत्रता मिळवून देईन. त्यांची स्थिति पूर्णपणं सुधारीन. इतर कोणत्याही वर्गाइतक्याच कामगारांना सवलती मिळवून देईन. कामगारवर्ग इतर वर्गांच्या मानानं कोणत्याही दृष्टीनं मागासलेला नाहीं असं दाखवीन. "

" रशियांतील कामगारविषयक कायद्याविषयीं आपणांस काय वाटतं ? "

" झारच्या राज्यापेक्षां रशियन कामगारांची स्थिति फारच सुधारलेली आहे. "

" रशियन कामगारांना स्वातंत्र्य आहे असं आपणांस वाटतं काय ?"

" माझ्यामतें रशियन कामगारांना स्वातंत्र्य अगदीं कमी आहे. "

" मग रशियांतल्या कोणत्या गोष्टी विशेष आपल्याला आवडतात ? "

" तिथली Collective agriculture ची पद्धति मला मान्य आहे. Land belongs to Community as represented by Government असं त्याचं स्वरूप असावं. उद्योगधंदेही सरकारच्याच हातीं असावेत. आजची रशियांतली ही पद्धति मला मान्य आहे. "

" मग आपणांस कोणती पद्धति मान्य नाहीं ? "

" Dictatorship ! " नानासाहेब जोशी उद्गारले. " लोकशाही पद्धति मला मान्य आहे. पण सर्वाधिकारशाही मात्र मुळींच आवडत नाहीं. रशियांत कामगारांच्या हातीं सत्ता आहे असं म्हणतात. पण तें मला खरं वाटत नाहीं. तेथील प्रोलेटॅरीएटच्या हातीं सत्ता नाहीं आणि कधीं जाईल असं वाटत नाहीं. आज रशियामधें जी Proletariat Dictatorship आहे—लोकशाहीच्या नांवाखालीं कम्युनिस्ट पक्षाचं जें वर्चस्व आहे तें मला मुळींच पसंत नाहीं. माझ्यामतें आज रशियांत Proletariat ची सत्ता नाहीं—राज्य नाहीं. "

" रशियामधलं कामगारांचं राज्य पूर्णावस्थेला पोंचलं नाहीं, तिथं कामगारांच्या राज्याचा प्रयोग चालू आहे असं म्हणतां नाहीं का येणार ? "

" Experiments कशाला करीत बसतां म्हणावं? लोकशाही पद्धतीनं मत घेऊन काय तें कार्य करायला त्यांचं काय जातं? फिनलंडच्या प्रश्नावर कामगारांचं मत विचारलं असतं तर त्यांनीं फिनलंडवर स्वारी न करण्याविषयींच रशियन सरकारला स्पष्ट इषारा दिला असता. मजुरांना सर्व प्रश्न समजावून दिले पाहिजेत. त्यांना जागतिक परिस्थितीची नीट कल्पना दिली पाहिजे. रशियांतील कामगारांना अशी कल्पना दिली जात असेल असं कांहीं मला वाटत नाहीं."

" हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रशियन कामगारांच्या इतकी किंवा त्याहीपेक्षां जास्त हिंदी मजुरांची स्थिति सुधारेल, असं आपणांस वाटतं का?"

" हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कुणाच्या हातीं सत्ता जाईल यावर हा प्रश्न बराचसा अवलंबून आहे. हिंदी श्रीमंतवर्ग आणि मध्यमवर्ग हिंदी कामगारांच्या सुखसोईना अडथळा करीत राहण्याचा संभव आहे."

" हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालं तर कॉंग्रेसपक्षाच्या हातीं सत्ता जाईल हें उघडच दिसत आहे. कामगारांच्या हितसंबंधांकडे कॉंग्रेस दुर्लक्ष करील असं आपणांस खरोखरच वाटतं का?"

" कॉंग्रेसच्या आजच्या हायकमांडवर भांडवलवाल्यांचं बरंच influence आहे. कॉंग्रेस हायकमांड सर्वस्वीं भांडवलवाल्यांचें हित करणारे आहेत असं मला म्हणायचं नाहीं. मी मात्र इतकं म्हणेन, कीं जनतेपेक्षां कॉंग्रेसवर भांडवलवाल्यांचं जास्त वजन आहे."

कामगारांच्या चर्चेवरून आमच्या भाषणाचा ओघ सन्तवाङ्मय, धर्म, ईश्वर या प्रश्नांकडे वळला. सन्त वाङ्मयासंबंधीं बोलतांना नानासाहेब जोशी म्हणाले, " सोसायटींत दाखल होईपर्यंत मी जुनं वाङ्मय वाचीत होतों."

" आजच्या नव्या जगांत जुन्या वाङ्मयांतील तत्त्वज्ञान उपयोगी पडेल असं आपल्याला वाटतं का?"

" मी केवळ वाङ्मय म्हणूनच जुनं काव्यवाङ्मय वाचलेलं आहे. त्यांतलं तत्त्वज्ञान मला मुळींच पसंत नाहीं. जुनं वाङ्मय धार्मिकतेवर आधारलेलं आहे. आणि माझा तर कुठल्याही धर्मावर विश्वास नाहीं. मी Agnostic ( अज्ञेयवादी ) आहे. ईश्वर आहे कीं नाहीं हें मला नक्की सांगतां येत नाहीं आणि ईश्वराच्या अस्तित्वावरच सर्व धर्म अवलंबून असल्यामुळं धर्मकारणावर माझा मुळींच विश्वास नाहीं. मानवी जातीचं हित हाच माझा धर्म आहे. धर्माप्रमाणं जातिभेदही मी मानीत नाहीं. तो अनिष्ट आहे."

सन्त–वाङ्मयासंबंधीं बोलतांना नानासाहेब जोशी पुढें म्हणाले, " केवळ वाङ्मय या दृष्टीनं सर्वांनीं संत वाङ्मयाचा अवश्य अभ्यास करावा. तत्त्वज्ञान या दृष्टीनं त्या वाङ्मयाला आज महत्त्व नाहीं. असं जरी असलं तरी तें जाळून टाकायलाही मी तयार नाहीं. वाङ्मय म्हणून संत–वाङ्मयाची आजही मला गोडी वाटते. मी Rationalist आहे. बुद्धिवादी आहे. बुद्धिवादाच्या कसोटीला उतरतं तेंच मी मान्य करतों. कित्येकांना मार्क्स धर्मगुरू वाटतो. मी कुणालाच धर्मगुरू मानीत नाहीं. बुद्धिवादांतून तावून सुलाखून निघून जिवंत राहिलं तेंच तत्त्वज्ञान मला आवडतं. "

" आपण आधुनिक मराठी वाङ्मय वाचलं आहे का ? "

" हरिभाऊंच्या सर्व कादंबऱ्या मी वाचल्या आहेत आणि वेळ मिळाला म्हणजे अजूनही त्या कादंबऱ्यांची मी पारायणं करतो ' शेल्फवर असलेल्या हरिभाऊंच्या कादंबऱ्यांकडे बोट दाखवीत नानासाहेब म्हणाले, " हरिभाऊंच्या वाङ्मयानंतर वरेरकरांचंही वाङ्मय मी आवडीनं वाचलं आहे. माझ्या बंधूचंही ( वामनराव जोशी ) वाङ्मय मला फार आवडतं. फडके, खांडेकर यांचं वाङ्मय त्याचप्रमाणं इतर नव्या लेखकांचंही बरंच वाङ्मय मी वाचलं आहे. वामनरावांकडे मोठा पुस्तकसंग्रह आहे. मी पुण्याला त्यांच्याकडे गेलों म्हणजे हाताला मिळतील तेवढीं पुस्तकं वाचून टाकतों. "

" हरिभाऊंच्या वाङ्मयानंतर आधुनिक वाङ्मयांत जे नवे विचारप्रवाह वाहूं लागले ते आपणांस पसंत आहेत काय ? "

" कालाप्रमाणें नवे विचार निर्माण होणारच. त्या विचारांना बंधन कसं घालतां येणार ?"

" वाङ्मयामुळं समाजाला वळण लागतं–मार्गदर्शन होतं असं आपणांस वाटत नाहीं काय ?"

" वाङ्मयामुळं समाजाला थोडंबहुत वळण लागतं–सर्वस्वीं नाहीं. पण समाजाच्या उन्नतीवर वाङ्मयाचं भवितव्य आणि भरभराट अवलंबून असते, असं माझं तरी मत आहे. "

" आपणांस कोणकोणते पाश्चात्य लेखक आवडतात ? "

" डिकन्स मला फार आवडतो. "

" याचं कारण ? "

" त्यानं गरीबांच्या जीवनाचीं चित्रं अत्यंत सहानुभूतीनं आणि सहृदयतेनं रेखाटलीं आहेत. त्याच्या वाङ्मयांत गरिबांच्या जीवनाचा उपहास–तिरस्कार करणारं चित्र सांपडायचं नाहीं. "

" आणखी कोणता ग्रंथकार आपल्याला आवडतो ? "

" हार्डी हा माझा आवडता कादंबरीकार आहे. त्याचं सर्व वाङ्मय मी वाचलं आहे. पण कादंबऱ्यांपेक्षां नाटकं मला जास्त आवडतात. शेक्सपीयर, बॅरी, बर्नार्ड शॉ, गॅल्सवर्दी, ऑस्कर वाईल्ड प्रभृति सर्व नाटककारांचीं नाटकं मी वाचलेलीं आहेत."

" सर्वांत आपणांस गॅल्सवर्दी आवडत असेल नाहीं ?"

" कशावरून म्हणतां ? "

" त्यांचं कामगारांच्या जीवनावर Strife या नांवाचं नाटक आहे म्हणून म्हणतां."

"चुकीचा आहे तुमचा अंदाज" नानासाहेब म्हणाले, " मला बर्नार्ड शॉच जास्त आवडतो. मी ज्यावेळीं वाङ्मय वाचतों त्यावेळीं माझ्या राजकीय मतांचा कधीं विचार करीत नाहीं. राजकारणाची वाङ्मयाला मी कधींच कसोटी लावीत नाहीं."

" गॅल्सवर्दीपेक्षांही शॉची नाटकं आपणांस अधिक आवडतात त्याचं कारण मला सांगाल का ?"

" माझी कांहीं हरकत नाहीं. शॉची नाटकं मला जास्त कलात्मक वाटतात हेंच खरं कारण आहे."

" कादंबऱ्यांपेक्षां आपणांस नाटकं आवडतात तीं कां ? "

" कादंबरीप्रमाणें नाटकांत पाल्हाळिकपणा असत नाहीं, त्यामुळं नाटकांत मी जास्त रंगून जातों हेंही एक कारण असावं. पण एवढी मात्र गोष्ट खरी, कीं नाटकं मला जास्त आवडतात."

" आपण इतकं वाङ्मय वाचतां, मग ग्रंथलेखन कां करीत नाहीं ? "

" साधत नाहीं." नानासाहेब हंसत म्हणाले.

" साधत नाहीं कीं तेवढा वेळ नाहीं ? "

" साधत नाहीं असंच म्हणा."

" आपण कधीं लेखनाचा प्रयत्न केला आहे काय ? "

" तसा मी कधींच प्रयत्न केला नाहीं."

" ग्रंथ-लेखनाचं राहूं द्या, पण कामगारविषयक प्रश्नांवर तरी कां लेख लिहीत नाहीं ?"

" ज्याला सर्वांशीं मिळून मिसळून काम करायचं आहे त्याला कधीं स्पष्ट लिहितां येत

नाहीं. एकदां लेखणी घेतली म्हणजे टीकाही करावी लागते. असं धोरण स्वीकारलं म्हणजे हातीं घेतलेल्या कार्यांत अनेक अडचणी येतात. कोणतंही सामाजिक कार्य करतांना सर्वांना संभाळावं लागतं. लिहायला सुरवात केली म्हणजे हें कसं साधणार ? "

" या धोरणामुळं आपण लिहीत नाहीं. पण त्यामुळं वाङ्मयाचं किंवा ज्या प्रश्नांवर आपण लिहिणार त्या प्रश्नांचंही नुकसान होत नाहीं काय ? "

" होईलही नुकसान कदाचित. पण एकट्यानं सर्वच गोष्टी कराव्या असं तरी कुणी सांगितलं आहे ? ज्यानं त्यानं आपलं क्षेत्र आंखावं. "

" आपणांस संगीताची आवड असेलच. " मी विषय बदलून म्हणालों.

" मला संगीत आवडतं–ऐकलं कीं बरं वाटतं. पण अजून मी गाण्यासाठीं म्हणून कुठं मुद्दाम गेलों नाहीं. खेळण्याचा मात्र मला फार नाद होता. क्रिकेट आणि टेनिस हे माझे आवडते खेळ होते. विद्यार्थीदशेंत आणि शिक्षक असतांना मी फारच खेळलों आहें. "

" आपणांस प्रवासाची आवड आहे का ? "

" मी कामाशिवाय कुठंच कधींच जात नाहीं. कामानिमित्त मी परदेशांत बरेच वेळां गेलों आहें; पण काम टाकून मी कुठंही फिरायला गेलों नाहीं. हिंदुस्थानांतही कामाशिवाय मी कुठं फारसा फिरलेलों नाहीं. माथेरान, महाबळेश्वर किंवा बडोदेंही मीं कधीं पाहिलेलं नाहीं; आणि कामाखेरीज त्या ठिकाणीं जावं असं मला वाटतही नाहीं. "

" आपणांस कोणत्या प्रकारचा पोषाख विशेष आवडतो ? "

" पोषाखाविषयीं माझ्या फारशा आवडीनिवडी नाहींत. पोषाखांत सहसा मी कधीं बदल करीत नाहीं. मी अजूनपर्यंत जरी पगडी घालतों तरी मला कुणी विचारलं तर युरोपिअन पद्धतीचाच पोषाख बरा असाच मी त्याला सल्ला देईन. "

त्यानंतर लग्नविषयक कायद्याच्या प्रश्नावर आमच्या चर्चेला प्रारंभ झाला. ते म्हणाले,

" लग्न हा करार असावा. तो करार केव्हांही दूर करण्याची पतिपत्नींना मुभा असावी. त्यांना वाटेल तेव्हां एकमेकांपासून दूर रहाण्याचं स्वातंत्र्य असावं. एखाद्या स्त्रीचं नवऱ्याशीं पटत नसलं तर काडीमोड करून तिनं खुशाल दुसऱ्या नवऱ्याशीं संसार करावा. आणि दुसऱ्या नवऱ्याशींही जर तिचं पटलं नाहीं आणि पहिल्या नवऱ्याची संमति असली तर तिनं खुशाल येऊन पुनः पहिल्या नवऱ्याशीं संसार करावा. प्रत्येक स्त्रीपुरुषाला व्यक्तिस्वातंत्र्य असावं. व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येणारे असे तरी विवाहविषयक कायदे नसावे. "

“ डॉ. देशमुख यांच्या Divorce बिलाबद्दल आपलं काय मत आहे ? ”

“ माझ्या मतें त्या बिलांत कांहीं दोष आहेत. आणि ते दोष वगळून तें बिल पास झालं तर कांहीं वाईट नाहीं. काडीमोड केल्यानंतर स्त्रीला तिचं दुसरं लग्न होईपर्यंत तिला पोटगी देण्याची व्यवस्था असावी. हा प्रश्न न्यायाधिशाकडे सोंपविणं बरं. परिस्थितिप्रमाणें त्यानं स्त्रीला पोटगी द्यावी असा न्यायाधीश निर्णय देईल. या बाबतींत सक्तीचं कलम असूं नये. ”

त्याच दिवशीं नानासाहेब जोशी मध्यवर्ति असेंब्लीच्या बैठकीला हजर राहण्यासाठीं नवी दिल्ली येथें जायचे असल्यामुळें त्यांच्या सामानाची बांधाबांध चालली होती. त्यांना त्या दिवशीं कांहीं कपडेही खरेदी करायचे होते. कपडे घेऊन आलेल्या नोकराला ते म्हणाले, “ कांहीं काळ्या रंगाचे पायमोजेही घे. पांढऱ्या रंगाचे पायमोजे आहेत माझ्याजवळ. पण काळा कोट घातला म्हणजे पंचाईत व्हायची. काळा कोट असतांना पांढरे पायमोजे घातले तर सगळ्यांचं लक्ष वेधेल माझ्याकडे.” हंसत हंसत नानासाहेब म्हणाले.

: ७ :

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# एम्. एन्. रॉय

“ गांधीवाद मला मान्य नाहीं याचं कारण गांधीवादांत बुद्धिवादाला मुळींच स्थान नाहीं. हिंदी लोकांच्या खुळ्या समजुती आणि भ्रम यांवरच गांधीवाद आधारलेला आहे. लोकांचं अज्ञान तें गांधीवादाचं अधिष्ठान आहे. आणि म्हणूनच मला असं वाटतं, कीं गांधीवाद हरप्रयत्नानं उलथून पाडावा. ”

कॉ. एम्. एन्. रॉय यांची भेट घेतली त्यावेळीं त्यांनीं वरील उद्गार काढले.

कॉ. रॉय गेल्या एक वर्षापूर्वी ज्यावेळीं डेहराडून येथें राहायला गेले त्यावेळीं त्यांनीं जो बंगला भाड्यानें घेतला होता त्याच्या आजुबाजूचें वातावरण भयाण आणि रुक्ष वाटत होतें. बंगल्याच्या आजुबाजूच्या आवारांत सर्व रेताड जमीन होती. आजुबाजूला नांवालाही एखादें झुडूप दिसत नव्हतें. पण ज्यावेळीं मुलाखतीसाठीं म्हणून मी कॉ. रॉय यांच्या बंगल्यावर गेलों त्यावेळीं तेथील वातावरणच बदललेलें माझ्या दृष्टीस पडलें.

बंगल्याच्या आवारांत निरनिराळ्या जातींचीं फुलझाडें आणि निरनिराळ्या जातींचीं इतर नयनमनोहर झाडें तेथें माझ्या दृष्टीस पडलीं. तेथील दृश्य पाहून सुरवंटाचें फुलपांखरूं झाल्याप्रमाणेंच मला वाटलें ! परकऱ्या मुलीच्या मुखावरील भावनाशून्यता तिनें तारुण्यांत पदार्पण करतांच नाहींशी होऊन जसें तिच्या मुखावर भावनांचें इंद्रधनुष्य दिसूं लागतें त्याचप्रमाणें तेथील बागेच्या स्वरूपांत बदल झाला होता.

मी त्यांच्या बंगल्याच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला, त्यावेळीं कॉ. रॉय मुख्य दिवाणखान्यांत वाचीत बसले होते.

त्यांची स्वतःची लायब्ररी अगदीं छोटीशीच म्हणजे सुमारें चारपांचशें पुस्तकांची असावी. पण त्यांत सायन्स, मॅथेमेटिक, फिलॉसफी यांवरील पुस्तकांची संख्या जास्त आहे. कॉ. रॉय हे मनानें डॉ. आंबेडकरांप्रमाणेंच तत्त्वज्ञानी आहेत. पण आंबेडकरांप्रमाणें त्यांचें तत्त्वज्ञान एकांगी नाहीं. डॉ. आंबेडकर तत्त्वज्ञानी असले तरी भावनाप्रधान आहेत. अनेक प्रसंगीं डॉ. आंबेडकर भावनेच्या प्रवाहांत वाहात जातात. पण कॉ. रॉय यांचें तसें नाहीं. ते बुद्धिवादाच्या कसोटीनें सर्व गोष्टींकडे पाहात असतात. ते कृतीनें जसे क्रांतिकारक आहेत तसे हाडाचेही क्रांतिकारक आहेत. आणि म्हणूनच जीवनांत आणीबाणीचे अनेक प्रसंग आले असले तरी कॉ. रॉय कधीं डगमगलेले नाहींत.

" राजकारण अन् लेखन याखेरीज दुसरा आपणांस कसला नाद आहे का ? " असा मी ज्यावेळीं कॉ. रॉय यांना प्रश्न विचारला त्यावेळीं त्यांनीं समोरच्या आवारांतील बागेकडे बोट दाखविलें आणि ते म्हणाले, " बागबगीचा करण्याची मला अत्यंत आवड आहे. " आणि त्यानंतर मिसेस रॉय व आपण मिळून रेताड वाळवंटावर कसा बागबगीचा निर्माण केला याचा त्यांनीं मला इतिहास सांगितला.

आमचें हें बोलणें चाललें असतांना एक मांजर येऊन त्यांच्या टेबलावर बसलें. त्यावेळीं मी त्यांना विचारलें, " मांजरंही आपणांस आवडतात का ? "

त्यावेळीं आपलें या मांजरावर किती प्रेम आहे हें सांगतांना ते म्हणाले, " हें मांजर माझ्याबरोबर वाटेल तितकं लांब फिरायला जातं. तुरुंगांत असतांनाही मी एक मांजर पाळलं होतं. आणि Memoirs of a Cat या नांवानं मी एक पुस्तकही लिहिलं असून तें लवकरच प्रसिद्ध होणार आहे. "

" काय लिहिलं आहे आपण त्या पुस्तकांत ? " मीं विचारलें.

" मानसशास्त्र, आधुनिक शास्त्र यांच्या पायावर उभारलेल्या तत्त्वज्ञानानं मी जुन्या रूढी अन् परंपरा यांच्यावर कोरडे ओढले आहेत. मांजराचं तें आत्मकथन आहे. "

आणि त्यानंतर त्या नितान्त-रम्य पुस्तकांतील उतारेही त्यांनीं मला वाचून दाखविले.

" लहानपणीं आपली कोणती महत्त्वाकांक्षा होती ?" मी त्यांना विचारलें.

" लहानपणीं विशिष्ट अशा महत्वाकांक्षेनं मी कांहीं भारून गेलों नव्हतों. पण लहानपणीं रामकृष्ण परमहंसांच्या तत्त्वज्ञानाचा माझ्यावर फार परिणाम झाला होता. रामकृष्ण परमहंस पंथाच्या मी नादीं लागलों होतों. त्यानंतर आमच्या गांवीं एक साधु आले. ते सूर्योपासक होते. मी व इतर माझे कांहीं स्नेही त्या सांधूच्या नादीं लागलों. ते साधू होम पेटवून सूर्योपासना करीत. आम्हींही त्यांचं अनुकरण करूं लागलों. त्या बुवांच्या व्यक्तिमत्वाचा अन् तत्त्वज्ञानाचा आमच्या मतावर इतका परिणाम झाला होता, कीं आम्हीं गांवांतील देवाच्या मूर्ति फेंकून दिल्या होत्या; कारण त्या बुवांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. त्यावेळीं संन्यास घ्यावा अशीही मला नेहमीं इच्छा होत असे. "

" मग संन्यास कां घेतला नाहीं तुम्हीं ? "

" त्यानंतर terrorist चळवळीशीं माझा संबंध आला अन् वयाच्या तेराव्या वर्षी मला सक्तमजुरीची शिक्षा झाली. "

" आपण आध्यात्मिक वाङ्मयाचा अभ्यास केला आहे काय ? "

" तुरुंगांत असतांना मी आध्यात्मिक वाङ्मयाचा बराच अभ्यास केला आहे. "

" त्या वाङ्मयाविषयीं आपलं काय मत आहे ? "

" आज मला तें वाङ्मय मुळींच आवडत नाहीं. वेदान्ताचा काळ हा अवनतीचा काळ आहे. वेदान्तापेक्षां सांख्य, कपिल किंवा कणाद यांचं तत्त्वज्ञान जास्त श्रेष्ठ वाटतं. "

" याचं कारण काय ? " मी विचारलें.

" सांख्य, कपिल आणि कणाद यांच्या तत्त्वज्ञानांत आधिभौतिकवाद आहे, तसा वेदान्तांत नाहीं. हिंदुस्थानांत प्राचीन काळीं आध्यात्मिक तत्त्वज्ञानच नव्हतं हें विधान अगदीं चुकीचं आहे. इसवी सनापूर्वी आधिभौतिक तत्त्वज्ञान हिंदुस्थानांत परमोत्कर्षाला पोंचलं होतं. हिंदी मार्क्सवाद्यांनीं या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून त्याचं पुनरुज्जीवन केलं पाहिजे. "

" आपणांस आयुष्यांत विश्रांति मिळाली तर आपण कोणतं कार्य हातीं घ्याल ? " मी विचारलें.

" माझ्या डोक्यांत नेहमीं असे विचार येतात, कीं राजकारण—गांधीजींच्या हातीं गेलेलं आजचं राजकारण सोडावं, अन् सायन्स, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करीत बसावं. याचं कारण असं, कीं मार्क्सच्या वेळीं मॅटरची ( matter ) जी कल्पना होती ती आतां पूर्णपणं बदललेली आहे. आजच्या बदललेल्या कल्पनेवर तत्त्वज्ञानाचा पाया बदलण्याचा माझा विचार आहे. मला वेळ मिळाला तर हेंच कार्य मी माझ्या हातीं घेईन ! "

" देवाविषयींच्या आपल्या काय कल्पना आहेत ? "

" मी Atheist ( निरीश्वरवादी ) आहें. देवावर माझा मुळींच विश्वास नाहीं. ईश्वराचं अस्तित्व मला मान्य नाहीं. ज्यांचा देवाच्या अस्तित्वावर विश्वास आहे त्यानं तें मला पटवून द्यावं. जोंपर्यंत ईश्वराचं अस्तित्व मला कुणी पटवून देत नाहीं तोंपर्यंत मी ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्यास तयार नाहीं. "

" आपण संस्कृत, बंगाली किंवा इतर हिंदी वाङ्मय कितीसं वाचलं आहे ? "

" तुरुंगांत असतांना मी बरंच संस्कृत वाङ्मय वाचलेलं आहे. माझ्या कोठडींत संयुक्त प्रान्तांतला एक जमीनदार कैदी होता. तो आपल्या घरच्या लायब्ररींतून संस्कृत ग्रंथ आणवीत असे अन् ते मी अभ्यासपूर्वक वाचीत असें. त्याच वेळीं मी संस्कृत भाषेत असलेलं हिंदी तत्त्वज्ञान वाचलं. बंगाली वाङ्मयही मी फार वाचलं आहे. पण रवींद्रनाथ टागोरांच्या वाङ्मयापेक्षां शरच्चंद्राच्या कादंबऱ्या मला फार आवडतात. इंग्रजी भाषेंतील ललित वाङ्मयही मी बरंचसं वाचलं आहे. "

वाङ्मयावरील आमच्या चर्चेचा ओघ रशियन क्रांति आणि त्यानंतरची परिस्थिति यांकडे वळला.

" आपण रशियांत कोणत्या सालीं गेलां होतां ? "

" १९१८ सालीं. " रॉय म्हणाले.

" म्हणजे क्रांतिनंतरच ? "

" होय ! " रॉय उत्तरले.

" रशियांत गेल्यानंतर आपण लेनिनला कोणती मदत केली ? "

" लेनिनला मी सर्व प्रकारची मदत केली. विशेषतः आर्थिकदृष्टया फार मदत केली. "

" आणखी आपण कोणतं कार्य केलं ? "

" Communist International जें स्थापन करण्यांत आलं त्याच्या स्थापनंत माझा बराच हात होता. त्याच्या कार्यकारी मंडळाचा मी सभासद होतों. "

" मग तेथून आपण बाहेर कां निघाला ? आपलं अन् स्टॅलिनचं वांकडं यायला कोणतीं कारणं घडलीं ? "

" स्टॅलिनचं आणि माझं वांकडं कधींच आलं नाहीं अन् आजही नाहीं. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या सभासदांशीं माझा मतभेद झाला म्हणून मी तिथून निघालों. "

" ते कोणत्या स्वरूपाचे मतभेद होते तें आपण सांगाल का ? " मी विचारलें.

" अलबत् ! " रॉय पुढें बोलूं लागले, " १९२८ च्या सप्टेंबर महिन्यांत Communist International ची सहावी world Congress भरली होती. त्यावेळीं त्या कॉंग्रेसमधें आत्यंतिक जहाल धोरण ( ultra-leftist ) स्वीकारण्यांत आलं. त्या कॉंग्रेसमधें हिंदुस्थानविषयक असं धोरण जाहीर करण्यांत आलं होतं, कीं हिंदी राष्ट्रीय सभेंतून हिंदी कम्युनिस्टांनीं फुटून निघावं अन् हिंदी राष्ट्रीय सभा नेस्तनाबूद करावी आणि हेंच धोरण मला मान्य नव्हतं. याचं कारण असं, कीं कॉंग्रेसचं पुढारीपण आजच्याप्रमाणंच त्यावेळींही जरी मला प्रतिकांतिकारक वाटत होतं तरीही कॉंग्रेस कांहीं प्रतिक्रांतिकारक वाटत नव्हती. कॉंग्रेसचं अस्तित्व मला हवं होतं. आणि हें माझं धोरण इतर सभासदांना पसंत नव्हतं ! "

" मग स्टॅलिनचं तुमचं कांहींच वांकडं नाहीं तर ? "

" मुळींच नाहीं. " रॉय पुढें म्हणाले, " कम्युनिस्ट इंटरनॅशनलमधील सभासदांशीं कांहीं राजकीय बाबतींत माझं पटलं नाहीं म्हणूनच १९२९ सालीं मला त्यांतून काढून टाकण्यांत आलं. "

" इंटरनॅशनलनं कारणं कोणतीं दिलीं ? "

" मी विरोधी पक्षाच्या वर्तमानपत्रांत लेख लिहिले म्हणून त्यांनीं माझं सभासदत्व रद्द केलं. हेंच माझ्या बाबतींत त्यांनीं कारण दिलं. आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनलनं माझ्या विरुद्ध जो शिस्तभंगाचा ठराव आहे त्यांत हेंच कारण नमूद केलं आहे. "

" हिंदी राष्ट्रीय सभा नेस्तनाबूत करण्याचं कम्युनिस्ट इंटर नॅशनलचं धोरण अजूनही कायम आहे का ? "

" नाहीं—" रॉय म्हणाले, " १९३५ सालीं जी जागतिक कॉंग्रेस भरली, त्यावेळीं पूर्वीचं ज्वलज्जहाल धोरण बदलण्यांत आलं. त्यावेळीं Popular front च्या धोरणाचा अंगिकार करण्यांत आला. माझं जें धोरण होतं तेंच स्वीकारण्यांत आलं. हिंदी कम्युनिस्टांनीं कॉंग्रेसमधें शिरून कार्य करावं असं माझं धोरण होतं, अन् शेवटीं तेंच धोरण कम्युनिस्ट इंटरनॅशनलनं स्वीकारलं—मान्य केलं. "

" स्टॅलिनचं आजचं धोरण आपणांस मान्य आहे का ? "

" Stalin's policy is absolutely correct. " रॉय पुढें बोलूं लागले, " मी शंभर टक्के स्टॅलिनिस्ट आहे. "

" मग ट्रॉट्स्कीचे जे स्टॅलिनवर अनेक गंभीर आरोप आहेत त्यांचं काय ? "

" ट्रॉट्स्कीचे स्टॅलिनवर जे आरोप आहेत ते चुकीचे आहेत. "

" सोव्हिएटमधील ट्रायल्स आणि त्यानंतर कित्येक बड्या पुढाऱ्यांना फांशीं देण्याचं स्टॅलिनचं धोरण आपणांस मान्य आहे का ? "

" कांहीं बाबतींत स्टॅलिनचा अतिरेक होत असेलही. पण उगीच कांहीं त्याला कुणालाही फांशीं देतां येणार नाहीं. जनमताचीसुद्धां त्याला भीति बाळगावी लागतेच. म्हणूनच त्याला मी दोष द्यायला तयार नाहीं. "

" सोव्हिएटमधें पूर्ण लोकशाही आहे असं आपणांस वाटतं का ? "

" या बाबतींत शंका बाळगण्याचं मुळींच कारण नाहीं. लोकमताला अनुसरून स्टॅलिननं अनेक वेळां आपल्या धोरणांत बदल केला आहे. "

" तिथल्या कामगारांना राज्यकारभारामधें स्थान आहे का ? "

" माझा जो अनुभव आहे त्यावरून मी असं सांगूं शकतों, कीं तिथल्या कामगारांना सोव्हिएट राज्यकारभारांत पूर्ण स्थान आहे—महत्त्वाचं स्थान आहे. फॅक्टरी—फॅक्टरीमधून राजकीय प्रश्नांवर चर्चा केली जाते. कामगार किंवा शेतकरी आपापल्या सोव्हिएटमधें राजकीय प्रश्नांची चर्चा करून त्या बाबतचीं आपलीं मतं वरिष्ठ सोव्हिएटकडे पाठवितात. त्यांच्या मतांचा विचार केला जातो व त्यानुसार धोरणांत बदल केला जातो. लोकमताप्रमाणं राज्ययंत्रामधें बदल केला जातो. "

" रशियांतील कामगार धनसंपन्न आहेत का ? "

" धनसंपन्न नाहींत अन् उपाशीही मरत नाहींत. तिथं अजूनही सर्व प्रकारं सुबत्ता

आहे असं नव्हे. पण इतर देशांतील कामगारांपेक्षां तिथल्या कामगारांची स्थिति चांगली आहे. झारशाहींतील दैन्याचा अन् पारतंत्र्याचा तिथं मागमूसही राहिलेला नाहीं. ”

“ तिथल्या कामगारांच्या पगाराचं प्रमाण कसं काय आहे ? ”

“ कामगारांच्या पगारांत Inequality आहे. कामगारांच्या कलाकुसरीवर व उत्पादनाच्या कौशल्यावर अन् प्रमाणावर पगाराचं प्रमाण अवलंबून असतं. But Communism does not mean equal pay. It means quality of opportunity. आणि म्हणूनच पगाराच्या प्रमाणांत फरक हा राहाणारच. पण कामगार किंवा गिरण्यांमधील वरिष्ठ अधिकारी यांना कितीही पगार असला अन् त्यांनीं कितीही पैसे वाळगून ठेवले तरी त्यांना मिळकत किंवा फॅक्टरी मात्र खरेदी करतां येणार नाहीं. त्यांनीं पाहिजे तर जवळ असलेल्या पैशांतून वाटेल तितकी चन करावी. ”

“ रशियामध्यें विवाहाचं बंधन नाहीं—तिथं स्वैराचार आहे हें खरं आहे का ?”

“ क्रांतिनंतर परकीय राष्ट्राच्या चिथावणीनं रशियामधें जी कांहीं काळ यादवी सुरू होती त्या वेळीं वराच ~~स्वैराचार~~ झाला. त्या वेळीं कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नव्हता. पण ज्यावेळीं यादवीयुद्ध थांबलं त्यावेळीं मात्र लग्नविषयक कायदे कडक करण्यांत आले. मुलांच्या संगोपनाची जबाबदारी आईबापांवर सारखीच असते. कुणीही ती जबाबदारी टाळली तर कायद्यांत त्याला कडक शिक्षा आहे. स्त्रीला गर्भपाताचीही परवानगी नाहीं. त्यामुळं स्त्रीलाही जबाबदारीनं राहावं लागतं. मुलांच्या संगोपनासाठीं आईबापांनाही पोटगीखर्च ( Alimony ) द्यावा लागतो. रशियांत जर कोणती स्तुत्य अन् अनुकरणीय गोष्ट असेल तर तिथं औरस-अनौरस हा भेद मानला जात नाहीं. रजिस्टर विवाह केलाच पाहिजे असं जरी सक्तीचं बंधन नसलं—संभोगस्वातंत्र्य असलं तरी त्यानंतरची सर्व जबाबदारी—मुलांच्या संगोपनाची जबाबदारी मातापित्यांवर असते. Any person can have sexual relations with any woman provided they love each other. But both of them must be prepared to face the Consequences ! इतके कडक निर्बंध असल्यावर सक्तीची विवाहनोंदणी तरी कशाला पाहिजे ? जबाबदारी पाळण्यासाठींच विवाहाचं बंधन असतं. पण रशियांतील कायद्यांनींच प्रत्येक स्त्री-पुरुषाला जबाबदार बनविलं आहे. ”

रशियांतील कम्युनिस्ट तत्त्वज्ञान, तिथले कायदे वगैरेवर चर्चा केल्यानंतर मी रॉय यांना हळुच विचारलें, “ गांधीवादाला आपला इतका विरोध कां ? ”

" गांधीवाद Irrational आहे. बुद्धिवादाला त्यांत मुळींच स्थान नाहीं. लोकांच्या खुळ्या समजुती, भ्रम यांच्या उत्तेजनावर गांधीवाद आधारलेला आहे. लोकांचं जें अज्ञान आहे तें गांधीवादाचं अधिष्ठान आहे. It represents the mass mind as it is today. आजची जी हिंदी जनता आहे ती अज्ञानानं भरलेली आहे. तिला तशीच अज्ञानांत ठेवण्याचं गांधीवादाचं तंत्र आहे. म्हणूनच जनतेचा शैक्षणिक दर्जा वाढवून गांधीवाद उलथून पाडला पाहिजे. "

त्यानंतर कॉ. रॉय यांनीं १९२७ सालीं चीनमधें जी चळवळ केली त्यासंबंधीं मी त्यांना प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, " १९२७ सालीं कम्युनिस्ट इंटरनॅशनलनं मला चीनमधें पाठविलं. पण मला तिथं यशस्वी रीतीनं कार्य करतां आलं नाहीं. चीनमधें बोरोडिनच्या हातीं सर्व अधिकार होते. अन् कोमिंटाशी व तिथला भांडवलदार वर्ग यांच्याशीं बोरोडिनचे चांगले संबंध होते. अन् अधिकारही त्याच्या हातीं असल्यामुळं माझ्या कार्यास अनेक अडचणी आल्या. पण तिथल्या आठ महिन्यांच्या मुक्कामांत ' चायनिज कम्युनिस्ट पार्टी 'ला मात्र मी योग्य तें स्वरूप दिलं. "

रशियाचें फिनलंडविषयक जें धोरण आहे त्यासंबंधीं बोलतांना कॉ. रॉय म्हणाले,

" आजचं रशियाचं धोरण सर्वतोपरी योग्य आहे. रशियाची सुरक्षितता हाच फिन्लंड-विषयक धोरणाशीं रशियाचा मूळ हेतू आहे. रशियावर स्वारी करण्यासाठीं रशियाविरोधी साम्राज्यशाही राष्ट्रांनीं फिन्लंडचा उपयोग केला असता; तो त्यांचा बेत हाणून पाडण्यासाठींच रशियानं आजचं धोरण स्वीकारलं आहे. रशियानं फिन्लंडकडे ज्या मागण्या केल्या होत्या त्याबद्दल रशियानं फिन्लंडला भरपूर मोबदला देऊं केला होता. यांत रशियाला कसा दोष देतां येईल ? "

कॉ. रॉय हे असामान्य बुद्धिमत्तेचे तत्त्वज्ञानी आहेत, तरी ते रुक्ष नाहींत. त्यांना ललित वाङ्मयाची आवड आहे तशीच संगीताची त्यांना जास्त आवड आहे. पॉल रॉब्सन हा निग्रो नट व गायक त्यांना फार आवडतो. युरोपिअन संगीताची आवड आहे. बेटोफने हा जर्मन गायकही त्यांचा आवडता गायक आहे. चित्रपटांचेही ते शोकीन आहेत असें त्यांच्याशीं झालेल्या चर्चेवरून दिसून आलें.

: ८ :

# बॅ. जमनादास एम्. मेहता

" **मा**झा हिंदुधर्मावर पूर्ण विश्वास आहे. हिंदुधर्मातील रूढी आणि धार्मिक विधी यांविषयीं मला कांहीं तितकासा जिव्हाळा वाटत नाहीं. पण त्यांतील सोहळे–समारंभ नष्ट व्हावे असं मात्र मला वाटत नाहीं. कम्युनिस्टांचा कोणत्याही धर्माकडे पहाण्याचा दृष्टिकोण पूर्णपणं तर्कदुष्ट ( Irrational ) आहे. "

असें मत बॅ. जमनादास मेहता यांनीं मुलाखतींत व्यक्त केलें.

बॅ. जमनादास मेहता यांच्या मलबारहिलवरील बंगल्यांत मी ज्यावेळीं प्रवेश केला त्यावेळीं एकाद्या लायब्ररीच्या भव्य दिवाणखान्यांत प्रवेश केल्याचा मला भास झाला. त्यांच्या दिवाणखान्यांत ठिकठिकाणीं लहानमोठीं पुस्तकांचीं कपाटें दिसत होतीं. अन् त्यांच्या दिवाणखान्याचें वैशिष्ट्य हें, कीं तिथें साधेपणा दिसत होता. थाटमाट दिसत नव्हता. पुस्तकांचीं कपाटें, दहाबारा खुर्च्या आणि एकदोन इझिचेअर्स दिवाणखान्यांत दिसत होत्या. दिवाणखान्याच्या प्रमुखस्थानीं शिवाजीमहाराजांचा एक फोटो आणि

कोणत्या तरी साधुमहाराजाचा एक फोटो टांगलेला दिसत होता. हें दृश्य पहातांच बॅ. जमनादास मेहता हे कृतीनें बुद्धिवादी दिसत असले तरी मनानें भावनाप्रधान आहेत, याची स्पष्ट जाणीव होत होती.

बॅ. मेहता यांचें घरचें वातावरणही पाश्चात्य पद्धतीची छाप पडल्यासारखें वाटत नाहीं. अगदीं नियमित बोलणें आणि नियमित वागणें बॅ. जमनादास यांच्या गांवींही नाहीं. त्यांच्या वागणुकींत कृत्रिमता नाहीं. अन् बडेपणाचाही दिमाख नाहीं. के. एम्. मुनशी यांच्या प्रत्येक हालचालींत जसा 'मी कुणीतरी आहे' याचा ठसा उमटलेला दिसून येतो त्याप्रमाणें बॅ. जमनादास यांच्या वागणुकींत दिसत नाहीं.

मी ज्यावेळीं त्यांच्या भेटीसाठीं गेलों त्यावेळीं मुंबईच्या कामगारांच्या महागाई भत्त्याच्या मागणीचा विचार करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या 'कन्सिलिएशन बोर्डा'च्या बैठकीचें काम संपवून बॅ. जमनादास नुकतेच घरीं आले होते. गिरणीमालकांशीं केलेल्या वाटाघाटींत अपयश आल्याची साक्ष त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होती. दोन तीन दिवस झालेले कामाचे परिश्रम आणि वाटाघाटींत आलेलें अपयश यामुळें त्यांचा चेहरा उदासवाणा दिसत होता. त्यांचें नेहमींचें मिस्किल हास्य चेहऱ्यावर मुळींच दिसत नव्हतें. असेंब्लीची बैठक किंवा इतर कोणत्याही सभेच्या वेळीं त्यांच्या मनाची जी उल्हसित वृत्ति दिसून येते, ती त्यावेळीं मला दिसली नाहीं. आणि म्हणूनच पुनः केव्हां तरी मुलाखत देण्याचें आश्वासन देऊन माझी ते बोळवण करतील अशीही शंका मला वाटली.

पण ज्या वेळीं त्यांनीं 'आशे' चा अंक हातीं घेऊन आपल्या मोडक्यातोडक्या मराठी भाषेच्या ज्ञानानें अन् चुकीच्या उच्चारांनीं अंकांतील ना. म. जोशी यांची मुलाखत वाचायला सुरवात केली त्यावेळीं त्यांच्या चेहऱ्यावर त्यांचें नेहमींचें मिस्किल हास्य खेळूं लागलें. 'एकाद्या स्त्रीचं नवऱ्याशीं पटत नसलं तर तिनं खुशाल दुसऱ्या नवऱ्याशीं संसार करावा. आपल्या दुसऱ्या नवऱ्याशींही जर तिचं पटलं नाहीं तर तिनं पहिल्या नवऱ्याची संमति असल्यास पहिल्या नवऱ्याशींही संसार करावा' असे जें ना. म. जोशी यांच्या मुलाखतींत वाक्य आहे तें आपल्या गुजराती उच्चारांनीं त्यांनीं मोठ्यानें वाचलें. त्यांना त्या वाक्याचा अर्थ नीटसा कळला नाहीं म्हणून त्यांनीं मला खुलासा विचारला. आणि मी ज्यावेळीं इंग्रजींत त्यांना त्या वाक्याचा अर्थ सांगितला त्यावेळीं 'पुनः तिनं तिसऱ्या नवऱ्याशीं लग्न केलं तर चालणार नाहीं का ?' असें ते हंसत हंसत म्हणाले.

आमच्या संभाषणाला सुरवात होऊन पांच दहा मिनिटें झाली असतील नसतील इतक्यांत बॅ. जमनादास यांना पांच सहा तरी टेलिफोन आले. माझ्याशीं बोलत असतांनाच ते बोलत बोलत टेलिफोन रूममधें जात होते आणि तिथूनच लांबून बोलत बोलत दिवाणखान्यांत येत होते. आमचें बोलणें ऐनरंगांत आलें होतें. इतक्यांत कॉ. रणदिवे यांचा बॅरिस्टरसाहेबांना फोन आला. आणि 'रणदिवे' नांवाचा अपभ्रंश करून ज्या वेळीं त्यांच्या गड्यानें चमत्कारिक नांव उच्चारून सांगितलें, त्यावेळीं आमची दोघांचीही हंसतां हंसतां मुरकंडी वळल्याखेरीज राहिली नाहीं.

"आपली लहानपणीं कोणती महत्त्वाकांक्षा होती?" मी त्यांना प्रश्न विचारला.

"माझ्या महत्त्वाकांक्षेचं क्षेत्र नेहमीं बदलत चाललं आहे. बालपणांतली महत्त्वाकांक्षा अन् तारुण्यांतली महत्त्वाकांक्षा असे दोन भाग पाडतां येतील माझ्या महत्त्वाकांक्षेचे. तेव्हां कोणत्या वयांतली महत्त्वाकांक्षा पाहिजे तुम्हांला?"

"ज्या ज्या कालांतली तुम्हांला सांगतां येईल ती!" मी म्हटलें.

"बालपणीं रामायण–महाभारत मी फार वेळां वाचलं होतं. त्यावेळीं मला रामाविषयीं मोठी सहानुभूति वाटे अन् रावणाचा निःपात करावा असे विचार मनांत येत. त्याच ग्रंथाच्या वाचनामुळं अन्यायाचा प्रतिकार करण्याची वृत्ति माझ्या अंगीं बाणली. रामायण–महाभारत वाचून जर माझा कोणता फायदा झाला तर हाच. आज जशी मला अन्यायाची चीड येते तशी बालपणींही येत असे. अन् अन्यायाचा प्रतिकार करायची बालपणांतली माझी शक्ति अन् उत्साह अजूनही कायम आहे."

"बालपण संपल्यावर आपणांस कोण व्हावंसं वाटलं?"

"पण बालपण संपण्यापूर्वी मी नाटककंपनींतही गेलों आहें." बॅ. जमनादास हंसत म्हणाले.

"नाटक कंपनींत?" मी आश्चर्यानें विचारलें.

"हो–हो—नाटक कंपनींत. नाटकांत कामंही केलीं आहेत मी."

"मग नटाचे बॅरिस्टर कसे काय झालांत तुम्हीं?"

"त्याचं असं झालं," बॅ. जमनादास यांनीं आपल्या बालपणचा इतिहास सांगायला सुरवात केली, "मी लहान असतांना शाळेंत जायला नेहमींच नाखूष असें. त्यामुळं घरच्या मंडळीकडून मला अनेक वेळां मारही खावा लागे. अर्थातच शाळा अन् मार कसा चुकवावा

याचा मी विचार करीत असें. शाळा चुकवणं माझ्या लहरीवर असे. पण मार चुकवणं कांहीं माझ्या हातचं नव्हतं. पण कांहीं दिवसांनीं मला मार्ग सांपडला. आमच्या गांवीं आलेल्या एका नाटकमंडळींत माझे कांहीं बालमित्र होते. ते त्यावेळीं नाटकांत काम करीत होते. त्यांचं तें नटणं, मुरडणं, नाटकांतील कामाच्या वेळीं भरजरी पोषाखांत मिरवणं याचा माझ्या बालबुद्धीवर मोठा परिणाम झाला. मला नाटकांत जावंसं वाटलं अन् माझ्या नट-मित्राचा वशिला लावून मी नाटकमंडळींत सामीलही झालों."

"मग नाटकमंडळी कां सोडलीत तुम्हीं ?" मी विचारलें.

"दोन कारणं आहेत त्याला." बॅ. जमनादास यांनीं बोलायला सुरवात केली. "नाटकांत असतांना आम्ही मारामाऱ्याही केल्या आहेत. एकदां असं झालं, दोन बालनट स्त्रीपुरुषांच्या भूमिका करीत असत. एका नाटकांत प्रणयप्रसंगाचा सीन होता. नायक नायिकेशीं प्रेमालाप करतो असं दृश्य होतं. त्या प्रसंगाचं काम आटोपल्यानंतर ज्या मुलानं स्त्रीभूमिका करणाऱ्या मुलाशीं नाटकांत प्रेमाची भाषा बोलायला सुरवात केली होती त्याची टिंगल करायला सुरवात करतांच तें प्रकरण चिडीला गेलं अन् उभयपक्षांत एके दिवशीं मारामारी जुंपली. मी विरोधी पक्षांतील नटांना मार दिला अन् मार खाल्लाही."

"या मारामारीमुळंच नाटक कंपनी सुटली वाटतं ?"

"नाहीं." बॅ. जमनादास म्हणाले, "मारामारीमुळं दोन्ही पक्षांत वैमनस्य वाढलं. अन् माझ्या गोड आवाजीचा हेवा वाटणाऱ्या एका प्रतिस्पर्धी नटानं माझा आवाज बिघडावा म्हणून पानपट्टींत शेंदूर घातला. त्यामुळं माझा आवाज बिघडला. याच वेळीं माझ्या घरच्या मंडळींना उपरति होऊन मला प्रेमानं घरीं नेलं अन् मी नाटक मंडळी सोडली."

"त्यापूर्वी तुम्हीं चांगलं गात होतां का ?"

"अगदीं मधुर गात होतों."

"आपण स्त्री-भूमिका करीत होतां कीं पुरुष-भूमिका ?"

"पहिल्यानं तर मी नृत्य करीत होतों—मनोहर अन् आकर्षक नृत्य करीत होतों." बॅ. जमनादास हंसत हंसत म्हणाले, "अन् गातही होतों किती मधुर !"

बॅ. जमनादास यांचें तें वर्णन ऐकून मला कांहीं केल्या हंसूं आवरेना. माझ्याबरोबर तेही हंसत होते. पुढें ते म्हणाले, "माझ्या पोटांत शेंदूर गेल्यामुळं माझा आवाज बिघडला.

S. G. M. College, Karad.
New ma.

चांगलं बोलतां यावं म्हणून औषधोपचारही करावा लागला. आजही मला बोलतांना नेहमीं त्रास होतो. मधुनमधून खांकरून खांकरून बोलावं लागतं. "

" आपल्याशीं समक्ष बोलतांना आपल्या आवाजांतील दोष चटदिशीं ध्यानीं येत नाहीं. पण फोनवर आपलं बोलणं ऐकलं म्हणजे आवाजांतील दोष स्पष्ट कळतो. " मी म्हटलें.

" खरं आहे तें. " बॅरिस्टरसाहेबांनीं उत्तर दिलें, " नाटक मंडळींत मी थोडे दिवस राहिलों खरा पण त्यामुळं मला नाटकांचा फार नाद लागला. जुनागड इथं कॉलेजांत असतांना मी कितीतरी लघुनाटकं लिहिलीं होतीं. अन् मीच तीं दिग्दर्शित करीत होतों. त्यमुळं जुनागड कॉलेजांत अन् शहरांतही मी लहानपणीं लोकप्रिय होतों. कॉलेजांत असतांना मला एकदां कॉलेजांतून बडतर्फही केलं होतं. "

" मारामारी केली म्हणून ? " विचारलें.

" नव्हे. लो. टिळकांना ज्यावेळीं बंदिवासाची शिक्षा झाली त्यावेळीं कॉलेजांत हरताळ पाडण्याच्या बाबतींत मी पुढाकार घेतला. सगळ्या पोरांना हांकलून लावलं मी कॉलेजाच्या बाहेर. म्हणूनच प्रिन्सिपॉलनं मला कॉलेजांतून बाहेर हांकललं पण योगायोगानं माझं नुकसान मात्र झालं नाहीं. "

" तें कसं काय ? "

" त्यापूर्वीच मी बी. ए. च्या परीक्षेस बसलों होतों. "

" ही बालपणांतली बंडखोरी संपल्यानंतर आपण कोणतं ध्येय ठरवलंत ? "

" खरं सांगायचं म्हणजे आपण पुढारी व्हावं—अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं पुढारी व्हावं असं मला कॉलेजांत गेल्यापासून वाटूं लागलं. मात्र सरकारी नोकरी करण्याचा मोह मला कधींच वाटला नाहीं. "

" म्हणूनच आपण बॅरिस्टरीचा कोर्स घेतला होता वाटतं ? "

" अर्थातच ! " बॅ. जमनादास म्हणाले.

" आपण इंग्रजी कथावाङ्मय वाचलं आहे का ? " मी त्यांना प्रश्न केला.

" किती तरी कथावाङ्मय मी वाचलेलं आहे ! "

" कोणते ग्रंथकार वाचले आहेत आपण ? "

" शेक्स्पीअर, डिकन्स, मेरी कॉरेली, जेन ऑस्टिन, थॅकरे या ग्रंथकारांचं वाङ्मय वाचलं आहे मी. "

" आधुनिक ग्रंथकार वाचले आहेत का ? "

" वाचले आहेत ना ! एच्. जी. वेल्स, बर्नार्ड शॉ, एडगर वॉलेस यांचं सर्व वाङ्मय मी वाचलं आहे. पण इच्छा असतांनाही वेळाच्या अभावीं त्यानंतरच्या लेखकांचं वाङ्मय मात्र मी फारसं वाचलं नाहीं. "

" आपले आवडते ग्रंथकार कोणते ? "

" जुन्या पिढींतील ग्रंथकारांत डिकन्स मला फार आवडतो. "

" त्याच्या लेखनांतील कोणते गुण आपल्याला आवडतात ? "

" डिकन्सच्या कादंबऱ्यांत अनेक गुण आहेत. त्याची प्रत्येक कादंबरी कोणत्या तरी सामाजिक प्रश्नाच्या पायावर उभारलेली आहे. जनतेच्या आशा, आकांक्षा, जीवन आणि जनतेचं दारिद्र्य यांचं त्यांत प्रतिबिंब आढळतं. म्हणून मला डिकन्सच्या कादंबऱ्या आवडतात. "

" ना. म. जोशी यांचंही असंच मत आहे. " मी त्यांना म्हटलें.

" असं का ! " बॅ. जमनादास उद्गारले.

" दुसरा कोणता ग्रंथकार आवडतो आपल्याला ? "

" बर्नार्ड शॉ ! " बॅ. मेहता म्हणाले.

" त्याच्या वाङ्मयांतील कोणतं वैशिष्ट्य आपणांस आवडतं ? "

" त्याच्या लेखनांत उपहास भरपूर असतो. "

" तुमच्याप्रमाणंच ना ? दुसऱ्यावर टोले हाणण्याची कला तुम्हांला चांगलीच साधली आहे. त्याच्यासाठीं तर तुम्हीं जास्त प्रसिद्ध आहांत ! " मी हंसत हंसत म्हटलें.

" म्हणूनच तर बर्नार्ड शॉ मला जास्त आवडतो. " बॅ. मेहता हंसत हंसत म्हणाले, " बर्नार्ड शॉ प्रमाणंच शेरिडनही मला फार आवडतो. "

" नाटकं आणि कादंबऱ्याप्रमाणंच तत्त्वज्ञानावरील विविध ग्रंथ मी वाचलेले आहेत. प्लेटो, ॲरिस्टॉट्ल, कॅन्ट, हेगेल, बर्क प्रभृति ग्रंथकारांचे ग्रंथही मी वाचलेले आहेत. "

" गुजराती वाङ्मय आपणांस कितीसं आवडतं ? "

" गुजराती वाङ्मयाविषयीं मला मुळींच आस्था वाटत नाहीं. माझ्या दृष्टीनं गुजराती ललित वाङ्मय अजूनही मागासलेलं आहे. तें वाङ्मय वाचून माझं कधींच समाधान झालेलं

नाहीं. अलीकडे तें वाङ्मय मी फारसं कधीं वाचत नाहीं. गुजराती वाङ्मयांत Scholar फार आहेत. पण उत्कृष्ट ललित लेखक मात्र फार थोडे आहेत."

"कन्हयालाल मुनशी यांचं वाङ्मय—कथावाङ्मय आपणांस कितीसं आवडतं ?"

"त्याविषयीं न बोललेलंच बरं." जमनादास म्हणाले, "याचं कारण असं, कीं मी जरी माझं त्यांच्या वाङ्मयाविषयीं प्रांजल मत व्यक्त केलं तरी आमच्यामधील राजकीय मतभेदानं प्रेरित होऊन मत व्यक्त केलं असाच त्याचा अर्थ होईल. गुजराती वाङ्मयानं माझं कांहीं समाधान होत नाहीं. या माझ्या मतानं आपलं समाधान होईल अशी मला आशा वाटते."

त्यानंतर धार्मिक प्रश्नावर आमची चर्चा सुरू झाली. आपला धर्मावर विश्वास आहे काय असें मी त्यांना विचारलें त्यावेळीं ते म्हणाले, "हिंदुधर्मावर माझा पूर्ण विश्वास आहे."

"कां तें सांगाल काय ?"

"It offers rational solution to all problems." जमनादास मेहता आवेशानें म्हणाले. "जीवनांतील महत्त्वाच्या प्रश्नांची त्यांत मीमांसा आढळते. हिंदुधर्मांतील रूढी व विधी यांविषयीं मला तेवढी उत्सुकता अन् भक्ति वाटत नाहीं. पण हिंदु धर्मांतील कांहीं विधी नाहींसे व्हावे असंही मला वाटत नाहीं. कांहीं रूढींना आज धार्मिक स्वरूप प्राप्त झालं आहे. पण त्या रुढींत उत्सवप्रियता आहे. कांहीं रूढींमुळं अन् सणासुदिनांमुळं घरांत जें आनंदी वातावरण निर्माण होतं तें नष्ट व्हावं असं मला कधींच वाटत नाहीं. कोणत्याही धर्माकडे पहाण्याची कम्युनिस्टांची जी तर्कदुष्ट ( Irrational ) पद्धति आहे ती मला मुळींच मान्य नाहीं."

"मग तुमचं आणि गांधींचं या बाबतींत तरी पटतं तर ?" मी विचारलें.

"In this respect I agree with Gandhi." बॅ. मेहता म्हणाले, "देव कुठंतरी आकाशांत आम्हांला शिक्षा करण्यासाठीं छडी घेऊन बसला आहे यावर माझा मुळींच विश्वास नाहीं. देव म्हणून कांहींतरी शक्ति असावी असा माझा समज आहे. ती तशी शक्ति नाहीं हें जोंपर्यंत कुणाला सिद्ध करतां येत नाहीं तोपर्यंत तसा विश्वास ठेवण्यांत कांहीं नुकसान नाहीं. त्याच दृष्टीनं धर्माकडे मी पहातों—व्यापक दृष्टीनं धर्माकडे अन् देवाकडे पहातों. आपल्याकडे देवळं आहेत. तीं देवळं मोडून टाकण्यांत यावीं असं मला कधींच वाटत नाहीं. मीसुद्धां कधीं कधीं देवळांत जातों. देवळांतील वातावरण प्रसन्न अन् पवित्र

वाटतं. नाटकसिनेमाला गेल्यानंतर जसा मनुष्य सर्व दुःखं विसरतो त्याप्रमाणं देवळांचं आहे. आज करमणुकीचीं साधनं बदललीं आहेत. पूर्वी देवळं हीच करमणुकीचीं साधनं होतीं. "

धार्मिक प्रश्नावर बरीच चर्चा केल्यावर रशियांतील लोकशाहीवर आमची चर्चा सुरू झाली. रशियांतील लोकशाहीसंबंधीं मी त्यांना प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, "राजकीयदृष्ट्या रशियांत लोकशाही आहे असं मला मुळींच वाटत नाहीं. रशियांत मुळींच व्यक्तिस्वातंत्र्य नाहीं. माणसाला व्यक्तित्व नाहीं."

"मग तिथल्या कोणत्या सुधारणा आपणांस आवडतात ?"

"औद्योगिकदृष्ट्या रशियानं जी मजल गांठली आहे ती समाधानकारक आहे. औद्योगिकदृष्ट्या जितका रशिया सुधारलेला आहे, औद्योगिकदृष्ट्या रशियांत जें स्वातंत्र्य आहे, तेवढं राजकीयदृष्ट्या नाहीं. Political democracy does not exist in Russia !"

"मग इंग्लंडमधली तरी लोकशाही आपणांस आवडते का ?"

"ब्रिटिशांचं धोरण कितीही स्वार्थी असो, पण इंग्लंडमधील लोकशाही मला आवडते. याचं कारण साधं आहे. तिथं स्वातंत्र्य आहे–व्यक्तिस्वातंत्र्य आहे. वाटेल त्या व्यक्तीला अगर संस्थेला सरकारी धोरणाविरुद्धही आपलं मत स्पष्ट व्यक्त करतां येतं. पण रशियांत तसं नाहीं. रशियांत बंधनं आहेत. तिथं सर्वसत्ताधारशाही आहे."

"रशियांत कामगारविषयक जे कायदे आहेत तसे हिंदुस्थानांत प्रचलित झाले तर आपणांस आवडतील काय ?"

"अवश्य आवडतील. रशियांतल्या कामगारांची स्थिति सुधारली आहे—या कायद्यांमुळं सुधारली आहे हें मला मान्य आहे."

स्टॅलिनच्या राज्यकारभाराविषयीं जसें बॅ. मेहता यांचें कलुषित मत आहे, त्याचप्रमाणें गांधींच्या तत्त्वज्ञानाविषयीं आहे. गांधीवादावर बोलतांना ते म्हणाले,

"गांधींनीं आपल्या तत्त्वज्ञानानं व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट केलं आहे. पूर्वींच्या जेत्यांनीं रक्ताचे पाट वाहवून लोकांना जिंकलं. पण गांधींनीं दांभिकपणानं लोकांचीं मनं जिंकून लोकांना मारलं. He has enslaved the soul of our Country. He has enslaved the soul of mankind. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या एकदां माणूस

आहारीं गेला म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाच्या विकासाला वावच मिळत नाहीं. विकासाचीं सर्व द्वारं आपोआप बंद होतात. " जमनादास मेहता जळफळून म्हणाले.

" मग काँग्रेसमधें राहून गांधीवादाला उलथून कां पाडत नाहीं ? कॉ. रॉयसारखी काँग्रेसमधें राहूनच गांधीवादावर कां टीका करीत नाहीं ? "

" मी पंधरा वर्षे त्याचा अनुभव घेतलेला आहे–कटु अनुभव घेतलेला आहे. काँग्रेसमधें राहून गांधीवादावर टीका केली तर शिस्तपालनाचा बडगा डोक्यावर बसायला वेळ लागणार नाहीं. कॉ. रॉय यांना मी हें एकदां समजावून सांगितलं आहे. "

" आपला अहिंसावादावर विश्वास आहे का ? "

" अहिंसावादाचा गीतेंत जो अर्थ आहे—जें स्पष्टीकरण आहे त्यावर माझा विश्वास आहे. गांधीकृत अहिंसावाद मला मुळींच पसंत नाहीं. कोणत्या तरी स्वार्थाकरितां हिंसा करावी असं मी कधींच म्हणणार नाहीं. पण ठोशाला ठोसा द्यावा अशा वृत्तीचा मी आहें. I won't shed one tear if the whole world is slaughtered for the honour of one woman. "

" तुम्हांला कोणते नाद ( Hobbies ) आहेत का ? "

" पूर्वी मला फार नाद होते. पण आतां मी ते सगळे सोडून दिले आहेत. Now work is my only Hobby ! " बॅ. जमनादास म्हणाले, " तसा एक गोड नाद आहे–नव्हे होता म्हटला तरी चालेल—"

" कोणता तो ? " मी विचारलें.

" मुलांना हंसवणं अन् रडवणं ! "

" स्वतःच्याच मुलांना कीं कुणाच्याही मुलांना ? "

" कुणाचंही मूल असलं तरी चालतं. पण तें मूल मात्र हंसरं अन् गुटगुटीत असलं पाहिजे. पण अलीकडे मी तो नाद सोडला आहे. याचं कारण असं, कीं माझ्या मित्राचं एक मूल मला फार आवडत होतं अन् त्या मुलालाही मी आवडत होतों. एके दिवशीं काय झालं, कीं त्या मुलाला मी एक दिवस माझ्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणं माझं हें करंगळीचं लांब बोट दाखवून दटावलं. पण तें मूल फारच घाबरलं. इतकं घाबरलं, कीं तें मूल माझ्याकडे कधींच येईनासं झालं. अन् त्या दिवसापासून मी कानाला खडा लावून घेतला अन् मुलांना भिवविण्याचं सोडून दिलं. "

त्यानंतर बॅ. मेहता यांनीं त्यांच्या उजव्या पायाच्या करंगळीला असलेलें बोटभर लांब नख दाखविलें. हें नख असतांना आपण स्लिपर कसा काय वापरतां असें मी त्यांना विचारतांच त्यांनीं लगेच बूट घालून दाखविला. बूट वापरतांना ते आपलें लांब नख परतून बाजूच्या बोटावर फिरवीत असतात.

" नख तुम्हीं कापून कां टाकीत नाहीं ? " मी त्यांना विचारलें.

" त्याचं असं आहे—" बॅ. मेहता म्हणाले, " माझ्या आईनं मला तें नख कधींच न कापण्याचा इषारा दिला आहे. तें नख असेपर्यंत कोणत्याही बिकट परिस्थितींत माझ्या जीवाला धोका पोंचणार नाहीं—मला अपयश येणार नाहीं असं तिनं सांगितलं आहे. या गोष्टीवर तितकासा माझा विश्वास नाहीं. पण आईच्या स्मृतीसाठीं मी तें नख ठेवलं आहे. अन् दुसरी गोष्ट अशी, कीं आईची आज्ञा मोडल्याचं मला प्रायश्चितही मिळालं होतं. एकदां अट्टाहासानं मी तें नख कापलं अन् त्याच महिन्यांत माझ्या एका जिवलग स्नेह्याशीं माझं भांडण झालं. अजूनही आमची दिलजमाई झालेली नाहीं. हा एक कटु अनुभव आल्यामुळं मी नख कापण्याचा नाद सोडून दिला आहे. "

" राजकारणांतून निवृत्त झालांत तर आपण कोणतं कार्य हातीं घ्याल ? "

" राजकारणांतून निवृत्त होण्याची माझी इच्छा नाहींच. शरिरानं अगदीं दुबळा झालों तरच मी राजकारणांतून निवृत्त होईन. अन् अशा वेळीं वाचनाखेरीज मी कांहींच करणार नाहीं. "

" आपण ग्रंथलेखन कां करीत नाहीं ? "

" जेवायलासुद्धां फुरसत नसते मला. विठ्ठलभाई पटेल यांचं चरित्र लिहावं अशी माझी फार इच्छा आहे. पण वेळ होत नाहीं. इंडियन आर्टिस्ट लिमिटेडचा मी एक डायरेक्टर आहे. माझ्याकडे लिहिलेल्या दोन कथा आहेत. पण त्या नीट लिहायला मला वेळ होत नाहीं. मला कधीं वेळ मिळाला तर त्या कंपनीसाठीं त्या कथा मी तयार ठेवणार आहें."

नगर वाचनालय सातारा
दा नं.........
दे नं.........
आ४४७०
३६, पवानी पेठ

: ९ :

नगर वाचनालय, सातारा.

# सामळदास गांधी

" म. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा विपर्यास करण्यांत आला आहे. चरख्याला लोकप्रियता मिळावी असं त्यांना वाटतं, याचं कारण गोरगरिबांना पोटभर अन्न मिळावं हेंच आहे. यांत्रिक सुधारणेला गांधीजींचा कुठं विरोध आहे ? रेल्वे, विमानं मोडून टाका असं कधीं गांधीजींनीं म्हटलं आहे का ? यांत्रिक युगामुळं खेड्यांत जें औदासीन्य पसरलं आहे त्याचंच गांधीजींना दुःख होतं. म्हणूनच चरख्याच्या लोकप्रियतेवर त्यांनीं भर दिलेला आहे. भांडवलशाहीमुळं जे प्रश्न उपस्थित होतात त्यांवर खादीचा प्रसार हाच तोडगा आहे. "

असें मत ' जन्मभूमि ' या गुजराती दैनिकाचे संपादक, अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे एक पुढारी सामळदास गांधी यांनीं व्यक्त केलें.

सामळदास गांधी यांना मी गेल्या तीनचार वर्षांत अनेक वेळां पाहिलें आहे. त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलण्याचीही मला अनेक वेळां संधि मिळाली आहे. पण त्यांचा तो धिप्पाड देह, त्यांच्या तेजस्वी डोळ्यांवर दिसणाऱ्या त्या जाड भुंवया अन् त्यांचा सदासर्वदा परकी माणसाला दिसणारा गंभीर चेहेरा पाहिल्यानंतर त्यांची ओळख वाढविण्याचा मी कधींच प्रयत्न केला नाहीं. कारण ते अत्यंत करड्या स्वभावाचे असावे असा माझा ठाम समज होता. ते मितभाषणीही असावे असेंही माझें मत होतें. म्हणूनच गुजराती वाङ्मयांतील एक प्रसिद्ध लेखक अन् सामळदास यांचे एक सहकारी यज्ञेश शुक्ल यांच्याबरोबर जाऊन मी सामळदास गांधी यांची भेट घेतली.

त्या पहिल्या भेटींतच त्यांच्या करड्या वृत्तीबद्दल असलेला माझा गैरसमज दूर झाला. पाहुण्यांशीं आणि आपल्या सहकारी मंडळींशीं खेळीमेळीनें वागण्याची त्यांची वृत्ती पाहून मी आश्चर्यचकितच झालों. आणि मुलाखतीसाठीं वेळ ठरवून मी ज्यावेळीं त्यांच्या खार येथील निवासस्थानीं त्यांची भेट घेतली त्यावेळीं त्यांच्याविषयीं असलेला माझा गैरसमज अन् दहशतही दूर झाली.

सामळदास गांधी हे फारच बोलके आहेत. ते एकदां बोलूं लागले म्हणजे पूर्णविराम अन् स्वल्पविराम ते बोलत असलेल्या भाषेंत आहेत किंवा नाहींत याची श्रोत्यांना भ्रांतच पडते. ते एकदां बोलूं लागले म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावरील गंभीरपणा हळुहळू मावळूं लागतो.

सामळदास गांधी यांच्या दिवाणखान्यांत प्रवेश केल्यावरोबरच मला त्यांच्या रसिकतेची साक्ष पटली. त्यांचा दिवाणखाना त्यांच्या रुबाबदारपणाला साजेसाच आहे. त्यांच्या दिवाणखान्यांत ठिकठिकाणीं कलापूर्ण चित्रें आहेत. अन् दिवाणखान्यांतील सर्व रचनाही कलापूर्ण आहे. दिवाणखान्यांतील आंतल्या खोलींत त्यांचा पुस्तकसंग्रह आहे. त्यांत नव्याजुन्या ग्रंथकारांचे ग्रंथ आहेत. त्यांच्या 'स्टडी' मधें जितका साधेपणा आहे तितकाच दिवाणखान्यांत खानदानीपणा आहे.

सामळदास सकाळीं आठ वाजतां घरांतून बाहेर पडतात ते सर्व कामें आटपून रात्रीं नऊ वाजतां घरीं येतात. मी रात्रीं नऊ वाजतां त्यांच्या निवासस्थानीं गेलों त्यावेळीं आम्ही दोघे त्यांच्या दारांतच एकत्र झालों. त्यांचें घर शोधून काढण्याच्या मी चिंतेंत होतों तोंच त्यांच्याच दारांत अचानकपणें त्यांची माझी भेट झाली.

"आपण जेवण उरकून घ्या आधीं." त्यांच्या घरीं पोंचतांच मी त्यांना म्हटलें.

" गेलीं अकरा बारा वर्षे रात्रीं मी जेवतच नाहीं. मोसंबीचा रस किंवा कसलीं तरी फळं खातों. " असें म्हणून त्यांनीं आपल्यासाठीं रस मागविला आणि माझ्यासाठीं कॉफी मागविली.

" ल्हानपणीं आपणांस कोण व्हावंसं वाटत होतं ? " मी त्यांना पहिलाच प्रश्न केला.

" अगदीं बालपणापासूनच मला वृत्तपत्रकार व्हावंसं वाटत होतं. " त्यांनीं चटदिशीं उत्तर दिलें.

आणि त्यानंतर त्यांनीं जो मला आपल्या जीवनाचा इतिहास सांगितला तो अत्यंत हृद्य होता.

सामळदास यांना मी अनेकदां गुजराती बोलतांना ऐकलं होतं. ते फारच जलद बोलतात. पण गुजराती भाषा जलद बोलण्यानेंच चांगली वाटत असेल म्हणून ते तसे बोलत असावे असा मी समज करून घेतला होता. कारण गुजराती भाषेचें माझें ज्ञान जेमतेमच आहे. पण गुजराती भाषेइतकीच जलदगतीनें सामळदास इंग्रजी भाषा बोलतात. इंग्रजी भाषेवरही त्यांचें असामान्य प्रभुत्व आहे. त्यामुळें वाटेल त्या विषयावर ते इंग्रजींत अस्खलित बोलूं शकतात. अन् कितीही विद्वान असले तरी गुजराती अन् मद्रासी लोक इंग्रजी भाषा बोलूं लागले म्हणजे त्यांच्या बोलण्याच्या धाटणींत जो एक विचित्र हेल–चुकीचा उच्चार दिसून येतो तसा सामळदास यांच्या बोलण्याच्या शैलींत दिसत नाहीं.

" मी सुमारें बारा तेरा वर्षांचा असतांना 'वीसमी सदी' अन् 'समालोचक' या गुजराती मासिकांत लेख लिहीत होतों. अर्थातच त्यावेळीं मी कांहींतरी गचाळ लिहीत होतों हें सांगायला पाहिजे असं नाहीं. " सामळदास हंसत हंसत म्हणाले. " अन् एकाद्या संपादकाचं मला पत्र येऊन पोंचलं म्हणजे माझ्या आनंदाला पारावार राहात नसे. मी तीं पत्रं माझ्या बालमित्रांना दाखवून मिरवीत असें. "

" बालपणींची तुमची महत्त्वाकांक्षा सहजसाध्य झाली म्हणायची ! " मी म्हटलें.

" अगदीं चुकीचा आहे समज तुमचा ! " त्यांनीं बोलायला सुरवात केली, " वृत्तपत्र–व्यवसाय पत्करण्यापूर्वी मला अनेक व्यवसाय करावे लागले अन् वृत्तपत्रव्यवसाय पत्करण्यासाठींही मला अनेक बारीक सारीक कामं करावीं लागलीं. कंपॉझिटरचंही काम मी केलेलं आहे. "

" कंपॉझिटरचं काम ? " मी नकळत मोठ्यानें उद्गारलों. त्यांच्या शब्दावर माझा

क्षणभर विश्वासच बसेना. कारण विद्वान संपादक, कर्तबगार राजकारणी म्हणून गुजराती समाजांत आणि राजकीय क्षेत्रांतही सामळदास यांची ख्याति आहे. तेव्हां कधींकाळीं ते कंपॉझिटर होते ही कल्पनाच मला काल्पनिक वाटूं लागली—अद्‌भुतरम्य वाटूं लागली.

"मी कंपॉझिटरचं काम केलं आहे इतकंच नव्हे तर—" सामळदास पुढें बोलूं लागले, "मशीनबॉय, फोल्डर वगैरे छापखान्यांतील सर्व प्रकारचीं कामं केलेलीं आहेत."

"उच्च शिक्षण घेतल्यानंतर हीं कामं करायचा तुमच्यावर कां प्रसंग आला ?"

"मी उच्च शिक्षण घेतलेलं नाहीं—विश्वविद्यालयाचं मी तोंडही पाहिलेलं नाहीं. मी इंग्रजी पांचवीच काय तो पास झालेला आहें. यापुढं माझी मजल गेलेली नाहीं."

सामळदासांनीं मला दुसरा आश्चर्याचा धक्का दिला !

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें डॉक्टरेट पदवी दिलेले बंगालचे महाकवि डॉ. टागोर, डॉ. शरच्चंद्र आणि मराठी वाङ्मयांतील पहिल्या दर्जाचे लेखक मामा वरेरकर प्रभृति लेखकांचा वर्ग माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला आणि परिश्रम करण्याची ताकत असली तर बिनपदवीधरही पदवीधरावर मात करूं शकतो असा माझ्या मनांत विचार आला. या वेळीं बर्नार्ड शॉ आणि ॲनाटमीवर जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिणारे ग्रे हेही माझ्या मनःश्चक्षूसमोर नाचूं लागले.

"आपण कॉलेजमधें कां गेलां नाहीं ?" मी विचारलें.

"मॅट्रिकच जिथं मी झालों नाहीं तिथं मी कॉलेजमधें कसा जाणार ?"

"मग शाळा तरी आपण कां सोडलीत ? आपण होऊन सोडलीत शाळा कीं परिस्थितीमुळं सोडावी लागली ?"

"परिस्थितीमुळंच मला शाळा सोडावी लागली." सामळदास यांनीं बोलायला सुरवात केली, "मी पंधरा वर्षांचा असतांनाच माझे वडील निधन पावले. अर्थातच त्यामुळं प्रपंचाचा भार माझ्या डोक्यावर पडला. माझे वडील पोरबंदर संस्थानांत मोठे अधिकारी होते. पण त्यांनीं कांहीं जवळ पुंजी करून ठेवली नव्हती. तेव्हां माझ्यावर अन् माझ्या आईवर मोठी आपत्ति कोसळली. माझ्या वडिलांच्या एका स्नेह्यांनीं संस्थानांत नोकरी करायचा मला सल्ला दिला, अन् त्यावेळचे संस्थानचे ॲडमिनिस्ट्रेटर मेजर हॅन्कॉक हे माझ्या वडिलांचे स्नेही असल्यामुळं त्यांच्या वशिल्यानं मला नोकरी मिळेल असं त्यांनीं मला आश्वासन दिलं. हॅन्कॉककडे घेऊन जाण्याचंही कबूल केलं."

"पण युरोपिअन अधिकाऱ्याला भेटायचं म्हटल्यावरोबर माझ्या छातींत धडकी भरली."

सामळदास पुढें बोलूं लागले, "याचं कारण असं, कीं जरी मी इंग्रजी पांच इयत्ता शिकलों होतों तरी मला चार दोन इंग्रजी वाक्यंही बोलतां येत नसत. माझं हें इंग्रजीचं अगाध ज्ञान माझ्या वडिलांच्या स्नेह्यांना ठाऊक होतं. तेव्हां मुलाखतीच्या वेळीं उच्चारण्यासाठीं Most Honoured Sir सारखीं दोन तीन वाक्यं त्यांनीं मला शिकविलीं. तीं तीन चार वाक्यं मी सबंध रात्र पाठ करीत होतों. झोंपेंतही तीं वाक्यं उच्चारीत होतों अन् मुलाखतीला जातांना रस्त्यांतही त्या वाक्यांची घोकंपट्टी करीत होतों. पण ज्यावेळीं माझ्या स्नेह्यांबरोवर मी मेजर हॅन्कॉक यांच्या कचेरींत जाऊन पोंचलों त्यावेळीं त्यांचा तो अवाढव्य लष्करी देह पहातांच माझी गाळण उडाली. पाठ केलेलीं सर्व वाक्यं मी विसरलों. Most Honoured Sir हेंही मला आठवेना. पण माझ्या स्नेह्यांनीं मेजरसाहेबांशीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारून आणि माझ्या वडिलांचे गुण गाऊन ती वेळ सांवरून नेली. अन् मी बड्या बापाचा बेटा आहे यावर विसंबून मेजरसाहेबांनीं ट्रेझरी क्लार्क म्हणून माझी नेमणूक केली.

"अन् मी एकदांचा नोकरीवर हजर झालों. पण ज्यावेळीं इंग्रजी पत्रव्यवहाराच्या फाइली माझ्यापुढं येऊन पडल्या त्यावेळीं माझे डोळे पांढरे झाले. त्यावेळीं हस्ताक्षरानं लिहिलेल्या इंग्रजी अक्षरांतील एकादा शब्दही मला वाचतां येत नसे. बोलतां तर कांहीं येतच नसे.

"मी कित्येक दिवस कांहीं काम न करतां उगीचच बसलों होतों. एक दिवस वरिष्ठ अधिकाऱ्याच्या ही गोष्ट ध्यानांत आली. त्यानं मला ज्यावेळीं दम दिला त्यावेळीं मी ओक्साबोक्सीं रडायला सुरवात केली. अन् त्यांना खरी हकिकत सांगितली. त्यावेळीं ते अधिकारी मला म्हणाले, 'बाबारे, इंग्रजी येत नसलं तर तूं इथं राहून काय करणार आहेस? कुठल्या तरी खेड्यांत जा कीं.'

"या गोष्टीचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. मी त्यावेळीं अंतर्मुख झालों— माझ्या जीवनाचा गंभीरपणं विचार करूं लागलों.

"दुसऱ्याच दिवशीं मी लायब्ररीचा मेंबर झालों. अन् अमुक पुस्तक वाचायचं नाहीं, तमुक वाचायचं असं मी कधीं बंधन पाळलं नाहीं. पहिल्यानं एक कपाट निवडलं अन् जें पुस्तक हातीं मिळेल तें अधाशीपणानं वाचायला सुरवात केली. सारा दिवस एका हातांत कोणतं तरी पुस्तक अन् दुसऱ्या हातांत डिक्शनरी घेऊन मी

अभ्यास करायला सुरवात केली. कांहीं दिवसानंतर स्वामी रामतीर्थ यांचं 'In the woods of God realisation' हें पुस्तक माझ्या हातीं आलं. त्यांतील तिसऱ्या व्याख्यानांत Man is the master of his destiny या विषयावर व्याख्यान आहे. तें वाचतांच माझा आत्मविश्वास जास्त बळावला. माझ्यांत नवचैतन्य आल्यासारखं मला वाटलं. जास्त उत्साहानं मी व्यासंग करायला सुरवात केली.

"पांचसहा महिन्यांतच मला थोडा आत्मविश्वास वाटूं लागला. कुणालाही न कळवितां मी अभ्यास चालविला होता. मी खोली बंद करून सारा दिवस बसत असें. मीं काय करतों आहें याची माझ्या पत्नीलाही दाद नसे. माझ्या एका मित्राकडून इंग्रजी सहावीपासून ज्युनिअर बी. ए. पर्यंत अभ्यासक्रमांत कोणतीं इंग्रजी पुस्तकं आहेत तें विचारून घेतलं अन् त्या सर्व पुस्तकांचा अभ्यास केला.

"मी अशाप्रकारं अभ्यास करीत असतां कुणाशीं तरी इंग्रजींत बोलावं असं मला वाटत होतं. पण बोलणार कुणाशीं ? तेव्हां मनांतल्या मनांत Imaginary Conversation करायला सुरवात केली, अन् तो माझा प्रयत्न साधतही गेला."

"असा किती दिवस आपला अभ्यास चालू होता ?"

"सुमारं दोनतीन वर्षं मी अभ्यास केला अन् शेवटीं म्युनिसिपालिटींत नोकरीला राहिलों. तरी अभ्यास मात्र मी सोडला नाहीं. पूर्वीप्रमाणंच माझा अभ्यासक्रम अव्याहत चालू होता. त्यामुळं दिवसेंदिवस इंग्रजी भाषेवरील माझं प्रभुत्व वाढत चाललं. इतक्यांत होमरूलची चळवळ चालू झाली. मी होमरूल लीगचा तावडतोब सभासद झालों. त्यावेळीं मी इंग्रजींत लिहिलेलं एक राजकीय पत्रक ॲनी बेझंट यांनीं प्रसिद्ध केलेलं आहे.

"मी होमरूल लीगचा सभासद झाल्यानंतर माझ्या कोटावर होमरूल लीगच्या सभासदत्वाचा 'एच्. आर.' हा बिल्ला झळकूं लागला. ही गोष्ट एक दिवस मेजर हॅन्कॉक ह्यांच्या ध्यानीं आल्यावर त्यांनीं मला बोलाविलं अन् ते म्हणाले, 'हें बघ, असं चालायचं नाहीं बरं का ! तुझे वाडवडील या संस्थानचे एकनिष्ठ सेवक होते. दिवाणगिरीसारख्या मानाच्या जागेवर काम करीत होते. याची स्मृति बाळगून तूं यापुढं वागत जा.'

"पण मेजर हॅन्कॉकचा हा उपदेश ऐकून माझ्या मनावर उलट परिणाम झाला. संस्थानी कारभाराविषयीं मला तिरस्कार वाटून राजकारणाकडे माझा जास्त ओढा दिसूं लागला. मी संस्थानीं राजकारणाचा अन् राज्यकारभाराचा जास्त नेटानं अभ्यास करायला



नगर वाचनालय

लागलों अन् जसजसा मी अभ्यास करायला लागलों तसतसा मी संस्थान-विरोधक व्हायला लागलों. म्युनिसिपालिटींत सुमारें सहा महिने नोकरी केल्यावर मी आपण होऊन नोकरीचा राजीनामा दिला. अन् मुंबईची वाट धरली. "

" मुंबईत येऊन तुम्हीं कोणता व्यवसाय पत्करला ?" मी विचारलें.

" व्यवसाय कसला म्हणतां ? नोकरी मिळत नाहीं म्हणून मुंबईही मला सोडावी लागली. सहा महिने मुंबईत वणवण फिरत होतों. पण नोकरी मिळाली नाहीं. "

" मुंबई सोडल्यानंतर आपण कुठं गेलां ? ' मी त्यांना प्रश्न केला.

" मुंबई सोडल्यानंतर मी अहमदाबाद इथं जाऊन गांधीजींची भेट घेतली. त्यांच्या उपदेशाचा माझ्या मनावर बराच परिणाम झाला. मी आश्रमांत राहिलों अन् त्यावेळीं गुजरातींत प्रसिद्ध होणाऱ्या ' नवजीवन ' मधें तुम्हांला मघाशी सांगितल्याप्रमाणं कंपॉझिटर, मशीन बॉय, फोल्डर वगैरेचीं कामं केलीं.

" हीं कामं करीत असतांनाही माझा व्यासंग सुरू होताच. मनांतल्या मनांत मला लिहिण्याची स्फूर्तिही होत होती. पण वाव मिळत नव्हता. कांहीं दिवसांनीं मला आश्रमांतील जीवनक्रमाचा कंटाळा आला अन् मी आश्रम सोडला. अन् पुन्हां मुंबईची वाट धरली. यावेळीं मात्र मी निश्चय केला, कीं काय वाटेल तें झालं तरी मुंबई सोडायची नाहीं. हरप्रयत्न करून तिथंच नोकरी करायची. माझ्या आईला तसं सांगितलंही.

" मी मुंबईला पुनः आल्यानंतर शेअर बाजार, कॉटन मार्केट वगैरे अनेक ठिकाणीं मी नोकऱ्या केल्या. पण माझा पाय कुठं टिकत नव्हता. कॉटन मार्केटमधें मला ६५ रुपयांची ज्यावेळीं नोकरी मिळाली त्यावेळीं मला स्वास्थ्य मिळालं. माझा वाङ्मयाचा अन् राजकारणाचा व्यासंग चालूच होता. कॉटन मार्केटमधें असतांना ज्यांच्या पेढीवर मी नोकरीला होतों ते गृहस्थ ' बॉम्बे समाचार ' व ' बॉम्बे क्रॉनिकल ' विकत घेत असत. सकाळीं पेढीवर आल्यावर तीं दोन्हीं पत्रं मी अधाशीपणानं वाचीत असें ही गोष्ट माझ्या मालकाला आवडत असे, असं नव्हे. पण मी तिकडे दुर्लक्ष करीत असें.

" त्यानंतर ' बॉम्बे समाचार ' पत्राला मी सहा लेख लिहून पाठविले. त्यापैकीं डबल कॉलम हेडिंग दिलेला पहिला लेख ज्यावेळीं त्या पत्रांत प्रसिद्ध झाला त्यावेळीं कॉटन बाजारांत अन् आमच्या पेढीवर खळबळच उडाली. आमचा मालक आश्चर्यानंच माझ्याकडे पहायला लागला. सर्व लोक नंतर माझ्याकडे निराळ्या दृष्टीनं पहायला लागले. तं सहाही लेख

क्रमानं प्रसिद्ध होतांच माझं नांव सर्वतोमुखी झालं. ' मुंबई समाचार ' पत्राच्या संपादकांशीं माझी ओळखही झाली. त्यानंतर मुंबई समाचार पत्रांत एक वर्षभर मी टोपण नांवानं दर आठवड्याला लेख लिहित होतों.

" त्यानंतर लोटवाला यांची माझी ओळख झाली. त्यांनी मला Iron Hill या इंग्रजी कादंबरीचं भाषांतर करायला लावलं. ' सोनेरी खंजीर ' या नांवानं तें पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. याचवेळीं माझ्या सोशालिस्ट मतांविषयीं सर्वत्र गाजावाजा झाला होता. लोटवाला यांनीं मला ' हिंदुस्तान प्रजामित्र ' पत्राचा संपादक केलं. गुजराती वृत्तपत्रसृष्टींत त्यावेळीं मीच काय तो तरुण संपादक होतों.

"मी सर्वाधिकार हातीं घेतल्यावर कांहीं कालावधीनं स्वराजपक्ष स्थापन झाला. फेर–नाफेर पक्षाचा उदय झाला. त्यावेळीं मी गांधीजींची विचारसरणी माझ्या पत्रांत व्यक्त करीत होतों. एक दिवस लोटवाला आले अन् त्यांनीं मला पत्राच्या गांधीवादी धोरणाबद्दल दम द्यायला सुरवात केली.

" पण माझ्या संपादकीय धोरणाशीं मी तुम्हांला ढवळाढवळ करूं देणार नाहीं असं मी त्यांना सरळ उत्तर दिलं. त्यामुळं प्रकरण चिडीला गेलं. या मतभेदामुळं अन् लोटवाला यांची विलक्षण साम्यवादी मतें मला पटण्यासारखीं नसल्यामुळं मी संपादकीय अधिकाराचा राजीनामा दिला आणि ' कर्मभूमि ' या नांवाचं स्वतःचं साप्ताहिक सुरूं केलं. "

त्यानंतर त्या साप्ताहिकामुळें आपणांस कसें कर्ज झालें याचा त्यांनीं इतिहास सांगितला. त्यानंतर सामळदास यांनीं ' मुंबई क्रॉनिकल ' व ' हेरल्ड ' मधें इंग्रजींत लेख लिहायला सुरवात केली. त्यानंतर ते ' मुंबई समाचार ' पत्रांत सामील झाले. याच कालांत त्यांनीं हिंदी संस्थानांतील परिस्थितींचा अभ्यास जास्त व्यापक रीतीनें केला. त्यानंतर ते आज संपादक असलेल्या ' जन्मभूमीं ' त ते दाखल झाले.

आपल्या जीवनाचा अद्‌भुतरम्य इतिहास सामळदास यांनीं अवघ्या वीस मिनिटांत मला सांगितला. त्यांची बोलण्याची शैली इतकी मधुर आहे, कीं एकाद्या कथेच्या नायकाचा जीवनाचा इतिहास मी ऐकत आहें असा मला भास झाला.

" आपण इंग्रजी वाङ्मयाचा फार अभ्यास केला आहे हें आपण मला सांगितलंच. पण आपले आवडते लेखक कोणते आहेत ? " मी त्यांना प्रश्न केला.

" खरं म्हटलं तर मी सिरियस वाङ्मय फार वाचलेलं आहे. तरीही शेक्सपीअर,

ॲलेक्झांडर डयूमा वगैर लखकाचं वाङ्मय वाचलेलं आहे. पण कार्लाईल, शेक्सपीअर आणि बर्क हेच माझे जास्त आवडते लेखक आहेत. त्यांचं वाङ्मय वाचण्याची माझी आवड अजूनही कायम आहे. पण आजकाल वाचनासाठीं मला वेळ मिळत नाहीं. कधींतरी वेळ मिळाला म्हणजे मी अजूनही शेक्सपीअर चाळीत असतों. "

" गुजराती वाङ्मयाविषयीं आपलं काय मत आहे ? "

" गुजराती वाङ्मय आज फारच सुधारलेलं आहे. आजच्या वाङ्मयांत मोठी प्रगति झाली आहे. "

" पण बॅ. जमनादास मेहता यांना तर गुजराती वाङ्मय मुळींच आवडत नाहीं ! " मी म्हटलें.

" He is not in touch with modern Gujarati literature. " सामळदास एकदम म्हणाले,

" मुनशी, रमणलाल देसाई, धूमकेतु यांचं वाङ्मय कितीतरी सरस आहे—आधुनिक आहे. आजचं गुजराती वाङ्मय पुढारलेलं आहे. संख्येच्या दृष्टीनं इतर भाषेंतील वाङ्मयापेक्षां तें अल्प आहे. पण गुणांच्या दृष्टीनं विचार केला तर कोणत्याही देशी वाङ्मयापेक्षां तें मागासलेलं आहे असं म्हणतां येणार नाहीं. "

" इंग्रजी–गुजरातीखेरीज आपण कोणत्या भाषेंतलं वाङ्मय वाचलेलं आहे ? "

" मराठी लेखकांपैकीं नाथमाधव अन् मामा वरेरकर यांचं बहुतेक वाङ्मय मी वाचलं आहे. "

" इतर कोणत्या लेखकांचं वाचलं आहे का ? "

" नाहीं. नाथमाधव यांचे अन् माझे अत्यंत प्रेमाचे संबंध होते. त्यामुळं मी त्यांचं वाङ्मय वाचलं अन् वरेरकरही माझे स्नेही असल्यामुळं त्यांचंही वाङ्मय मी वाचलं. वरेरकरांचं मराठींत प्रसिद्ध असलेलं अन् गुजरातींत भाषांतरित झालेलं वाङ्मय मी वाचलं आहे. त्याचप्रमाणं त्यांच्या बहुतेक नाटकांचे प्रयोगही मी पाहिले आहेत. "

" नाथमाधव आणि वरेरकर यांचं वाङ्मय आपणांस कसं काय आवडलं ? "

" भाषेचं सर्वपरीनं सौंदर्य कळण्याइतकं मराठी भाषेवर माझं प्रभुत्व नाहीं. पण दोघेही लेखक मला फार आवडले. वरेरकरांच्या नाटकांचे प्रयोग मी पाहिल्यामुळं मला असं वाटतं, कीं वरेरकर हे प्रभावी लेखक आहेत. त्यांच्या वाङ्मयांत जिवंतपणा आहे. "

"आपण संस्कृत वाङ्मय वाचलं आहे का ?"

"नाहीं. संस्कृत भाषा मला येत नाहीं. पण संस्कृतमधील सर्व ग्रंथांचं गुजरातींत अगर इंग्रजीमधें भाषांतर झालेलं असल्यामुळं मी सर्व ग्रंथ वाचले आहेत."

"गीतेंतील तत्वज्ञान आपणांस मान्य आहे का ?"

"गीतेचं तत्त्वज्ञान मला अत्यंत आवडतं. मी ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला आहे. पण ज्ञानेश्वरीपेक्षां लो. टिळकांनीं लिहिलेलं 'गीतारहस्य'च मला जास्त आवडलं. याचं कारण असं, कीं हिंदु तत्त्वज्ञान आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान यांचा लोकमान्यांनीं फार अभ्यास केल्यामुळं त्यांनीं त्या तत्त्वज्ञानाचं चांगल्या रीतीनं स्पष्टीकरण केलं. ज्ञानेश्वरीपेक्षां 'गीतारहस्यां'त मला जास्त बौद्धिकता दिसून आली."

धर्मावरून रशियन साम्यवादावर आमच्या चर्चेचा ओघ वळला. मी त्यांना विचारलें, "रशियाप्रमाणं आपल्या देशांत साम्यवादाचं नवयुग सुरू व्हावं असं आपणांस वाटत नाहीं काय ?"

"अवश्य सुरू झालं पाहिजे." सामळदास यांनीं बोलायला सुरवात केली, "पण इथली अन् रशियांतली परिस्थिति वेगळी आहे हें मात्र विसरून चालायचं नाहीं. साम्यवादाचं तत्त्वज्ञान जरी योग्य अगर मोहक असलं तरी देशाची परिस्थिति पाहून त्या तत्त्वज्ञानाला मुरड नको का घालायला ? कोणत्याही तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करतांना त्या देशाचा सांस्कृतिक इतिहास, जनतेची मनोभूमिका यांचाही विचार करावा लागतो."

"गांधीवाद आपल्या हिंदी परिस्थितीला जुळता आहे असंच आपणांस वाटतं का ?"

"माझं तरी असंच मत आहे. गांधींजींचं अनत्याचाराचं तत्त्वज्ञान उदाहरणादाखल घ्या. त्या तत्त्वज्ञानामुळं हिंदुस्थानचा तसा जगाचाही दृष्टिकोण बदललेला नाहीं का ? रोमां रोलां किंवा आल्डस् हक्स्ले यांच्यासारखे विद्वानही गांधीजींच्या या तत्त्वज्ञाचा उदोउदो करतांना दिसतात त तरी त्यांचा या तत्त्वज्ञानावर विश्वास आहे म्हणूनच ना ?"

"अनत्याचाराच्या तत्त्वज्ञानाचं राहूं द्या. पण गांधीजींचं चरख्याच्या प्रसाराचं तत्त्वज्ञान आजच्या काळीं मागासलेलं तत्त्वज्ञान नाहीं का ?"

"तें कसं काय ?" सामळदास म्हणाले.

"म्हणजे असं, कीं यांत्रिक युगाचं महत्त्व कमी करण्यासाठीं गांधीजी चरख्याला लोक-

प्रियता मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत — यांत्रिक युगाला त्यांचा विरोध आहे असं त्यांच्या टीकाकारांचं मत आहे."

"गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा विपर्यास करण्यांत आला आहे. गांधीजींचा यांत्रिक युगाला विरोध आहे हें कशावरून? त्यांनीं रेल्वे, विमानं उलथून पाडा असं कधीं लिहिलं आहे का? मोटारींतून ते प्रवास करतातच ना? विजेचे दिवे वापरतात ना? तारा करतातच ना? मग त्यांचा यांत्रिक युगाला विरोध कसा? हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्यानंतर इथंही अनेक प्रयोग होतील. तोंपर्यंत गांधीजींच्या तत्वज्ञानावर आम्हीं कां विश्वास ठेवूं नये? लेनिनच्या तत्वज्ञानाला रशियांत आज मुरड घातली जातेच आहे ना? तेव्हां गांधीवादाचा—किंवा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा विपर्यास करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. He may be a visionary. But he is also a practical man." सामळदास अभिमानानें म्हणाले.

"आपण वृत्तपत्रव्यवसायांतून निवृत्त झालांत तर कोणतं कार्य हातीं घ्याल?" मी त्यांना शेवटीं विचारलें.

"वृत्तपत्र-व्यवसायांतून कधींच निवृत्त होण्याची माझी इच्छा नाहीं. या व्यवसायांत मला अपरिमित आनंद वाटतो. कितीही परिश्रम केले तरी मला त्रास होत नाहीं. उलट आनंद होतो. १९२९ पासून आजपर्यंत मी एकदांही ऑफिसांतून रजा घेतलेली नाहीं. राजकीय कार्यासाठीं बाहेर जावं लागल्यामुळं अगर घरच्या माणसांच्या आजारामुळं केव्हांतरी गैरहजर राहिलों असेन इतकाच."

: १० :

# भा. वि. वरेरकर

"ज्याला लेखक व्हायचं असेल त्यानं वाचनाच्या क्षेत्रांत बोकडासारखं चरलं पाहिजे. बरावाईट भेद पहातां कामा नये. तरच त्याला व्यापक दृष्टि येईल हें माझ्या अनुभवावरून मी सांगतों. मी अधाशासारखं वाचन केलं आहे. एका एका लेखकाचे सगळेच्या सगळे ग्रंथ वाचून काढले आहेत. त्याचा माझ्या प्रकृतीवर आणि दृष्टीवर परिणाम झाला. पण बुद्धीला मजबुती आली." असे उद्गार मामांनीं काढले.

"आणखी किती ग्रंथ लिहायची आपली इच्छा आहे ?"

"पहिल्यानं नोकरींत आणि नंतर पैसे वसुलीसाठीं नाटक मंडळींत रहावं लागल्यामुळं माझ्या आयुष्याचा बराचसा काळ फुकट गेला. किती तरी नाटकांचीं कथानकं अजून पुरीं व्हायचीं आहेत. कांहीं नाटकं अजून अर्ध्यावर पडून राहिलेलीं आहेत. दाबक्यांसारखा लघु-लेखक मिळाला तर अजूनही कितीतरी पुस्तकं लिहिण्याची माझी तयारी आहे.

पण लघु–लेखक मिळणं दुर्मिळ आहे. माझा हात निकामी असल्यामुळं स्वतः लिहिणं अशक्य झालं आहे त्यामुळं पुष्कळसं वाङ्मय निर्माण करण्याची इच्छा असूनही ती मला साध्य झाली नाहीं. "

" कुठलंही पुस्तक लिहायचं झालं म्हणजे आपण कथानकाचा विचार करतां कीं आधींच कथानकं तयार असतात ? "

" किती तरी कथानकं तयार आहेत. तोच माझा निदिध्यास आहे. त्यामुळं कथानकं मी वेळोवेळीं तयार करून ठेवलीं आहेत. माझी Compartment systeem आहे. त्या त्या विषयाचे निरनिराळे कप्पे आहेत आणि ज्यावेळीं जें लिहायचें असेल, तो कप्पा खुला करायचा अभ्यास मी केलेला असल्यामुळं एकाच वेळीं एका मागून एक निरनिराळ्या पुस्तकांतील भाग मी अजूनही लिहीत असतों. "

" आपणांला लहानपणीं कोण व्हावंसं वाटत होतं ? "

" संन्यासी व्हावं अशी माझी लहानपणची मोठी महत्त्वाकांक्षा होती. गौडपादाचार्यांच्या गादीवर बसण्याचा मला योग आला होता. संन्यास घेण्यासाठीं मी एका काळीं घर टाकून निघूनही गेलों होतों. पण तुकारामाइतका संसारी बनून शेवटीं मी संन्यासाचं सौख्य आज अनुभवतोंय्. "

" मग आपल्या ज्या महत्त्वाकांक्षा होत्या त्या सर्व पूर्ण झाल्या का ? त्यांपैकीं किती पूर्ण झाल्या अन् किती झाल्या नाहींत ? "

" माझ्या कोणत्याच महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्या नाहींत हें माझं मोठं भाग्य समजतों. असमाधानामुळं माणूस कार्यप्रवण होतो. महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्याचं समाधान मिळाल्यामुळं तेजस्वी माणसाचे कसे मुडदे पडले आहेत हें पाहिलं, म्हणजे झालं तें चांगलं झालं असं मला वाटतं. "

" आपण राजकारणांत प्रत्यक्ष भाग कां घेतला नाहीं ? "

" राजकारणांत प्रत्यक्ष भाग घ्यायला मला एक मोठी अडचण होती अन् ती म्हणजे उत्तम रीतीनं इंग्रजी बोलतां अन् लिहितां येणं. राजकारणांत मी प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं, असं म्हणतां येणार नाहीं. गर्दीच्या राजकारणांत मी प्रामुख्यानं भाग घेतला होता—अन् घेतोंही आहें–पुढंही घेईन. पण आज ज्याला राजकारणांत भाग घेणं म्हणतात, तसल्या नगारेशाहीचा मला तिटकारा आहे. इंग्रजीशिवाय हल्लीं राजकारण होत नाहीं, यांत मुळींच

शंका नाहीं. वाङ्मय आणि राजकारण यांची फारकत होतां नये, असं वाङ्मयाच्या व्यासपीठावर उभं राहून सांगण्याचं पहिलं धैर्य मीच केलं. तें धैर्य दाखवायला परिस्थिति अनुकूल नव्हती, विरोध भरपूर होता. तरीही या एकच विषयाचा आज कित्येक वर्षं जो मी डांगोरा पिटला, त्याचा प्रत्यक्ष परिणाम आतां दिसूं लागला आहे. याला राजकारण म्हणायचं नसेल तर माझं कांहीं म्हणणं नाहीं. पण प्रत्यक्ष राजकारणापेक्षां हें राजकारण जास्त महत्त्वाचं आहे, असं मला वाटतं. मोठमोठे विद्वान् वाङ्मयांत राजकारण आणूं नका म्हणून सारखा कंठशोष करीत असतां एकांड्या शिलेदाराप्रमाणं त्यांना विरोध करणं सोपं नव्हतं—अजूनही नाहीं. वाङ्मयांतल्या राजकारणासाठीं अजूनही झगडावं लागणार आहे, तरच पुढं राजकारणी वाङ्मय निर्माण होईल. "

" आपण कधींच इंग्रजींत व्याख्यान दिलेलं नाहीं का ?"

"भावनगरच्या कॉलेजांत इंग्रजी भाषण करण्याचा प्रसंग माझ्यावर आला. अहमदाबादला मी मराठींत बोललों, तिथल्या लोकांना तें कळलं. तिथल्या वर्तमानपत्रांनीं माझं भाषण मराठींत असतांही आमच्या मराठी पत्रकारांप्रमाणें भाषणाचा विपर्यास न करतां बिनचूक रिपोर्ट दिला. पण भावनगरला माझा नाइलाज झाला. तिथल्या लोकांना -विशेषतः विद्यार्थ्यांना मराठीचा गंधसुद्धां नव्हता. गुजरातचे प्रख्यात चित्रकार रविभाई रावळ यांनीं मला प्रोत्साहन दिलं आणि मी इंग्रजींत व्याख्यान द्यायचं कबूल केलं. विषय ' मराठी रंगभूमि ' हा होता. सुरवात करतांना मी घाबरलों, पण त्या घाबरण्याचा परिणाम चांगला झाला. मी पन्नास मिनिटं भाषण केलं. मला वाटतं माझ्या भाषणांत व्याकरण दोष झाले असतील–नव्हे, तसे ते झाल्याचं मला जाणवत होतं पण मी दणकावून बोलत गेलों. माझं भाषण संपल्यावर डॉ. याज्ञिक प्रभृति प्रोफेसरांनीं माझी तारीफ केली. मी उगीच विनय दाखवित होतों, असाही माझ्यावर आरोप केला. त्या व्याख्यानानंतर भेटायला आलेल्या विद्यार्थ्यांनीं तर आपल्या कांहीं प्रोफेसरांपेक्षां मी चांगलं बोललों, असे त्यांनीं उद्गार काढले. कदाचित् ती फाजील स्तुति असेल. पण माझ्या चुका कांहीं कुणाच्या लक्षांत आल्या नाहींत. त्याचवेळीं मला वाटलं, कीं अशिक्षितपणाच्या जाणीवेमुळं–किंबहुना विद्वान लेखकांनीं मला ही जाणीव करून दिल्यामुळं घाबरून उगीच इंग्रजींत व्याख्यान द्यायचा मी प्रयत्न केला नाहीं. पूर्वी तसा प्रयत्न केला असता, तर आज मला लोकांनीं राजकारणी म्हटलं असतं. भावनगरला हा जो आत्मविश्वास निर्माण झाला, त्यानंतर मुंबईत झालेल्या फिल्म कॉंग्रेसमधेंही मी इंग्रजींत भाषण केलं. अन् तें यशस्वी झालं असं ऐकणारांनीं सांगितलं. "

" आपण इंग्रजींत कां लिखाण केलें नाहीं ? "

" यालाही उत्तर तेंच. मी पदवीधर नाहीं याची जाणीव मला पुन्हा पुन्हा दिल्यामुळं. तरीही मी क्रॉनिकलमधून एखाददुसरा लेख लिहिलेला आहे. "

" आपण नेहमींच्या पद्धतीप्रमाणं डिक्टेट केला, कीं स्वतः लिहिला ? "

" अर्थात् डिक्टेट केला. त्यांत कांहीं दुरुस्ती न करतां क्रॉनिकलनं तो प्रसिद्ध केला. "

" प्रो. वामनराव जोशी यांनीं आपल्या वाङ्मयांतील स्त्री-भूमिका अवास्तव असतात असे जे उद्गार काढले त्याबद्दल आपलं काय म्हणणं आहे ? "

" मी अवास्तव कांहींच लिहीत नाहीं. पहायचं अन् लिहायचं असा माझा शिरस्ता आहे. नुसती मांडणी तेवढी माझी ! मी घेतलेलीं स्त्रीभूमिकांचीं उदाहरणं कदाचित् विरळा असतील—अपवादात्मक असतील. पण तीं सत्यसृष्टींतील आहेत—काल्पनिक नाहींत. प्रो. वामनराव यांनीं असे उद्गार कां काढावे याचं मला आश्चर्य वाटतं. त्यांच्या रागिणींतील 'उत्तरा' तेच विसरले. कोल्हटकरांच्या 'मूकनायकां'तील 'वेत्रिका' या भूमिकेप्रमाणं 'उत्तरा'ही मला मार्गदर्शक झाली आहे. मला वाटतं, पुण्याच्या सनातनी वातावरणांत फार दिवस राहिल्यामुळं तात्यांच्या मूळ तेजस्वितेवर कुठं तरी बुरसा चढलाय्. 'सोन्याचा कळस' हें नाटक रंगभूमीवर आलं, त्यावेळीं बिजली हें पात्र अवास्तव आहे अशी हाकाटी सर्वांनीं केली. लेखक असो, कीं वर्तमानपत्रकार असो, त्यांना गिरणगांवच्या अंतरंगाची माहिती नाहीं, याच्या पुराव्याची ही साक्ष आहे. तेजस्वितेला शिक्षण लागत नाहीं—ती जन्मजात असते, हें विश्वविद्यालयांतल्या पदवीच्या बारीकशा ठिणगीनं हुरळलेल्या जवानांना अजून कळलेलं नाहीं. पण परवांच त्याचा पुरावा मिळाला. एकच नव्हे, हजारो बिजल्या परवांच्या संपाच्यावेळीं दिसल्या. इतकंच नव्हे तर गोदू गोखले 'गोदू गोखले' च्या स्वरूपांत दिसली. अजूनही हें जर कुणाला कबूल करायचं नसेल तर मी असं म्हणेन " ब्रह्मापि तं नरं न रंजयति ! "

" आपण संतवाङ्मय कितीसं वाचलं आहे ? "

" मी पाहिलं वाङ्मय वाचलं तेंच संतवाङ्मय ! तुकाराम व वामन हे माझे आवडते लेखक आहेत. तुकारामाकडे पहाण्याची माझी दृष्टि निराळी आहे. तुकारामाला मी संत म्हणणार नाहीं. 'संत तुकाराम' म्हणणारे तुकारामाची बदनामी करतात असंच मी म्हणेन.

तुकारामासारखा संसारी प्रचारक भारताच्या इतिहासांत निर्माण झाला नाहीं. 'आधीं संसार करावा नेटका ' असं म्हणणारा रामदास संसारी नव्हता. जें माहित नाहीं, तें सांगण्याचा आव रामदासांनीं आणला. तुकारामाचं चरित्र अजूनही बारकाईनं पाहिलं जात नाहीं. तो मेला कीं मारला गेला ? त्यावेळीं त्याचं वय ६० वर्षांचे होतं, असं संशोधक म्हणतात. पण त्याचवेळीं त्याची बायको गरोदर होती, हें ते विसरतात. त्याच्या बायकांच्या मुलांची संख्या कुणीही हिशोबांत घेत नाहींत अन् एकाच वेळीं दोन्ही बायकांशीं तो संसार थाटून बसला होता, याचीही पुष्कळांना विस्मृति पडली आहे. तसंच वामनाचं ! वामनाच्या यथार्थदीपिकेपुढं मला ज्ञानेश्वरीची किंमत वाटत नाहीं. ज्ञानेश्वरानं शांकरभाष्याची कास धरली आहे. वामनानं साऱ्या भाष्यकारांना हाणून स्वतंत्र दृष्टीनं गीतेचं विवेचन केलं आहे. तीच हकीगत एकनाथाची. मुख्यत्वें-करून याच लेखकांच्या वाङ्मयाच्या वाचनानं आणि उपनिषदांच्या अभ्यासामुळं मी आज जवळ जवळ नास्तिक बनलों आहें. म्हणून आजच्या तरुणांना मी म्हणतों, आधीं संतवाङ्मय वाचा, आधीं पुराणं वाचा, उपनिषदं वाचा—तीं भाविकपणानं वाचूं नका. पूर्वीचे लेखक—देखील आजच्या लेखकाप्रमाणं परिस्थिती पाहून लेखन करीत होते. त्या शेंकडों वर्षांच्या कालखंडाच्या मागं जाऊन आजच्या नजरेनं ते ग्रंथ वाचा, परदेशांतील आधुनिक तत्त्ववेत्ते त्यांच्यापुढं कःपदार्थ पडतील. जहालांतल्या जहालांचं मूळ तत्वज्ञान या जुन्या वाङ्मयांत—संत-वाङ्मयांत नव्हे—तुम्हांला सांपडेल. ''

''इंग्रजी अन् संस्कृत-वाङ्मयाचा आपल्या जीवनावर कितपत परिणाम झाला ?''

" कोणत्याही वाङ्मयाचं वाचन म्हणजे बुद्धीला व्यायाम आहे. मेंदू मजबूत करण्यासाठीं जशी वाचनाची आवश्यकता असते, तशीच जग कुठं चाललं आहे हें पहाण्यासाठींही त्याची जरूरी असते. वाचनाइतका प्रवासही माणसाला घडला पाहिजे. पण तो प्रवास घडणं, ज्यावेळीं अशक्य असतं त्यावेळीं वाचनानं त्याची उणीव भरून काढावी लागते. या न्यायानं जेवढा परिणाम व्हायचा, तेवढाच परिणाम माझ्या जीवनावर आणि लेखनावर झाला आहे. संस्कृत वाङ्मयाच्या वाचनानं माझ्या बुद्धीचा पाया बळकट झाला. अन् परदेशी वाङ्मयाच्या वाचनानं त्याच्यावर इमारत उभारतां आली. ज्याला लेखक व्हायचं असेल त्यानं वाचनाच्या क्षेत्रांत बोकडासारखं चरलं पाहिजे, बरा वाईट भेद पहातां कामा नये, तरच त्याला व्यापक दृष्टी येईल हें माझ्या अनुभवावरून मी सांगतों. मी अधाशासारखं वाचन केलं आहे. एका एका लेखकाचे सगळेच्या सगळे ग्रंथ वाचून काढले आहेत. त्याचा माझ्या प्रकृतीवर आणि दृष्टिवरही परिणाम झाला. पण बुद्धीला मजबूती आली. ''

" पण यांतील तुमचा आवडता लेखक कोणता ? "

" माझी आवड निश्चित नाहीं. ती सारखी बदलत आली आहे. बुद्धीच्या विकासाबरोबर ावडींतही फरक होत गेला. एकाकाळीं मेरी कॉरेली मला आवडत असे. पण आतां ती अगदीं तिसऱ्या दर्जाची वाटते. "

" रशियन वाङ्मय आपण कितीसं वाचलं आहे ? "

" ज्यावेळीं लोक रशियन पुस्तकांचीं नांव घ्यायला भीत होते त्यावेळीं मी तीं पैदा करून वाचून काढलीं आहेत. गोगोल १९०३ सालीं मी वाचून संपविला. मला वाटतं, अजूनही कित्येकांनीं गोगोल वाचलेला नसेल. पण मी जें हें भिन्न लेखकांचं वाचन केलं त्याला कारण डॉ. कीर्तिकर ! पुष्कळच लेखक वाचल्यामुळं एकाच लेखकानं मी दिपून गेलों नाहीं. म्हणूनज मी कुणाही लेखकाचा अनुयायी बनलों नाहीं. "

" तात्यासाहेब कोल्हटकरांच्या वाङ्मयाचं आपण अनुकरण केलं नसतांही त्यांना गुरू कां मानतां ? "

" मी ' तात्यासाहेब कोल्हटकरां'चं अनुकरण केलं—त्यांच्या ' वाङ्मयाचं ' अनुकरण केलं नाहीं, किंवा त्यांच्या लेखनपद्धतींचंही अनुकरण केलं नाहीं. एकाच बाबतींत ते मला मार्गदर्शक झाले, अन् ती बाब म्हणजे नावीन्य ! कुणाचंही अनुकरण करायचं नाहीं—आपला सवतासुभा निर्माण करायचा—परंपरा मोडायची—या एकाच तत्वाचं अवलंबन करण्याची स्फूर्ति मला त्यांच्या लेखनांतून मिळाली. म्हणूनच मी त्यांना गुरुस्थानीं मानतों."

" आपण आपलं आत्मचरित्र केव्हां लिहिणार आहांत ? "

" माझी लिहिण्याची मोठी इच्छा आहे. परंतु त्यासाठीं लागणारा वेळ हवा आहे ना ? माझं आत्मचरित्र मरणाच्या पूर्वी प्रसिद्ध करण्याची माझी इच्छा आहे. परंतु सर्वच कांहीं वेळेवर होत नाहीं. सध्यां माझ्या रंगभूमीवरील अनुभवांची लेखमाला लिहिली जात आहे."

" आपल्या वाङ्मयावर योग्य अशी कुणाची टीका झाली आहे का ? "

" माझ्या वाङ्मयाची टीका तशी झालीच नाहीं. आणि झालीच असली, तर ती माझ्या वैयक्तिक निंदेसाठीं—वाङ्मयाच्या निरीक्षणासाठीं नव्हे. स्तुति म्हणजे टीका नव्हे—तसंच निंदा म्हणजेही टीका नव्हे. समदृष्टीनं गुणदोषाचं विश्लेषण करण्याचा प्रघात महाराष्ट्रांत फारच थोड्या टीकाकारांनीं केला आहे, हें मराठी लेखकांचं दुर्भाग्य होय. "

" आपल्याला जर स्वास्थ्य मिळालं तर आपण काय करायचं ठरवंल आहे ? "

" माझ्या आयुष्याला आतां ५७ वर्षं पुरीं झालीं. तसं पाहिलं तर ४०–४५ वर्षं मी लेखन करीत आलों आहे. पण यशस्वी लेखनाची सुरवात होऊन ३२ वर्षं झालीं. तेवढ्या काळांत मला कधींच स्वास्थ्य लाभलं नाहीं. अन् यापुढं तें लाभेलसं वाटत नाहीं. स्वास्थ्य मिळो वा न मिळो, पण एक कार्य आपल्या हातून घडावं म्हणून माझी धडपड चालली आहे. अन् तें म्हणजे रंगभूमीला उजाळा आणणं—नव्हे नवी रंगभूमि अस्तित्वांत आणणं. मग ती यांत्रिक असो, वा मानवी असो. हा देह ठवण्यापूर्वी लोकशिक्षणाचें हें प्रभावी साधन आपलं खरं कार्य करूं लागल्याचं मला दिसून यावं, एवढीच माझी इच्छा ! "

# जीवनांतील सुखदुःखाचे कांहीं क्षण

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

: ११ :

# शंकरराव देव

"ज्यावेळीं लोक माझा उपहास अन् अपमान करतात त्यावेळीं मी त्यांच्यावर रागावत नाहीं. पण परमेश्वराची करुणा भाकतों, कीं देवा, या लोकांना सुबुद्धि दे. अज्ञानामुळं ते असे वागतात. त्यांच्यावर चिडण्यांत काय अर्थ आहे ?"

काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे एक सभासद आणि महाराष्ट्रांतील प्रमुख काँग्रेस पुढारी शंकरराव देव यांची ज्यावेळीं सरदारगृहांत जाऊन मी मुलाखत घेतली त्यावेळीं त्यांनीं असे उद्गार काढले. शंकरराव देव यांचा निरनिराळ्या वृत्तपत्रांतून उपहास केला जातो. विशेषतः त्यांचा पोशाख आणि त्यांची जुन्या पद्धतीची राहणी यांवरच जास्त टीका केलेली आढळते म्हणूनच त्यासंबंधीं मी त्यांना प्रश्न विचारले.

"आपल्या जीवनांतील सुख–दुःखाचे कांहीं क्षण आपण मला सांगाल का ?" मी त्यांना प्रश्न केला.

"प्रत्येकाच्या जीवनांत सुखदुःखाचे अनेक क्षण आलेले असतात. तेव्हां प्रौढी मिरविण्यांत काय अर्थ आहे ?"

"पण असे कांहीं प्रसंग आपणांस सांगतां येणार नाहींत का ?"

"सांगायला कोणती हरकत आहे ? पण एवढ्या मोठ्या आयुष्यांत घडलेल्या प्रसंगांची क्षणांत स्मृति होणं शक्य आहे का ? शिवाय आयुष्यांतले हे तुटक प्रसंग सांगून त्याचा उपयोग तरी काय ?"

"आपल्यासारख्या प्रमुख पुढाऱ्याचं जीवन कसं असतं हें जाणण्याची सर्वसाधारण जनतेला उत्सुकता असते. अन् तुमच्या जीवनाची जनतेला यथार्थ कल्पना यावी म्हणूनच मी आपल्याला हा प्रश्न विचारीत आहें."

"मी माझ्या वैयक्तिक जीवनाचा कधींच विचार करीत नाहीं देशकार्य हेंच माझं आतां जीवन झालं आहे. अर्थातच कार्य करीत असतांना मला जे सुखदुःखाचे अनुभव येतात त्याकडे मी फारसं लक्ष देत नाहीं."

"पण अशा वेळचे कांहीं प्रसंग आपणांस आठवत नाहींत का ?"

"काय करायचं त्या प्रसंगांशीं ? कोणत्याही प्रसंगाच्या वेळीं माझी जी भूमिका असते तशी सर्वांची राहिलच असं नाहीं."

"पण एखादा प्रसंग सांगितल्याखेरीज जीवनाकडे पहायची आपली भूमिका कोणती आहे हें कसं समजणार ?"

. "कुणी म्हणेल ही आत्मप्रौढी आहे. पण तुमचा आग्रह आहे म्हणून मी सांगतों. ज्या वेळीं मुळशीच्या सत्याग्रहाच्या वेळीं मला फटके मारण्यांत आले अन् कोठडींत ठेवलं, त्यावेळीं तर तो रडण्याचा प्रसंग. पण त्यावेळीं मला मुळींच दुःख वाटलं नाहीं. पण मी थोडावेळ हंसत मात्र राहिलों."

"हंसण्याचं असं कारण काय ?"

"आपण कोणतीही न्याय्य गोष्ट करीत असतांना ज्यावेळीं आपणांला कुणाचा तरी विरोध होतो अगर ज्यावेळीं कुणी आपला अपमान करतो त्यावेळीं आपण नेहमींच त्या व्यक्तीच्या अज्ञानाला किंवा कृत्याला हंसत असतों."

"आपण ब्रह्मचारी कां राहिलांत ?" मी विषयांतर केलें.

" स्वामी विवेकानंद ब्रह्मचारी कां राहिले ? हेतुशिवाय कुणी कधीं कांहींही करीत नाहीं."

" ब्रह्मचारी राहाण्याच्या मुळाशीं आपला कांहीं हेतु आहे का ? "

" तर काय मी उगीच ब्रह्मचारी राहिलों ? "

" कोणतं ध्येय बाळगलं आहे आपण ? "

" राजकीय कार्य ! " शंकररावजी उद्गारले.

" पण राजकीय कार्य करण्यासाठीं ब्रह्मचारी राहिलंच पाहिजे असं आहे का ?"

" असं नाहीं-पण माझ्या जीवनावर स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांच्या तत्त्वज्ञानाचा अन् राहाणीचाही फार परिणाम झाला आहे "

" संसाराच्या व्यापांत सांपडल्यानंतर मनाप्रमाणं राजकीय कार्य करतां येणार नाहीं म्हणूनच आपण अविवाहित राहलां का ? "

" हें तर आहेच. विवाहित माणसंही राजकीय कार्य करीत आहेत हें खरं असलं तरी सगळ्यांनाच त्या गोष्टी जुळतील असं नाहीं. तें बरंचसं परिस्थितीवर अवलंबून आहे. आणि म्हणूनच विचारांतीं मी असं ठरविलं, कीं ब्रह्मचर्यपालन हेंच माझ्या ध्येयसिद्धीला जास्त श्रेयस्कर आहे. "

" या जीवनाचा आपणांस कधीं कंटाळा येत नाहीं का ? "

" मी कांहीं हा कचेरींत जाण्याचा धंदा करीत नाहीं किंवा हें जीवन माझ्यावर कुणी सक्तीनं लादलेलं आहे, असंही नाहीं. ध्येयाशीं ज्या वेळीं माणूस समरस होतो—ध्येय हेंच ज्या वेळीं त्याचं जीवन असतं त्या वेळीं त्याला कंटाळा येण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. "

" आपल्याप्रमाणंच सगळ्यांनीं ब्रह्मचर्य पालन करावं म्हणजे देशाचा उद्धार होईल असं आपणांस वाटतं का ? "

" असं कसं म्हणतां येईल ? मी जी गोष्ट केली किंवा करत आलों आहें तीच गोष्ट इतरांनीं करावी असं मी मुळींच कधीं म्हणणार नाहीं. आपापल्या क्षेत्रांत राहून प्रत्येकाला देशासाठीं कार्य करतां येईल. देशकार्य करण्यासाठीं प्रत्यकानं माझीच दीक्षा घेतली पाहिजे असं नाहीं, आणि तें सगळ्यांना शक्य होईल असंही नाहीं. "

" आपण नीट पोषाख कां करीत नाहीं ? "

" नीट पोषाख म्हणजे ? "

" आजच्या आधुनिक पद्धतीनं. "

" माझा आजचा पोषाख माझ्या धर्मावरील श्रद्धेचं प्रतीक आहे. हिंदु पद्धतींतील हा उत्तम असा गणला गेलेला पोषाख आहे. या पोषाखांत आर्य संस्कृतीचं Best reflection आहे असं मला वाटतं. "

असे उद्गार काढून शंकररावजींनीं आपल्या बॅगेंतून एक पुस्तक बाहेर काढलें आणि त्या पुस्तकांतील बुद्धाच्या शिष्यांच्या चित्रांकडे माझें लक्ष वेधून ते पुढें म्हणाले, " यांनीं हा जो पोषाख केला आहे तो त्यांनीं कां केला असं विचारण्यांत काय अर्थ आहे ? तुमचा पोषाख तुमच्या दृष्टीनं चांगला आहे. माझा पोषाख माझ्या दृष्टीनं चांगला आहे. तो आवडी-निवडीचा प्रश्न आहे. माझ्या पोषाखावर टीका करणारे जे लोक आहेत ते आमच्या धर्माला किती दुरावले आहेत याची मात्र त्यामुळं नीट कल्पना येते. "

" समाजांत आपणांस मोठेपणा मिळावा म्हणून आपण असा साधुवेषधारी पोषाख वापरतां का ? "

" पोषाखानं कांहीं माणसं मोठीं होत नाहींत. महात्माजी आज मोठे ठरलेले आहेत ते पोषाखानं नव्हे–त्यांच्या कर्तबगारीनं. तेव्हां पोषाखानं मोठे होण्याची हांव बाळगणं मूर्खपणाचं आहे. मी तशी ती कधीं बाळगलेलीच नाहीं. मी असा जो पोषाख करतों याचं कारण बुद्धधर्माचा माझ्या मनावर झालेला परिणामच होय."

" सभांच्या वेळीं आपल्यावर अंडीं फेंकलीं किंवा अन्य तऱ्हेनं आपला कुणी उपहास अगर अपमान केला तर आपणांस राग येतो का ? "

" मुळींच नाहीं. ज्यावेळीं लोक माझा उपहास अगर अपमान करतात त्यावेळीं मी त्यांच्यावर कधींच रागवत नाहीं. पण परमेश्वराची अशी करुणा भाकतों, कीं देवा, या लोकांना सुबुद्धि दे. अज्ञानामुळं ते लोक असे वागतात. त्यांच्यावर चिडण्यांत काय अर्थ आहे ? "

शंकररावजी यांना मला आणखी बरेच प्रश्न विचारावयाचे होते, पण त्यांना भेटण्यासाठीं सरदारगृहांत बरीच कार्यकर्ती मंडळी आल्यामुळें मी त्यांचा निरोप घेतला.

: १२ :

# प्रो. वा. म. जोशी

"नव्या अनुभवाशिवाय लिहायचं तरी काय? आजच्या बदलत्या परिस्थितींत निश्चित असं मत देतां येत नाहीं—मत बनवितां येत नाहीं. माझी प्रवृत्तीच मुळीं संशयात्म्याची. त्यांतून परिस्थितीही अनिश्चित. त्यामुळं लेखणी चालत नाहीं. वेळ नाहीं असं म्हणणं ही आत्मवंचना आहे."

आपण अलीकडे लेखन कां करीत नाहीं असा ज्यावेळीं मी प्रो. वा. म. जोशी यांना प्रश्न विचारला त्यावेळीं त्यांनीं वरील उद्गार काढले.

प्रो. वामनराव जोशी जितके गंभीर दिसतात तितकेच ते रसाळ आहेत. पहिल्यानें ज्यावेळीं मी त्यांच्याशीं बोलायला सुरवात केली त्यावेळीं ते बरेच गंभीर दिसले. पण ज्यावेळीं त्यांनीं बोलायला सुरवात केली त्यावेळीं मात्र त्यांची नैसर्गिक वृत्ति मला दिसून आली. ते अगदीं संयमानें बोलतात. पण विद्वत्ता आणि रसिकता या दोनही गुणांचें

त्यांच्या भाषेंत मिश्रण झालेलें दिसून येतें. त्यांच्या वाङ्मयांत हे जे दोन गुण प्रकर्षानें दिसतात तसे संभाषणांतही प्रतीत होतात.

"आपल्या जीवनांतील एखादा सुखाचा प्रसंग आपण सांगाल का ?" मी त्यांना प्रश्न केला.

"माझी पहिली कादंबरी 'रागिणी' ज्यावेळीं प्रसिद्ध झाली त्यावेळीं मला फार आनंद झाला. कारण ती कादंबरी दोघांतिघांनीं नाकारली होती त्याचा इतिहास फार मनोरंजक आहे. पहिल्यानं ती 'मनोरंजन'नं नाकारली. त्याचं असं झालं, कीं 'मनोरंजनां'त रीडर म्हणून त्यावेळीं जे कुणी गृहस्थ होते त्यांनीं ती कादंबरी पहिल्यानं वाचली आणि नापसंत म्हणून बाजूला ठेवून दिली. पण एकदां काशीनाथपंत मित्रांची त्या कादंबरीवर नजर गेली. त्यांनीं ती वाचली तेव्हां ती त्यांना फारच आवडली, अन् म्हणूनच ती प्रसिद्ध झाली."

"आपली 'रागिणी' दोन तीन ठिकाणांहून परत आली त्यावेळीं आपणांस काय वाटलं ? वाईट वाटलं का ?"

"आणखी काय वाटणार ? कींव वाटली. नवीन माणसाला असे अनुभव यायचेच. कार्लाईल यालाही असाच अनुभव आला होता. माझ्या 'आश्रमहरिणी' या कादंबरीचंही असंच झालं. दोघां तिघां प्रकाशकांनीं ती नाकारली. त्यांत पुनर्विवाह दाखविला आहे. तो तेवढा वगळून द्या, असं प्रकाशकानं मला सांगितलं. त्यावेळीं मी त्याला सांगितलं, पोटाकरितां दुसरा उद्योग करतों आहें. वाङ्मय हौशीकरितां आहे—कलोपासनेसाठीं आहे त्यांत कांहीं फरक होणार नाहीं."

नगर वाचनालय, सातारा.

"आपण आणखी एखादा आनंदाचा प्रसंग सांगाल का ?"

'साहित्य संमेलनाचं ज्यावेळीं मला अध्यक्षपद मिळालं त्यावेळीं पहिल्या कादंबरी-इतकाच आनंद झाला. तसंच ज्या नगर हायस्कूलमधें माझं शिक्षण झालं तिथंच ज्यावेळीं मला एकदां अध्यक्ष म्हणून बोलावलं त्यावेळींही मला अपरिमित आनंद झाला. डेक्कन कॉलेजमधें माझं शिक्षण झालं; अन् त्याच कॉलेजामधें ज्यावेळीं मला एकदां व्याख्या-नाला म्हणून बोलावलं त्यावेळींही तसाच मला अपरिमित आनंद झाला."

"अलिकडे आपण लेखन कां सोडलं ?"

"आणखी एक दोन कादंबऱ्या लिहायची माझी फार इच्छा आहे. पण मी हल्लीं लिहित नाहीं त्याला प्रकृतीची किंवा वेळाची सबब मला सांगायची नाहीं. नव्या अनुभवाशिवाय

लिहायचं तरी काय ? आजच्या परिस्थितींत निश्चित असं मत बनवितां येत नाहीं. माझी प्रवृत्तीच मुळीं संशयात्म्याची. त्यांतून परिस्थितीही अनिश्चित. त्यामुळं लेखणी चालत नाहीं."

" आपण पूर्वीच्या ज्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत त्या प्रत्यक्ष अनुभवाच्या अनुभूतीनं लिहिल्या आहेत का ? "

" मला पूर्वीं जे कांहीं अनुभव आलेले होते ते सारे पचवून मी कादंबरींत ग्रथित केले आहेत. मी पूर्वीं माझं वाङ्मय लिहिलं त्यावेळीं म्हणजे १९०८ सालीं मी राजकीय चळवळींत होतों. त्यावेळीं मला तुरुंगाचाही अनुभव आला. त्या त्या काळीं जरी मला त्रास झाला तरी ते अनुभव मला लेखनाला उपयोगीच पडलेले आहेत. अशा अनुभवांमुळं कठोर सत्यं अनुभवाला येतात–अन् नंतर मात्र त्यामुळं आनंद होतो. "

" आपल्या वाङ्मयांत जीं स्वभावचित्रं आहेत त्यांतील कोणतीं स्वभावचित्रं आपणांस सत्यसृष्टींतील व्यक्तींवरून सुचलेलीं आहेत ? "

" त्यांतील एकदोन पात्रं व्यक्तींवरून सुचलेलीं आहेत–बाकीचीं निरनिराळ्या अनुभवांच्या आधारावर निर्माण केलेलीं आहेत ! "

" कोणत्या व्यक्तींवरून आपणांस स्वभावचित्रं सुचलीं हें सांगूं शकाल का ? "

" नाहीं. तें मी कसं सांगूं ? " प्रो. वामनराव म्हणाले.

"वाङ्मयीन आनंद अन् सांसारिक आनंद यांत आपण कुठल्या आनंदाला प्राधान्य देतां ? "

" अर्थातच सांसारिक आनंद. आई, मुलं यांच्या सहवासाच्या आनंदाची वाङ्मयीन आनंदाशीं तुलनाच होऊं शकत नाहीं. "

" आपण राजकारणांत भाग घेतल्याचा मघाशीं उल्लेख केला. आपण राजकारणापासून कां निवृत्त झालांत ? "

" आतां Easy-chair politician चे दिवस राहिले नाहींत. राजकारणांत पडायचं म्हणजे सर्वसंगपरित्याग तरी केला पाहिजे किंवा श्रीमंत तरी असलं पाहिजे. ज्याला आपलं व्यक्तित्व राखायचं आहे किंवा विचार–स्वातंत्र्य राखायचं आहे तो मनुष्य कोणत्याही पक्षांत सामावूं शकत नाहीं. एकवेळ तो श्रीमंत असला तर तो आपलं व्यक्तित्व राखूं शकेल, पण गरीब असला तर मात्र राखूं शकत नाहीं. श्रीमंती किंवा संन्यासी वृत्ति असलेल्यांसाठींच आजचं राजकारण आहे. "

" सध्यां वाङ्मयामधें कला आणि प्रचार यांबाबत जो वाद चालू आहे त्याबद्दल आपणांस काय वाटतं ? "

" लेखन करायचं म्हटलं म्हणजे लेखकाला कांहीं तरी सांगायचं असतंच. कला आणि नीतिवाद याबद्दल जे भांडत आहेत ते केवळ शब्दाकरितां भांडत आहेत. कसं सांगायचं याबद्दल कलैक्यवादी खबरदारी घेतात आणि जीवनवादी काय सांगायचं या प्रश्नाला महत्त्व देतात. लेखकाजवळ सांगण्यासारखं कांहीं नसलं तर निव्वळ भाषेच्या फुलोऱ्यानं त्याचा काय उपयोग होणार ? तसंच चांगलं सांगायचं असलं अन् तें उत्तम रीतीनं सांगतां आलं नाहीं तरीही त्याचा काय उपयोग होणार ? "

" आजच्या आधुनिक मराठी वाङ्मयाविषयीं आपणांस काय वाटतं ? "

" आजचं वाङ्मय एकांगी असलं, त्यांतील कित्येक मतं मला पटत नसलीं, तरी आजच्या लेखकांत श्रद्धा आणि उत्साह आहे हें खरं. तें वाङ्मय सर्वांगपरिपूर्ण नसलं तरी त्या वाङ्मयाला जें वैचारिक वळण लागलं आहे तें चांगलं आहे. "

" आज वाङ्मयांत वैकारिक किंवा शृंगारिक वाङ्मयाला जें प्राधान्य दिलं जात आहे त्याबद्दल आपलं काय मत आहे ? "

" शृंगाराला अगर प्रणयाला माझा मुळींच विरोध नाहीं. तरुण लोकांना शृंगार आवडणारच, अन् तो जीवनांतील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे असं माझं मत आहे. पण स्त्रीपुरुषसंबंध, कामवासना यांचं आविष्करण वाङ्मयांत करतांना औचित्य बाळगलं पाहिजे–संयम राखला पाहिजे—मर्यादा सांभाळल्या पाहिजेत. शास्त्रीय चर्चा करायला कांहीं हरकत नाहीं. पण ललित वाङ्मयांत उद्दीपक वर्णन करण्यांत अर्थ काय ? "

" आजच्या परिस्थितींत स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक भावना दाबल्या जात आहेत. तेव्हां त्यांचा साहजिकच वाङ्मयांत पडसाद उमटतो. वैकारिक भावना जर नैसर्गिक आहेत तर त्यांचं वाङ्मयांत प्रकटीकरण अगर आविष्करण झालं तर बिघडलं कुठं ? "

" सगळेच शारीरिक व्यापार नैसर्गिक आहेत, म्हणून कांही कुणी त्या गोष्टी चव्हाट्यावर करीत नाहीं. तरुणांना शृंगार आवडतो, म्हणून त्यांचं उठल्या बसल्या वर्णन करण्यांत अर्थ नाहीं. तरुणांना जें जें आवडतं तें सारंच चांगलं आहे असंही म्हणतां येणार नाहीं. वासना दाबल्या जातात म्हणून शृंगारिक वाङ्मयाला ललित वाङ्मयांत प्राधान्य मिळालं आहे असं तुम्हीं म्हणतां. आणि म्हणूनच तो गुन्हा नाहीं असं आपण म्हणतां. बेकारी वाढली म्हणून

चोरी होते. म्हणून काय चोराला दोषी ठरवायचा नाहीं ? डॉक्टरांनीं शास्त्रीय ज्ञानासाठीं शारीरिक क्रियांचीं विद्यार्थ्यांपुढं वर्णनं केलीं तर चालतील. पण शारीरिक क्रियांची ललित वाङ्मयांत वर्णनं केलीं तर त्यांत माझ्या मतें तरी औचित्य नाहीं. ''

नंतर मराठी वाङ्मयांतील प्रथितयश लेखक प्रो. फडके, वरेरकर आणि खांडेकर यांच्या वाङ्मयासंबंधीं बोलतांना प्रो. वामनराव म्हणाले, " प्रो. फडके यांचं वाङ्मय मला आवडतं. स्त्री-पुरुषांच्या भावनांचं सहृदयतेनं आणि आकर्षकपणं ते आविष्करण करतात. आपलं वाङ्मय प्रचारक स्वरूपाचं नाहीं असं ते म्हणतात. पण त्यांच्या वाङ्मयांत प्रचार आहे. ज्या लेखकाला कांहींतरी सांगावं असं वाटतं त्याच्या वाङ्मयांत प्रचार हा असतोच. वरेरकर यांचं वाङ्मय मला फार आवडतं. त्यांची लेखनशैली चांगली आहे. मात्र त्यांच्या वाङ्मयांत स्त्रियांच्या स्वभाव-दिग्दर्शनाला जें अतिरंजित स्वरूप दिलं जात असतं तें मात्र मला आवडत नाहीं. खांडेकर तर जावनवादीच आहेत. त्यांचं वाङ्मयही मला आवडतं. ''

" आपल्या जीवनांत दुःखाचे कांहीं प्रसंग आले आहेत का ? "

" मला फारसं कधीं दुःख झालेलंच नाहीं. जरी मी दारिद्र्य सहन केलं आहे तरी दैन्य कधींच भोगलं नाहीं. कुणी ना कुणी तरी वेळीं मदत केली आहे. जीवनांत जे नेहमीं सुख-दुःखाचे प्रसंग येतात ते वाङ्मय-लेखनाला मात्र नेहमीं उपयोगी पडतात. ''

: १३ :

# प्रो. र. धों. कर्वे

**आ**पल्या क्रांतिकारक विचारसरणीनें समाजाला धक्के देणाऱ्या क्रांतिकारकाच्या तरुणपणांतील लाजऱ्या अन् भित्र्या स्वभावामुळें त्याच्यावर प्रेमभंगाचे प्रसंग आले—त्याचें प्रेम अव्यक्त राहिलें हें कुणाला सांगितलें तर खरें वाटेल काय ?

लैंगिक वाङ्मयाचे प्रचारक आणि स्वैराचाराच्या कल्पनेचे आजचे प्रवर्तक प्रो. र. धों. कर्वे आज जरी कोणत्याही परिस्थितींत समाजाची पर्वा करीत नाहींत तरी आपल्या ऐन तारुण्यांत ते लाजऱ्या स्वभावाचे होते—भित्रे होते. त्यामुळें ते तारुण्यांत कुणाजवळही आपलें प्रेम व्यक्त करूं शकले नाहींत. ' माझ्या प्रियकरीणींना त्यांचं लग्न झाल्यानंतर मुलं झालीं तरी मी अजून अविवाहितच ' असें कुणींसें आपल्या आत्मचरित्रांत म्हटलें आहे. पण अशी जरी प्रो. कर्वे यांची स्थिति नसली तरी त्यांचें प्रेम अव्यक्तच राहिलें आहे ही मात्र गोष्ट खरी.

"आपल्या जीवनांतील कांहीं सुखदुःखाचे प्रसंग सांगाल का ?" असा ज्यावेळीं मी प्रो. कर्वे यांना प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, "मॅट्रिकच्या परीक्षेंत माझा ज्यावेळीं पहिला नंबर आला त्यावेळीं मला अपरिमित आनंद झाला. पण याला इतिहास आहे. मी ज्यावेळीं आदल्या वर्षी परीक्षेला बसलों त्यावेळीं नापास झालों. माझी चूक नसतांना नापास झालों. इतिहास भूगोलांत नापास झालों. पण कुठं काय घोटाळा झाला तें कळलं नाहीं. माझे पेपर्स बरे गेले होते, तरी मी नापास झालों; अन् दुसऱ्या खेपेला मात्र माझे पेपर्स बरे गेल्याचं मी कुणाला सांगितलं नाहीं अन् पास मात्र झालों. तसंच कॉलेजांत असतां प्रीव्हियस आणि इंटरमिजिएट मधेंही जेव्हां मी पहिला आलों त्यावेळींही मला फार आनंद झाला."

"विद्यार्थीदशा संपल्यानंतरचा आनंदाचा एखादा प्रसंग सांगाल का ?"

"विलायतेहून मी येत असतां बोटीवर बुद्धिबळांचा डाव युरोपियनांबरोबर खेळण्याची संधि मिळाली. त्यावेळीं मीच जिंकलों. मलाच पहिलं बक्षीस मिळालं. पण तेथील युरोपियनांनीं भेदभाव हा बाळगलाच. मला त्यांनीं आपल्या इच्छेविरुद्ध जरी पहिलं बक्षीस दिलं तरी त्यांनीं तें अगदीं कमी किंमतीचं दिलं आणि ज्या युरोपियनाला बक्षीस मिळालं त्याला जास्त किंमतीचं दिलं. बक्षीस देतांना बाळगलेल्या भेदभावामुळं जरी मला वाईट वाटलं तरी मी पहिला आलों—युरोपियनांना जिंकून पहिला आलों हें समाधान कांहीं थोडथोडकं नव्हतं."

"आपल्यावर कधीं दुःखाचे प्रसंग आलेच नाहींत का ?"

"ज्या प्रसंगांना दुःखाचे असे प्रसंग म्हणतां येतील ते प्रसंग मीच माझ्यावर ओढवून घेतले आहेत. अन् त्या प्रसंगांबद्दल सुखदुःखाच्या दृष्टीनं मी कधीं विचारच केलेला नाहीं. माझ्यांत एक असा दोष आहे, कीं माझ्यांत असलेल्या गुणांचं मला कधीं प्रदर्शन करतां येत नाहीं. वरिष्ठांना खूष ठेवण्याचं तर मला कधींही साधलेलं नाहीं."

"वरिष्ठांशीं वितुष्ट आल्यामुळं आपलं कधीं कांहीं नुकसान झालं आहे का ?"

"नुकसान झालं असं जरी मानायला मी तयार नसलों तरी त्यामुळं माझ्या जीवनांत स्थित्यंतर झालं आहे हें मात्र खरं. वरिष्ठांशीं न पटल्यामुळं दोनतीनदां मी नोकरी सोडली आहे."

"त्यावेळीं आपण कुठं नोकरीला होतां ?"

" या दोन्ही प्रसंगीं मी अहमदाबाद आणि मुंबईच्या विल्सन कॉलेजांत प्रोफेसर होतों. "

" विल्सन कॉलेजांतील नोकरी आपण कां सोडली ? "

" बर्थ कंट्रोलवर लेख लिहूं नका, असं मला वरिष्ठांनीं सांगितलं त्यावेळीं मी राजीनामा दिला. अन् त्यानंतर एका व्यापारी कंपनींत साहेबाचा सेक्रेटरी म्हणून राहिलों. "

" तिथली नोकरी आपण कां सोडली ? "

" मानहानि मला कधींच सहन करतां येत नाहीं. पूर्वी प्रोफेसराचीच नोकरी केल्यामुळं अंगावर ओरडून घेण्याची मला संवय नव्हती अन् आमच्या ' सायबाला ' तर अंगावर येऊन ओरडण्याची संवय असल्यामुळं मी त्याच्याकडे करायचं काम अंगाबाहेर टाकलं— तिथली नोकरी सोडली. "

" आपल्या अशा या तीन नोकऱ्या सुटल्या. पण त्यामुळं आपणांस थोडंसुद्धां दुःख वाटलं नाहीं का ? "

" मी नोकऱ्या सोडल्या ते मी माझ्या जीवनांतील आनंदाचे प्रसंग समजतों. दुःख संपल्याचा आनंद अपूर्व असतो नाहीं का ? "

" दुःख अन् आनंद हें मानण्यावरच आहे असंच आपणांस म्हणायचं आहे का ? "

" तें तर आहेच. पण माझी मनोभूमिका अशी आहे, कीं तत्त्वानं प्रेरित होऊन मी कोणती तरी गोष्ट केली अन् त्यामुळं माझं नुकसान झालं तरी मला कधीं वाईट वाटत नाहीं. पण पॅरिसमधें असतांना मात्र एका प्रसंगामुळं मला अत्यंत दुःख झालं. त्यावेळीं मी पॅरिसमधें डॉक्टरेटसाठीं गेलों होतों. मला एक वर्षानंतर डॉक्टरेटसाठीं 'थिसिस' लिहायचा होता. पण मी ज्या प्रोफेसरच्या हाताखालीं काम करीत होतों त्याला तें आवडलं नाहीं. कारण तो तीन वर्षं अभ्यास करून पास झाला होता. तेव्हां मला सवलत मिळाली हें त्याला पसंत पडेना. इतर प्रोफेसांरनीं संमति दिली, पण त्यांच्या मान्यतेचा कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता. कारण ज्या प्रोफेसराच्या हाताखालीं काम करायचं असतं त्याच्याच मान्यतेची जरूरी असते. तीन वर्षांऐवजीं एका वर्षात मला परवानगी देण्याचं त्याच्या जिवावर आलं. पण मी एम. ए. होतों हें बुद्धिपुरस्सर विसरला. आणि माझी डॉक्टरेट मिळविण्याची लायकी असतांनाही मी डॉक्टरेट न झाल्याबद्दल मात्र मला दुःख झालं. "

" डॉक्टरेट न मिळाल्याबद्दल आपणांस आतां खरोखरच वाईट वाटतं का ? "

" वाईट हें वाटतंच. कारण ती पदवी कांहीं मला फुकटची मिळणार नव्हती. मी अभ्यास केला होता. "

" तारुण्यांत आल्यावर आपणांवर प्रेमभंगाचे प्रसंग आले कीं नाहींत ? "

" मी प्रेम केलं तरी तें मनांतच राहिलं, अन् प्रेमभंग झाला तरीही मनांतल्या मनांतच मी तें दुःख गिळलं आहे. मी अगदीं भित्रा आहे. तेव्हां कुणाजवळ माझं प्रेम मी बोलणं शक्यच नव्हतं. त्यामुळं तें अव्यक्तच राहिलं. "

त्यानंतर आफ्रिकेंतील नैरोबी येथें आपण एका युरोपियनावर बुद्धिबळें खेळण्याच्या बाबतींत कशी मात केली याचें वर्णन केल्यावर प्रो. र. धों. कर्वे पुढें म्हणाले, " आपली कांहीं चूक न होतां कांहीं घडलं तर मला कधींच दुःख होत नाहीं. "

" अत्यंत दुःखाचा असा आपल्या आयुष्यांत कोणता काल गेला ? "

" मॅट्रिक पास होण्याच्या पूर्वीं सगळा बालपणींचा काल असंच मी म्हणेन. ' बालपणींचा काल सुखाचा ' असं कवीनं काव्यांत म्हटलं आहे. पण त्या गोष्टी काव्यांत शक्य आहेत. वास्तव जगांत नाहींत असा मला तरी अनुभव आहे. "

" आपलं बालपण दुःखांत जायला कारण काय घडलं ? "

" माझे वडील अन् त्यांचे एक स्नेही एकाच ठिकाणीं राहात असत. तो त्यांचा स्नेही म्हणजे आम्हां मुलांना राक्षसासारखा वाटत असे. भूक लागली तरी खायची आम्हांला चोरी. त्यामुळं भूक लागली म्हणजे चोरूनच आम्हांला खावं लागत असे. त्या गृहस्थाचा मला इतका दरारा वाटे, कीं मी माझ्या वडिलांशींही बोलायला भीत असे. पण आतां नाहीं भीति वाटत मला वडिलांची " प्रो. कर्वे हंसत हंसत म्हणाले, " माझ्या वडिलांनीं त्या गृहस्थांची आपल्या आत्मचरित्रांत फार स्तुति केली आहे. पण मला तरी ती पसंत नाहीं. "

" त्या गृहस्थाचं नांव सांगाल का ? "

" आतां त्यांची मला भीति नाहीं अन् नांव सांगायलाही भीति नाहीं. कारण ते आतां हयात नाहींत. "

" बालपणीं आणखी आपणांस कशामुळं त्रास झाला ? "

" बालपणीं मीं फारच कुरूप होतों—आजही आहे. विरूप मुलं कुणालाच आवडत नाहींत. त्यामुळं मी कुणालाच आवडत नसे. लहान मुलांना ही गोष्ट कळत नसते. तीं जास्त प्रेमानं कुणाशींही वागत असतात. पण त्यांना त्याचा मोबदला मिळत नसतो. "

" आपल्या वडिलांशीं आपले अनेक वेळां मतभेदाचे प्रसंग आले असतील. पण असा मतभेदाचा प्रसंग उद्‌भवला, कीं आपणांस मनापासून खेद होत नाहीं का ? "

" खरं सांगायचं म्हणजे दुःख वाटण्यासारखे त्यांच्या माझ्यांत कधीं मतभेद आलेच नाहींत. त्यांच्या संस्थेंत मी सामील व्हावं असं त्यांना फार वाटत होतं. पण लग्न केल्या-खेरीज त्यांच्या संस्थेंत प्रवेश मिळण्यासारखा नव्हता. आणि लग्न करून गरीबींत राहणं मला परवडलं नसतं. "

" याखेरीज दुसऱ्या कोणत्या बाबतींत आपलं आणि वडिलांचं पटलं नाहीं ? "

" कधीं आमचा खटका उडाला नाहीं. पण तात्त्विक असे मतभेद बरेच वेळां झाले. त्या मतभेदांत दुःख वाटण्यासारखं कांहीं नव्हतं. मी ' गुप्त रोग ' आणि ' संततिनियमन ' या विषयांवर पुस्तकं लिहिलीं. संततिनियमनाच्या कांहीं ते विरुद्ध नव्हते. पण 'गुप्त रोगां' संबंधीं मी पुस्तक लिहिल्याचं ज्यावेळीं त्यांना कळलं तेव्हां त्यांना धक्का बसला. त्यांना पहिल्यांदा असं वाटलं, कीं गुप्तरोग बरा करतां येऊं लागला म्हणजे माणूस वाटेल तसा वागेल. पण त्यांनीं नंतर तीन चार महिन्यांनीं ज्यावेळीं पुस्तक वाचलं त्यावेळीं त्यांनीं तें पुस्तक वाईट नसल्याचं आपलं मत मला कळविलं. मी कोणतीही गोष्ट तत्त्वाच्या दृष्टीनं करीत असतों. तेव्हां त्या बाबतींत त्यांचं आणि माझं एकमत होत नसलं तरी ते कधीं वाईट वाटून घेत नाहींत. "

: १४ :

# प्रो. ना. के. बेहेरे

" माझ्या जीवनांत सुखदुःखाचा प्रश्न उद्भवतच नाहीं. सुखदुःखाकडे मी सारख्याच भावनेनं पहात असतों. या दोन्हीही भावनांविषयीं मी सारखाच उदासीन असतों. "

असे उद्गार प्रो. ना. के. बेहेरे यांनीं मुलाखतींत काढले. प्रो. बेहेरे यांना लोक उद्दाम, मिजासखोर म्हणतात याची त्यांनाही जाणीव आहे. पण कुणाचीही पर्वा न करतां वागण्याचा आपला निसर्गसिद्ध स्वभाव आहे असें ते म्हणतात. आपल्या जीवनांतील कांहीं सुख-दुःखाचे प्रसंग सांगाल काय, असा मी त्यांना प्रश्न केला त्यावेळीं ते म्हणाले, " माझ्या जीवनांत अनेक घडामोडी झाल्या आहेत. पण त्या घडामोडींकडे मी गंभीरपणं कधींच पाहिलेलं नाहीं. माझ्या जीवनांत कोणतीही उलथापालथ झाली तरी मी त्याबद्दल दुःख वाटून घेत नाहीं. माझी मनोवृत्तीच अशी आहे, कीं तिला दुःखाचा लवलेशही पोंचत नाहीं. माझ्या जीवनांत दुःखाचा प्रश्नच उद्भवत नाहीं. "

नानासाहेब बेहेरे बोलतांना पुढें म्हणाले, " १९३२ सालीं घडलेलीच गोष्ट मी तुम्हांला सांगतों. सकाळीं सुमारें नऊ वाजतां मला युनिव्हर्सिटींतून नोकरीवरून काढून टाकल्याचा

हुकूम माझ्या हातीं मिळाला. अगदीं खरं सांगायचं म्हणजे तो हुकूम वाचून माझ्या मनावर यत्किंचितही परिणाम झाला नाहीं. त्या दिवशीं दुपारीं १२ वाजतां सभा होती. मी नेहमींप्रमाणेंच आनंदी वृत्तींत सभेला हजर राहिलों. नेहमींप्रमाणं हंसलों—गप्पाही मारल्या. त्यावेळीं माझ्या एका मित्रानं मला विचारलं, 'तुम्हांला हुकूम नाहीं मिळाला?' ''

'' मी त्याला उत्तर दिलं, मिळाला कीं सकाळींच. ''

'' 'मग सांगितलं नाहींत तें?' त्यानें प्रश्न केला. ''

'' मी त्याला असं उत्तर दिलं, आजच एक हेडमास्तर टेनिस खेळतां खेळतां मरण पावल्याची बातमी तुम्हीं वाचली असेलच. त्या बिचाऱ्याला आपल्या कुटुंबाची कांहीं व्यवस्था करण्याचीही संधि मिळालेली नाहीं. माझं कांहीं तसं नाहीं. मी हा जिवंत आहे—धडधाकट आहे. कुटुंबाची आर्थिक सोय करण्याइतकी मला शक्ति आहे. मग मी नोकरी गेल्याचं दुःख करून शरिराला कां शिणवूं? मला सरकारची अन् सरकारी नोकरीची तरी कुठं पर्वा आहे? ''

नानासाहेब पुढें म्हणाले, '' मला त्यावेळीं सहाशें सातशें रुपये मिळत होते. पण त्या पैशाचा मला मोह वाटला नाहीं. नोकरी गेल्यामुळं माझ्या जीवनावर कांहीं अनिष्ट परिणाम झाला नाहीं. मला कधीं वाईट वाटलं नाहीं. ''

''आर्थिक प्रश्न सोडा, पण कौटुंबिक परिस्थितीनंही आपणांस कधीं दुःख झालं नाहीं का?''

'' मुळींच नाहीं. अठराव्या किंवा एकोणिसाव्या वर्षाची असतांना माझी प्रथम पत्नी मरण पावली. मी त्यावेळीं फार तर २३–२४ वर्षांचा असेन. पण मी त्यामुळं खचून गेलों नाहीं. तिच्या सहवासांत जें मला सुख आणि समाधान मिळालं त्यामुळं मला जीवनांत आनंद मिळाला. पण तिच्या मृत्यूनं माझ्या जीवनांतला आनंद मावळला असं मला वाटलं नाहीं. मी भावि जीवनाचा कधीं विचार करीत नाहीं. मिळाला तेवढा आनंद आपला, पुढं काय होईल याची काळजी कशाला? जीवनाच्या प्रारंभापासून अंतापर्यंत प्रत्येकाला आनंद मिळेल असं थोडंच आहे? मग माणसानं तरी तसा आग्रह कां धरावा? त्यामुळं दुःखाच्या प्रसंगानं मी कधीं हतबुद्ध होतच नाहीं. ''

'' तुम्हांला आजारांत तरी जिवाची भीति वाटते कीं नाहीं?'' मी त्यांना विचारलें.

'' मी १९३३ सालीं फार आजारी होतों.'' नानासाहेब बेहेरे यांनीं बोलायला सुरवात केली, ''डॉक्टरनीं मला जरी मी मरणार असं सांगितलं नाहीं तरी प्रकृति वाटते तितकी बरी

नाहीं असा माझ्या घरच्या मंडळीला दिलेला इषारा माझ्या कानीं आला. खरंच मला त्यावेळीं कांहीं वाटलं नाहीं. आजारी असतांही मी ज्ञानेश्वरी वाचीत होतों. पण ज्ञानेश्वरी न वाचतां कांहीं तरी Light Reading करा असं मला डॉक्टरनीं सांगितलं. मी डॉक्टरना सांगितलं, ज्ञानेश्वरी मला लाइटच वाटते. अन् उशाखालीं ज्ञानेश्वरी असतांना मी मेलों तर कांहीं वाईट नाहीं. दुसरा एक प्रसंग तुम्हांला मी सांगतों. मला एकदां मोटरचा अपघात झाला. माझ्या डोक्याला तीन इंच लांब जखम झाली. मी तीन तासांनंतर शुद्धीवर आलों. पण मला त्यावेळीं कांहींच वाटलं नाहीं. माझीही काळजी वाटली नाहीं. आणि कुटुंबाचें काय होणार हाही प्रश्न डोक्यांत आला नाहीं मी शुद्धीवर येतांच पहिल्यानं मी माझ्या डॉक्टर–मित्राला बोलावून आणण्यास सांगितलं आणि नंतर म्हटलं सावकाश घरीं निरोप पोंचवा. मी नेहमीं माझ्या जीवनाविषयीं आणि कुटुंबांतील माण-सांच्या जीवनाविषयींही बेफिकीर असतों."

"खांडेकरांनीं कांहीं वर्षांपूर्वी 'मोत्यांची माळ' या आपल्या कवितासंग्रहावर कडक टीका केली त्यावेळीं आपणांस काय वाटलं?".

"कांहींच वाटलं नाहीं." नानासाहेबांनीं उत्तर दिलें.

"टीका करण्यांत आपल्या बाबतींत त्यांनीं अन्याय केला असं नाहीं का आपणांस वाटलं?"

"माझ्या बाबतींत सर्वच लोक अन्याय करतात. अशा क्षुल्लक गोष्टींना जर माणसानं महत्त्व दिलं तर त्याचं जीवन दुःखमय होईल."

"त्यांनीं तुमच्यावर द्वेषबुद्धीनं टीका केली होती का?"

"तसं मुळींच नाहीं. त्यांचा माझा मुळींच द्वेष नव्हता. पण लेखन-कौशल्य दाखविण्या-साठींच त्यांनीं माझ्या काव्यसंग्रहावर टीका केली असावी!"

"आपली पहिली कविता प्रसिद्ध झाली त्यावेळीं आपणांस आनंद झाला नाहीं का?"

"आनंद झाला खरा; पण त्या आनंदाच्या मागं बायकोचं प्रेम होतं."

"तें कसं काय?"

"त्याचं असं झालं, मंगळागौरीच्या पूजनाच्यावेळीं गाण्यासाठीं माझ्या बायकोनं एक कविता केली. आणि दुरुस्तीसाठीं दिली माझ्याकडे. तेव्हां मी सर्दच झालों. कारण माझा आणि काव्याचा त्यावेळीं कांहींही संबंध नव्हता. मी त्यापूर्वी कवितेची एकही ओळ लिहिलेली नव्हती. कविता दुरुस्त करण्याचा तो माझ्यावर प्रसंग आला. पण त्या प्रसंगांतून निभा-

वण्यासाठीं मी माझे मित्र आनंदराव टेकाडे यांची मदत घेतली. त्यांनीं ती कविता दुरुस्त करून दिली. त्यानंतर मलाही कविता करावीशी वाटली. आपल्याला हें तंत्र साधतं कीं नाहीं तें पहावं म्हणून मी दुसऱ्या दिवशीं कविता केली. ' विरोधाभास ' या नांवानं ती कविता आतां प्रसिद्ध आहे. ती कविता रचल्यावर मी ती ' विविधज्ञान-विस्तार'कडे पाठविली. आणि ती पुढच्याच महिन्यांत जेव्हां प्रसिद्ध झाली त्यावेळीं आपणही ' कवि ' झालों असं मला वाटूं लागलं. फारच उत्तम कविता रचतां येते आपल्याला असं मला वाटलं. कारण त्या काळीं प्रसिद्ध असलेल्या ' वि. विस्तार ' मासिकांत माझी कविता प्रसिद्ध झाली ना ? "

" नंतर आपण सतत कविता करायला लागलां का ? "

" माझी बायको इंदूरला माहेरीं गेली होती. तिनं तिथं गेल्यावर मला पत्र पाठविलं अन् पत्राच्या शेवटीं तिनं ' चरणाची दासी ' असं लिहिलं होतं. नंतर मी तिला ' चरणाची नच तूं दासी ' या नांवानं काव्यमय पत्र पाठविलं. त्यानंतर मी सतत कविता करायला लागलों— कवि बनलों. बायकोच्या आत्यंतिक प्रेमामुळं मी कवि बनलों. "

" एकादी आवडती गोष्ट आपल्या आयुष्यांत घडून आली तर आपल्याला अत्यानंद होईल काय ? '

" मी असले कधींच बेत करीत नाहीं. मी उगीच महत्त्वाकांक्षेचे मनोरे उभारीत नाहीं. मी नेहमींच सुखी असतों. असाच नेहमीं राहीन. दुःख माझ्या अंतःकरणाला कधींही स्पर्श करूं शकणार नाहीं."

" आपण नेहमीं आनंदी असतां हें खरं. पण अचानकपणं आपणांस कधीं आनंद झाला आहे काय ? '

" एका वर्षीं असं झालं, कीं अमेरिकेंतून नुकत्याच आलेल्या कांहीं मित्रांनीं मला आपल्या घरीं खान्याला बोलाविलं. खान्याला प्रारंभ होतांच माझा एक मित्र म्हणाला, ' आजचा समारंभ कां आरंभिला आहे तो माहित आहे ना ? ' मी हंसत हंसत उत्तर दिलं, ' माझा वाढदिवस साजरा करण्यासाठीं ना ? ' त्या माझ्या मित्राला आश्चर्याचा धक्का बसला. ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन आहे, म्हणून त्यानं समारंभ आरंभिला होता. माझाही जन्म त्याच दिवशीं आहे. त्या दिवशीं मला खरोखरच आनंद झाला. माझ्या मनोवृत्तीचं चित्र माझ्या जन्माच्या दिवसांत असल्याचं पाहून मला अत्यानंद झाला. "

: १५ :

# अण्णासाहेब लट्ठे

" मास्तरची नोकरी करीत होते त्यावेळीं कवि रेंदाळकर त्यांना सात रुपये पगार मिळत होता. मी एज्युकेशनल इन्स्पेक्टर असतांना त्यांना पंधरा रुपये पगार मिळावा अशी शिफारस केली. पण त्यांची अवघ्या नऊ रुपयांवरच नेमणूक करण्यांत आली अन् त्यावेळीं मला फारच वाईट वाटलं."

मुंबई सरकारचे माजी अर्थमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांची मी मुलाखत घेतली त्यावेळीं त्यांनीं उद्गार काढले.

आपल्या जीवनांतील कांहीं सुखदुःखाचे क्षण सांगाल काय असें ज्यावेळीं मी त्यांना विचारलें त्यावेळीं ते म्हणाले, " मी ज्यावेळीं तरुण होतों त्यावेळीं माझ्यावर अनेक दुःखांचे प्रसंग आले आहेत. त्यावेळीं मी क्षुल्लक गोष्टीवरून मनस्ताप करून घेत होतों. मी ज्यावेळीं एज्युकेशनल इन्स्पेक्टर होतों त्यावेळीं क्षुल्लक कारण घडलं तरी मला मनस्तापानें रात्रभर झोंप येत नसे—"

आणि त्यावेळच्या एखाद्या प्रसंगाची माहिती सांगाल काय असें ज्यावेळीं मी त्यांना विचारलें त्यावेळीं रेंदाळकरांविषयींची वरील माहिती त्यांनीं मला सांगितली.

" कोल्हापूर इथं दिवाण असतांना आपणांस आपल्या इच्छेविरुद्ध कांहीं गोष्टी कराव्या लागल्या आहेत काय ? "

" मुळींच नाहीं. " लठ्ठे अभिमानानें म्हणाले, " मी माझ्या इच्छेविरुद्ध कोणतीच गोष्ट करीत नाहीं. "

" कोल्हापुरांत असतांना मनस्ताप होण्यासारखे कांहीं प्रसंग आपल्या जीवनांत घडलेच नाहींत का ? "

" असे प्रसंग घडले नाहींत असं नाहीं. पण त्यावेळीं मात्र मला मनस्ताप झाला नाहीं—दु:ख झालं नाहीं. याचं कारण जीवनांत अनेक बऱ्यावाईट घटना घडल्यामुळं माझ्या मनाची त्यावेळीं बरीच तयारी झाली होती. "

" आपण कोल्हापूर संस्थानांतील नोकरी कां सोडली ? महाराजांचं अन् आपलं पटत नव्हतं का ? "

" छे–छे—असं मुळींच नाहीं. The Maharaja gave me very much freedom. "

" मग नोकरी कां सोडली ? " मी पुनः विचारलें.

" त्याला मोठा इतिहास आहे. " अण्णासाहेबांनीं बोलायला सुरवात केली. "१९३२ सालीं-कोल्हापूर येथील एडवर्ड बादशहाच्या पुतळ्याला कुणीतरी डांबर फासलं होतं. त्या प्रकरणांत माझा हात असावा असा पोलिसांना कसा कुणास ठाऊक एकदां ' साक्षात्कार ' झाला ! त्यांनीं पोलिटिकल एजंटालाही या बाबतींत पुष्कळ सांगून पाहिलं. पण पुरावा कांहींच हातीं नसल्यामुळं पोलिटिकल एजंटाला कांहींच करतां येण्यासारखं नव्हतं. त्यामुळं तें प्रकरण तेवढ्यावर मिटलं. "

" मग पुढं काय इतिहास घडला ? "

" पोलिसांनीं माझ्यावर जो आळ घेतला होता तो सर्वस्वीं फसल्यामुळं पोलिस मनांतल्या मनांत चिडलेच होते. त्यामुळं माझ्यावर विश्वासघाताचा आळ आणून मला माणसांतून उठवावं असा त्यांनीं निश्चय केला. पोलिसांनीं कावा लढवून माझ्या शेल्फमध्यें कांहीं गुप्त कागदपत्र आणून ठेवले. पण ते माझ्या नजरेला येतांच मी ते पोलिटिकल एजंटकडे

पाठवून दिले. अर्थातच ही गोष्ट पोलिसाना माहित नव्हती. माझ्या निवासस्थानाची झडती घेण्याचा हुकूम निघतांच ज्या अधिकाऱ्याच्या हातीं ती कामगिरी सोंपवली होती त्या अधिकाऱ्याला माझ्या घराची झडती घेण्यास संकोच वाटूं लागला. कारण मी त्यावेळीं दिवाण होतों. पण शेवटीं त्यानं झडती घेतली त्यावेळीं त्यांना कांहींच सांपडलं नाहीं. It was a mere chance that I escaped. त्यानंतर मात्र मला तिथल्या जीवनाचा कंटाळा आला अन् म्हणूनच मी नोकरी सोडण्याचं ठरवून बेळगांवला जाण्याचं ठरवलं. पण मी बेळगांवला जात असतां मला मिरज स्टेशनवर अटक करण्यांत आली."

"त्यावेळीं तरी आपल्या मनावर अपघात झाला का ?"

"मुळींच नाहीं. I was quite prepared. पकडल्यानंतर गाडींतसुद्धां मी स्वस्थ झोंप घेतली. पुढं नंतर बेळगांवला माझी जामिनावर मुक्तता करण्यांत आली. पण १९१७ सालीं मात्र कोल्हापूर दरबारनं मला माफीचं पत्र पाठवलं."

"त्यावेळीं आपणाला आनंद झाला नाहीं का ?"

"आनंद झाला. पण मी या प्रकरणाला फारसं महत्त्व दिलंच नव्हतं."

"मी असं विचारतों, कीं पोलिसांना आपल्याविषयीं संशय येण्यास कारण तरी काय घडलं ?"

"१९११ सालीं कोल्हापुरच्या जैन वसतिगृहांत एक विद्यार्थी होता. त्याच्यावर खुनाचा आरोप होता. त्याला पुढं फांशीं देण्यांत आलंच. पण त्या विद्यार्थ्याला मीच कोल्हापुरांत आणलं असं पोलिसांना वाटत होतं. पण तो विद्यार्थी कोल्हापुरांत कसा आला आणि त्याच्या शिक्षणाचा खर्च कसा चालत आहे हें खरं म्हटलं तर मलाही एक कोडंच होतं. पण कांहीं दिवसांनीं मला तें कोडं उलगडलं. एक दिवस मला सवड मिळतांच निरुपयोगी पत्रव्यवहार फाडून टाकायचं ठरविलं. सर्व पत्रं चाळीत असतां एक पत्र मला सांपडलं. तें पत्र एका मृत जैन गृहस्थाचं होतं. त्यांनीं त्या पत्रांत आपण त्या विद्यार्थ्याच्या खर्चाची व्यवस्था केली असल्याचं लिहिलं होतं. तेंही पत्र मी पोलिटिकल एजंटकडे पाठविलं. त्यामुळं पोलिटिकल एजंटांना माझ्याविषयीं कधींही संशय वाटत नव्हता."

"मुंबई सरकारचे अर्थमंत्री असतांना आपणांस जास्त स्वातंत्र्य होतं, कीं कोल्हापुरला दिवाण असतांना ?"

" खरं सांगायचं म्हणजे कोल्हापुरला असतांनाही मला पूर्ण स्वातंत्र्य होतं. ज्यावेळीं माझ्या मनाप्रमाणं स्वातंत्र्य मिळणार नाहीं असं मला वाटलं त्यावेळीं मी तिकडची नोकरी सोडली. मुंबई मंत्रिमंडळांतीलही माझे सहकारी चांगले होते. त्यावेळीं मला पूर्ण स्वातंत्र्य होतं. आमच्यामध्यें मतभेद होत नसत असं नव्हे, पण ते मतभेद तेवढ्यापुरतेच. आमच्यामधील आपलेपणाचं अन् प्रेमळपणाचं वातावरण बिघडायला मतभेद कधींच समर्थ ठरले नाहींत. माझे सर्वच सहकारी तडजोडीच्या धोरणानं वागणारे होते. Really speaking, I was worst of them. मीच सगळ्यांत जास्त वाईट होतों. मी फारच हट्टी आहें, असा पुष्कळांचा समज आहे."

" पण या बाबतींत तुमचं काय मत आहे ?"

" माझ्या बाबतींत मी काय सांगूं शकणार ? पण एवढं खरं, कीं माझा जो काय स्वभाव आहे त्याबद्दल मला मात्र कधीं वाईट वाटत नाहीं."

" कोणती गोष्ट आतां आपल्या आयुष्यांत घडली म्हणजे आपल्याला अत्यानंद होईल ?"

" खरं सांगायचं म्हणजे मला आतां कोणतीच वैयक्तिक महत्त्वाकांक्षा राहिलेली नाहीं. राजकीय क्षेत्रांतील महत्त्वाकांक्षा ही कांहीं माझ्या एकट्याच्या प्रयत्नावर अवलंबून नाहीं. पण मला जर थोडं स्वास्थ्य मिळालं अन् संधि मिळाली तर मी अगदीं खेड्यापाड्यांत जाऊन राहीन. वाचनाचा अन् लेखनाचा आनंद उपभोगीन. मला माझ्या जीवनांतील कांहीं अनुभव लिहायचे आहेत. पण माझ्या पश्चात् ते प्रसिद्ध व्हावे असं मात्र मला वाटतं." असे आण्णासाहेबांनीं उद्गार काढले.

" आपण कॉलेजांत असतांना आपल्या जीवनांत एखादी भावनात्मक घटना घडली आहे काय ?" आण्णासाहेब कॉलेजांतील आपल्या एखाद्या प्रेमसंबंधाचें रसभरीत वर्णन करतील या अपेक्षेनें मी त्यांना प्रश्न केला. पण " कॉलेजांत असतांनाच माझी आई निधन पावली." असें ज्यावेळीं त्यांनीं खिन्नपणानें उत्तर दिलें त्यावेळीं कॉलेजांत असतांना ते प्रेमाच्या भानगडींत सांपडले होते कीं काय असें विचारण्याचेंही मला धैर्य झालें नाहीं.

: १६ :

# प्रो. ना. सी. फडके

"कांहीं अधिकार नसतांना ज्यांनीं 'प्रतिभासाधन' वादांत भाग घेतला त्यांचं मला कांहींच वाटलं नाहीं. पण ज्यांचा अधिकार होता ते माझ्यातर्फे एकही शब्द बोलले नाहींत त्यांचं मात्र मला वाईट वाटलं. त्यांच्या भित्रेपणाचा मला जास्त राग आला."

प्रो. ना. सी. फडके यांनीं मुलाखतींत उद्गार काढले.

मुंबई रेडिओ स्टेशनवरून प्रो. फडके यांचें रत्नागिरी साहित्यसंमेलनांतील अध्यक्षीय भाषण ब्रॉडकास्ट करण्यांत यायचें होतें. त्याच्या रेकॉर्डिंगसाठीं ते मुंबईला आल्याचें ज्या वेळीं मला कळलें त्यावेळीं त्यांच्या उतरण्याच्या ठिकाणीं मी त्यांना टेलिफोन केला अन् मुलाखतीची वेळ मुक्रर केली.

मी त्यांच्या भेटीसाठीं रेडिओ स्टेशनवर गेलों त्यावेळीं त्यांच्या भाषणाचें रेकॉर्डिंग चालू होतें. रेकॉर्डिंग संपतांच मी, प्रो. फडके अन् त्यांचे चिरंजीव रेडिओ स्टेशनमधून बाहेर पडलों.

प्रो. फडके चेहेऱ्यावरून गंभीर वाटतात. त्यांच्या चेहेऱ्यावर नैराश्याची किंचित् छाया पसरल्याचा भास होतो. पण ते वृत्तीनें खेळकर आहेत. आम्हीं गाडींत बसल्यावर आमचें इकडच्या तिकडच्या विषयावर बोलणें सुरू झालें. ते माझ्याशीं बोलत होते अन् आपल्या चिरंजिवाला मुंबईची माहिती करून देत होते. आपल्या एकाद्या मित्राशीं प्रो. फडके जसे खेळकरपणानें वागत असतील तसेच ते आपल्या मुलाशीं वागत होते. कितीही सुधारलेला बाप असला तरी मुलाशीं वागतांना तो थोडासा रुबाबानें, त्याच्यावर आपलें वजन ठेवून वागतो. प्रो. फडक्यांचें मात्र तसें नाहीं. ते आपल्या मुलाशीं अगदीं खेळीमेळीनें वागतात. मुलाशीं हंसण्याखेळण्यांत तादात्म्य पावतात. आपलें दु:ख विसरतात.

"आपली पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली त्यावेळीं आपणांस काय वाटलं ?" रेडिओ स्टेशनवरून लोटवालाशेठच्या बंगल्यावर आम्हीं येऊन पोंचलों त्यावेळीं मी त्यांना प्रश्न केला.

"कांहींच वाटलं नाहीं." प्रो. फडके हंसत हंसत म्हणाले, "माझ्या जादूगार, दौलत या कादंबऱ्या लोकांना फार आवडल्या. पण मीं कांहीं इतका आनंदानं बेहोष झालों नाहीं."

"म्हणजे आपल्या कादंबऱ्यांच्या प्रसिद्धिमुळं आपणांस आनंदच झाला नाहीं ?"

"झाला आहे, नाहीं असं नाहीं." प्रो. फडके अभिमानानें म्हणाले, "मी लिहिलेली प्रत्येक कादंबरी माझे वडील आईला वाचून दाखवितात हें ज्यावेळीं मला कळलं त्यावेळीं मात्र मला अत्यानंद झाला. तरुणपिढी वडील मंडळीच्या धाकानं नवे विचार नेहमीं लपवीतच असते. पण तेच विचार माझ्या कादंबरींत व्यक्त होत होते. तेव्हां ते विचार वाचून माझ्या वडिलांना काय वाटेल याविषयीं मी जरा साशंकच होतों. पण माझे वडीलच जेव्हां माझ्या कादंबऱ्या माझ्या आईला वाचूनच दाखवितात असं कळलं त्यावेळीं मला समाधान वाटलं."

यावेळीं प्रो. फडके मला बऱ्याच आनंदांत दिसले. पूर्वस्मृतीनीं त्यांच्या चेहेऱ्यावर समाधानाचें हास्य पसरलें. समोरच बसलेल्या आपल्या चिरंजिवाकडे पहात हंसत हंसत ते पुढें म्हणाले, "मी 'अटकेपार' या माझ्या कादंबरींत माझ्या वडिलांचंच स्वभावचित्र रेखाटलं आहे."

"तें वाचल्यावर वडिलांना काय वाटलं ?"

"दु:खाची गोष्ट म्हणजे कादंबरी प्रसिद्ध झाली त्यावेळीं माझे वडील हयात नव्हते. त्यांचें तें स्वभाव-चित्र त्यांच्या वाचण्यांत आलं असतं तर त्यांनीं त्याविषयीं आपलं

मतही व्यक्त केलं असतं अन् त्यांचं तें मत ऐकून मला समाधानही वाटलं असतं." प्रो. फडके विषादानें उद्गारले.

"प्रतिभासाधनवादाचे वेळीं आपण सभा जिंकली त्यावेळीं आपणांस फारच आनंद झाला असेल नाहीं ?"

"फडक्यांनीं सभा जिंकली असं अत्रेही त्यावेळीं म्हणाले. मी सभा जिंकली खरी. त्यांत काय मोठंसं ? सभा जिंकेन असं पहिल्यापासूनच वाटत होतं मला. कारण माझी बाजू न्याय्य होती असा मला आत्मविश्वास होताच."

"प्रतिभासाधन वाद लोकांनीं उकरून काढला म्हणून आपल्याला उपद्यापी लोकांचा तिरस्कार वाटला नाहीं काय ?"

"कांहीं अधिकार नसतांना ज्यांनीं 'प्रतिभासाधन' वादांत भाग घेतला त्यांचं मला कांहीं वाटलं नाहीं. पण ज्यांचा अधिकार होता ते माझ्यातर्फे कांहीं बोलले नाहींत त्याचं मात्र मला फार वाईट वाटलं. त्यांच्या भित्रेपणाचा मला जास्त राग आला."

"आपल्या जीवनांत आपणांस आत्यंतिक असा कधीं आनंद झाला आहे काय ?"

"असा एकदां आनंद झाला आहे. म्हैसूर इथं एकदां बर्कतुल्ला यांचं गायन मला ऐकायला मिळालं त्यावेळीं मला परमोच्च आनंद झाला. अत्यंत दुर्मिळ अशा संधीचा लाभ मिळाला असं मला वाटलं."

"एकादी कादंबरी अगर नाटक वाचल्यावर आपणांस असा कधीं आनंद झाला आहे काय ?"

"कितीतरी वेळां ! माझ्या 'मनोहरच्या आकाशवाणीं'त मी ज्याचं रसग्रहण केलं तें मॉमचं 'Sacred Flame' हें नाटक वाचून मी आनंदानं बेहोष झालों. इंग्रजी वाङ्मयांत अशा कांहीं कादंबऱ्या आहेत, कीं त्या वाचल्यावर तशा कादंबऱ्या लिहिणं अगदीं असाध्य आहे असं वाटूं लागतं. गॅल्सवर्दीच्या कांहीं कादंबऱ्या अशाच आहेत. त्या वाचल्या म्हणजे अशा कादंबऱ्या आपणांस लिहितां आल्या पाहिजेत असं वाटूं लागतं"

"प्रतिभासाधन ग्रंथ लिहून झाला त्यावेळीं आपणांस फार आनंद झाला असेल नाहीं ?"

"त्या पुस्तकाची कल्पनाच मनांत आल्यापासून मी आनंदांत होतों. अन् तें पुस्तक ज्यावेळीं मी लिहून संपविलं त्यावेळीं एका मोठ्या पुस्तकाची भर मराठी वाङ्मयांत मी घातली असं मला वाटलं."

" आपलं पहिलं नाटक रंगभूमीवर आलं त्यावेळीं आपणांस काय वाटलं ? "

" रंगभूमीवर आलं त्यावेळीं कांहींच वाटलं नाहीं. पण नाटकाच्या तालमी घेत असतांना मात्र मला फार आनंद झाला. नाटकाच्या तालमी घेणं ही परम सुखाची गोष्ट आहे असं त्यावेळीं मला वाटलं. "

" कोणती गोष्ट आपल्या आयुष्यांत घडून आली तर आपणांस पराकाष्टेचा आनंद होईल ?"

" परदेशांत जायला मिळालं तर–जगांत सर्वत्र प्रवास करायला मिळाला तर." प्रो. फडके उद्गारले. "मला कीर्तीची हांव नाहीं. कीर्ति तकलुबी आहे. चार दोन दिवस लोक मोठ्या माणसाची आठवण करतात–तितकेच दिवस स्मारकाच्या गोष्टी बोलतात अन् मग विसरून जातात. "

" मग आपण एवढी जिवाची आटापीट करून लिहितां तरीं कां ? "

" आनंदांत वेळ जातो अन् शिवाय पैसेही मिळतात, अन् आतां मी राहवत नाहीं म्हणून लिहितों. "

" आपणांस लिहिण्यासाठीं स्फूर्तीवर अवलंबून राहावं लागतं का ? "

" मला स्फूर्तीची कधींच गरज भासत नाहीं. पण समजा, स्फूर्ति आली अन् कुणी लिहिलं नाहीं तर त्याचा प्राण जाईल असंही नाहीं. "

" आपणांस आत्यंतिक असं कधीं दुःख झालं आहे का ? "

" ज्यावेळीं लोकमान्य टिळक वारल्याची बातमी माझ्या कानीं आली त्यावेळीं मला आत्यंतिक दुःख झालं. कुणी मेल्यावर रडूं येतं याची मला त्या दिवशीं प्रतीति आली. माझ्या घरांतलीं माणसं गेलीं तरी तोंपर्यंत मी इतका कधीं रडलों नव्हतों. "

" आपल्या जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध नसलेल्या एकाद्या घटनेमुळं आपणांस कधीं दुःख झालं आहे काय ? "

" रत्नाकर मासिकाचे गोखले गेलीं सहा वर्षे नाहिंसे झाले आहेत. त्यांच्यासारख्या कर्तृत्ववान माणसाचं जीवन मातीमोल झालेलं पाहून मला मनस्वीं दुःख होतं. गोखले बेपत्ता झाले आहेत याची मला ज्या ज्या वेळीं स्मृति होते त्यावेळीं मी दुःखानं चूर होतों."

सातारा.

: १७ :

# आर्. एस्. निमकर

“ सार्वजनिक जीवनांत माझ्यावर कांहीं फारसे दुःखाचे प्रसंग आलेले नाहींत. अन् वैयक्तिक दुःखाला तर मी मुळींच महत्त्व देत नाहीं. मला खासगी असं जीवनच नाहीं म्हटलं तरी चालेल.”

आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळालेले मुंबईचे प्रसिद्ध कामगार पुढारी कॉ. आर्. एस्. निमकर यांनीं मुलाखतींत उद्गार काढले.

पहिल्या दर्जाचे कामगार-पुढारी या नात्यानें कॉ. निमकर यांना जगभर कीर्ति मिळाली आहे. पण त्यांना आपल्या लोकप्रियतेचें कांहींही वाटत नाहीं. कामगारांच्या कल्याणासाठीं वाटेल तें दिव्य करण्याचें जसें त्यांचें ध्येय आहे त्याचप्रमाणें लहान–थोरांशीं मिळून मिसळून वागण्याचेंही त्यांचें धोरण आहे. अन् त्या दृष्टीनें विचार केला म्हणजे ते खरोखरच कामगारांचे पुढारी आहेत असें वाटूं लागतें.

असामान्य बुद्धिमत्ता अन् हवा तेवढा पैसा मिळविण्याची ताकद अंगीं असतांही निमकर एखाद्या गरीब मजुरासारखेंच जीवन कंठीत आहेत. अन् वेळींप्रसंगीं रिकामा खिसा

असतांही ते कामगारांचें कार्य धीरानें चालवित आहेत. कॉ. निमकर पं. जवाहरलाल यांच्यासारखेच असामान्य बुद्धिमत्तेचे आहेत. पण पंडितजींना ज्याप्रमाणें त्यांच्या जीवनांत अवाढव्य संपत्तीचा पाठिंबा मिळाला त्याप्रमाणें कॉ. निमकर यांना मिळाला नाहीं इतकेंच. पंडितजी मनानें कवि आहेत. त्यांच्या काव्यपिपासु मनाचा विकास व्हायला त्यांना अनुकूल परिस्थिति मिळाली. पण परिस्थितीमुळें कॉ. निमकर यांच्या मनांतलें अन् जीवनांतलें काव्य जळून गेलें आहे. पण ध्येयवादाच्या बाबतींत पंडितजी आणि निमकर तुल्यबळ आहेत असें म्हटलें तर अतिशयोक्तीचें होणार नाहीं. कॉ. निमकर यांचा माझा परिचय गेल्या तीनचार वर्षांचा आहे. आपल्या एखाद्या निकट सहकाऱ्याकडून ट्रॅम–बससाठीं चारदोन आणे घेत असतांना आणि तितक्यांतच कुणी ओळखीचे मित्र भेटले तर त्याच चारदोन आण्यांचा त्यांना चहा पाजून सिगारेटचा धूर सोडीत जगाकडे बेफिकीर-पणानें पहात चालत चालत जातांना मी अनेकवार निमकर यांना पाहिलें आहे. पण ते जें हें दारिद्र्य भोगत आहेत तें काय निष्क्रियतेमुळें कीं पैसे कमावण्याची लायकी नाहीं म्हणून ? यांपैकीं एकही गोष्ट खरी नाहीं. ते ध्येयवादासाठींच हें दारिद्र्य भोगीत आहेत.

हे विचार माझ्या मनांत घोळत असतांनाच मी मुंबई गिरणीकामगार युनियनच्या ऑफिसांत प्रवेश केला. स्पष्टवक्तेपणा आणि बेफिकीरीची वृत्ति यामुळें कॉ. निमकर अनो-ळखी व्यक्तीला गर्विष्ट वाटतात खरे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. त्यांना स्वतःच्या कार्याचा अन् ध्येयवादाचा अभिमान आहे. पण इतरांच्या कार्याकडे अगर ध्येयवादाकडे ते कधीं तुच्छतेनें पहात नाहींत. टिळकांचें किंवा गांधीजीचें राजकारण त्यांना आज मान्य नाहीं. पण टिळकांच्या अनुयायांकडे अगर गांधीजींकडे ते कधींच तुच्छतेच्या भावनेनें पहात नाहींत. म्हणूनच कॉंग्रेस पुढाऱ्यांत पं. जवाहरलाल जसे मला फार आव-डतात त्याचप्रमाणें कामगार पुढाऱ्यांत निमकर मला सर्वांत जास्त आवडतात.

मी मुलाखतीचें स्वरूप कॉ. निमकर यांना समजावून सांगितल्यावर ते म्हणाले,

" मला रशियाला जातां आलं हा माझ्या जीवनांतील अत्यंत आनंदाचा प्रसंग आहे. मी लेनिनग्राडच्या धक्क्यावर ज्यावेळीं जाऊन उतरलों त्यावेळीं मी आनंदानें वेडा झालों. वेड्यासारखा मी इकडे तिकडे पहात होतों. अन् मी वेडा आहे अशा भावनेनं लोक माझ्याकडे पहात होते. रशियांत मी येऊन पोंचलों या भावनेनंच मी बेहोष झालों होतों. लेनिनग्राडला उतरल्यावर पहिली जर आनंदाच्या भरांत मी कोणती गोष्ट केली असेल तर

मुंबई गिरणी कामगार युनिअनचे अध्यक्ष व म्युनिसिपल वर्केर्स युनियनचे अध्यक्ष यांना मी मराठींत दोन पत्रं लिहिलीं. ''

थोडासा विचार करून कॉ. निमकर पुढें म्हणाले, " सुमारें चार वर्षे मीरत कटाच्या खटल्यांत माझं काम मीच चालवीत होतों. त्यावेळीं सरकारतर्फे काम चालविणारे बॅ. लँकफर्ड जेम्स यांनीं माझ्यावर टीका केली, त्यावेळीं मी त्यांच्या टीकेला असं सणसणीत उत्तर दिलं, कीं त्यांना एक शब्दही उच्चारूं दिला नाहीं. त्यावेळीं मला मागाहून खरोखरच अभिमान वाटला. "

" आपल्या खाजगी जीवनांतील कांहीं आनंदाचे प्रसंग सांगाल काय ? " मी त्यांना विचारलें.

" मला खाजगी असं जीवनच नाहीं तिथं आनंदाचे प्रसंग कुठले असणार ? "

" दुःखाचे तरी ? " मी त्यांना प्रश्न केला.

" दुःखाचे काय, नेहमींचेच आहेत " कॉ. निमकर हंसत हंसत म्हणाले, " माझ्या सार्वजनिक आयुष्यांत मात्र आनंदाचे अनेक प्रसंग आहेत. "

" मग ते तरी सांगा. " मी म्हटलें.

" माझ्या जीवनांतील ते प्रसंग असे आहेत, कीं मी त्यांची वाच्यता केली तर लोक माझ्यावर गर्विष्ठपणाचा आरोप करतील. "

" तुम्हीं कांहीं आपण होऊन ते प्रसंग सांगत नाहीं, मीच तुम्हांला विचारतों आहे. शिवाय आपल्या जीवनांत जे अभिमानाचे असे प्रसंग आले आहेत त्यांचं सिंहावलोकन करायला काय हरकत आहे ? "

जगाविषयीं पूर्ण बेफिकिरी दाखविणाऱ्या आपल्या किंचित कर्कश हास्याचे ध्वनि उमटवीत कॉ. निमकर म्हणाले, " मी परवां ज्यावेळीं जिनिव्हाला गेलों त्यावेळीं अशाच एका प्रसंगामुळं मला आनंद झाला. खरं म्हटलं तर लिहून नेलेलीं भाषणं तिथं वाचून दाखवायचीं असतात. मी त्यांच्या नियमाप्रमाणं एकदोन भाषणं लिहून वाचलींही. पण एक मात्र Extempore असं भाषण मी केलं. तें माझं भाषण तेथील शॉर्टहॅन्ड टायपिस्ट मुलीही लिहून घेऊ शकल्या नाहींत. तें माझं भाषण संपल्यावर निरनिराळ्या देशांच्या परिषदेला हजर राहिलेल्या प्रतिनिधींपैकीं कांहीं प्रतिनिधींनीं मुद्दाम येऊन मला शेकहॅन्ड केलं अन् भाषणाबद्दल माझं अभिनंदन केलं. त्यावेळीं मला खरोखरच अभिमान वाटला. "

" आपल्या सार्वजनिक आयुष्यांत दुःखाचा असा एकादाही प्रसंग आपल्यावर आलेला नाहीं का ? "

" गेल्या संपाच्या वेळीं असा प्रसंग माझ्यावर आला. त्या संपाला माझा पहिल्यापासूनच विरोध होता. त्या संपांतून कामगारांचा कांहीं फायदा होणार नाहीं असं मला वाटत होतं. आणि युनियनच्या मान्यतेचा प्रश्न मला जास्त महत्त्वाचा वाटत होता. माझं असं मत असल्यामुळं डांगे प्रभृति माझ्या सहकाऱ्यांशीं माझे खटक्याचे अनेक प्रसंग आले. पण डांगे प्रभृति माझे मित्र ज्यावेळीं तुरुंगांत गेले त्यावेळीं माझा विरोध असलेल्या संपाचं पुढारीपण मला पत्करावं लागलं. नंतर संप मागं घेण्याचा ज्यावेळीं माझ्यावर प्रसंग आला त्यावेळीं माझ्या डोळ्यांतून पाणी आलं. दोन कारणांमुळं मला दुःख झालं. एक म्हणजे संप पुकारणारे माझे सहकारी माझ्या जवळ नव्हते, आणि दुसरं म्हणजे संप मागं घ्यावा लागतो. "

यानंतर थोडा वेळ थांबून कॉ. निमकर पुढें म्हणाले, " माझ्या सार्वजनिक आयुष्यांत माझ्यावर आनंदाचे प्रसंग आले आहेत. एकदां लोकमान्य टिळकांनीं माझी पाठ थोपटली त्यावेळीं मला अननुभूत आनंद झाला ! "

" कोणत्या वेळीं आपली पाठ थोपटली ? "

" त्याचं असं झालं, " कॉ. निमकर यांनीं बोलायला सुरवात केली, " लाला लजपतराय ज्यावेळीं हिंदुस्थानांत आले त्यावेळीं त्यांच्या स्वागताच्या सभेला लो. टिळकांना अध्यक्ष होण्याविषयीं मी तार केली. Home Rule League तर्फेंही त्यांना अध्यक्ष होण्याविषयीं तार करण्यांत आली होती. लोकमान्य सभेला आले त्यावेळीं माझी पाठ थोपटून ते म्हणाले, " तुझी तार आली असतांना होमरूल लीगच्या सभेचा मी कसा अध्यक्ष होईन ? " लोकमान्यांसारख्या पुढाऱ्याला माझ्याविषयीं इतका लोभ वाटतो तें पाहून मला खरोखरच परमावधीचा आनंद झाला. गांधीजीनीं मला भेटीला बोलावलं त्यावेळीं असाच मला आनंद झाला. पण गांधिजीनीं मला चांगला दम दिला. "

" गांधींनीं कां दम भरला तुम्हांला ? "

" त्याचं असं झालं," कॉ. निमकर बोलूं लागले, " आम्हीं एक सभा उधळून लावली होती. ती बातमी जेव्हां गांधींजीना कळली तेव्हां त्यांनीं मला मुद्दाम मणिभवनांत बोलावून नेलं, अन् मला अहिंसेवर एक तास व्याख्यान दिलं. त्यावेळीं मला खरोखरच अभिमान वाटला. पण माझ्या जीवनांतील परमोच्च सुखाचा क्षण जर कोणता असेल तर रशियाला गेलों त्यावेळीं लेनिनच्या शवाचं दर्शन घेण्याची मला संधि मिळाली तो. "

अन् त्यावेळीं खरोखरच कॉ. निमकर यांच्या नेत्रांत आनंदाश्रु चमकले !

आनंदाच्या प्रसंगावर पुढें बोलतांना कॉ. निमकर म्हणाले, ' इंग्लंडमधें मी सात आठ-वडे राहिलों त्यावेळीं इंग्रजी जनतेनं माझं मोठ्या प्रेमानं स्वागत केलं. ' हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांपैकीं एका—दोघांच्याच नशिबीं असं स्वागत आलं असेल. ' असे माझ्या एका मित्रानं उद्गार काढले. पं. नेहरूंचं असं नेहमीं स्वागत होतं. त्यांच्या मानानं मी कितीतरी लहान; पण त्या स्वागतानं मात्र मला आनंद झाला. मान मिळावा म्हणून कोणतीही गोष्ट मी करीत नाहीं. पण कुणी माझं स्वागत केलं म्हणजे आनंद व्हायचाच."

आपल्या एकंदर आयुष्यासंबंधीं बोलतांना कॉ. निमकर म्हणाले, "सार्वजनिक आयुष्यांत माझ्यावर दुःखाचे प्रसंग फारसे आले नाहींत. अन् वैयक्तिक दुःखाला मी फारसं महत्त्व देत नाहीं. तरीही माझे वडील वारले त्यावेळीं मात्र मला अपरिमित दुःख झालं. याचं कारण ज्या परिस्थितींत त्यांना मृत्यु आला त्या परिस्थितीमुळं मला वाईट वाटलं. मी फारसा त्यांच्या सहवासांत आलोंच नाहीं. त्यांच्या मृत्यूपूर्वी कांहीं दिवस एक रात्रच मी त्यांच्या सहवासांत आलों; अन् मीरत खटल्यांत मला शिक्षा झाल्याचं कळतांच त्या धक्क्यानं अगदीं अल्पावधींतच ते मरण पावले ! अन् म्हणूनच अजूनही त्यांच्या मृत्यूची आठवण झाली म्हणजे मला हळहळ लागते. "

" राजकीय चळवळीमुळं संसाराला पारखं झाल्याबद्दल आपल्याला कधीं वाईट वाटत नाहीं का ? "

" मुळींच नाहीं. मला जर कशामुळं वाईट वाटत असेल तर लोकांना आर्थिक मदत करतां येत नाहीं म्हणून. कुणीतरी मदतीसाठीं तोंड उघडलं अन् खिशांत हात घालतांच तो रिकामा असल्याचं दिसून आलं म्हणजे मात्र मला आत्यंतिक दुःख होतं. खरं म्हटलं तर माझ्या आयुष्याला एकच बाजू आहे आणि ती म्हणजे राजकारण ! "

" राजकारणाला किंवा सार्वजनिक आयुष्याला वाहून घेतलेल्या माणसानं लग्न करूं नये असं आपणांस वाटतं का ? "

" माणसानं अविवाहित राहूं नये असं माझं मत आहे. सार्वजनिक जीवनक्रमांत भाग घेणाऱ्या माणसानं तर अवश्य लग्न करावं. कारण अनेक कारणांमुळं त्याचं डोकं नेहमीं संतप्त होतं. तेव्हां कौटुंबिक जीवनाशिवाय त्याच्या मनाला शांतता लाभणं शक्य नाहीं. स्त्रीसहवास ही एक नैसर्गिक गोष्ट आहे. कोणतीही नैसर्गिक गोष्ट माणसाला हितावह असते. म्हणूनच मी म्हणतों प्रत्येकानं लग्न करावं. "

: १८ :

# ग. त्र्यं. माडखोलकर

" माझ्या जीवनांतील दोन उल्लेखनीय आनंदाचे प्रसंग म्हणजे कोल्हटकर–केळकरांची भेट. माझ्या आयुष्यांत अगदीं तरुणपणीं मी तीन महत्त्वाकांक्षा बाळगल्या होत्या. त्या म्हणजे हरिभाऊ आपटे, तात्यासाहेब कोल्हटकर आणि तात्यासाहेब केळकर यांच्या ओळखी होणं. कोल्हटकर–केळकरांची ओळख होण्याची माझी इच्छा पूर्ण झाली. पण हरिभाऊंची ओळख करून घेण्याची इच्छा मात्र अतृप्तच राहिली. कारण मी लेखक म्हणून पुढं येण्यापूर्वींच हरिभाऊ निधन पावले."

असे उद्गार महाराष्ट्राचे आवडते लेखक ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं काढले.

माडखोलकर यांना कधींही भेटणें मला नेहमीं आवडतें. याचें कारण त्यांच्या तोंडून कुणाचीही वैयक्तिक निंदा ऐकूं येण्यापेक्षां काव्यशास्त्रविनोदच ऐकूं येतो. माडखोलकर यांचे पूर्वींचे टीकालेख ज्यांनीं वाचले असतील त्यांना माडखोलकर हे फार करड्या स्वभा-

वाचे असतील असें वाटणें साहजिक आहे. पण त्यांच्या थोड्या परिचयानेंही कुणालाही असें कळून चुकेल, कीं माडखोलकरांची लेखणी जितकी तीक्ष्ण आहे तितकीच त्यांची वाणी अन् त्यांचा स्वभाव गोड आहे

माडखोलकर प्रेमळ आहेत. त्यांचा मित्रपरिवार मोठा आहे. पण आपल्या मित्रपरिवाराच्या मतांचें मात्र त्यांच्यावर कधींच दडपण पडत नाहीं. अन् माझ्या मतें हेंच त्यांच्या स्वभावाचें वैशिष्ट्य आहे.

" आपल्या जीवनांतील एखादा आनंदाचा प्रसंग सांगाल का ? " मी त्यांना प्रश्न केला.

" तसं पाहिलं तर माझ्या जीवनांत आनंदाचे अनेक प्रसंग आहेत." गजाननराव म्हणाले.

" आणि दुःखाचे ? "

" तेही फार आहेत कीं ! "

गजाननरावांनीं हंसत हंसत उत्तर दिलें, " पण माझ्या आयुष्यांतील अत्यंत आनंदाचा प्रसंग सांगायचा झाला तर १९२० सालच्या जून महिन्यांतील एका प्रसंगाची आठवण द्यावी लागेल. १९१९ च्या मे महिन्यांत मी मॅट्रिकमधें नापास झालों आणि त्याच दिवशीं सायंकाळीं मी पुनः कधीं परीक्षेला बसणार नाहीं, असं वडिलांना सांगून टाकलं. "

" असा कां निश्चय केलात तुम्हीं ? " मी विचारलें.

" गणितांत कधींच पास होणार नाहीं अशी खात्री होती म्हणून ! " गजाननराव हंसत हंसत म्हणाले, " माझ्या त्या नकाराचा माझ्या वडिलांना इतका राग आला, कीं पुढं एक महिनाभर त्यांनीं माझ्याशीं भाषण वर्ज्य केलं. पुढं त्यांनीं आपलं मौन सोडलं आणि मुंबईच्या गवालिया टँकवर असलेल्या गोकुळदास तेजपाळ पाठशाळेंत नांव दाखल करण्याचा मला त्यांनीं आग्रह केला. त्यांच्या आग्रहाची भूमिका मला इथं स्पष्ट करणं भाग आहे. माझं मातुल घराणं हें बाळशास्त्री जांभेकरांचं आहे. माझे आजोबा नारायणशास्त्री जांभेकर हे त्यावेळचे प्रसिद्ध शास्त्री आणि ज्योतिषी. माझे थोरले मामा महादेवशास्त्री जांभेकर हे कोल्हापूर इथं कवि आणि व्युत्पन्न म्हणून प्रसिद्ध होते. माझे दुसरे मामा धुंडिराजशास्त्री जांभेकर हे इंदूरच्या संस्कृत महाविद्यालयांत आज अध्यापक आहेत. माझ्या आईनंसुद्धां माझ्या वडिलांच्या नेतृत्वाखालीं संस्कृत वाङ्मयाचा चांगला अभ्यास केला होता. त्यामुळं माझ्या वडिलांची इच्छा अशी, कीं मला संस्कृत पंडित बनवून अन् शेवटीं पंजाब विद्यापीठाच्या परीक्षेला बसवून प्रोफेसर बनवायचं. मी वडिलांच्या

इच्छेला मान देऊन संस्कृत शाळेंत नांव दाखल केलं. मी वर्षभर तिथं जात होतों-पण माझ्या अभिरुचीला योग्य असा मार्ग शोधून काढण्याची माझी धडपड चालूच होती. १९२० सालच्या जूनमधें त्यावेळीं अत्यंत लोकप्रिय असलेल्या 'नवयुग' मासिकांत माझी 'शिवप्रभूस' ही कविता प्रसिद्ध झाली. 'नवयुगा' चे संपादक गणपतराव कुळकर्णी यांचें लेखनसहाय्यासंबंधीं मला पत्र आलं. त्यावेळीं मात्र मला हवा असलेला मार्ग सांपडल्याचा आनंद झाला. त्या आनंदानं मी बेहोष झालों. त्यानंतर मात्र त्यानंतर मी संस्कृत पाठशाळेंत कधीं पाऊलही टाकलं नाहीं."

"आणखी कांहीं आनंदाचे प्रसंग सांगाल का?"

"हरिभाऊ आपटे, तात्यासाहेब कोल्हटकर आणि तात्यासाहेब केळकर यांच्या भेटीची मला विशेष उत्सुकता वाटत होती. १९१७ सालीं मीं पुण्याला होतों; त्यावेळीं हरिभाऊंचं दर्शन व्हावं म्हणून मी दररोज आनंदाश्रमावरून फेऱ्या घालीत होतों. हरिभाऊंची अशी पद्धत असे, कीं ते आनंदाश्रमाच्या आंगणांतील कारंजाजवळच्या बांकावर बसत असत. त्यामुळं ते रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्याला प्रत्यक्ष दिसत. त्यांचं दर्शन घेतलं म्हणजे मला आनंद होत असे."

"पण त्यांची तुमची शेवटीं ओळख झाली कीं नाहीं?"

"नाहीं." गजाननराव विषादानें म्हणाले, "मी लेखक म्हणून पुढं येण्यापूर्वींच ते निधन पावले अन् त्यांची माझी ओळख झाली नाहीं. मला याचं अजूनही वाईट वाटतं!"

"आनंदाश्रमांत तुम्हीं इतक्या खेपा टाकत होतां. मग हरिभाऊंची तुम्हीं भेट कां घेतली नाहीं?"

"आपण होऊन कोणत्याही बड्या माणसाच्या भेटीला जावं असं मला वाटत नाहीं. माझी ही अहंकारी वृत्ति म्हणा पाहिजे तर. पण मला आवडणाऱ्या अन् आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तींनाही मी कधीं आपण होऊन भेटलों नाहीं. कोल्हटकर, केळकर हे माझे आवडते लेखक. पण त्यांनाही आपण होऊन मी कधीं भेटलों नाहीं."

"मग कोल्हटकर–केळकरांची आपली भेट कशी काय झाली?"

"त्याची माहिती मी 'माझे आवडते लेखक' मधील 'दोन तात्या' या लेखांत दिलीच आहे. १९२० सालीं 'आधुनिक कविपंचक' मधील माझे चार लेख नवयुगांतून प्रसिद्ध झाले. कोल्हटकरांना ते लेख फारच आवडले अन् त्यांनींच मला

भेटीसाठीं बोलावलं. त्यांच्या भेटीचा जुळून आलेला योग पाहून मला पराकाष्ठेचा आनंद झाला. केळकरांच्या भेटीचाही असाच योग जुळून आला. १९२१ सालच्या जानेवारींत मी आयर्लंडमधील सिनफेन चळवळीवरील लेखमाला ' केसरी ' कडे पाठविली. तात्यासाहेब केळकरांना ती इतकी आवडली, कीं त्यांनीं ती ' केसरीं 'त अग्रलेखाच्या शेजारीं प्रसिद्ध करतों असं मला पत्र लिहिलं. अन् पत्राप्रमाणं त्यांनीं ती ' केसरीं 'त अग्रलेखाच्या शेजारीं छापलीही. त्यानंतर त्यांनीं सरदारगृहांत भेटायलाही बोलाविलं. त्यांच्या भेटीनं मला आनंद झाला हें खरं. पण त्याहीपेक्षां त्यांच्या पत्रानं मला आनंद झाला."

" आपली पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली त्यावेळीं आपणांस आनंद झाला नाहीं का ? "

" खरं सांगायचं म्हणजे मला मुळींच आनंद झाला नाहीं. ती माझी आत्मचरित्रपर कादंबरी आहे. पण कां कुणास ठाऊक, मला तिच्या प्रकाशनाबद्दल कांहींच वाटलं नाहीं. माझ्या पत्नीला मात्र त्याचा फार आनंद झाला. It was her great ambition that I should be a novelist. तिनंच मला कादंबरीकार बनवलं."

" नंतरच्याही कुठल्या प्रकाशनानं आपणांस आनंद झाला नाहीं ? "

" कुठल्याही वेळीं आनंद झाला नाहीं." माडखोलकर म्हणाले, " पुस्तक-प्रकाशनानं जरी नाहीं तरी तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं एकदां माझ्याविषयीं जे उद्गार काढले त्यावेळीं मात्र मला परमावधीचा आनंद झाला."

" कोणत्या प्रसंगीं उद्गार काढले त्यांनीं ? " मी त्यांना प्रश्न केला.

" १९२२ सालीं तात्यासाहेब कोल्हटकर पुण्याच्या कवि-सम्मेलनाचे अध्यक्ष झाले त्यावेळीं अध्यक्षीय भाषण लिहितांना त्यांनीं माझी सर्व प्रकारं मदत घेतली. काम आटोपल्यानंतर रात्रीं १२ वाजतां ज्यावेळीं मी घरीं जायला निघालों तेव्हां तात्यासाहेब कोल्हटकर मला म्हणाले, ' तुमची आजच इतकी तयारी आहे, कीं तुम्हांला साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व्हायला आमच्याइतकं थांबावं लागणार नाहीं. ' मला खरोखरीच फार आनंद झाला. आणि १९३६ सालीं महेश्वर येथील मध्यभारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं ज्यावेळीं माझी निवड झाली त्यावेळीं मला तात्यासाहेबांच्या आशीर्वादाची आठवण होऊन हा आनंदाचा योग पहायला ते हयात नाहींत म्हणून वाईट वाटलं."

" हें झालं वाङ्मयीन जीवनासंबंधीं. आपल्या खासगी जीवनांतलि कांहीं आनंदाचे अगर दुःखाचे प्रसंग सांगाल का ? "

" घरगुती सुखदुःखाचे अनेक प्रसंग माझ्या जीवनांत आले आहेत. माझ्या लग्नानंतर बारा वर्षांनीं अन् तीसुद्धां लग्नाच्या तारखेदिवशीं ज्यावेळीं माझी पत्नी जी. ए. झाली तो दिवस मला परमावधीच्या आनंदाचा वाटला. त्याचं कारण असं, कीं आमचं लग्न झालं तेव्हां माझ्या पत्नीचं अवघं मराठी पांचवीपर्यंत शिक्षण झालेलं होतं. अशा कमी शिकलेल्या मुलीशीं मी लग्न केल्यामुळं माझ्या बहुतेक मित्रांनीं नाकं मुरडलीं. अन् म्हणूनच माझ्या पत्नीनं आपल्यामधील बुद्धि प्रगट करतांच मला आनंद झाला. माझ्या जीवनांत दुःखाचे प्रसंग आहेत तसेच आनंदाचे प्रसंग आहेत. पण एकंदरींत माझं जीवन—निदान आजचं जीवन तरी सुखी वाटतं. माझ्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाचे असे एकदोन प्रसंग आहेत, पण ते खाजगी आहेत. "

" आत्मचरित्रासाठीं खास राखून ठेवले असतील ते आपण ! "

" असं म्हटलं तरी चालेल. " माडखोलकर उद्गारले, " १९२३ पर्यंत माझं जीवन फारच निराशेचं गेलं. १९२३ पर्यंत दर वर्षीं आमच्या घरांतील कुणाचा तरी मृत्यु पहाण्याचं दुर्भाग्य मला लाभलं होतं. माझ्या पांच भावंडांचे मृत्यु मी समक्ष पाहिले आहेत. माझा अन् माझ्या आप्तेष्टांच्या मृत्यूचा काय अन्योन्यसंबंध होता कुणास ठाऊक. पण माझी आजीसुद्धां माझ्या जन्माच्या सातव्या दिवशीं निधन पावली. माझ्या वडिलांना पहिल्या बायकोचीं सहा अन् दुसऱ्या बायकोचीं म्हणजे माझ्या आईचीं पांच मिळून अकरा मुलं होतीं. त्यांपैकीं मीच काय तो त्यांना शेवटपर्यंत हयात आहे. आपल्या अकरा अपत्यांपैकीं जें एकच अपत्य अन् तोही पुनः मुलगा जगून वांचून आपल्या हातीं लागला या घटनेमुळं माझ्या वडिलांचं मन माझ्या बाबतींत अतिशय हळवं आणि भितरं झालं होतं. ते नेहमीं म्हणायचे, ' एक डोळा अन् एक मुलगा असणं सारखंच; एका डोळ्याला अपघात झाल्यानं जसा सगळा जन्म अंधारांत काढावा लागतो तसाच एक मुलगा जर आपल्याला दुरावला तर आपलं आयुष्य कायमचं दुःखी होतं.' कांहीं दिवसांपूर्वीं माझे परमस्नेही बडोद्याचे लोकप्रिय विनोद-पंडित प्रो. चिंतामणराव जोशी यांचा एकुलता एक गुणी पुत्र वारल्याबद्दल जें विलक्षण हृदयद्रावक पत्र चिंतामणरावजींनीं मला लिहिलं होतं तें वाचल्यावर माझ्या

वडिलांचे हे उद्गार एकवार आठवले. त्यांच्या मजवरील अलौकिक प्रेमामुळं मी अतिशय शिस्तींत वाढविला गेलों; त्यामुळं परावलंबी व पंगूही झालों आहे."

"या संकटपरंपरेमुळं आपल्या जीवनावर कांहीं अनिष्ट परिणाम झाला आहे काय ?"

"सतत मृत्युपरंपरेमुळं माझी मनोवृत्ति उदासीन आणि कठोर बनली. पण लग्न झाल्या-नंतरचं गेल्या पंधरा वर्षांचं माझं आयुष्य कमालीचं सुखांत गेलं. मला कधीं कधीं असं वाटतं, कीं माझं एकट्याचं नशीब वाईट होतं म्हणूनच माझ्यावर दुःखपरंपरा ओढवत होती. कारण ज्यावेळीं शान्ताबाईनीं माझ्या जीवनांत प्रवेश केला त्यावेळीं त्यांनीं आपल्या-बरोबर माझ्या जीवनांत आनंद आणि आशावाद आणला." गजाननराव अभिमानानें उद्गारले.

: १९ :

# एस्. के. पाटील

"राजकीय जीवनाशिवाय मला दुसरं जीवन नाहीं. कुणाला आश्चर्य वाटेल, पण माझे नातेवाईक कोण आहेत आणि कुठं आहेत याचीही मला जाणीव नसते."

असे उद्गार मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे एक जनरल सेक्रेटरी एस्. के. पाटील यांनीं काढले.

"आपल्या राजकीय जीवनांतील एकादा सुखाचा प्रसंग सांगाल का ?" मी पाटील यांना प्रश्न विचारला.

"मी १९२० सालीं कॉलेज सोडलं त्या वेळचा प्रसंग मला अजूनही ताजा वाटतो. नागपूर काँग्रेसच्या पूर्वी शांतारामाच्या चाळींत गांधीजींची पहिली सभा भरली होती. त्या सभेला सुमारे दोन हजार विद्यार्थी जमले होते. त्या सभेंत कॉलेज सोडण्याचा निर्णय घेणारा मीच पहिला विद्यार्थी होतों. त्या निर्णयामुळं माझ्या जीवनाला अगदीं निराळं वळण

लागलं. ज्या उत्साहानं मी तो निर्णय घेतला तो माझा उत्साह अजूनही कायम आहे. अन् त्या प्रसंगाची मला स्मृति झाली कीं अजूनही मला पुनःप्रत्ययाचा आनंद झाल्या-खेरीज राहात नाहीं. "

" त्यानंतरच्या एकाद्या प्रसंगाची आपण माहिती सांगाल का ?"

" त्यानंतर खरं सांगायचं म्हणजे माझ्या जीवनांत अनेक प्रसंग घडलेले आहेत. व्यक्तीचं जीवन हें निरनिराळ्या प्रसंगांचा इतिहास आहे. त्याला मी तरी अपवाद कसा ठरेन ? पण राजकीय जीवनाशिवाय मला जीवन नाहीं. कुणाला हें अतिशयोक्तीचं वाटेल. पण कोणत्या तरी ध्येयानं कोणत्याही चळवळींत कार्य केलं म्हणजे माणूस त्यांत समरस होतो. त्या जीवनाची त्याला संवय होते. "

" राजकीय जीवनांतील प्रसंग असले तरी चालतील." मीं त्यांना सांगितलें.

" राजकीय जीवनांत माझ्यावर अनेक सुखदुःखाचे प्रसंग आले आहेत. लंडनमधें असतानांचा एक प्रसंग मला आठवतो. ब्रिटिश पार्लमेन्टचे सभासद सर वाल्टर सॉर्टर यांचा अन् माझा हिंदी प्रश्नावर बरेच दिवस पत्रव्यवहार चालू होता. त्या पत्रव्यवहाराच्या वेळीं त्यांनीं माझी जी प्रशंसा केली होती त्यामुळं त्यावेळीं मला फारच आनंद झाला. पण आज मला त्याचं कांहीं वाटत नाहीं. मी फ्रान्समधें कांहीं महिने होतों त्यावेळीं माझं आयुष्य फारच आनंदांत गेलं. "

" तिथले कांहीं अनुभव आपण सांगू शकाल काय ? "

" तिथले विशिष्ट असे प्रसंग कांहीं मला आठवत नाहींत. पण एकंदरींत तिथलं माझं जीवन सुखाचं गेलं आहे. फ्रान्स हें राष्ट्रही थोडंसं साम्राज्यवादी राष्ट्र आहे खरं. पण तिथं Racial prejudices मुळींच नाहींत. तिथली संस्कृति जशी उच्च आहे त्याचप्रमाणं तिथले लोकही दिलदार आहेत. फ्रेंच संस्कृतीविषयीं अन् जनतेविषयींही मला आदर आहे. चालू युद्धांत फ्रान्सची हानि झाली तर त्यामुळं जगाचं मोठं नुकसान होईल असं माझं मत आहे."

" गांधीजींची आपली पहिली भेट झाली त्यावेळीं आपणांस अपरिमित आनंद झाला असेल नाहीं ? "

" गांधीजींच्या व्यक्तित्वाचा इतका प्रभाव आहे, कीं कुणीही मनुष्य त्यांना भेटायला गेल्यावर त्यांच्यापुढं आदरानं मान वांकवितो. मी तर त्यांची भेट घेतली ती

त्यांचा अनुयायी म्हणूनच. तेव्हां मला आनंद झाला तर कांहींच नवल नाहीं. गांधीजींविषयीं मला वाटत असलेला आदर दिवसेंदिवस वाढतच आहे. गांधीजींच्या व्यक्तिमत्वाविषयीं अन् मुत्सद्देगिरीविषयीं त्यांच्या विरोधकांनाही तक्रार करतां येणार नाहीं. चालू युद्धाविषयीं त्यांनीं जें धोरण स्वीकारलं आहे ती पहिल्या प्रतीची मुत्सद्देगिरी ( Highest illustration of statesmanship ) आहे असं म्हणतां येईल. म्हणूनच गांधीजींविषयीं कुणी अनुदार उद्गार काढले, कीं मला आत्यंतिक दुःख होतं. गांधीजीवर वैयक्तिक टीका करणारा माणूस त्या वेळीं मला समोर दिसला तर अनत्याचाराचं तत्त्व मला सांवरून धरीलच याची कांहीं मी ग्वाही देऊं शकणार नाहीं. कारण पुढल्या शंभर वर्षांतसुद्धां गांधीजींसारखा पुढारी हिंदी राष्ट्राला लाभेल असं मला वाटत नाहीं."

"आपल्या राजकीय जीवनांत आत्यंतिक आनंदाचा प्रसंग एकादां तरी आला आहे काय?"

"असा एकच प्रसंग आहे, अन् तो म्हणजे गेल्या असेंब्लीच्या निवडणुकीच्या वेळचा. असेंब्लीच्या निवडणुकीला उभं राहावं असं मला वाटत नव्हतं. सरदारजींचंही तेंच मत होतं."

"असं आपणांस कां वाटत होतं?"

"याचं कारण असेंब्लींत न जातां बाहेर राहून मला बरंच कार्य करतां येण्यासारखं आहे असं मला वाटत होतं—अजूनही वाटतं. कारण असेंब्लींत निवडून आल्यावर थोडा तरी कालापव्यय होणार असं मला वाटतच होतं. मी ज्या मतदारसंघांतून उभा राहिलों त्याच मतदारसंघांतून बाळासाहेब खेर यांनीं उभं राहावं असे प्रयत्न करण्यांत आले. पण बाळासाहेबांनीं तें नाकारलं. डॉ. देशमुख यांनींही या मतदारसंघातर्फे उभं राहायची तेवढी आस्था दाखविली नाहीं. अन् विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या जागेसाठीं कोणत्याही महाराष्ट्रीयाचा अर्ज आला नव्हता. शिवाय माझ्या या उमेदवारीला मुंबईतील सर्व मराठी साप्ताहिकांचा कसून विरोध होता. विविधवृत्तप्रभृति साप्ताहिकांनीं त्यावेळीं माझ्याविषयीं अनेक धादान्त खोट्या बातम्या प्रसिद्ध केल्या. माझ्यावर निंदाप्रचुर टीकेचा नुसता भडिमार केला. हीं पत्रं नेहमीं प्रांतिक दृष्टीनं राजकारणाचा खल करतात. त्यावेळीं महाराष्ट्राविषयींचा त्यांचा अभिमान कुठं गेला होता? खरं सांगायचं म्हणजे मला त्या टीकेची पर्वा वाटत नव्हती. I had got tremendous faith in the robust

common-sense of Maharastrians. अन् निवडणुकीच्या वेळीं त्याचं मला प्रत्यंतर आलं. नियतकालिकांतील टीकेचा उलटा परिणाम झाल्याचं मला आढळून आलं."

आपणांला राजकीय आयुष्यांत आलेल्या विविध प्रसंगांचें वर्णन करतांना पाटील पुढें म्हणाले, " गुजराती लोकांनीं कॉंग्रेस काबीज केली अशी तक्रार केली जाते. पण महाराष्ट्रीय लोकच जर मागं राहूं लागले तर तो कुणाचा दोष ? मी गेलीं वीस वर्षे कॉंग्रेसमधें प्रत्यक्ष कार्य करीत आहे. पण मला कांहीं अजून कोणत्याही गुजराथ्यानं कुठंही विरोध केल्याचं आठवत नाहीं. गेल्या म्युनिसिपल निवडणुकीच्या वेळीं डॉ. म्हसकर यांनीं कॉंग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवावी असे मी शिकस्तीचे प्रयत्न केले. पण डॉ. म्हसकरांनीं कांहीं त्याला मान्यता दिली नाहीं. मी असे सतत प्रयत्न करतों. कॉंग्रेसमधें महाराष्ट्रीयांना योग्य स्थान मिळावं अशी माझी नेहमीं खटपट चालू असते. पण महाराष्ट्रीय माणसं पुढाकारच घेत नाहींत. त्यांना कॉंग्रेसमधें येण्यास कुणीही मज्जाव केलेला नाहीं. चांगल्या माणसांनीं कॉंग्रेसमधें येण्याचं नाकारलं अन् त्यांच्या जागा इतरांनीं अडविल्या तर त्याला कोण काय करणार ? राजकारण कांहीं व्यक्तीसाठीं अडून बसत नाहीं. महाराष्ट्रांत यादवी आहे, अंतस्थ कलह आहेत अन् त्यामुळंच आपल्या प्रान्ताची प्रगति कुंठित झाली आहे; अन् ही परिस्थिति ज्यावेळीं माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते त्यावेळीं मला आत्यंतिक दुःख होतं. "

" आपल्या खाजगी जीवनांतील कांहीं महत्त्वाचे प्रसंग सांगाल का ?"

" I can't understand what my private life is ! In my life private life has become insignificant." पाटील यांनीं उत्तर दिलें.

' आपल्यावर ज्यावेळीं वृत्तपत्रांतून वैयक्तिक टीका केली जाते त्यावेळीं आपणांस वाईट वाटत नाहीं का ?"

" विविधवृत्त माझ्यावर नेहमीं टीका करतें-वैयक्तिक टीका करतें. पण गेल्या तीन चार वर्षांत मी विविधवृत्ताच्या अंकाला कधीं नुसता स्पर्शही केलेला नाहीं. 'नागरिक' चा एकादाही अंक मी अजून हातीं घेतलेला नाहीं. टीकेला मी घाबरतों असं नाहीं. प्रामाणिक टीका मला आवडते. ' टाइम्स ' हें पत्र कांहीं कॉंग्रेसचं नाहीं. त्या पत्रांतील टीका आम्हीं वाचतों. याचं कारण ती टीका बौद्धिकतेच्या उच्च भूमिकेवरून केलेली असते. विविधवृत्ताच्या टीकेला कांहीं राजकारणाचा अगर मतांचा पायाच नाहीं. त्या टीकेंत

Commercial aim असतो. पोटभरूणाची वृत्ति असते. तेव्हां अशी टीका वाचून कालापव्यय करायचं कारण तरी काय? वैयक्तिक टीका करणं हेंच ज्यांचं धोरण त्या वृत्तपत्रांना मी कधींही स्पर्श करीत नाहीं."

आपल्या खाजगी जीवनक्रमाविषयीं बोलतांना ते पुनः पुढें म्हणाले, "माझं जीवनच असं झालं आहे, कीं आतां माझ्या साऱ्या इष्टमित्रांना मी पारखा झालों आहें. माझी जी कांहीं नात्यागोत्याची मंडळी आहे ती सर्वच कांहीं माझ्या ओळखीची नाहीं. कधीं कुणी येऊन आपण नात्याचा असल्याचं मला सांगतो. त्यानं नांवगांव सांगितल्यानंतर मी विचार करूं लागतों. And I laugh to myself. कारण त्या गृहस्थांना मी कुठं पाहिल्याचं मला कधींच स्मरत नाहीं. ही मनाची क्रूरता नाहीं किंवा बेफिकीरीही नाहीं. माझ्या नातेवाईकांशीं माझा फारसा संबंध येत नाहीं. त्यांच्या सहवासाची मला कधीं संधि लाभत नाहीं हें त्याचं कारण आहे."

: २० :

# य. गो. जोशी

"माझं इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंतच शिक्षण झालं आहे. चौथ्या इयत्तेपर्यंतच्या शिक्षणक्रमांतील पुस्तकांपेक्षां मी अजून एकही इंग्रजी पुस्तक वाचलेलं नाहीं. मी इंग्रजी वाङ्मय वाचत नाहीं याचं कारण इंग्रजी वाङ्मय समजण्याइतकं माझं इंग्रजीचं ज्ञान नाहीं."

महाराष्ट्राचे आवडते कथालेखक य. गो. जोशी यांनीं मुलाखतींत वरील उद्गार काढले. यशवन्तराव जोशी यांना कुणी अनोळखी माणूस भेटायला गेला, कीं त्यांच्या गबाळ-पणाकडे पाहून तो त्यांची कींव करील. त्यांची मिस्किल जीभ अन् ओंठ लपविणाऱ्या त्या मिशा, वीतभर लांब शेंडी पाहून कुणी जर त्यांची टिंगल करण्याचें ठरविलें तर मात्र त्या माणसाची धडगत नाहीं. त्यांनीं आपल्या कथांत घरगुती जीवनांतील प्रसंग इतक्या सहृदयतेनें रेखाटले आहेत, कीं त्यांचें वाङ्मय वाचतांच ते स्वभावानें अगदीं गरीब असावे असें वाटतें. म्हणूनच त्यांची थट्टा करायचा मोह कुणालाही अनावर होतो. एकदां त्यांच्या एका मित्रानें त्यांना आपल्या घरीं आणायला मोटर पाठविली. ते मोटरींतून

येतांच तो मित्र विनोदानें डोळे मिचकावीत म्हणाला, " आज जोशीबुवा मोटरनं आले. बरं का ! "

पण जोशीबुवा चट्दिशीं उत्तरले, " आतां मोटरींतून येणं तेवढं अभिमानाचं वाटत नाहीं. कारण म्युनिसिपालिटीचा कचरासुद्धां मोटरींतूनच येतो ! "

एकदां जोशीबुवा असेच आपल्या श्रीमंत मित्राच्या घरीं गेले होते. त्यांना लघवीला जायचें होतें. समोरच दिसणाऱ्या संडासांत ते शिरूं लागले तेव्हां तिथला नोकर त्यांना म्हणाला, ' हा संडास खास मालकांसाठीं आहे. ' तेव्हां जोशीबुवा लगेच उत्तरले, ' बाकीचीं घरांतलीं माणसं इतकीं का रे घाणेरडीं आहेत ? ' त्यावेळीं त्या घराचे मालक तिथेंच उभे होते. त्यांनीं ते उद्गार ऐकतांच ते हतबुद्ध झाले. अन् जोशीबुवांना तसें सांगितल्याबद्दल त्यांनीं नोकरावर डोळे वटारले !

जोशीबुवांच्या नेहमीं सान्निध्यांत असणाऱ्या व्यक्तीला जोशीबुवांच्या जिभेच्या तीक्ष्ण धारेनें घायाळ झालेल्या कितीतरी व्यक्तींचीं उदाहरणें सांगतां येतील !

" आपल्या जीवनांतील आनंदाचा एखादा प्रसंग सांगाल का ? " मी विचारलें त्यावेळीं जोशीबुवा म्हणाले,

" माझ्या 'शेवग्याच्या शेंगा' या गोष्टीला ज्यावेळीं पहिलं बक्षिस मिळालं त्यावेळीं मला पराकाष्ठेचा आनंद झाला. "

" बक्षीस मिळणार नाहीं असं तुम्हांला वाटत होतं कीं काय ? "

" दुसरं किंवा तिसरं बक्षीस मिळेल असं वाटत होतं. पहिल्याची कांहीं मी अपेक्षा केली नव्हती. "

" आपल्या सगळ्या कथांत हीच गोष्ट चांगली आहे असं आपलं मत आहे का ? "

" शेवग्याच्या शेंगा या माझ्या गोष्टीची मुसलमानांच्या पीरासारखी स्थिति झाली आहे. त्या कथेला बक्षीस मिळालं म्हणूनच लोक तिची फार स्तुति करतात. बाकी खरं म्हटलं तर वहिनींच्या बांगड्या, सुपारी, पारिजातकाचीं फुलं याच माझ्या कथा चांगल्या आहेत. "

" आपली पहिली कथा प्रसिद्ध झाली त्यावेळीं आपणांस फारच आनंद झाला असेल नाहीं ? "

" पण कुणी कथा छापत नाहींत म्हणून जें मला वाईट वाटत होतं त्या मानानं तो आनंद अगदीं कमी आहे. "

" आपल्या कथा कोण छापत नव्हते ? " मी आश्चर्यानें विचारलें.

" यांत आश्चर्य वाटायचं कांहीं कारण नाहीं. मी कितीतरी वर्षें कथा लिहीत होतों. पण सुमारं चौदा वर्षं मला प्रसिद्धि मिळाली नाहीं. महाराष्ट्रांत त्यावेळीं जीं जीं मासिकं होतीं त्या सर्वांकडे मी माझ्या कथा पाठवीत असें. पण त्या नेमानें उलट टपालीं परत येत. तेव्हां लोकांनांच कांहीं कळत नाहीं असं मला वाटे. 'वहिनींच्या बांगड्या' ही कथा सुद्धां सगळ्या मासिकांकडून परत आली आहे. पुनर्भेटीच्या पहिल्या भागांत ज्या माझ्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत त्या सर्व कथा सर्व मासिकांकडून साभार परत आलेल्या आहेत. तेव्हां मला एकदां असं वाटलं, कीं आपल्याला कांहीं हें जमत नाहीं ! एकदां 'यशवन्त' मासिकाचे संपादक जोगळेकर यांच्याकडे मी गेलों आणि त्यांना सांगितलं, 'माझी ही कथा वाचा. पसंत पडली तर छापा, नापसंत पडली तर फाडून टाका–पण परत करूं नका.' अन् एकदोन दिवसांनंतर मी जोगळेकरांची भेट घेतली त्यावेळीं ते म्हणाले, 'मी तुमची गोष्ट छापणार, इतकंच नव्हे तर तुम्हांला पैसेही देणार. तुमच्या एकदोन गोष्टी प्रसिद्ध झाल्या म्हणजे सगळ्या संपादकांचे डोळे उघडतील.' १९२८–१९२९ पर्यंत मला कोणताही संपादक जवळ उभा करीत नव्हता. सुमारं चौदा वर्षं गोष्टी साभार परत आलेल्या पहायची माझ्या डोळ्यांना संवय झालेली होती. पुढं पुढं तर गोष्ट परत आली नाहीं म्हणजे मला वाईट वाटूं लागे. "

" आपण ज्या इतक्या विपुल कथा लिहिल्या आहेत त्या सगळ्या काल्पनिक आहेत कीं आपल्या जीवनांतील अगर कुटुंबांतील प्रसंगाचे त्यांत पडसाद उमटले आहेत ? "

" त्या कथांतील ७५ टक्के प्रसंग आमच्या जीवनांत घडलेल्या प्रसंगांपैकीं आहेत. कर्ज फिटलें पण सावकार गमावला, दुधावरची साय आणि नान् या कथा तर शंभर टक्के सत्यकथा आहेत. माझ्या जीवनांत घडलेल्या कथा आहेत. "

" आपल्या जीवनांतील कांहीं दुःखद प्रसंग सांगाल का ? "

" १९२९ पर्यंत माझ्या जीवनांत अनेक घडामोडी झाल्या. तोंपर्यंतचा काल दुःखांत गेला. मी लिथो आर्टिस्ट म्हणून काम करीत होतों. पण स्वतंत्र धंदा करण्यासाठीं म्हणून मी नोकरी सोडली. नोकरी सोडल्यानंतर अल्पावधींतच माझे वडील वारले, त्यावेळीं मी अन् आई बिछान्यालाच खिळलेले होतों. त्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांत माझी सासू, मेहुणा, मेहुणी आणि बायको निधन पावली. त्या प्रसंगांचा माझ्या मनावर इतका परिणाम

झाला आहे, कीं माझ्या अंतःकरणांतील सुखदुःखाच्या भावनाच नाहींशा झालेल्या आहेत. आतां कुणीही मेलं गेलं तरी माझ्या अंतःकरणाला धक्काच बसत नाहीं. त्याचं एकच उदाहरण सांगतों. १९३१ सालची गोष्ट. 'त्रिकाळ' च्या खास अंकासाठीं मला लघुकथा लिहायची होती. ज्या दिवशीं माझा मुलगा वारला त्याच दिवशीं 'त्रिकाळ'च्या संपादकांचा मला तांतडीचा निरोप आला, कीं आजच गोष्ट पाहिजे. त्यांना त्यावेळीं माझ्या मुलाच्या मृत्यूची हकिकत ठाऊक नव्हती. मी सकाळीं दहा वाजतां मुलाच्या अंत्यविधीसाठीं स्मशानांत गेलों आणि १२॥ वाजतां परत आलों. अन् त्यानंतर दोन तासांनींच मी गोष्ट लिहून त्रिकाळकडे पाठविली. करंदीकरांना ज्यावेळीं माझ्या मुलाच्या मृत्यूची बातमी कळली त्यावेळीं लघुकथेसाठीं तगादा लावल्याबद्दल त्यांना वाईट वाटलं, ते हळहळले."

"त्या कथेंत आपण तो मुलाच्या मृत्यूचाच करुण प्रसंग रेखाटला होता काय?"

"नाहीं. तो करुण प्रसंग नव्हता. 'विकास' या नांवानं जी माझी कथा प्रसिद्ध आहे ती मी त्यावेळीं लिहिली. हे कांहीं मृत्यूचे प्रसंग सोडले तर माझं घरगुती जीवन सुखाचं गेलं आहे. आणि याचं कारण माझ्या आईचा स्वभाव. माझ्या आईची विनोद-बुद्धि फारच तीक्ष्ण आहे. एकदां काय झालं, मी एक कथा लिहिल्यानंतर ती आईला वाचून दाखविली अन् विचारलं, 'आई, कशी आहे ग ही कथा?' त्यावेळीं क्षणाचीही फुरसत न लावतां आई हंसत हंसत म्हणाली, 'अशा चांगल्या गोष्टी लिहिण्यापेक्षां घरांतच चांगला वागलास तर बिघडेल का कांहीं?' माझी आई ही माझ्या कथांचं स्फूर्तिस्थान आहे असं म्हटलं तरी चालेल. एकदां काय झालं, माझ्या हस्तें कुठला तरी पुस्तक-प्रकाशन समारंभ पार पडला. त्यावेळीं मला जे हारतुरे देण्यांत आले होते ते मी येतांना घरीं आणले. ते हारतुरे पाहून आई मला म्हणाली, 'लोक तुला बाहेर मोठा समजतात, पण मी तुला गाढवच समजतें' आणि मी तरी त्या आईचाच मुलगा नाहीं का? मी तिला सरळ सुनावलं, कीं 'या गाढवालाच हे गाढव लोक मोठा समजतात!"

आपल्या शिक्षणासंबंधीं बोलतांना जोशीबुवा पुढें म्हणाले, "इंग्रजी चौथ्या इयत्तेंत असतांनाच मी शाळा सोडली. इंग्रजी वाङ्मयाचा मी अभ्यास केलेला नाहीं याचं कारण इंग्रजी भाषा मला जेमतेमच समजतें. शाळेंतल्या अभ्यासाखेरीज एकही इंग्रजी पुस्तक मी अजून वाचलेलं नाहीं. पण एकदां मी मजा केली. 'एक नंबरचा शहाणा' या नांवाची जी



सांगली.

मी कथा लिहिली आहे त्या कथेच्या खालीं 'मॉरिस शुगरकेन' या लेखकाच्या कथेचं भाषान्तर असं लिहिलं. वस्तुतः ती कथा भाषान्तरित नाहीं; मीच लिहिली आहे. पण कुणाही वाङ्मय फौजदाराच्या तें ध्यानीं आलं नाहीं. एका वाचकानं मात्र मला पत्र लिहून विचारलं, 'तुम्हांला इंग्रजी येत नाहीं तर मग हें भाषान्तर कसं काय केलंत?"

एका आनंदाच्या प्रसंगासंबंधीं बोलतांना जोशीबुवा म्हणाले, "वहिनींच्या बांगड्या ही माझी कथा प्रसिद्ध होतांच दीक्षित या नांवाच्या गृहस्थानं मला पत्र लिहिलं अन् माझी बेफाट स्तुति केली. अन् गोष्ट आवडल्याबद्दल मनिऑर्डरनं एक रुपयाही पाठविला. पण खरोखरच त्यावेळीं मला फार आनंद झाला."

"आणखी एक तुम्हांला गंमतीची हकिकत सांगतों." जोशीबुवांनीं सुरवात केली, "परचुरे, पुराणिक आणि मंडळीचे श्री. परचुरे आणि मी मुंबईत माझा 'माझा मुलगा' हा चित्रपट पहायला सेंट्रल सिनेमांत गेलों. त्यावेळीं चित्रपटाची हिंदी प्रत चालू होती. परचुरे यांनीं मला मधेंच एका हिंदी शब्दाचा अर्थ विचारला. पण मलाही तो शब्द माहीत नसल्यामुळं मी मला माहित नाहीं असं सांगितलं. हें आमचं बोलणं शेजारीं बसलेल्या एका गृहस्थानं ऐकलं. अन् त्यानंतर तो गृहस्थ 'माझा मुलगा' चित्रपटाची गोष्ट शेवटपर्यंत मला समजावून सांगत होता. एक वेळ माझ्या मनांत आलं, कीं ती कथा मीच लिहिली आहे असं त्याला सांगावं! पण मी संयम राखला."

"जीवनांतील कोणत्याही दुःखद घटनेनं आपल्या मनाला दुःख होत नाहीं का?" मी विचारलें.

"नाहीं. माझी मनोवृत्तीच आतां तशी बनली आहे. माझ्या घरांत एकदां चोरी झाली. असलेले सर्व दागदागिने चोरांनीं पळविले. सकाळीं उठल्यावरोबर हें आमच्या ध्यानीं येतांच माझ्या बायकोनं तोंड वाकडं केलं. त्यावेळीं मी निर्विकारपणं म्हटलं, 'चहा साखरेचा डबा आधीं पहा. नाहीं तर आतांच जाऊन मंडईतून चहा साखर घेऊन येतों.' खरोखरच त्यावेळीं मी अगदीं खेळकरपणानं उद्गार काढले. चोरींत कोणकोणत्या वस्तु गेल्या याची चौकशी करण्याचाही विचार माझ्या मनांत आला नाहीं. माझ्या सुरवातीच्या आयुष्यांत माझ्यावर जे अनेक निराशेचे प्रसंग आले त्यामुळंच माझी अशी वृत्ति बनली आहे."

# साहित्य आणि कला

: २१ :

# वि. स. खांडेकर

"आजच्या श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या लेखकांनीं टीकात्मक वाङ्मय लिहिण्यास प्रारंभ केला पाहिजे. वाङ्मयांत अग्रभागीं चमकणारे लेखक एकमेकांच्या वाङ्मयावर टीकात्मक वाङ्मय लिहूं लागले म्हणजे साहित्यांत खेळीमेळीचं वातावरण निर्माण होईल.

कोल्हटकर–केळकरांनीं जसं अभिजात ललित वाङ्मय निर्माण केलं आहे त्याप्रमाणं विपुल असं टीकावाङ्मयही निर्माण केलं आहे. जो लेखक कलात्मक वाङ्मय निर्माण करतो त्याला टीकेची कलात्मक व व्यापक दृष्टि असते. त्याच्या नजरेंतून जसे दोष सुटत नाहींत तसे गुणही सुटत नाहींत आणि म्हणूनच ललितलेखनांत यश मिळालेला लेखक मार्गदर्शक टीकावाङ्मय निर्माण करूं शकेल. कोल्हटकर–केळकरांचं उदाहरण आपल्या नजरेसमोर आहेच. मी गेल्या सात आठ वर्षांत टीकालेखनाकडे दुर्लक्ष केलं याचं मला फार वाईट वाटत आहे." असे उद्गार वि. स. खांडेकर यांनीं मुलाखतींत काढले.

आतांपर्यंत गेल्या दहा बारा वर्षांत त्यांच्या वाङ्मयावर झालेल्या टीकेसंबंधीं आणि एकंदरींत टीकावाङ्मयासंबंधीं त्यांचें कोणतें मत आहे असा मी प्रश्न केला त्या वेळीं खांडेकर म्हणाले, " माझ्या वाङ्मयावर अनेक वृत्तपत्रांतून टीका आल्या आहेत. पण या टीकांचा मला विशेष उपयोग झाला नाहीं. त्या सर्व टीका मामुली स्वरूपाच्या होत्या. बहुतेक वृत्तपत्रलेखकांनीं केलेल्या टीका प्रामाणिक स्वरूपाच्या होत्या. पण वाङ्मयीन महत्त्वाच्या नव्हत्या. त्या टीकालेखांमुळं फाजील अलंकारिक भाषेशिवाय माझे दुसरे कोणतेही दोष मला कळले नाहींत. दैनिकं किंवा साप्ताहिकं यांच्यापेक्षां मासिकांतील टीकात्मक लेख कित्येकदां महत्त्वाचे असतात. पण अलीकडे मासिकांनींही टीकालेखनाकडे पूर्णपणं दुर्लक्ष केलेलं दिसत आहे. मार्मिक व मूलग्राही टीका क्वचितच वाचायला मिळते. टीकालेखनाला महत्त्व येण्यासाठीं टीकालेखन तज्ज्ञ लेखकांनीं केलं पाहिजे. प्रो. फडके, वरेरकर, माडखोलकर आणि अत्रे प्रभृतींकडून संपादकांनीं टीका लिहवून घेतल्या पाहिजेत. फडके–माडखोलकर सारख्या लेखकांच्या कलाकृतींवर अभिप्राय व्यक्त करणारा टीकाकार तितकाच रसिक, विद्वान आणि देशी–परदेशी वाङ्मयाचा अभ्यासक पाहिजे. तो स्वतः कलावानही असला पाहिजे. टीकाकार ललितलेखक असला म्हणजे तो बेजबाबदारपणं कांहींही लिहूं शकत नाहीं. "

" तुमच्या वाङ्मयकृतींवर आतांपर्यंत मत्सरीपणानं कुणी टीका केली आहे का ? "

" मत्सरी वृत्तीनं कुणीही माझ्या वाङ्मयावर टीका केलेली नाहीं. मात्र टीकाकाराच्या मत्सराचा नसला तरी अज्ञानाचा तोटा लेखकाला भोगावा लागतो. ' दोन मनें ' या माझ्या कादंबरीवर विरोधी स्वरूपाचीं कांहीं परीक्षणं आलीं. पण त्यांत मत्सर नव्हता—पूर्वग्रह आणि अज्ञान यांचं मिश्रण होतं. लेखकासंबंधींचा पूर्वग्रह बाजूला सारून अभिजात रसिक दृष्टीनं नव्या वाङ्मयकृतीकडे पहाण्याची वृत्ति प्रो. आंबेकर व शेषप्रभृति मोजक्या टीकाकारांतच आढळून येते. "

" ज्या विशिष्ट हेतूनं तुम्हीं कादंबऱ्या लिहिल्या ते हेतु समजून घेऊन तुमच्या कादंबऱ्यांवर टीकाकारांनीं टीका लिहिल्या आहेत असं आपणांस वाटतं का ? "

" 'दोन ध्रुव' आणि 'हिरवा चांफा' या कादंबरींतील माझी भूमिका समजून घेऊन अनेक टीकाकारांनीं परीक्षणं लिहिलीं. पण ' उल्का ' व ' दोन मनें ' या कादंबऱ्यांवर जे टीकालेख आले त्यांपैकीं बहुतेक उथळ होते. ' उल्का ' व ' दोन मनें ' लिहितांना मी रचनेंत व

शैलींत जो बदल केला होता त्याच्याकडे पुष्कळांचं दुर्लक्ष झालं. ' हिरवा चांफा ' आणि ' दोन ध्रुव ' या कादंबऱ्या कथानकप्रधान कादंबऱ्या आहेत आणि ' उल्का ' आणि ' दोन मनें ' मनोविश्लेषणप्रधान कादंबऱ्या आहेत. या महत्त्वाच्या फरकाकडे टीकाकारांनीं लक्ष न देतां माझ्या पूर्वीच्या वाङ्मयासंबंधीं जे पूर्वग्रह होते तेच कायम ठेवून त्यांनीं या कादंबऱ्यांचं परीक्षण केलं. लेखकाचं सर्व वाङ्मय अभ्यासपूर्वक न वाचतां त्याच्या एखाद्या कृतीवरून त्याच्या वाङ्मयासंबंधीं मतें व्यक्त करणारे टीकाकारही महाराष्ट्रांत थोडेथोडके नाहींत. आजच्या बहुतेक टीकाकारांची मनोभूमिका व्यक्तिनिष्ठ आहे. याचं ठळक उदाहरण म्हणजे 'समाजस्वास्थ्यां'तील शकुंतलाबाई परांजपे यांचीं परीक्षणं. या बाईच्या मनाच्या रसिकतेचीं अनेक द्वारं बंद आहेत. त्याचं प्रायश्चित्त लेखकांना कां ? आजच्या टीकाकारांमधें ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीचा अभाव आहे. ' उल्का ' कादंबरीवर शिखरे यांनीं केसरींत टीका केली होती. त्यांना उल्केचं प्रेमच नापसंत असावं. या कादंबरींत उल्केचा चार व्यक्तींशीं प्रणयिनी म्हणून संबंध येतो असं दाखविलं आहे. याचा अर्थ ती मुलगी भ्रमराच्या वृत्तीची असते असं नाहीं. विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळं तिला आयुष्याच्या प्रवाहाबरोबर वाहात जावं लागतं. प्रेमपूर्ति झालेली कोणतीही व्यक्ति सुखासुखी दुसऱ्या प्रेमाच्या फंदांत पडणार नाहीं. पण प्रेमभंगाचे चटके बसूं लागले तर ती प्रेमाच्या वाटेला पुन्हां कधींच जाणार नाहीं असं मात्र म्हणतां येणार नाहीं. माणसाला जोंपर्यंत जगावंसं वाटतं तोंपर्यंत तो प्रेम करीत रहाणारच. प्रेमभंगानं प्रेमाविषयीं उदासीनता वाटूं लागली तरी ती तात्कालिक असते. एखाद्या तरुणीनं प्रेमभंग झाल्यावर पुन्हां प्रेमासाठीं उत्सुक होणं हा कांहीं तिचा दोष नाहीं. ज्या सामाजिक परिस्थितींत प्रेमासारख्या नैसर्गिक भावनांचा कोंडमारा केला जातो त्या परिस्थितीचा तो दोष आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीनं उल्केची मनोरचना जशी नैसर्गिक आहे त्याचप्रमाणं आजच्या तरुण मुलींचं एक प्रातिनिधिक चित्र या दृष्टीनंही ती भूमिका वास्तव स्वरूपाची आहे. तरुणींच्या मनांतील खळबळीचं मापन करणारीं जर यंत्रं निघालीं तर आजच्या समाजांत उल्केसारख्या नव्वद टक्के तरुणी असलेल्या दिसून येतील. आणि म्हणूनच उल्केचं स्वभावचित्र आजच्या समाजांतील तरुणींच्या परिस्थितीचं प्रातिनिधिक चित्र आहे. मी माझ्या कादंबऱ्यांतही नायकांचीं जीं स्वभावचित्रें रेखाटलीं आहेत तींही अशीच प्रातिनिधिक स्वरूपाचीं आहेत. ' दोन ध्रुवां'तील विद्याधर, ' उल्के ' मधील चंद्रकान्त, ' हिरवा चांफा ' मधील मुकुंद, ' दोन मनें ' मधील श्री,

' पांढरा ढग ' मधील अभय हे आजच्या आपल्या समाजांतील तरुणांचे प्रतिनिधी आहेत. हिरव्या चाफ्यांतील मुकुंदाच्या भूमिकेसंबंधीं पां. वा. गाडगीळ यांनीं टीका लिहिली होती. त्यांना तें स्वभावचित्र फार सदोष वाटलं. मुलींना भुलविण्याखेरीज मुकुंदानं कांहींच कार्य कादंबरींत केलेलं नाहीं असा त्यांचा आक्षेप आहे. ' पांढरे ढग ' मधील अभय मात्र त्यांना आवडला. मग मुकुंद त्यांना कां आवडला नाहीं हें मला समजत नाहीं मुकुंद हा खालच्या वर्गांतून आला आहे हें कित्येकांच्या सुप्त मनाला आवडत नसेल कदाचित्. माझ्या दृष्टीनं मुकुंद आणि अभय यांत कांहीं दोन ध्रुवांचं अंतर नाहीं. अभय वरच्या समाजांतील आहे एवढंच. वरील कादंबऱ्यांतील पांचही नायक लोकप्रिय असूनही त्यांच्या टीकाकारांना कांहींही कळलेलं नाहीं. निरनिराळ्या परिस्थितींत समाजाचे प्रतिनिधी म्हणून मी त्या नायकांचीं स्वभावचित्रं रेखाटलीं आहेत. पूर्ण समाजवादी नायक निर्माण करून समाजाला त्यांच्याकडून बौद्धिक सन्देश देणं फारसं कठीण आहे असं नाहीं. पण समाजवादी परिस्थिति निर्माण होण्याच्या मार्गांत कोणत्या अडचणी आहेत आणि त्या अडचणींत सांपडून किती समाजवादी मनोभूमिकेच्या बुद्धिवान तरुणांचं जीवन व्यर्थ जात आहे याचं लेखकानं वर्णन करायला नको का? समाजांतील अनिष्ट परिस्थितीविषयीं समाजाच्या मनांत तिरस्कार निर्माण केला जाण्यासाठीं चंद्रकान्त, मुकुंद, अभय असले बुद्धिमान् तरुण संक्रमणांत कसे धडपडत आहेत याचं चित्र दाखविणं माझ्यासारख्या मर्यादित अनुभवाच्या लेखकाचं कर्तव्य आहे. आयुष्यांत अपयश मिळालेला तरुण दुबळा असतोच असं नाहीं. अपयश मिळणं हा तरुणाचा दोष नसून परिस्थितीचा आहे. या परिस्थितीचं भडक वर्णन करणं अगर दुर्दैवानं दुबळा ठरणारा नायक रेखाटणं हा मुळींच प्रतिगामीपणा होत नाहीं. परिस्थिति आडवी आली नाहीं तर प्रत्येक व्यक्ति जीवनांत यशस्वी होऊं शकते. म्हणूनच परिस्थिती बदलण्याच्या हेतूनं प्रचार करण्यासाठीं लेखकानं कथावाङ्मयांतील भूमिकांचा योग्य तो उपयोग करून घेतला पाहिजे. कोणत्याही कामगार पुढाऱ्याइतकाच मी मनानं समाजवादी आहे. पण केवळ तात्त्विक अशीं स्वभावचित्रं रेखाटणं मला आवडत नाहीं. "

" तुमच्या लघुकथावाङ्मयावर तरी योग्य प्रकारं टीका झाली आहे का ? "

" माझ्या लघुकथा सर्वांना—टीकाकारांनाही आवडतात. पण गेल्या पंधरा वर्षांत लघुकथेच्या लेखनतंत्रांत आणि विषयांत मी जे प्रयोग करीत आलों आहे त्यांची कुणाला

फारशी जाणीव नाहीं. लघुकथा लिहितांना मी निरनिराळ्या पद्धतींचा उपयोग केला आहे. जीवनांतील अनुभवाच्या उत्कट क्षणावर कथा लिहिण्याचं तंत्र देशीपरदेशी कथालेखकांनीं हाताळलेलं आहे. मीही तसल्या गोष्टी लिहितों. पण गेल्या वीस वर्षांत माझ्या कथांना मी थोडं निराळं वळण लावलं आहे. कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यांतील उत्कट क्षणावर कथेची रचना करतांना त्या व्यक्तीच्या पूर्व जीवनाचाही कलात्मकतेनं मी थोडक्यांत आढावा घेतों आणि मध्यवर्ति प्रसंगाला अनुकूल होईल अशा रीतीनं लघुकथेंतच तिच्या उभ्या आयुष्याचं चित्रण करतों. आज लघुकथांचं वपुल्य फार आहे. पण लघुकथा वाङ्मयाला वळण लावण्यासाठीं त्या वाङ्मयप्रकारावर चर्चा केली जात नाहीं. लघुकथा-संग्रहांवर परीक्षणं येतात खरीं; पण तीं अत्यंत अपुरीं असतात. गेल्या पांच वर्षांत लघुकथेच्या विकासाबद्दल अनास्था दाखविण्यांत आली आहे. तेव्हां 'ज्योत्स्ना', 'उषा', 'सह्याद्रि', 'मनोहर,' या मासिकांनीं प्रत्येक अंकांत एका सुंदर लघुकथेवर एखाद्या प्रसिद्ध टीकाकाराकडून टीका लिहवून घेणं जरूरीचं आहे. इतर देशी भाषांच्या मानानं लघुकथांच्या दृष्टीनं मराठी वाङ्मय मागासलेलं आहे असं समजण्याचें कारण नाहीं. 'माणूस जगतो कशासाठीं?' 'न्याय', या प्रो. फडके यांच्या लघुकथा आणि 'महेश्वरी लुगडें' ही वरेरकरांची लघुकथा यांचं जर इंग्रजींत भाषांतर केलं तर त्या कथा इंग्रजीच्या तोडीच्या ठरतील. आमच्या मराठी वाङ्मयांत आज अशी दुर्दैवी परिस्थिति आहे, कीं टीकावाङ्मयाला कुणीही महत्त्व देत नाहीं. म्हणूनच आजच्या श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या लेखकांनीं टीकात्मक वाङ्मय लिहिण्यास प्रारंभ केला पाहिजे. वाङ्मयांत अग्रभागीं चमकणारे लेखक एकमेकांच्या वाङ्मयावर टीकात्मक वाङ्मय लिहूं लागले म्हणजे साहित्यांत खेळी-मेळीचं वातावरण निर्माण होईल. कोल्हटकर केळकरांनीं जसं अभिजात ललित वाङ्मय निर्माण केलं आहे त्याचप्रमाणं विपुल असं टीकात्मक वाङ्मयही निर्माण केलं आहे. जो लेखक कलात्मक वाङ्मय निर्माण करतो त्याला कलात्मक दृष्टि असते. त्याच्या नजरेंतून दोषही सुटत नाहींत तसे गुणही सुटत नाहींत. आणि म्हणूनच ललितवाङ्मयांत यश मिळालेला लेखक मार्गदर्शक असं टीका—वाङ्मय निर्माण करूं शकेल. कोल्हटकर—केळकरांचं उदाहरण प्रत्यक्ष आपल्या नजरेसमोर आहे. मी हल्लीं टीकालेखनाकडे दुर्लक्ष केलं याबद्दल मला फार वाईट वाटत आहे!"

: २२ :

# शिल्पकार वि. पां. करमरकर

"कलावन्तांनीं संसाराच्या भानगडींत पडूं नये असं मी म्हणतों याचं कारण असं, कीं कलावन्ताचं संसाराच्या व्यापामुळं कलेकडे दुर्लक्ष होतं. पैसा मिळविण्यासाठीं त्याला वाटेल तें काम हातीं घ्यावं लागतं. त्याचा कलेवर अनिष्ट परिणाम होतो. त्या कलेंत सत्व राहात नाहीं. जोंपर्यंत आपला देश पारतंत्र्यांत आहे, आपल्या देशांत दारिद्र्य आहे अन् कलेची किंमत करण्याइतकी आपल्या देशाची आर्थिक स्थिति सुधारली नाहीं तोंपर्यंत कलावन्तानं अविवाहितच राहावं. लोकापवादाला घाबरूं नये. कलेसाठीं आमचा जन्म आहे. कलावन्ताला कुणी मवाली म्हटलं तर चालेल; पण आपल्या कलेंत तो नालायक आहे असं कुणी म्हणतां नये. कलावन्तांनीं अविवाहित राहावं हें मी म्हणतों तें आजच्या परिस्थितीच्या

दृष्टीनं विचार करून. पाश्चिमात्य कलावन्तांनीं अविवाहित राहावं किंवा आमच्यांतील जन्मजात श्रीमंतांनीं अविवाहित राहावं असा कुठं माझा आग्रह आहे ? ”

शिल्पकार वि. पां. करमरकर यांना मी प्रश्न केला त्यावेळीं त्यांनीं वरील उद्गार काढले.

शिल्पकार करमरकर यांच्या ताडदेव येथील निवासस्थानीं ज्यावेळीं मी प्रवेश केला त्यावेळीं उपनगरांतल्या कोणत्या तरी निवान्त जागीं मी चुकीनें आल्याचा मला भास झाला ! त्यांचें निवासस्थान अन् स्टुडिओ यांच्या सभोंवतीं अन् मध्यभागीं पसरलेला बगीचा, त्या बागेची कलात्मक रचना, अन् त्या बागेंतील पुष्पांप्रमाणेंच जिकडे तिकडे खुलून दिसणारे विविध पुतळे पहातांच मला शिल्पकार करमरकर यांच्या सौख्याचा क्षणभर हेवा वाटला. करमरकर स्वभावानें जितके गोड आहेत तितकेंच त्यांच्या निवासस्थानाचें वातावरण रम्य अन् विलोभनीय आहे. करमरकर यांच्या चेहऱ्याकडे अन् वागणुकीकडे अपरिचितानें पाहिलें तर ते अबोल स्वभावाचे वाटतात. पहिल्यानें मलाही तसेंच वाटलें. पण त्यांनीं ज्यावेळीं बोलायला सुरवात केली त्यावेळीं ते बोलकेच नव्हे तर वक्तृत्वपटुही असल्याचें माझ्या नजरेस आलें. जिव्हेंतील नैसर्गिक दोषामुळें बोलतांना ते थोडे अडखळतात. पण कित्येक वेळीं ते अशा लकबीनें तोंडांत सिगारेट ठेवतात कीं त्यामुळें कित्येक मिनिटें ते अस्खलित बोलतात. त्यांचा शब्द अडखळत नाहीं.

“ चित्रकलेंत जसा भावनापरिपोषाला वाव मिळतो तसा शिल्पकलेंत मिळतो का ? ” मी त्यांना प्रश्न केला.

“ अर्थांतच ! ’ करमरकर उद्गारले, “दोन्ही कलांमधें भावनापरिपोषाला वाव मिळतो. दोन्ही कलांचे हेतु एकच आहेत. पण चित्रकलेंत जो एक नाजुकपणा असतो तो शिल्पकलेंत येऊं शकत नाहीं शिल्पकलेंत त्याला मर्यादा पडते. उदाहरणार्थ पापण्या घ्या– चित्रकाराला जितक्या नाजुकपणानं त्या दाखवितां येतील तेवढ्या शिल्पकाराला दाखवितां येणार नाहींत. निरनिराळ्या अवस्थेंतील अन् मनःस्थितींतील स्त्रीपुरुषांचीं चित्रं चित्रकाराप्रमाणं शिल्पकारालाही काढतां येतील. पण शिल्पकाराची एकच रंगपद्धति (One Colour scheme) असते. चित्रकाराच्या अनेक रंगपद्धति असतात. मी तर असं म्हणेन, कीं शिल्पकला ही Manly Art आहे आणि चित्रकला Feminine Art आहे. म्हणजे असं, कीं शिल्पकलेसाठीं जास्त शारीरिक परिश्रम करावे लागतात अन्

चित्रकलेसाठीं शारीरिक परिश्रमाची जरूरी नाहीं. पण कलात्मकतेच्या दृष्टीनं दोन्ही कला मात्र सारख्याच महत्त्वाच्या आहेत. अन एकादा शिल्पकार जसा चित्रकला अल्प परिश्रमानं साध्य करील त्याचप्रमाणं चित्रकारही शिल्पकला हस्तगत करील. "

" चित्रकलेंत जशा चित्रीकरणाच्या निरनिराळ्या पद्धती आहेत तशा शिल्पकलेंतही तीन पद्धति आहेत का ? "

" होय. तीन पद्धती आहेत. त्या तथातथ्य दर्शनपद्धति ( Representation), भावनायुक्त आविष्करणपद्धति ( Interpretation with Sentiments ) आणि स्वातंत्र्ययुक्त तांत्रिक आविष्करण ( Interpretation with every liberty ) अशा या तीन पद्धती आहेत. यांनाच अनुक्रमें पाश्चात्य, हिंदी अन् आधुनिक कला असं संबोधण्यांत येतं. यांपैकीं कुठल्याही पद्धतीचा चित्रकाराप्रमाणंच शिल्पकारालाही उपयोग करतां येतो "

" यांपैकीं आपणांस कोणती पद्धति आवडते ? "

तिसरी—स्वातंत्र्ययुक्त तांत्रिक आविष्करणपद्धति ( Interpretation with every liberty ). पण वर मी सांगितलेल्या तिन्ही पद्धतींना चित्रकलेप्रमाणं शिल्पकलेंतही वाव आहे. "

" नैसर्गिक देखाव्यांना—लॅन्डस्केपना शिल्पकलेंत कितपत वाव आहे ? "

" लॅन्डस्केप कित्येकदां आम्हीं तयार करितों, नाहीं असं नाहीं. पण तें रंगहीन ( Colourless ) होतं. "

" चित्रकलेप्रमाणं शिल्पकलेंत प्रचाराला वाव आहे असं आपणांस वाटतं का ? "

"कां नसावा ? शिल्पकलेला तर चिरकालीन महत्त्व आहे. तेव्हां त्यांत प्रचाराला जास्त वाव आहे. अगदीं चिरकाल टिकणारी ती कला आहे. शिल्पकलेइतकी चित्रकला जास्त काळ टिकत नाहीं. शिल्पकला गाडली गेली तरी ती हजार वर्षं तशीच राहील. पांच हजार वर्षांपूर्वींची Human development आज आपणांस दिसूं शकते ती शिल्पकलेमुळंच ना ? आपल्या संस्कृतीला जर चिरकालीन महत्त्व आणायचं असेल तर शिल्पकलेचाच आश्रय घेतला पाहिजे. आज बुद्धधर्माचे जे अवशेष दिसतात ते शिल्पकलेमुळंच ना ? कला ही ध्येयात्मक असते अन् ती असावी असं मला तरी वाटतं. साहित्य, संगीत अन् कला अशा या तीन वहिणी आहेत. साहित्यामधें गद्यपद्याचा अंतर्भाव होतो, संगीतामधें

नृत्यगायन येतं अन् कलेमधें चित्रकला अन् शिल्पकला येते. या तिन्ही बहिणींत जन्मानं चित्रकला मोठी बहीण आहे. पण आज ज्येष्ठपणा मात्र साहित्यानं पटकावला आहे. "

" पाश्चात्य, पौर्वात्य अन् आधुनिक या पद्धतींतील कोणती कलेची पद्धति आपणांस विशेष आवडते ? "

" मला आधुनिक पद्धति जास्त आवडते. कारण त्यांत तांत्रिक स्वातंत्र्य, बौद्धिक वैशिष्ट्य आणि नावीन्य आहे. "

" बंगाली चित्रकलेच्या पद्धतिविषयीं आपणांस काय वाटतं ? "

" They are more at immitation than at creation. त्यांनीं प्रचार मात्र फार प्रभावी केला आहे. त्यांनीं आमच्या चित्रकलेला आंतरराष्ट्रीय महत्त्व आणलं आहे. "

" आपण आपल्या रत्नागिरी येथील अध्यक्षीय भाषणांत कलावन्तांनीं संसारांत पडूं नये, असं म्हटलं तें कां ? "

" संसाराच्या व्यापामुळं कलावन्ताचं कलेकडे दुर्लक्ष होतं. पैसा मिळविण्यासठीं त्याला वाटेल तें काम हातीं घ्यावं लागतं. त्याचाच कलेवर अनिष्ट परिणाम होतो. त्या कलेंत स्वत्व राहात नाहीं. आपला देश पारतंत्र्यांत आहे, दरिद्री आहे, अन् कलेची किंमत कळण्याइतकी आपल्या देशाची आर्थिक स्थिति सुधारलेली नाहीं. तेव्हां कलावन्तांनीं अविवाहित राहावं. लोकापवादाला घाबरूं नये. कलेसाठीं आमचा जन्म आहे. कलावन्ताला कुणी मवाली म्हटलं तरी चालेल. पण आपल्या कलेंत तो नालायक आहे असं कुणी म्हणतां कामा नये. कलावन्तांनीं अविवाहित राहावं असं मी म्हणतों तें आजच्या परिस्थितीचा विचार करूनच. "

" पण अविवाहित राहाण्यानं कलावन्ताच्या जीवनाला अनिष्ट वळण लागणार नाहीं का ? "

" जो कलेच्या प्रेमानं अविवाहित राहाणार तो आपल्या जीवनाला अनिष्ट वळण लावील कसं ? "

" पण भावनाशून्यतेनं कलावानाला जगतां येणं शक्य आहे का ? "

" कलावान कधींच भावनाशून्य असूं शकत नाहीं. त्यानं भावनाशून्यतेनं जगावं असं तरी मी कुठं म्हणतोंय् ? त्याच्या एकट्याच्या ज्या कांहीं गरजा असतील त्या त्यानं खुशाल भागवाव्या. लोकापवादाची पर्वा करूं नये. पण संसाराचं ओझं घेऊं नये. We are

born for our art. टीका करणारे लोक मूर्ख आहेत असं समजून त्यानं कलेची उपासना करावी अन् संसारांत न गुरफटतां नैसर्गिक भावनांची गरज भागवावी."

"अशा वागणुकीमुळं कलावानांना समाजांत दर्जा मिळेल असं आपणांस वाटतं का ?"

"वैयक्तिक वागणुकीनं समाजांत कुणा कलावन्ताला दर्जा मिळत नाहीं. त्याच्या कलेमुळं त्याला दर्जा प्राप्त होतो. कित्येक कलावानांचं असं म्हणणं आहे, कीं लग्न केलं म्हणजे त्यांना सामाजिक दर्जा प्राप्त होतो. ते सभ्य म्हणून ओळखले जातात. अन् चित्र काढीत असतां कुणीच मॉडेल मिळालं नाहीं तर मॉडेल म्हणून बायकोला उभी करतां येईल असं ते समर्थन करतात. माझ्या मतें या कामीं बायको कधींच उपयोगी पडत नाहीं. मॉडेल म्हणून बायकोला जो उभी करील तो दुष्ट ठरेल. बायकोच्या दृष्टीनं तरी दुष्ट ठरेल–कोणत्याही पत्नीला तें पसंत पडणार नाहीं."

"कलावन्ताच्या वैवाहिक जीवनावर तुमचा फारच कटाक्ष दिसतो !"

"वैवाहिक जीवनापेक्षां कलेचं मला महत्त्व वाटतं म्हणून. सुदैवानं माझी बायको प्रेमळ आहे. माझी आज आर्थिक स्थितीही बरी आहे. पण मी जर संसाराच्या भानगडींत पडलों नसतों तर यापेक्षांही जास्त कार्य केलं असतं. संसारामुळं मी थोडाफार खर्ची पडलों आहे. खऱ्या कलेकडे माझं दुर्लक्ष झालं आहे. संसाराचा भार संभाळण्यासाठीं कित्येक कामं मी मनाविरुद्ध केलेलीं आहेत. म्हणूनच मी आज माझ्या संसारांत सर्व दृष्टीनं सुखी असतांनाही असं म्हणतों, कीं कलावन्त तरुणांनीं लग्नाच्या भानगडींत पडूं नये."

"आपण आतांपर्यंत अनेक पुतळे तयार केले आहेत, त्यांत विशेष असे कोणते पुतळे आपणांस आवडतात ?"

"एक मामा वरेरकरांचा अन् दुसरा Struggle (लढा) म्हणून मी तयार केला आहे तो पुतळा. हे दोन्ही पुतळे मी माझ्या कलेच्या आनंदासाठीं तयार केले आहेत." असें म्हणून त्यांनीं मला मामांचा पुतळा दाखविण्यासाठीं बागेंत आणलें. त्यांनीं मामांचे दोन पुतळे केले आहेत. एकामधें मामांचें वास्तवदर्शन अन् दुसऱ्यामधें त्यांच्या कल्पनेला दिसलेलं मामांचं स्वभावदर्शन.

"Struggle या पुतळ्याची कल्पना काय आहे ?" मीं त्यांना मामांचा पुतळा पाहिल्यावर प्रश्न केला.

" थांबा. तो पुतळाच तुम्हांला दाखवितों. " असें म्हणून करमरकर यांनीं मला त्या पुतळ्याजवळ नेलें.

तो पुतळा असा आहे, कीं एका भल्या मोठ्या हातानें माणसाचा अर्धा देह आपल्या मुठीच्या पकडींत ठेवला आहे. अन् त्या पकडींतून सोडवून घेण्यासाठीं त्या माणसाची धडपड चालू आहे. त्या अवाढव्य हातांतून सुटका करून घेत असतांना त्या माणसाच्या शरिराला जी बांक आली आहे अन् त्याच्या चेहऱ्यावर जी क्रुद्ध भावना दिसत आहे त्याचें कलात्मक दृश्य या पुतळ्यांत दिसतें.

" This is supposed to be foreign grip " करमरकर त्या अवाढव्य हाताच्या मनगटाकडे अंगुलिनिर्देश करून म्हणाले, " ही कल्पना काय आहे यासंबंधीं अजूनही मला कुणी प्रश्न केला नाहीं. ' क्रॉनिकल ' पत्रांत मात्र यासंबंधीं एकदां वर्णन आलं होतं. "

त्यानन्तर शिल्पकार करमरकर यांनीं बागेंतील निरनिराळे प्रमुख पुतळे मला दाखविले. त्यांनीं आपली कुत्री अन् बकरी यांचेही हुबेहुब पुतळे तयार केले आहेत. त्यांनीं बकरीचा पुतळा ज्या वेळीं तयार केला त्यावेळीं तिचीं पोरें ती आपली आई असें समजून लुचायला धांवलीं अन् तोंडाला घट्ट दगड लागतांच विरहानें मागें परतलीं असें करमरकर यांनीं मला सांगितलें. अन् तो पुतळा खरोखरच वास्तवपूर्ण आहे !

: २३ :

# चित्रकार श्रीराम देशप्रभु

"काय म्हणतं तुमचं मराठी वाङ्मय? अमेरिकेला गेल्यापासून गेलीं तीन वर्षं फारसं मराठी वाङ्मय वाचायला मिळालं नाहीं."

फ्लोरा-फाउन्टन जवळच्या 'बॉम्बे हाऊस' च्या दारांत आर्टिस्ट देशप्रभु यांची अन् माझी ज्यावेळीं गांठ पडली त्यावेळीं पहिल्यानेंच ते मला मराठी वाङ्मयासंबंधीं प्रश्न विचारतील अशी मला कल्पनाच नव्हती अन् म्हणूनच तो प्रश्न मला अनपेक्षित वाटला.

आम्ही दोघेही बोलत बोलत 'बस'च्या स्टॅन्डपर्यंत आलों. अन् जी पहिली 'बस' येईल त्यातून दोघांनींही जायचें, अशी आम्हीं सन्मान्य तडजोड करून आम्हीं दोघेही 'बस'ची वाट पहात राहिलों.

मात्र 'बस'मधें बसल्यानन्तर आमच्या विविध विषयांवर इतक्या गप्पा सुरू झाल्या, कीं आम्हीं दादरला केव्हां येऊन पोंचलों याचें मला तरी मुळींच भान राहिलें नाहीं.

देशप्रभु यांच्या घरांत प्रवेश करण्यापूर्वीं तिथें बरींचशीं सुन्दर चित्रें पहायला मिळतील अशी माझी अपेक्षा होती. पण त्यांच्या हॉलमधें ज्यावेळीं मी प्रवेश केला त्यावेळीं

'ऑपरेशनरूम 'मधेंच प्रवेश केल्याचा मला भास झाला ! सुन्दर चेहऱ्याच्या अन् गुलाबाच्या पाकळ्याप्रमाणें दिसणाऱ्या ओंठांच्या तरुणीच्या चित्राऐवजीं ओठाला कॅन्सर झालेल्या चेहऱ्याचें एक चित्र माझ्या दृष्टीस पडलें ! आकर्षक बांध्याच्या युवतीचें एकादें तरी चित्र दृष्टीला पडेल म्हणून मी जरा बाजूला मान वळविली, तों ब्लॅडर, व्हॅजिना इत्यादि स्त्रियांच्या रोगजर्जर गुह्य अवयवांचीं चित्रें माझ्या दृष्टिस पडली. स्त्री–पुरुषांच्या निरनिराळ्या रोगट अवयवांच्या चित्रांनीं त्यांची सबंध खोली भरलेलीं माझ्या दृष्टीस पडली.

" तुमची मेडिकल आर्ट म्हणजे हीच वाटतं ?" मी हंसत हंसत त्यांना प्रश्न केला.

" हो–हीच." बाजूचें एक चित्र हातीं घेत देशप्रभु म्हणाले, " हें पहा ब्लॅडरचं रफ स्केच. डॉक्टर ऑपेरेशन करीत असतां मी हें स्केच केलं आहे. अन् आपण मघांशीं जें पाहिलंत तें याच स्केचवरून केलेलं फायनल चित्र. "

" म्हणजे तुम्हीं अमेरिकेंत जोन्स हॉप्किन्स युनिव्हर्सिटींत शिक्षण घेतलंत तें हेंच का ?" मीं त्यांना प्रश्न केला.

" हो–हेंच. पण हा अभ्यास करतांना मला बरीच मेहनत घ्यावी लागली. मागं मी इथं असतांना एकाद्या सुंदर तरुणीचं हुबेहूब चित्र काढणं अगदीं हातचा मळ वाटे मला. पण शरिराच्या नाजुक अवयवाचं यथातथ्य चित्र काढणं त्याहूनही कठीण आहे असं मला कळून आलं. "

" पण तुमची मेडिकल आर्ट म्हणजे काय ? कोणकोणते विषय शिकलांत तुम्हीं ?" मी त्यांना विचारलें.

" Medical art is an art as applied to medicine. " देशप्रभूंनीं उत्तर दिलें, " I studied anatomy. My course consists of studies of fresh materials from autopsies and from the operating rooms, combined with microscopic studies of the various tissues in health and disease. "

" वैद्यकीय दृष्टीनं शरिराच्या निरनिराळ्या अवयवांचं चित्र काढणं हेंच ना तुमचं काम ?" मी त्यांच्याजवळचीं कांहीं चित्रें पहात प्रश्न केला.

" तें तर आहेच. पण हें शिक्षण घेत असतांना मला थोडासा ग्रोस पॅथॉलॉजी अन् हिस्टॉलॉजीचा अभ्यास करावा लागला. त्याचप्रमाणं फोटो–मायक्रोग्राफीचाही अभ्यास करणं

मला भाग पडलं. फोटो–मायक्रोग्रफी ही मेडिकल आर्टमधें अत्यंत महत्त्वाची बाब आहे. फोटो–मायक्रोग्राफीवांचून शरिरांतील रोगाचीं सूक्ष्म बीजं दृष्टीला पडणार नाहींत. "

" तुमच्या या कलेचा डॉक्टरनाच जास्त उपयोग ! " मी म्हटलें.

" अलबत ! म्हणूनच तर मी ही कला शिकून आलों. डॉक्टर ऑपरेशन करतो त्यावेळीं रोगाचीं बीजं तो दूर करतो खरं; पण त्यावेळीं रोगाची कशी अन् कुठून वाढ झाली याचा विचार अगर संशोधन करायला त्यावेळीं त्याला फुरसत नसते. म्हणूनच मेडिकल इलस्ट्रेटरची डॉक्टरास जरूरी लागते. डॉक्टर ऑपरेशन करीत असतांना शरिराच्या भागाचं मेडिकल इलस्ट्रेटरनं स्केच घेतलं, म्हणजे मागाहून डॉक्टरला त्या रोगाच्या कारणाचा विचार करतां येतो. रोगाच्या निरनिराळ्या अवस्थांचा त्याला अभ्यास करतां येतो. "

" एक्स-रेमुळं डॉक्टरांना माणसांच्या शरिरांतील विकृतींची माहिती होत नाहीं का ? " मी विचारलें.

" चुकतां तुम्हीं ! " देशप्रभु म्हणाले, " एक्स-रे अन् मेडिकल आर्ट यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. एक्स-रेमुळं फक्त हाडां ( Bones ) तील रोगाचीच परीक्षा करतां येते. पण मेडिकल आर्टचं तसं नाहीं. मेडिकल आर्टच्या सहाय्यानं शरिरांतील कोणत्याही भागांत झालेल्या रोगांचं चित्र मेडिकल इलस्ट्रेटर हुबेहूब काढूं शकतो. समजा, कुणाच्या तरी पायाच्या पोटरीला कॅन्सर अगर दुसरा कोणता तरी रोग झाला आहे. बाह्य चिन्हां-वरून डॉक्टर त्या रोगाचं निदान करील. पण त्या रोगानं आंत कसं ठाणं मांडलं आहे अन् त्याची कसकशी वाढ होत आहे हें डॉक्टरला कसं कळणार ? अशा प्रसंगीं मेडिकल इलस्ट्रेटर तें रोगाचं चित्र हुबेहूब काढून डॉक्टरसमोर ठेवतो. त्यामुळं डॉक्टरला उपाय-योजना करणं सोपं जातं. "

त्यानंतर आर्टिस्ट देशप्रभु यांनीं शरिराच्या रोगट अवयवाचीं काढलेलीं अनेक चित्रं मला दाखविलीं. आपल्याला अनेक रोगांचीं नांवं माहीत आहेत. पण कोणत्या तरी एका रोगानें मनुष्य पछाडलें म्हणजे त्या रोगाची शरिरांत कशी रचना असते, याची आपल्याला कल्पना नसते. कॅन्सर, ट्युबरक्युलॉसिस वगैरे रोगांनीं माणसाचें शरीर कसें पोखरलें जातें याचे कांहीं नमुने देशप्रभु यांनीं मला दाखविले.

कॅन्सरचा रोग नाहींसा करण्यासाठीं जें टाटा मेमोरिअल हॉस्पिटल उघडण्यांत यायचें आहे त्या हॉस्पिटलमधील आर्ट अन् फोटोग्राफी डिपार्टमेंन्टमधें देशप्रभु यांची मेडिकल इल-

स्ट्रेटर या नात्यानें नेमणूक झाली असल्यामुळें मी त्यांना प्रश्न केला, " कॅन्सरचा विकार नाहींसा होत नाहीं असं म्हणतात तें खरं का ? "

" असं कोण म्हणतंयू ? पहिल्या अगर दुसऱ्या अवस्थेंत असलेला रोगी खात्रीनं बरा होऊं शकतो. एवढी मात्र गोष्ट खरी, कीं हा विकार कसा उद्भवतो याचा अजून शोध लागलेला नाहीं. "

" अमेरिकेंत असतांना तुम्हीं आणखी कसला अभ्यास केलात ? "

" मी बायॉलॉजिकल फोटोग्राफीचा अभ्यास केला अन् त्याबद्दल मला अमेरिकन बायॉलॉजिकल असोशिएशननें एम्. बी. पी. ए. हा डिप्लोमाही दिला आहे. त्याखेरीज Infrared Photography चाही मी अभ्यास केला आहे."

"Infrared म्हणजे काय ? आणि त्याचा फोटोग्राफीला कसा काय उपयोग होतो ?" मी विचारलें.

" Infrared is that part of the spectrum, which extends below from the visible red to the shortest radio waves. The part of the infra-radiation has a property of penetrating haze and mist, and is consequently used in photography. शिवाय इन्फ्रारेडचा Clinical photography मधें फारच उपयोग होतो. " देशप्रभु म्हणाले.

देशप्रभु यांनीं मेडिकल आर्ट, बायॉलॉजिकल फोटोग्राफी वगैरे मेडिकल प्रश्नांसंबंधीं इतकी शास्त्रीय माहिती मला सांगितली कीं माझें डोकें पिकून गेलें. आतां मेडिकल आर्टच्या दृष्टीनें माझ्या मेंदूचें चित्र काढून त्यावर कोणते परिणाम झाले आहेत तें सांगा, असें ज्यावेळीं मी त्यांना थोडें त्रासून सांगितलें, त्यावेळीं त्यांना हंसूं आवरेना ! आतां तरी या मेडिकल आर्टच्या तावडींतून मीं सुटलों असें मला वाटलें होतें. इतक्यांत कसला तरी विकार झालेल्या माणसाच्या मेंदूचें चित्र त्यांनीं माझ्या हातीं दिलें अन् त्या विकाराची ते माहिती देऊं लागले. तेव्हां ती चर्चा थांबविण्यासाठीं मी त्यांना मधेंच प्रश्न केला, " न्यूयॉर्क येथें भरलेल्या ' वर्ल्ड फेअर ' ला आपण हजर होतां का ? "

" मी तिथं गेलों खरा. पण तेथून आनन्दून येण्याऐवजीं हिरमुसल्या तोंडानंच मागं परतलों. "



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

" म्हणजे ? तिथं 'कलर-बार' वगैरे होता कीं काय ? "

" अमेरिकेंत नीग्रोशिवाय कुणालाही 'कलर-बार' चं बंधन नाहीं. "

" मग हिरमुसले होऊन कां परतलांत ? "

" त्याचं कारण असं, कीं जगांतल्या सर्व राष्ट्रांनीं—स्वतंत्र, परतंत्र राष्ट्रांनीं वर्ल्ड फेअर-मधें भाग घेतला होता. पण हिंदुस्थानचा मात्र तिथं मागमूसही दिसत नव्हता. 'तुझ्या हिंदुस्थानांत काय कलाकौशल्य आहे तें तर दाखव मला' असं ज्यावेळीं माझ्या अमेरिकन मित्रानं मला सांगितलं, त्यावेळीं तर मी अगदीं ओशाळून गेलों. ज्या देशाचं स्वतंत्र देश म्हणून आतां अस्तित्व नाहीं तो झेकोस्लोव्हाकियाही आपल्या देशांतील कलाकौशल्यांच्या रूपानं तिथं आपलं अस्तित्वही दाखवीत होता. "

" वर्ल्ड-फेअरमधें सर्वांत आकर्षक असं काय वाटलं तुम्हाला ? " मी विचारलें.

" रशियन पॅव्हिलिअनखेरीज प्रदर्शनांतील दुसरा कोणताही भाग मला आवडला नाहीं. झारच्या काळांतीलही कांहीं अमोलिक वस्तु तिथं प्रदर्शनांत ठेवल्या होत्या. क्रांतिपूर्व रशिया, क्रांतिनंतरचा रशिया, आजचा रशिया अन् भावी रशिया अशीं जीं दृश्यं सोव्हिएट रशियानं तिथं दाखविलीं होतीं, त्यानं तर मी अगदीं मोहून गेलों. अमेरिकेच्या 'स्टॅच्यु ऑफ लिबर्टी' सारखा भव्य पुतळा रशियानं पॉव्हिलियनवर उभारला होता. त्यामुळं तर अमेरिकनही दिपून गेले. अन् दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी, कीं ही एवढी मोठी पॉव्हिलिअनची उभारणी जी रशियानं केली आहे तिची मोडतोड न करतां सर्व पॉव्हिलिअन रशियांत नेण्यांत यायचा आहे. प्रत्येक देशांतील कलाकौशल्य, उद्योगधंदे याची सर्व जगाला माहिती व्हावी हाच 'वर्ल्ड फेअर' भरविण्याचा खरं म्हटलं तर मूळ उद्देश आहे. पण या उद्देशाचा रशियानं तेवढा भरपूर फायदा घेतला. रशियानं तिथं दाखविलेलं प्रत्येक दृश्य अन् वस्तु प्रचाराच्या हेतूनं दाखविली होती. अन् तो रशियाचा हेतुही सफल झाला. इतर भागांपेक्षां रशियन पॉव्हिलिअनमधें लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत होत्या. "

लैंगिक प्रश्नासंबंधीं बोलतांना देशप्रभु म्हणाले, " अमेरिकेंत तरुण-तरुणींना साधारण वयांत आल्यावर बायॉलजीचं शिक्षण दिलं जातं, म्हणूनच त्यांना आपली प्रकृति सुदृढ राखतां येते. हिंदुस्थानांतल्या एकाद्या तरुण विवाहित स्त्रीला पोटांत अन्न कुठं जातं अन् गर्भधारणा कुठं होते असा प्रश्न विचारला तर पोटांत अन्न जातं तिथंच गर्भ असतो,

अशी ती उत्तर देईल. पोट म्हणजे जणुं काय ' वेस्ट पेपर बास्केट 'च ! तेंच तुम्हीं अमेरिकन अविवाहित मुलीला विचारा. ती तुम्हांला सर्व शरिराच्या व्यापाराची माहिती देईल."

" मुलांमुलींना ' सेक्स-एज्युकेशन ' द्यावं असंच तुमचं म्हणणं आहे का ?"

" Of course ! sex education constitutes an essential part of wider knowledge of elementary biology which is the right of every boy and girl." देशप्रभु म्हणाले " लैंगिक शिक्षणांत अश्लीलता आहे असं जुन्या पिढीच्या लोकांना वाटतं. पण स्वतःच्या शरिराचे व्यापार, त्याचा उपयोग, त्यांतील विकृति नाहींशी करण्याचे उपाय याचं शिक्षण घेणं यांत कसली आली आहे अश्लीलता ? हें पहा, माझ्याकडे स्त्रियांच्या गुप्त भागांचीं कांहीं चित्रं आहेत. आमच्या हिंदी स्त्रिया चुकूनही त्याकडे नजर टाकणार नाहींत. पण तींच चित्रं जर अमेरिकन स्त्रियांच्या हातीं लागलीं तर तीं चित्रं निरखून पहात पहात हजार प्रश्न विचारून त्या तुम्हांला भंडावून सोडतील."

मुंबईत मेडिकल आर्टचा कोर्स सुरू करण्याचा तुमचा विचार आहे काय, असा मी देशप्रभु यांना प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, " या शिक्षणाचा हिंदुस्थानांत प्रसार व्हावा अशी माझी आत्यंतिक इच्छा आहे. मुंबईतील प्रत्येक हॉस्पिटलमधें एकाद दुसरा मेडिकल इलस्ट्रेटर असला पाहिजे. हें शिक्षण देण्याची जरी माझी फार इच्छा आहे तरी तें काम मला माझ्या एकट्याच्या जबाबदारीवर करतां येणार नाहीं. मुंबईतल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट या संस्थेनं जर हें मनावर घेतलं तर त्या संस्थेला तें सहज साध्य होईल. मी जरी आज टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमधें नोकरीनं बांधलेला असलों तरी त्या संस्थेच्या चालकांच्या संमतीनं मी जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या अधिकाऱ्यांना सर्वतोपरी मदत करीन."

त्या नंतर अमेरिकन वाङ्मयाकडे आमच्या चर्चेचा ओघ वळला. अमेरिकन वाङ्मयासंबंधीं मी त्यांना प्रश्न विचारला त्यावेळीं देशप्रभु म्हणाले, " पण मी अमेरिकन वाङ्मय तरी कुठं वाचलं आहे ? जे कांहीं वाचलं आहे तेंसुद्धां फार घाईघाईनं. पूर्वी मी ललित वाङ्मयाचा फार भोक्ता होतों. पण अमेरिकेला गेल्यापासून मेडिकल आर्टसंबंधीं जीं मला पुस्तकें वाचावीं लागलीं त्यामुळं साहाजिकच Serious

Literature वाचण्याकडे माझा कल झाला. अन् अभ्यासामुळंही ललितवाङ्मय वाचायला तेवढा मला वेळ मिळाला नाहीं."

"पण कांहीं कादंबऱ्या नाटकं तुम्हीं वाचलीं असतीलच."

"तशीं फार वाचली आहेत. पण तुम्हीं प्रश्न विचारला तर सर्वच पुस्तकांसंबंधीं माहिती देण्याइतकी त्या पुस्तकांचीं अन् ग्रंथकर्त्यांचीं नांवं मला आतां आठवतीलच असं नाहीं."

"पण आठवतील तीं तरी सांगाल ना?"

"अलबत्!" हंसत म्हणाले.

"अमेरिकन ललित वाङ्मयासंबंधीं तुमचं काय मत आहे?"

"अमेरिकन वाङ्मय जगांतील कोणत्याही वाङ्मयापेक्षां सुधारलेलं आहे हें मी सांगितलं पाहिजे असं नाहीं."

"ब्रिटिश वाङ्मयापेक्षांही अमेरिकन वाङ्मय तुम्हांला आवडतं का?"

"अन् तुम्हांला नाहीं आवडत?" देशप्रभु म्हणाले. "अमेरिकेंत असतांना ब्रिटिश ऑथर मी फारसे वाचले नाहींत. याचं कारण अमेरिकेंत ब्रिटिश पुस्तकांना भारी किंमत पडते. अन् त्यांतून मी कांहीं वाङ्मयाचा अभ्यास करायला गेलों नव्हतों अमेरिकेंत. तेव्हां पुस्तकं तरी मी कां विकत घ्यावी?"

"पण अमेरिकन वाङ्मय आज सर्वश्रेष्ठ आहे असं तुमचं मत आहे तर?"

"निदान मला तरी असं वाटतं. याचं कारण असं, कीं अमेरिकेंत लेखकांच्या विचार-स्वातंत्र्यावर बंधन नाहीं. नीति अनीति, अश्लीलता यांचा तिथं बागुलबोवा नाहीं. अन् ब्रिटिश लेखकाप्रमाणं ते परंपरेचे अभिमानीही नाहींत. रशियन वाङ्मय मी फारसं वाचलेलं नाहींत. पण तेथील लेखकांवर थोडंसं बंधन असल्यामुळं त्यांना four corners of Soviet policy सांभाळून लिहावं लागतं. पण अमेरिकेंत लेखकांचं तसं नाहीं. ते प्रसंगीं प्रे. रूझवेल्टवरही टीका करूं शकतात."

"अमेरिकन वाङ्मय विशेषतः कोणत्या गुणांमुळं तुम्हांला जास्त आवडतं?"

"मनाला भुरळ पाडणारं लालित्य. अन् म्हणूनच अमेरिकन वाङ्मयाला जागतिक लोकप्रियता मिळाली आहे. अमूक लेखकानं अमूक तंत्रानं कादंबरी लिहिली आहे, म्हणून आपण त्याच तंत्रानें कादंबरी लिहिली पाहिजे असं कांहीं तरुण पिढीचे लेखक बंधन पाळीत नाहींत. कादंबरी जास्त लालित्यपूर्ण कशी करावी या बाबतींतच ते जास्त मेहनत

घेतात. त्यामुळं सिंक्लेअरलाही आपल्या लेखनशैलींत बदल करणं भाग पडलं. सिंक्लेअर यांच्या पूर्वींच्या कादंबऱ्या तुम्ही वाचल्या अन् No Pasaran ही कादंबरी वाचली तर त्यानंही लालित्यपूर्ण लेखनाला आतां प्रारंभ केला आहे असं दिसून येईल. "

" अमेरिकन लेखकांपैकीं कोणते ग्रंथकार तुम्हांला आवडतात ? "

" व्हर्जिनिया वुल्फ माझी आवडती कादंबरीकार आहे. पण नव्या पिढींतील लेखक-लेखिकांत के बॉईल ही कथालेखिका, जेरोम विडमन हा कथालेखक अन् विल्यम फॉकनेर हा कादंबरीकार मला जास्त आवडतो. विशेषतः के बॉईल या लेखिकेच्या कथा मला फार आवडतात. ती बाई तंत्राचं बंधन कधींच मानींत नाहीं. म्हणूनच एकाच पद्धतीच्या गोष्टी तिच्या कथासंग्रहांत फारशा आढळत नाहींत. जेरोम विडमन हा साधीसुधी भाषा लिहिणारा लेखक आहे. त्याच्या भाषेंत अन् कथानकांतही घरगुती वातावरण दिसतं. त्यामुळं अमेरिकेंतही तो लोकप्रिय आहे. आणखीही कांहीं ग्रंथकारांचीं मी पुस्तकं वाचलीं आहेत. पण त्यांचीं आतां नांवं आठवत नाहींत. "

" मराठी वाङ्मयांतील कांहीं कादंबऱ्या इंग्रजींत भाषांतरित झाल्या तर त्या लोकप्रिय होतील का ? "

" प्रो. ना. सी. फडके यांच्या कादंबरीखेरीज कोणत्याच लेखकाची कादंबरी लोकप्रिय होईल असं मला तरी वाटत नाहीं. स्वभावरेखाटनाचं कौशल्य अन् लालित्य हे दोन गुण अमेरिकन लेखकांना अन् वाचकांनाही आवडते आहेत. याच दोन गुणांवरच तर प्रो. फडके यांना कादंबरीकार म्हणून यश मिळालं. पण मराठी नाटककारांचीं नाटकं जर कुणी भाषांतरित केलीं तर वेरेरकरांच्या नाटकांनाच लोकप्रियता मिळेल. त्यांच्या नाटकांतील संवाद इतके सुटसुटीत अन् प्रभावी आहेत कीं त्यांच्या संवादावर अमेरिकन लोकही खूष होतील. आजच्या चित्रपटाच्या युगांत वेरेरकर जर अमेरिकेंत असते तर त्यांनीं चित्रपटांचे संवाद लिहून लाखों रुपये कमाविले असते. "

" गेल्या दोन वर्षांत अमेरिकेंत विशेष अशी लोकप्रियता कोणत्या कादंबरीला मिळाली ?"

" मार्गारेट मायकेल हिच्या Gone with the wind या कादंबरीला अभूतपूर्व असं यश मिळालं. अमेरिकेंतच या कादंबरीला लोकप्रियता मिळाली असं नाहीं तर त्या कादंबरीला जागतिक कीर्ति मिळाली. चिनी भाषेंतही या कादंबरीचं भाषांतर झालं आहे. "

" आणखी दुसरी कोणती कादंबरी लोकप्रिय आहे ? "

" अप्टन सिंक्लेअरची ' नो पॅसारा ' ही कादंबरी उत्कृष्ठ आहे यांत शंका नाहीं. पण ती विशेष लोकप्रिय होण्याचीं दोन कारणं आहेत. एक म्हणजे सिंक्लेअर हा जागतिक कीर्ति संपादन केलेला ग्रंथकार आहे अन् दुसरं म्हणजे त्यावेळीं सर्वांच्या चर्चेचा विषय झालेल्या स्पेनच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यानं कादंबरी लिहिली. "

" तुम्हांला ती कादंबरी आवडली का ? "

" आवडली. पण त्यांतील लालित्यामुळं मात्र नव्हे. सिंक्लेअरच्या इतर कादंबऱ्यांपेक्षां ती कादंबरी जास्त लालित्यपूर्ण आहे ही गोष्ट खरी. पण मला ती जी कादंबरी आवडली ती कादंबरींतील नायकाच्या स्वभावरेखाटनामुळं. मला वाटतं त्या नायकाचं नांव रूडीच असावं. लेखकानं त्याच्या स्वभावाचा जो पायरीपायरीनं विकास केला आहे तो वाचकाचं मन मोहित केल्याखेरीज राहात नाहीं. अन् त्यांतूनही सिंक्लेअरनं तत्कालिन परिस्थितीचे जे कादंबरींत मार्मिक उल्लेख केले आहेत त्यामुळं प्रस्तुत परिस्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनीं आपण पहात आहों असा भास निर्माण होतो; अन् तीं वर्णनंही नैसर्गिक वाटतात. कादंबरीला राजकीय महत्त्व देण्यासाठीं वर्णनांचीं ठिगळं मुद्दाम जोडलीं आहेत असं मुळींच वाटत नाहीं. यामुळं कादंबरीच्या उत्कृष्टपणांत भर पडली आहे. पण ती कादंबरी मला कां आवडली म्हणून तुम्हीं विचाराल तर ' नायकाचं उत्कृष्ट स्वभावलेखन ' असंच मी उत्तर देईन. "

: २४ :

# कै. बापूसाहेब पेंढारकर

" केळकरांनीं बोलावल्यावरून कमिटीपुढं पदें गाऊन दाखवायला मी पुण्याला गेलों. अन् संगीतज्ञ चार पांच मंडळीसमोर दोन्हीं तात्यांचीं पदें मी गायला सुरवात केली. अन् सगळीं पदें गायिल्यानन्तर केळकरांनीं नेमलेल्या कमिटींत कोल्हटकरांचीं सगळीं पदें पसंत केलीं ! "

असे उद्गार कोल्हटकर यांच्या निधनानंतर मी ज्यावेळीं ललितकलादर्श मंडळीचे चालक बापूसाहेब पेंढारकर यांची १९३४ सालीं मुलाखत घेतली त्यावेळीं त्यांनीं काढले.

मुलाखत घेण्यासाठीं मी गेलों त्यावेळीं स्वयंसेवक नाटकाची तालिम सुरू होती. मी ऑडिटरियममधें जाऊन बसल्यावर बापूसाहेब माझ्या शेजारीं येऊन बसले अन् माझ्याशीं इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलूं लागले. ते माझ्याशीं बोलत होते तरी त्यांचें लक्ष

तालमीकडे वेधलें असल्याचें मला दिसून आलें.

यावेळीं त्यांना व्यत्यय न करणें बरें असें मला वाटलें, अन् मुलाखतीला केव्हां येऊं असें मी त्यांना विचारलें त्यावेळीं ते चटदिशीं आपल्या नेहमींच्या पद्धतीनें हंसत म्हणाले, " मुलाखत ? तुम्हीं वाट चुकलेले दिसतां ! मणिभुवन तें हें नव्हे ! "

गांधीजी त्याच दिवशीं मणिभुवनमधें असल्यामुळें बापूसाहेबांच्या या समयोचित विनोदानें मी हंसलों. नंतर कोणत्या विषयावर मुलाखत पाहिजे तें मी त्यांना सांगितल्यावर त्यांनीं मला तालमी संपेपर्यंत थांबण्यास सांगितलें.

तालमीच्या वेळीं नटांच्या अभिनयाकडे माझें लक्ष वेधण्याऐवजीं बापूसाहेबांनींच आपल्याकडे वेधवून घेतलें. नाटककाराच्या मूळ कल्पनेबरहुकूम नटांना भूमिकेचें स्वरूप समजावून सांगण्याची त्यांची हातोटी, अभिनयासंबंधींच्या योग्य सूचना अन् नटांवर मालकशाही न गाजवतां मिळून मिसळून वागण्याची त्यांची वृत्ति पाहून मला त्यांचें कौतुक वाटलें.

" तात्यासाहेब कोल्हटकरांची अन् आपली भेट केव्हां झाली ? "

स्वयंसेवक नाटकाच्या तालमीचें काम संपल्यावर मी त्यांना विचारलें,

" वेरेरकरमामांच्या ' संन्याशाचा संसार ' या नाटकाच्या तालमीच्या वेळीं तात्यासाहेब आले होते. वेरेरकरमामा त्यांच्या विद्वत्तेचा अन् विनोदवृत्तीचा वारंवार उल्लेख करीत. त्यामुळं त्यांची माझी ओळख होण्यापूर्वींच मला त्यांच्याविषयीं अत्यंत आदर वाटे. ' संन्याशाच्या संसारां ' त शंकराचार्यांला पहिलंच शंकरा रागांतलं पद आहे. तें पद गायिल्यानंतर वेरेरकरमामांनीं तें पद कसं आहे असं तात्यासाहेबांना विचारलं तेव्हां ' शंकरा रागांतलं शंकराचार्यांचं पद कां नाहीं चांगलं असणार ? ' अशी त्यांनीं हंसत हंसत कोटी केली.

" त्यानंतर दुसऱ्या भेटीचा योग कधीं आला ? "

" तसा भेटायचा योग मधून मधून येतच असे. पण तेवढा निकट परिचय मात्र नव्हता. ' कृष्णार्जुन युद्धा 'च्या पदांच्या वेळीं मात्र त्यांचा माझा बराच निकट परिचय झाला ! "

" ' कृष्णार्जुन युद्धा 'च्या पदांच्या वेळीं त्यांचा तुमचा संबंध कसा काय आला ? त्या वेळची कांहीं हकिकत सांगूं शकाल का ? "

" हो ना ! सांगायला काय हरकत आहे ? तें असं झालं, कीं तात्यासाहेब केळकरांनीं करून दिलेलीं पदें गायनशुद्ध नव्हतीं. तीं गातांनासुद्धां नटांना फारच अडचणीचीं जाऊं लागलीं. त्यावेळीं तीं पदें सुधारून घेण्यासाठीं मी तात्यासाहेब कोल्हटकरांकडे गेलों. "

" पण हें पाहून केळकरांना वाईट वाटलं असेल नाहीं ? "

" छेः हो ! मी तर केळकरांचं पत्रच घेऊन गेलों होतों. शिवाय त्यांनीं पोस्टानं निराळंहीं पत्र कोल्हटकरांना पाठविलं होतं. मी जळगांव–जामोदला ( त्यांच्या वकिलीच्या गांवीं ) गेलों त्यावेळीं तात्यासाहेब कोर्टांतच होते. केळकरांनीं त्यांना आगाऊच कळविलं असल्यामुळं कोर्टाच्या दारांतच त्यांनीं पटेवाल्याला बजावून सांगितलं होतं–मी कोर्टांत गेलों त्यावेळीं तात्यासाहेब कोर्टाच्या कामांत गुंतलेले होते. खटल्यांतील आरोपीला सक्तमजुरी मिळण्याऐवजीं तिथं चार पांच तास ताटकळत बसण्याची मात्र सक्तमजुरी मला मिळाली ! नंतर सुमारं चार पांच वाजतां आम्हीं घरीं यायला निघालों. तात्यासाहेबांसारखा एवढा मोठा वकील अन् विद्वान लेखक तेव्हां जळगांव–जामोदला त्यांच्या मालकीचा एकदा टुमदार बंगला असेल असं मला वाटलं होतं. पण त्यांच्या राहात्या घरांत प्रत्यक्ष पाऊल ठेवतांच बंगल्याबद्दलचे माझे मनोरे कोसळून पडले. त्यांच्या त्या घराचं चित्र अजूनही माझ्या नजरेसमोर उभं राहतं. कचरा सांचलेली पडवी, पडवीच्या आंत दोन खोल्या, त्यांपैकीं एका खोलींत ऑफिस—अन् दुसऱ्या खोलींत स्वयंपाकघर. ऑफिसच्या खोलींत टेबलाभोंवतीं चार मोडक्या खुर्च्या, कागदाचीं दप्तरें अन् जुनीपुराणीं वर्तमानपत्रं होतीं. "

"मग कृष्णार्जुनयुद्धामधली पदें तुम्हीं त्या दिवशींच त्यांना करायला सांगितलींत का ?"

" नाहीं. केळकरांनीं केलेलीं कांहीं पदें अन् लिहून आणलेल्या तीस बत्तीस मूळ चिजा मी त्यांच्याकडे दिल्या. त्यावेळीं त्यांनीं मला त्या गाऊन दाखवायला सांगितलं. तिथं तबला किंवा पेटी नव्हती असं असतांना मी प्रत्येक चीज ते सांगेपर्यंत व्यवस्थित गाऊन दाखवीत होतों. अन् आपल्याशींच गुणगुणत ते ती चीज ध्यानांत ठेवीत होते. त्यांनीं पुरे म्हणेपर्यंत प्रत्येक चीज मीं त्यांना गाऊन दाखवली. अशा सगळ्या चीजा मीं गाऊन दाखविल्यानंतर त्या सगळ्या चिजा ज्यावेळीं त्यांनीं आपण गाऊन दाखविल्या त्यावेळीं मी थक्क झालों ! एकाच बैठकीला भिन्न रागांच्या अन् तालाच्या सांगितलेल्या दोन तीन चीजासुद्धां ध्यानांत राहाणं कठीण जातं. असं असतां एकामागून एक सांगितलेल्या भिन्न भिन्न बत्तीस चिजा

त्यांनीं ध्यानांत ठेवून पुनः कशा म्हणून दाखविल्या याची मला कल्पनासुद्धां करतां येत नाहीं. अन् हें सारं काम तीन चार तासांतच झालं. प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं त्यांना नऊ वाजतां झोंप घेणं अवश्य असल्यामुळं आठ वाजण्याच्या आंतच हें सर्व काम संपविणं भाग होतं. ही त्यांची विलक्षण धारणाशक्ति पाहून मात्र त्यांच्या असामान्यतेची कल्पना आली अन् त्यांच्याविषयींचा पहिला आदर दुणावला. नंतर पुढील आठवड्यांत येतों असं सांगून मी दुसऱ्या दिवशीं सकाळच्या गाडीनं मुंबईत आलों."

"त्यावेळीं नाटकाच्या तालमी सुरू होत्या का ?"

"म्हणूनच तर पदांची एवढी मला घाई होती. मी दुसऱ्या आठवड्यांत त्यांच्याकडे गेलों त्यावेळीं तात्यासाहेब कोर्टांतच होते. मधल्या सुटींत तात्यासाहेबांनीं मला बाररूममधें बोलावून नेलं अन् सर्व पदें केलीं आहेत असं मला सांगितलं. ते पदांचा कागद माझ्या हातीं देणार असं मला वाटत होतं. पण ते म्हणाले, 'हें पहा, पदांचा कागद राहिला घरीं; मी तुम्हांला सगळीं पदं गाऊन दाखवतों. गाण्याच्या सोईसाठीं कांहीं फरक करावा लागला तर मला सांगा–' असं म्हणून त्यांनीं त्यांतील बरींचशीं पदें गाऊन दाखविलीं. तीं पदें जरी ते हळुच गुणगुणत होते, तरी त्या गुणगुणण्यांतही ताल अन् राग यांचा मिलाफ दिसून येत होता. बरींचशीं पदें तात्यासाहेबांनीं पाठ म्हटलेलीं पाहून मी तर पुनः थक्क होऊन गेलों."

"तात्यासाहेब तीं पदें बाररूममधेंच म्हणत होते त्यावेळीं तिथं इतर वकील मंडळी हजर नव्हती का ?"

"तसे पांचसहा वकील तिथं होते. पण तात्यासाहेबांशीं ते आदरानं वागत असल्यामुळं ते जरा बाजूलाच बसलेले होते."

"पण केळकरांनीं जीं पदें करून दिलीं होतीं त्यांचं पुढं काय झालं ?"

"केळकरांचीं कांहीं पदें त्यांनीं दुरुस्त केलीं. कांहीं दुरुस्त करतां येईनात म्हणून अजिबात चाली बदलल्या. फक्त कल्पना कायम ठेवल्या. कांहीं पदांच्या कल्पनाही बदलल्या आहेत. केळकरांनीं द्रौपदीचं

**तापस मुनि म्हणुं कशी नारदा । वर्मी बिब्बा रुतला हा ॥ध्रु०॥**
**उठवि व्रण ठायिं ठायिं । हंसुनि रडवि धाइ धाइ । अश्रु हास्य**
**मिश्र करुनि । वाहती प्रवाहा ॥१॥**

असं पद केलं होतं. या पदांतील 'बिब्बा' या शब्दाच्या जागीं जो चिजेंतला मूळ शब्द आहे, त्या शब्दावर आकाराची तान असल्यामुळं ' बिब्बा ' शब्द तानेला कठीण जाऊं लागला. तेव्हां कोल्हटकरांनीं

**कपटसागर पुरुष साचा । जणूं कैसा मुनि जसा ॥ ध्रु० ॥**
**हांसुनि आपण रडवि इतरातें । सुख मानुनियां इतर नाशा ॥ १ ॥**

असं नवं पद तयार केलं. तसंच तिसऱ्या अंकांत केळकरांनीं खालील पद तयार केलं होतं—

**हें कठिण करिन वज्रासम मन । होऊं एकदां निःशंकित जन॥ध्रु०॥**
**प्रेमा स्थान न आतां हृदयिं या । लांछन येइल करिन जरि दया ।**
**प्रेषित जनलज्जा करि देऊनि धर्म । खड्ग मज विजया हें कठिण ॥१॥**

हें वरील पद कृष्णाचं आहे. पण तें गायनशुद्ध नसल्यामुळं कोल्हटकरांनीं स्वतःच्या कल्पनेनं खालील पद केलं—

**हें अशनिसम करी कठीण मन । जनविशंक करिनचि अजि पूर्ण ॥ध्रु॥**
**हृदयाच्या कलुषित जलाशयिं । रिघुं न शके स्नेहमिषें शशांक ।**
**सहानुभव मंदानिल करुणा लहरी । अल्प उद्भवूं न शके ॥ १ ॥**

तात्यासाहेब कोल्हटकरांनीं जीं कांहीं अगदीं स्वतंत्र पदें कृष्णार्जुन युद्धांत तयार केलीं आहेत त्यांमधें शब्दलालित्य अन् सुंदर कल्पना यांचा मधुर संगम झाला आहे."

" कोल्हटकरांनीं केलेलीं पदें केळकरांना कशी काय पसंत पडलीं ? "

" कृष्णार्जुन युद्धाच्या दुसऱ्या प्रयोगाला केळकर हजर होते. तात्यासाहेब कोल्हटकरांचीं पदें ऐकल्यावर त्यांनीं मला सरदारगृहांत बोलवून नेलं अन् ' यापुढं तुम्हीं कोल्हटकरांची पदें गाऊं नका. मी पदें पुनः दुरुस्त करून देईन ' असं त्यांनीं मला सांगितलं अन् पुढं ते असंही म्हणाले, ' पुण्याला गेल्यावर आपण एक ' कमिटी ' नेमतों. त्या कमिटीपुढं तुम्हीं माझीं अन् कोल्हटकरांचीं पदें गाऊन दाखवा अन् कमिटी पसंत करील तीं पदें प्रयोगाच्या वेळीं गाऊन दाखवा.' त्यांच्या म्हणण्याला माझी कबुली असल्याचं मी त्यांना सांगितलं. पण आपल्या नाटकांत कोल्हटकरांनीं केलेलीं पदें असणं त्यांना बरं वाटलं नाहीं. दोन्ही तात्यांचा स्नेहसंबंध जिव्हाळ्याचा होता असा जो माझा समज होता तो निखालस खोटा ठरला."

" पुण्याच्या ' कमिटी'चं पुढं काय झालं ? "

" केळकरांनीं बोलावल्यावरून कमिटीपुढं पदें गाऊन दाखवायला मी पुण्याला गेलों. कै. तात्यासाहेब मेहेंदळे यांच्या घरीं कमिटी जमली होती. बिनकार मुळे अन् इतर संगीतज्ञ चारपांच मंडळी यांच्यासमोर दोन्हीं तात्यांची पदें मी गायला सुरवात केलीं. तीं पदें गात असतां कुणाचं पद आहे हें न सांगतां मी पदें गायचं असं ठरलं होतं. सगळीं पदें गायिल्यानंतर केळकरांनीं नेमलेल्या कमिटीनं कोल्हटकरांचीं सगळीं पदें पसंत केलीं ! "

" मग यावर केळकर कांहीं म्हणाले का ? "

" तुम्हीं गातानांच माझी पदें वेडीवांकडीं म्हटलीं, त्यामुळं कमिटींला तीं बरी वाटली. तुम्हीं यापुढं कोल्हटकरांचीं पदें म्हणूं नका. महिन्याला एक या मुदतीनं मी तुम्हांला सर्व पदें करून देतों आणि तसतशीं तुम्हीं पदें बदलीत जा ' असं केळकरांनीं मला निक्षून सांगितलं. "

" हल्लीं प्रयोगाच्या वेळीं तुम्हीं जीं पदें म्हणतां, तीं केळकरांची कीं कोल्हटकरांची ? "

" प्रयोगाच्या वेळीं केळकरांचीं पदें म्हणतां आलीं असतीं तर मी एवढा उपद्याप कां केला असता ? सध्यां प्रयोगाच्या वेळीं कोल्हटकरांचीच मी पदें म्हणतों. "

" वधूपरीक्षा नाटक तुम्हीं केव्हां घेतलं ? "

" एका तात्यांची वर्तणूक पाहून दुसऱ्या तात्यांविषयींचा माझा आदर द्विगुणीत झाला. १९२७ सालीं तात्यासाहेब कोल्हटकर डोळ्यांवर उपचार करायला मुंबईस सरदेसाई यांच्या दवाखान्यांत आले असतां त्यांची मी तिथें भेट घेतली अन् त्यांच्या हातीं प्रयोगाचे अधिकार असलेलं अन् बारा वर्षे कुणीही करीत नसलेलं ' वधू परीक्षा ' नाटक घेतलं. तें गद्यस्वरूपांत होतं. कृष्णार्जुन युद्ध नाटकाच्या वेळेचा मला पूर्ण अनुभव असल्यामुळं मला पदांविषयीं काळजी वाटली नाहीं. ' कृष्णार्जुन युद्धा'च्या पदाच्या चाली ज्याप्रमाणं पहिल्या आठवड्यांत नेऊन दिल्या त्याप्रमाणंच ' वधूपरीक्षा ' नाटकांतील पदांच्या चाली पहिल्या आठवड्यांत नेऊन दिल्या अन् दुसऱ्याच आठवड्यांत पदें आणलीं. "

" कृष्णार्जुन युद्धानंतर केळकरांचं दुसरं एकादं नाटक कां घेतलं नाहीं ? "

" कृष्णार्जुन युद्ध मी केळकरांकडे मागायला गेलों त्यावेळीं हें जुनें नाटक देण्याऐवजीं एकादं नवीनच देईन असं केळकरांनीं मला म्हटलं होतं. त्यावेळीं ' कृष्णार्जुनयुद्ध ' जर

यशस्वी झालं तर लवकरच त्यांचीं दुसरींही नाटकं बसवायची माझी इच्छा आहे असंही मी केळकरांना सांगितलं होतं. कृष्णार्जुन युद्धानंतर व्यावहारिक दृष्ट्या त्यांचा जो मला अनुभव आला तो जन्मभर न विसरण्यासारख्या असल्यामुळं त्यांच्याकडे पुढं नाटक मागायचं मी धाडस केलं नाहीं ! ”

“ व्यावहारिक दृष्ट्या कोल्हटकरांचा कसा काय अनुभव आला ? ”

“ व्यावहारिक बाबतींत कोल्हटकरांचा मला मुळींच त्रास झाला नाहीं. पण त्यांची माझी कधीं तरी भेट झाली म्हणजे ते मला इतक्या प्रेमळपणानं वागवीत असत, कीं त्यावेळीं मला केळकरांची विरोधादाखल आठवण होई अन् ‘ हें चित्र पहा अन् तें चित्र पहा ’ असं कुणाला तरी सांगायची इच्छा होई. ”

“ कोल्हटकरांचा अन् तुमचा जर इतका स्नेह तर मग कोल्हटकरांचं दुसरं एखादं नाटक कां बसविलं नाहीं ? ”

“ वधूपरीक्षेचा प्रयोग उत्कृष्ट झाल्यानंतर ‘ श्रमसाफल्य ’ अन् ‘ मायाविवाह ’ हीं दोन नाटकं लिहिण्याची तात्यासाहेबांना स्फूर्ति आली. त्याचवेळीं मी त्यांच्याकडे ‘ प्रेमशोधन ’ नाटक बसविण्याची परवानगी मागून घेतली. ”

“ प्रेमशोधन नाटकच तुम्हीं कां निवडलं ? ”

“ कोल्हटकरांच्या सगळ्या नाटकांत प्रेमशोधनच मला फार आवडतं. पण प्रेमशोधन निवडण्याचं दुसरं कारण असं, कीं १९२६ सालीं गडकऱ्याचं ‘ पुण्य-प्रभाव ’ मी रंगभूमीवर आणलं. ‘ पुण्यप्रभाव ’ नाटकांतल्या दोन तीन भूमिका गडकऱ्यांनीं ‘ प्रेमशोधनां ’ तूनच घेतल्यामुळं या नाटकाची तुलना आमच्या खाजगी चर्चेत होत असे. पुण्यप्रभावांतील गडकऱ्याच्या भडक भूमिकांची प्रेमशोधनांतील मानसशास्त्रीय दृष्ट्या सर्वोत्कृष्ट असणाऱ्या भूमिकांशीं तुलना करतां त्या चुकीच्या असूनही ज्या अर्थी त्या लोकप्रिय झाल्या त्या अर्थी गडकऱ्यांचे गुरु कोल्हटकर यांनीं प्रेमशोधनांत रंगविलेल्या मूळ भूमिका लोकांच्या समोर असाव्या अशी मला इच्छा झाली. म्हणूनच मी प्रेमशोधन निवडलं. ”

“ कोल्हटकरांच्या सर्व नाटकांत तुम्हांला कुठला प्रवेश आवडतो ? ”

“ मूकनायक नाटकांतील तिसऱ्या अंकांतील पहिला प्रवेश हा माझ्या दृष्टीनं नाटकांतील काव्यमय प्रसंग असून रसपरिपोष, अभिनय, आणि काव्य यांचा या प्रवेशांत त्रिवेणीसंगम झाला आहे. यांच्या तोडीचा प्रवेश इतर नाटकांत क्वचितच ! ”

" बरं, वधूपरीक्षेंतील कोणता प्रवेश तुम्हांला आवडतो ? "

" वधूपरीक्षेंतील सर्वच प्रवेश मला आवडतात ! वधूपरीक्षेचा विशेष असा, कीं कोल्हट-करांच्या इतर नाटकांपेक्षां नाट्यप्रसंगा ( Situation ) चं वैचित्र्य विषयाच्या अनुषंगानं निर्माण करून शेवटी तें समीकरण सहज रीतीनं सोडविलं आहे हाच त्या नाटकाचा विशेष. तसंच काव्यापेक्षां अभिनयावर त्या नाटकांत भर दिली आहे. अन् त्या दृष्टीनं तें नमुनेदार नाटक आहे. केशवरावांच्या वेळेपासून अनेक नाटककारांशीं माझा परिचय झाला त्यांत तात्यांसारखे तात्याच असं म्हटल्याखेरीज राहावत नाहीं. "

# प्रेम आणि जीवन

: २५ :

# प्रो. वि. बा. आंबेकर, एम्. ए.

"या फुलावरून त्या फुलावर बसणाऱ्या भ्रमराची वृत्ति असते तीच वृत्ति आजकालच्या तरुण-तरुणींच्या प्रेमचाळ्यांमधें असते."

खालसा कॉलेजांतील प्रोफेसर आणि 'काळे ढग' या कादंबरीचे लेखक प्रो. वि. ब., आंबेकर, एम्. ए. यांनीं वरील उद्गार काढले.

अगदीं अल्प परिचयानें प्रो. आंबेकर यांच्यांतील एक गुण माझ्या नजरेला आला, अन् तो म्हणजे कोणत्याही प्रश्नाकडे अगर व्यक्तीकडेहि ते कधीं पूर्वग्रहदूषित दृष्टीनें पहात नाहींत. त्यांची दृष्टि टीकाकाराची आहे. पण त्या दृष्टींत जास्त विशुद्धपणा आहे. त्यामुळें वाङ्मयीन चर्चा करतांना त्यांच्या सहवासांत गढूळ वातावरण निर्माण न होतां खेळकर अन् सोज्ज्वळ वातावरण निर्माण होतें.

आजकालच्या वाङ्मयीन प्रश्नांची त्यांच्याशीं थोडीशी चर्चा केल्यावर मी त्यांना विचारलें, "कॉलेजांत असतांना तरुण तरुणींनीं प्रेमाच्या भानगडींत पडावं असं आपणांस वाटतं का?"

" प्रेमाला आधीं भानगड म्हणायला मी तयार नाहीं. " प्रो. आंबेकर यांनीं बोलायला सुरवात केली. " प्रेमांत अनिष्ट अन् अशिष्ट असं कांहीं नाहीं. अन् म्हणूनच मला असं वाटतं, कीं कॉलेजांतील तरुण—तरुणींनीं प्रेमांत पडायला कांहींच हरकत नाहीं. "

" विद्यार्थीदशेंत तरुण—तरुणी प्रेमाच्या आहारीं गेलीं तर त्यांच्या अभ्यासांत व्यत्यय येईल, अभ्यासावरचं त्यांचं लक्ष उडेल असं आपणांस वाटत नाहीं काय ? "

" अभ्यासांत प्रेम आड येण्याचं कांहीं कारण नाहीं. माझ्या माहितीचं एक विवाहित जोडपं आहे. कॉलेजांत प्रवेश केल्यापासून तीं एम्. ए होईपर्यंत एकमेकांवर प्रेम करीत होतीं. प्रेमांत अन् परीक्षेंत तीं दोघंही पास झालीं अन् त्यांनीं लग्न केलं. कुणालाही दाद लागूं न देतां मुलांमुलींनीं चोरून प्रेम केलं तर मात्र अभ्यासाकडे त्यांचं दुर्लक्ष होण्याचा जास्त संभव आहे. चोरून प्रेम केल्यामुळं असं होतं, कीं त्यांना एकमेकांच्या गांठीभेटी घेण्यांत बराच कालापव्यय करावा लागतो, अन् असा वेळ खर्च करूनही जर त्यांची एकमेकांची भेट झाली नाहीं तर तीं बेचैन होतात. त्याचा परिणाम असा होतो, कीं त्यांचं अभ्यासाकडे दुर्लक्ष होतं. "

" प्रत्येक मुलामुलींचे पालक कांहीं सुधारलेले नसतात. त्यामुळं सगळ्याच मुलांना उघड प्रेम करतां येतंच असं नाहीं. म्हणूनच तीं चोरट्या प्रेमाचा आश्रय घेतात "

" ही गोष्ट खरी आहे. पण त्यांतूनही मुलांमुलींना मार्ग काढतां येईल आपल्या मुलाचं किंवा मुलीचं लग्न व्हाव अशी प्रत्येक आई-बापाची इच्छा असते. त्यांचा एकच आग्रह असतो आणि तो हाच, कीं आपल्या मुलांना अनुरूप सहकारी मिळवा. अन् कॉलेजांत गेल्यावर आपल्या मुलांचीं लग्नं होऊं लागलीं तर कुणाही आईबापाला ' वधुवर-मंडळा 'त आपल्या मुलांचीं नांवं नोंदवावींशीं वाटणार नाहीत. "

" पण मुलांनीं ठरविलेल्या लग्नाला वडिलधाऱ्या माणसांचा विरोध होतो त्याला उपाय काय ? "

" एकमेकांवर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या माणसांना आयुष्यांत तडजोडीची वृत्ति स्वीकारावी लागतेच. प्रेमबद्ध तरुण-तरुणींनीं आपलं धोरण पालकांना समजून सांगितलं तर कलह मिटण्याचा संभव आहे. अन् न मिटला तर मुलांमुलींनीं धीर सोडायचं कारण नाहीं. वैचारिक मतभेद हे जगाच्या अंतापर्यंत चालू राहणारच. पण प्रेमप्रकरणाबाबत पालकांपेक्षां मुलांनाच मी जास्त दोष देतों. तीं आपल्या व्यक्ति-त्वाचा अन् आवडीनिवडीचा कधीं विचारच करीत नाहींत. आजकालच्या तरुण

तरुणींच्या प्रेमांत आत्यंतिकता अन् निष्ठा नसते. आजचे तरुण प्रणय ( Love-making ) करीत नाहींत. प्रेमचाळे ( Flirting ) करतात. हाच त्यांच्यांतील मोठा दोष आहे. तरुण–तरुणींनीं प्रणयांत आत्यंतिकता-निष्ठा दाखविली तर त्यांच्या जीवनाला त्या प्रेमामुळं स्थैर्य लाभेल. पण प्रेमचाळ्यांमुळं मात्र त्यांच्या मनाचा दिवसेंदिवस तोल सुटत जाईल. माणूस एका वेळीं एका व्यक्तीवरच प्रेम करूं शकतो. त्या प्रेमांत निष्ठा असते. पण प्रेमचाळयांत फार उच्छृंखलपणा असतो. निष्ठेचा अभाव असतो. ज्या विद्यार्थ्यानं आपल्या व्यक्तित्वाचा विचार केला आहे तो प्रेमचाळ्यांच्या कधींच भानगडींत पडणार नाहीं. प्रेमांत पावित्र्य आणि प्रीति पाहिजे."

"प्रेमभंगानंतर कुणी पुनः प्रेमांत पडूं नये असंच आपणांस म्हणायचं आहे का?"

"नाहीं." प्रो. आंबेकर यांनीं बोलायला सुरवात केली, "पहिल्या प्रेम-भंगानंतर दाट परिचयानं तरुण–तरुणी पुनः प्रेमांत पडतील, नाहीं असं नाहीं. अन् इथंही निष्ठेचा प्रश्न उद्भवतोच. एकाच वेळीं, एक व्यक्ति ज्या वळीं अनेकांवर प्रेम करीत नाहीं असं दिसतं त्या वेळीं त्याला निष्ठा म्हणतां येईल. Love is a science. It has to be studied properly. पण आजच्या तरुणांच्या प्रेमशास्त्रांत निष्ठेला जागाच नाहीं. Nothing is sacred under the sun अशी त्यांची वृत्ति आहे. या फुलावरून त्या फुलावर बसणाऱ्या भ्रमराची जी बेफिकीर अन् अस्थिर वृत्ति असते तीच वृत्ति आजकालच्या तरुणतरुणींच्या प्रेमचाळयांमधें असते."

"तुमच्या कॉलेजांतील प्रेमबद्ध तरुणतरुणी प्रणय करतांना तुमच्या नजरेला पडलीं तर तो त्यांचा शिस्तभंग आहे असं तुम्हांला वाटेल काय?'

'त्यांनीं आपली वैयक्तिक जबाबदारी अन् मर्यादा सांभाळून प्रणय केला तर आक्षेप घेण्याचं कारण नाहीं."

"कॉलेजांतील मुलांपैकीं प्रेमाच्या बाबतींत तरुण Offensive असतात कीं तरुणी?"

"खरं सांगायचं म्हणजे मुलगे लाजाळू असतात. ते लांबून मुलीवर प्रेम करतील, त्यांची टिंगल करतील. पण तरुण–तरुणी समोरासमोर आलीं तर मात्र मुलगे बायकांप्रमाणं लाजतील!"

" आपण वृत्तपत्रांतील कॉलेजवृत्तं नजरेखालीं घातलीं तर प्रेम केल्याबद्दल मुली मुलांना एकाद्या वेळीं मारही देतात अशा बातम्या प्रसिद्ध झालेल्या आढळून येतात. याबाबत आपलं काय मत आहे ? "

"एकाद्या वेळीं असं होतं, कीं तरुण विद्यार्थी मुलींवर एकतर्फी प्रेम करतात. मुलांची त्या बाबतींत चूक होते. पण मारणं हा कांहीं त्यावरचा उपाय नव्हे. प्रेम करतो म्हणून त्या तरुणाचा द्वेष करण्याऐवजीं त्याची सन्मान्य मार्गानं समजूत पाडली तर तें जास्त शिष्टाचाराचं होईल."

" कॉलेजांतील आजच्या अभ्यासक्रमांत Sex problem चा अंतर्भाव करण्यांत आलेला नाहीं. ही अभ्यासक्रमांत उणीव आहे असं आपणांस वाटत नाहीं का ? "

" मला ही उणीव भासत नाहीं. इंग्रजी भाषेचा योग्य अभ्यास झालेला कुणीही विद्यार्थी Sex problem वरील पुस्तकं वाचूं शकेल. त्याला कांहीं कुणी बंदी केली नाहीं. शिवाय या ज्ञानाच्या अभावीं कुणाचं कांहीं अडलं आहे असं नाहीं ! " प्रो. आंबेकर हंसत हंसत म्हणाले.

: २६ :

# प्रो. वि. ह. कुळकर्णी, एम्. ए.

“आजचीं कॉलेजमधील जीं मुलं आहेत त्यांचा वयपरत्वें शारीरिक वासनेचाच तेवढा विकास झालेला असतो. इतर गोष्टींच्या विकासाकडे त्यांचं लक्ष नसतं, किंवा परिस्थितीमुळं त्यांना तें देतां येत नाहीं. बौद्धिक विकास न झाल्यामुळं अन् आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळं त्यांच्यांत जबाबदारीची जाणीव नसते.” असें मत अंधेरीच्या इस्माइल यूसफ कॉलेजचे प्रोफेसर वि. ह. कुळकर्णी, एम्. ए. यांनीं व्यक्त केलें.

“पण कॉलेजांतील मुलांचं मुलींविषयींचं वर्तन हें त्यांच्या लैंगिक वासनेचं केवळ दुबळं व विकृत प्रदर्शन असतं. प्रेमाच्या बाबतींत अनभिज्ञ आणि आत्मविश्वासाला पारखे असल्यामुळं त्यांच्या प्रेमचेष्टा या केवळ प्रायोगिक स्वरूपाच्या असतात, व त्यामुळं त्यांचं वर्तन जबाबदारीची जाणीव असलेल्या तरुणासारखं नसतं.”

“ही जबाबदारी ओळखून त्यांनीं प्रेम केलं तर आपला विरोध आहे का ?”

" खरं म्हटलं तर प्रेमाला विरोध असण्याचं कांहींच कारण नाहीं. पण तरुणांनीं जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. पूर्वीच्या दृष्टीनं विचार केला तर आजचे कॉलेजमधले तरुण मुलाबाळांचे बाप शोभण्यासारखे असतात. त्यांच्या शरीरिक वासनांचा विकास झालेला असतो. पण बौद्धिक विकासाच्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यांचं दुर्लक्ष झालेलं असतं. माझं असं मत आहे. कीं मुलांमुलींनीं आर्थिक दृष्ट्या स्वतंत्रता मिळविल्याशिवाय त्यांना प्रेमाबरोबर येणाऱ्या जबाबदारीची जाणीव येणं शक्य नाहीं. "

" एखाद्या तरुण–तरुणीनं कॉलेजांत असतांना प्रेम केलं अन् आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यावर लग्न केलं तर ? "

" तसं करायला कांहींच हरकत नाहीं. इतक्या जिव्हाळ्यानं प्रेम करण्याला अनुकूल असं कॉलेजचं वातावरण नसतं. कॉलेजांतलीं मुलं इतक्या मनमोकळेपणाच्या आत्यंतिक सान्निध्यांत येत नसतात; आणि कांहीं तशीं सान्निध्यांत आलीं आणि त्यांनीं आपल्या आवडी–निवडीचा विचार करून भावी सहजीवनाचे मनोरे रचले तर त्यांत अनैसर्गिक असं कांहीं नाहीं. "

" तुमच्या कॉलेजांतली एकादी तरुणी तरुणाच्या प्रेमपाशांत सांपडल्याचं तुम्हांला आढळून आलं तर तुम्हांला काय वाटेल ? त्या प्रेमाला तुम्हीं विरोध कराल काय ? "

" मला कांहींच वाटणार नाहीं आणि विरोध करायचं तर मुळींच कारण नाहीं. आणि दुसरीही गोष्ट म्हणजे अशी, कीं कोणती तरुणी कुणाच्या प्रेमपाशांत सांपडली आहे हें कळायला कांहीं मार्गही नसतो. कारण तरुण–तरुणी एकत्र आलीं, कीं त्यांना एक प्रकारचं आकर्षण वाटणं स्वाभाविक असतं. त्यामुळं तीं एकमेकांभोंवतीं घुटमळत असतात. अशा स्थितींत कुणाचं प्रेम कुणावर आहे हें कळणार कसं ? "

" प्रेमाची भावना जर नैसर्गिक आहे असं तुम्हांला वाटतं तर जबाबदारीचा प्रश्न कुठं उपस्थित होतो ? "

" प्रेमाला संपूर्ण स्वातंत्र्य असावं हें खरं; पण ज्या समाजांत तरुण–तरुणींना राहावं लागतं त्या परिस्थितीचा त्यांनीं विचार केला पाहिजे. बर्नार्ड शॉचं Life force चं तत्त्व अनिर्बंध प्रेमाला परिपोषक आहे. प्रेमाच्या बाबतींत आज असलेलीं कृत्रिम सामाजिक बंधनं निसर्गनियमाला सर्वस्वीं धरून नाहींत. निसर्गनियमाप्रमाणें पहायचं झालं तर भावी पिढी आपल्यापेक्षां जास्त वरच्या दर्जाची होईल, अशी खात्री असलेल्या तरुणावरच स्त्री अभावितपणं प्रेम करते, हें तत्त्व बर्नार्ड शॉनं मॅन ॲन्ड सुपरमॅन नाटकाच्या प्रस्तावनेंत स्पष्ट केलं आहे. "

नगर वाचनालय, सातारा.

" म्हणजे कोणत्याही स्त्रीनं केलेली आपल्या भागीदाराची निवड योग्य असते असंच आपलं मत आहे का ? "

" आपल्याला अनुरूप असा भागीदार निवडण्याची प्रत्येक स्त्रीमधें उपजत बुद्धि असते. पण कृत्रिम बंधनानं ती बुद्धि मारली जाते, त्यामुळं साधकबाधक परिस्थितीचा विचार करून स्त्रीला आपला जोडीदार निवडावा लागतो. पण स्त्रीला आपल्या समाजांत इतकंही स्वातंत्र्य नसतं. हीं सामाजिक बंधनं वाईट आहेत खरीं. पण तीं जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत त्यांचा विचार करूनच त्यांतून मार्ग शोधून काढिला पाहिजे."

" No man ever yet fell in love with the entire female sex, nor any woman with the entire male sex. असं जें शॉनं म्हटलं आहे तें तुम्हांला मान्य आहे ना ? "

" अर्थातच ! " प्रो. कुळकर्णी यांनीं उत्तर दिलें. " स्त्री आणि पुरुष हीं आयुष्यांत पहिल्यानं आत्यंतिकतेनंच प्रेम करतात. पण नंतर त्यांची जी विकृत मनःस्थिति होते याचं कारण त्यांच्या प्रेमाआड कृत्रिम बंधनं येतात म्हणूनच. "

" आजच्या तरुण-तरुणींच्या विकृत मनोवृत्तीबद्दल समाजच जबाबदार आहे असंच तुमचं मत आहे ना ? "

" हें तर खरंच. कुणावरही प्रेम केल्यानंतर त्या प्रेमाच्या मार्गांत बंधन येण्याची जर भीति नसली तर प्रेमाला प्रामाणिकपणाचं आणि पवित्र स्वरूप येईल. पण आज ती परिस्थिति नाहीं. तेव्हां मुलांनीं आपला मगदूर पाहूनच वागलं पाहिजे. आजच्या परिस्थितींत हाच एक तरणोपाय आहे. "

" प्रेमाच्या बाबतींत तरुणी संयमी असतात कीं तरुण ? "

" आतांपर्यंत वाङ्मयांत असं दाखविलं गेलं आहे, कीं पुरुष आपल्या सहधर्मिणीची निवड करतो व तिला मागणी घालतो. पण वस्तुस्थिति निराळी आहे. खरं पाहिलं तर स्त्री पुरुषाची निवड करते. पण सामाजिक बंधनामुळं तिला आपल्या आवडीनिवडी प्रकट करून दाखवितां येत नाहींत. मॅन ॲन्ड सुपरमॅनच्या प्रस्तावनेंत शॉनं तें स्पष्ट केलं आहे. Give women the vote, and in five years there will be a crushing tax on bachelors असंही त्यानं प्रस्तावनेंत म्हटलं आहे. "

"कॉलेजमधें असतांना किंवा कुठंही प्रेमाला पूर्ण स्वातंत्र्य मिळावं असंच आपलं मत आहे ना ?"

" पण जोंपर्यंत अशी परिस्थिति निर्माण होणार नाहीं तोंपर्यंत तरुण-तरुणींनीं विशेषतः तरुणींनीं आपली नैसर्गिक जबाबदारी ओळखून वागावं. कारण स्त्रीवर मोठी जबाबदारी असते—मातृत्वाची जबाबदारी असते. "

मोग्यांपीमुलाखती/१८१—
ए. वि.
देसाई
आवक ४०

# आमचेकडे मिळणारीं पुस्तकें

## लायब्ऱ्या व व्यापारी यांना भरपूर कमिशन मिळेल

| पुस्तकाचें नांव | लेखक | रु. | आ. |
|---|---|---|---|
| विरलेलें वस्त्र | | १ | १२ |
| धर्मशास्त्र | (काणे) | २ | ८ |
| लो. टिळक | (मराठे) | ० | १२ |
| मुलांचा भक्तिमार्ग | | ० | ८ |
| सोन्याचा कळस | (वरेरकर) | १ | ० |
| मराठ्याची मुलगी | (कमतनूरकर) | १ | ० |
| भस्मासूर नाटक | | ० | ८ |
| वीरवंचना नाटक | | ० | ८ |
| पटवर्धन नाटक | (टेंबे) | १ | ४ |
| सवता सुभा | (गुप्ते) | ० | १२ |
| छेडलेला छावा | (कोठीवाले) | १ | ० |
| पतितपावन | (वरेरकर) | ० | १२ |
| सज्जन | (कमतनूरकर) | १ | ० |
| संततिनियमन (हिंदी) | कर्वे | ० | ८ |
| स्वामी रामतीर्थ भा. २, ३, ४ | | | |
| वीर वैरागी | (सावरकर) | १ | ० |
| मानसपूजा | (कोल्हटकर) | १ | ४ |
| ब्रँडीची बाटली | (प्र. के. अत्रे) | १ | ४ |
| वठलेला वृक्ष | (कु. गीता साने) | १ | ८ |
| स्नेहप्रभा | (कंळुसकर) | १ | ० |
| बहर | (व. ना. वैद्य) | १ | ० |
| निखळलेली हिरकणी | (कु. गीता साने) | १ | ० |
| जागत्या छाया | (अनंत काणेकर) | १ | ४ |

| पुस्तकाचें नांव | लेखक | रु. | आ. |
|---|---|---|---|
| शिंपले व मोतीं | (काणेकर) | ० | १२ |
| पिकलीं पानें | ,, | १ | ४ |
| श्रीकान्त | (य. गो. जोशी) | १ | ० |
| त्रिदोष | ,, | १ | ० |
| तुळशीपत्र | ,, | १ | ८ |
| वादळ | (हडप) | १ | ८ |
| अंजन | (गुर्जर) | १ | ४ |
| जीवननृत्य | (निरंतर) | १ | ८ |
| आघात | (भा. वि. वरेरकर) | १ | ० |
| अंधारांतील दिवे | (निरंतर) | १ | ४ |
| लतिका | (कु. गीता साने) | १ | ० |
| हिरवळीखालीं | ,, | १ | ८ |
| वेणू वेलणकर | (भा. वि. वरेरकर) | १ | ८ |
| उमलती कळी | ,, | १ | ८ |
| मृगजळ | (मो. ग. रांगणेकर) | २ | ० |
| देशमुखवाडी | (नाथमाधव) | २ | ८ |
| काजवे | (शंकर साठे) | १ | ० |
| वादळापूर्वी | (सौ. कमलाबाई सोहनी) | १ | ८ |
| वॅ सावरकर चरित्र | | १ | ० |
| पहांटेपूर्वीचा काळोख | (ना. ह. आपटे) | २ | ० |
| महाराष्ट्र शारदा | (केळकर) | १ | ० |
| शकुनी मोहोर | (कुमुदिनी प्रभावळकर) | १ | ४ |

| पुस्तकाचें नांव | लेखक | रु. | आ. |
|---|---|---|---|
| संततिनियमन | (ना. सी. फडके) | १ | ४ |
| कुठें ? | (कमलाबाई) | १ | ० |
| शृंगेरीची लक्ष्मी | (भानू) | २ | ० |
| मुलींची द्रौपदी | (किनरे) | १ | ८ |
| महात्मा गांधी | (सीताकान्त) | १ | ८ |
| ठगाची जबानी | | ३ | ० |
| शेतकी | (बालमहाजन) | ३ | ८ |
| साबणाचे फुगे | (जोगळेकर) | १ | ४ |
| देवपूजा | (शिंदे) | १ | ० |
| अनियमित जग | (कुमुदिनी प्रभावळकर) | १ | ८ |
| अनारकली | | १ | ० |
| राक्षसी रणसंग्राम | (ल. ना. जोशी) | १ | ० |
| माधवानुज [कविता] | (मोडक) | २ | ० |
| गोमंतक | (सावरकर) | २ | ० |
| रातराणी | (सरपोतदार) | १ | ० |
| राणी कीं रखेली | (हडप) | २ | ० |
| सौंदर्याचा फुलबाग | ,, | २ | ८ |
| मास्तरीण काकू | ,, | १ | ८ |
| बाईलवेडा | ,, | २ | ० |
| निरभ्र चन्द्र | ,, | १ | ८ |
| नंदनवन | ,, | ० | १२ |
| झांकली मूठ | ,, | १ | ० |
| वांकडें पाऊल | ,, | १ | ० |
| हाच माझा सम्राट | ,, | १ | ८ |

| पुस्तकाचें नांव | लेखक | रु. | आ. |
|---|---|---|---|
| रूढीच्या वणव्यांत | (हडप) | १ | ८ |
| चिरंजीवी | ,, | १ | ० |
| लग्नलांछन | ,, | १ | ० |
| उघडझांप | (वरेरकर) | १ | ८ |
| स्वैरसंचार | (वरेरकर) | २ | ० |
| निर्माल्यांतील कळी | (प्रभावळकर) | १ | ४ |
| हिंदु लग्नसंस्था | (निमकर) | २ | ० |
| स्त्रीहृदय | (सहृदय) | १ | ४ |
| शुक्राची चांदणी | (साळगांवकर) | ० | १२ |
| लोकमान्य टिळक भा. २ व ३ | केळकर | | |
| निरंजन | (फडके) | २ | ० |
| अटकेपार | ,, | २ | ८ |
| भविष्य प्रचीति | (नाथमाधव) | १ | ८ |
| सापत्नभाव | ,, | २ | ० |
| कथाकलाप | (विद्यार्थी) | १ | ० |
| मरण कीं लग्न ? | (सावरकर) | १ | ८ |
| कुलदैवत | (वरेरकर) | १ | ८ |
| विकारी वात्सल्य | ,, | १ | ८ |
| लपलेले खडक | (सहस्रबुद्धे) | १ | ४ |
| साम्राज्यासाठीं | (नाशिककर) | २ | ८ |
| किशोरीचें हृदय | (दिवाकर कृष्ण) | १ | ८ |
| अभागिनीची डायरी | (उपाध्ये) | १ | ४ |
| दैवदर्पण | (ज्योतिष) | ३ | ० |
| अचानक द्रव्यनिधि | (बाळ महाजन) | २ | ० |
| संख्याशास्त्र | | १ | ० |



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

| पुस्तकाचें नांव | लेखक | रु. | आ. |
|---|---|---|---|
| समोरासमोर | ( वरेरकर ) | १ | ० |
| गौरीशंकर | | १ | ८ |
| वहकलेली तरुणी | ( हडप ) | १ | ८ |
| समर्थ भिकारी | ( वरेरकर ) | १ | ० |
| काकाची शशी | ( माई वरेरकर ) | १ | ० |
| विनोदी लेखसंग्रह | | १ | ८ |
| मुलींचें कॉलेज | | ० | ६ |
| गोदू गोखले भा. १ला. | (वरेरकर) | १ | ८ |
| ,, ,, भा. २ रा. | ,, | १ | ८ |
| आग्र्याहून सुटका | ( औंधकर ) | १ | ० |
| कमळाच्या पाकळ्या | ( बंबेवाले ) | १ | ८ |
| वेड्यांचा बाजार | ( गडकरी ) | १ | ० |
| पूर्णिमा भा. १।२ | ( मुजुमदार ) | १ | ४ |
| मुलींची सीता | ( किनरे ) | १ | ४ |
| मृत्युच्या मांडीवर | ( भोपटकर ) | १ | १२ |

| पुस्तकाचें नांव | लेखक | रु. | आ. |
|---|---|---|---|
| केळकर | ( चरित्र ) | १ | ४ |
| संन्यस्त खड्ग | ( सावरकर ) | १ | ० |
| रणदुंदुभि | ( वीर वामन जोशी ) | १ | ४ |
| वऱ्हाडचा पाटील | (माधवराव जोशी) | ० | १२ |
| श्री | ( कमतनूरकर ) | १ | ४ |
| गिरणीवाला | ( मा. जोशी ) | ० | १२ |
| वशीकरण | ,, | ० | ८ |
| विश्ववैचित्र | ,, | १ | १२ |
| स्वामी रामतीर्थ भा. ५ वा | | २ | ८ |
| ताडगोळे | ( आठवले ) | १ | ० |
| बाँबगोळे | | १ | ४ |
| मृगजलावरील नौका | ( नाईक ) | २ | ० |
| नंदादीप | ,, | १ | ४ |
| उंबराचें फूल | ( सरमळकर ) | १ | ४ |
| मोरपिसें | ( काणकर ) | १ | ४ |

**हिरजी मोहनजी** शंकरबारीलेन, लोहाणा सिनेट्री,
३ रा मजला, रुम नं. १४५ मुंबई नं. २